म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

वी प्रवासवृत्तमाला

५ वे

# गाडीची चक्कर



श्रीमत् छत्रपति शिवाजीमहाराज
यांचें जन्मघर.

REFBK-0005414

गो. चि. भाटे

सन १९३५

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. मु. प्र. नं. ९१६
ता.
ठाणें.

प्रि. भाटे यांची प्रवासवृत्तमाला

पुष्प पांचवें

# आमचीं पायगाडीचीं चक्रें

लेखक व प्रकाशक :

गोविंद चिमणाजी भाटे

पुणें डे. ए. सोसायटीचे सेवानिवृत्त आजीव सभासद

REFBK-0005414

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १। रुपाया

मुद्रक :
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.,
आर्यभूषण प्रेस, भांबुर्डा पेठ, घर नं. ९३६।३
पुणें, नं.

प्रकाशक :
गोविंद चिमणाजी भाटे,
महाड, जिल्हा कुलाबा.



श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन
मिरज ( ज्यूनिअर ) संस्थानचे अधिपति

श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन
मिरजमळा संस्थानचे अधिपति

यांचे चरणीं

साधेपणा, सुलभदर्शनता, व्यायामप्रियता व
अश्वकलानिपुणता या श्रीमंतांच्या गुण-
चतुष्टयाचें कौतुक करणाऱ्या व त्यांच्या
शीतल सान्निध्यांत घालविलेल्या
आयुष्यांतील एका तपाचें
चिंतन करणाऱ्या लेखकानें
हें पुस्तक
सादर व सप्रेम

**अर्पण**

केलें आहे.

गो. चि. भाटे

स्थळ
सं. ........ नं.
ता. ........
ठाणें.

# प्रस्तावना

माझ्या प्रवासवृत्तमालेंतील या पुष्पाला स्थलमर्यादा किंवा कालमर्यादा नाहीं. वेगवेगळ्या वेळीं निरनिराळ्या स्थळांच्या दर्शनार्थ मिळतील त्या सोबत्यांसमवेत मीं पायगाडीचीं चक्करें मारलीं व सवडीप्रमाणें व निरनिराळ्या निमित्तानें मीं त्या प्रवासप्रसंगांचीं वर्णनें वेगवेगळ्या मासिकांत लिहिलीं. या सर्व विस्कळीत वर्णनांना एकत्रित करणारा व एका नांवाखालीं आणणारा सूत्रबंध म्हणजे माझा स्वतःचा अनुभव होय. हें व दुसरें एक पुस्तक मी दहाबारा वर्षांपूर्वीच प्रसिद्ध करणार होतों. मी एका तरुण होतकरू प्रकाशकाला माझें दुसरें पुस्तक प्रकाशनास दिलें होतें. त्यानें पुस्तकाचें सर्व छपाईकाम ज्या छापखान्यांत दिलें होतें त्या छापखान्याच्या मालकानें या होतकरू प्रकाशकाची भावोदानत ओळखून म्हणा किंवा छपाईबद्दल एक पैही न मिळाल्यामुळें म्हणा फर्मे अडकवून ठेवले व मग बऱ्याच महिन्यांच्या विलंबानंतर छापखान्याचें सर्व बिल चुकतें करून तें पुस्तक मला स्वतःलाच प्रसिद्ध करावें लागलें. या चक्करमालेच्या पुस्तकाची **मुद्रणप्रत** तयार करून मीं या प्रकाशकाजवळ दिली होती. पुढें ती प्रत मी त्यांचेजवळून परत घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना पत्रें लिहिलीं, त्यांच्या स्नेह्यांमार्फत रदबदली केली; पण या प्रकाशकबहाद्दरांनीं मुळींच दाद दिली नाहीं व माझी प्रत मला परत मिळाली नाहीं. असे ते **ते के न जानीमहे** कोटीपैकीं आहेत असें माझ्या कटु अनुभवास आलें. त्यामुळें त्यावेळीं हें पुस्तक छापण्याचें काम राहूनच गेलें. गेल्या वर्षी मीं जेव्हां प्रवासवृत्तमालेची एकसांची स्वतंत्र आवृत्ति काढण्याची योजना केली तेव्हां 'आमचीं पाय-गाडीचीं चक्करें' या पुष्पाच्या छपाईची जाहिरात दिली खरी; पण ह्यात असलेल्या व अस्तंगत झालेल्या निरनिराळ्या मासिकांमध्यें लिहिलेले लेख कसे जमवावे या विवंचनेमध्यें मीं असतांना मला सहज माझे मित्र रा. नरहरपंत फाटक भेटले. त्यांना मीं आपली अडचण व विवंचना सांगितली. तेव्हां त्यांनीं मला म्हटलें कीं 'तुमचे सर्व लेख व मासिकांतील निरनिराळ्या लेखकांचे लेख एकत्र करून त्यांचा संग्रह करण्याचा नाद असलेल्या एका गृहस्थाजवळ मीं पाहिले आहेत.' हें ऐकून लेख जमविण्याची माझी विवंचना दूर झाली व एखाद्यास देव भेटून आनंद व्हावा तसा मला आनंद वाटला. मला

माझ्या या पुस्तकप्रकाशनाच्या एकाच कामांत भर्तृहरीनें वर्गीकरण केलेल्या दोन परस्पर विरुद्ध तऱ्हेच्या कोटींतील गृहस्थ भेटले याचें राहून राहून आश्चर्य वाटत होतें. खुद्द लेखकाजवळ नसलेले लेख व त्याला आपण लेख लिहि- ल्याची आठवण नसलेले लेख यांचा लेखसंग्रह ज्या गृहस्थाजवळ सांपडतो ते गृहस्थ भर्तृहरीच्या **उत्तमकोटीं**तील गृहस्थ होत यांत शंका नाहीं.

रा. फाटकांनीं माझी अडचण त्या गृहस्थांना कळविली व लेख मागितले व आनंदाची गोष्ट ही कीं, त्या गृहस्थांनीं लागलीच माझे ते सर्व लेख ताबडतोब मजकडे पाठविले. त्या गृहस्थाचें नांव **श्री. राजाराम सखाराम शिरवळकर** हें होय. तेव्हां रा. शिरवळकरांचा मी अत्यंत आभारी आहें हें सांगावयास नको. कारण त्यांनीं माझी किती तरी खटपट वांचविली. अशा सद्‌गृहस्थांची मीं ओळख करून घेतली आहे व सवडीप्रमाणें त्यांचा लेखसंग्रह पाहण्यास मीं जाण्याचा बेत केला आहे.

अशी या पुष्पप्रकाशनाची हकीकत आहे. सध्यांचें पुस्तक तयार करतांना दोन लेख मीं नवेच लिहिले आहेत व पूर्वींच्या लेखांतील अर्धवट राहिलेला भाग लिहून पुरा केला आहे. या पुस्तकाची सूची तयार करण्याचें व सर्व प्रुफें तपासून पुस्तक छापून घेण्याचें त्रासदायक व किचकट काम माझे कविमित्र प्रो. शंकर केशव कानेटकर (गिरीश) यांनीं केलें याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. माझ्या बऱ्याच मोठ्या प्रमाणावरील पुस्तकप्रकाशनास माझ्या मित्रमंडळींची मदत मिळत आहे म्हणूनच हें काम इतक्या झपाट्यानें व निय- मितपणें होत आहे. अर्थात् या कामास छापखान्यांतील मंडळींचें सहकार्य आहेच. तेव्हां त्यांचाही मी आभारी आहें.

या पुस्तकांत छापलेल्या त्र्यंबकच्या चित्रांचे फोटो मला रा. शिवराम केशव साने यांचेकडून, सातारा परळीचे रा. बखले वकील सातारा यांचेकडून व किल्ल्यांचे फोटो श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचेकडून मिळाले याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहें.

ता. १४ जानेवारी सन १९३५.
मकरसंक्रांत, महाड,
जिल्हा कुलाबा.


गो. चि. भाटे

# अनुक्रमणिका.


| चक्कर | नांव | पानें |
|---|---|---|
| १ | मांजरी येथील शेतकीचें प्रयोगक्षेत्र ... ... | १–११ |
| २ | तुकारामाचें जन्मग्राम... ... ... | १२–२५ |
| ३ | जुन्नर व शिवनेरी किल्ला ... ... | २६–५४ |
| ४ | पुरंदर किल्ला ... ... ... | ५५–७३ |
| ५ | सज्जनगड–सातारा किल्ला ... ... | ७४–१०१ |
| ६ | कृष्ण वारणा संगमग्राम ... ... | १०२–१११ |
| ७ | सिंधुदुर्ग–विजयदुर्ग ... ... ... | ११२–१३५ |
| ८ | सुभेदार मल्हाररावांचें जन्मग्राम ... ... | १३६–१४४ |
| ९ | नाशिक व त्र्यंबकेश्वर ... ... ... | १४५–१७८ |
| १० | उपसंहार ... ... ... | १७९–१८१ |

# चित्रांची अनुक्रमणिका.


| नं. | नांव | पान |
|---|---|---|
| | श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन, मिरजमळा संस्थानचे अधिपति | प्रारंभीं |
| | महाराष्ट्राचा नकाशा | १ |
| १ | शिवनेरी किल्ला : दुरूनचा देखावा | ४४ |
| २ | शिवनेरी : शिवाईचें देऊळ | ४५ |
| ३ | पुरंदर किल्ला : दुरूनचा देखावा | ४५ |
| ४ | पुरंदर किल्ला : केदारेश्वराचें देऊळ | ४५ |
| ५ | सज्जनगडावरील राममंदिर | ८८ |
| ६ | सज्जनगडचा दुरूनचा देखावा | ८९ |
| ७ | साताऱ्च्या किल्ल्याचें प्रवेशद्वार | ९६ |
| ८ | साताऱ्चा किल्ला : शहराकडून देखावा | ९७ |
| ९ | हरिपुर : चिंचबनांतील राई | १०४ |
| १० | हरिपुर : चिंचबनांतील गणपतीचें देऊळ | १०४ |
| ११ | हरिपुर : कृष्णेवरील घाट | १०५ |
| १२ | कृष्णावारणा संगमस्थळ | १०५ |
| १३ | हरिपुर : कृष्णाबाईचें देऊळ | १०६ |
| १४ | हरिपुर : संगमेश्वराचें देऊळ | १०७ |
| १५ | सिंधुदुर्ग : दुरूनचा देखावा | १२४ |
| १६ | सिंधुदुर्ग : प्रवेशद्वार | १२५ |
| १७ | नाशिक : पुलावरून दिसणारा देखावा | १६६ |
| १८ | पंचवटी | १६६ |
| १९ | नाशिक : सुंदरनारायणाचें देऊळ | १६७ |
| २० | नाशिक : नारोशंकराचें देऊळ | १६७ |
| २१ | त्रिंबक : गंगेची मूर्ति | १७६ |
| २२ | त्रिंबक : त्रिंबकेश्वराचा मुकुट | १७६ |
| २३ | त्रिंबक : श्री त्र्यंबकेश्वराचें देवालय | १७८ |
| २४ | त्र्यंबकेश्वराच्या देवळांतील नक्षीकाम | १७७ |
| २५ | त्रिंबक : कुशावर्त | १७७ |
| २६ | नाशिक : काळ्या रामाच्या देवालयाचें महाद्वार | १७७ |


गुजराथ
मध्य हिंदुस्तान
नाशिक
नाशिक
सिन्नर
संगमनेर
अहमदनगर
मुंबई
खंडाळा
पुणे
सासवड
नीरा नदी
फलटण
सातारा
परळी
सांगली
मिरज
कोल्हापूर
फोंडाघाट
विजयदुर्ग
देवगड
(सिंधुदुर्ग)
सोलापूर
सोलापूर
विजापूर
महाराष्ट्राचा
नकाशा.
Eelodyan press

सं. ... ता. ... ८२८३ ... ठाणें ... ५४०६

# आमचीं पायगाडीचीं चक्करें

## चक्कर पहिलें

### मांजरी येथील शेतकीचें प्रयोगक्षेत्र

जलद प्रवासाचीं साधनें या दृष्टीनें आगगाडी, मोटारगाडी आणि पायगाडी या तीन पायऱ्या होत. आगगाडीचा वेग सर्वांत मोठा, त्याच्या खालोखाल मोटारगाडीचा, व सर्वांत कमी पायगाडीचा असतो. याचें कारणहि उघड आहे. आगगाडी वाफेच्या शक्तीनें चालणार, मोटार पेट्रोलच्या शक्तीनें चालणार, तर पायगाडी मनुष्याच्या अंगशक्तीनें चालणार. पण या तिहींमध्यें खर्चाच्या दृष्टीनें, हुकमीपणाच्या दृष्टीनें व सुलभपणाच्या दृष्टीनें पायगाडीच जास्त उपयुक्त होय. आगगाडीला आधीं स्वतंत्र रूळांचा रस्ता लागतो, व हें काम भारी खर्चाचें आहे. यामुळें सरकार किंवा समाईक भांडवलाच्या मंडळ्या यांखेरीज इतरांना असलीं साधनें उपलब्ध होणें शक्य नाहीं. एकादी खासगी व्यक्ति आगगाडी करूं शकणार नाहीं. कोंकणांत आगगाडी व्हावी, अशी आमची पुष्कळ इच्छा आहे, पण त्याचा उपयोग काय? ती गोष्ट एकाद दुसऱ्याच्या हातची नाहीं. मोटारगाडी व पायगाडी यांना स्वतंत्र रस्ते लागत नाहींत; यामुळें अशीं साधनें खासगी व्यक्तींना घेणें शक्य आहे. पण मोटारगाडी घेणें श्रीमंत माणसालाच शक्य आहे. कारण,

आधीं गाडीलाच किंमत फार पडते, आणि तिचा रोजचा खर्चेहि जबर असतो. पण पायगाडीचें तसें नाहीं. तिला मूळ किंमत फार पडत नाहीं. पन्नास रुपयांपासून दोनअडीचशें रुपयांपर्यंत रक्कम असली कीं बस्स. तिचा रोजचा खर्च तर मुळींच नाहीं. स्वतःचे हातपाय धडधाकड असले, म्हणजे हें वाहन नेहमीं आपलें तयार ! घोड्याप्रमाणें त्याला दाणा नको, वैरण नको, किंवा त्याची चाकरी करण्याचीहि गरज नाहीं. त्याला रोगमृत्यूंचें भय नाहीं. असें हें सर्वसुलभ, बिनखर्चाचें व सोयीचें साधन आहे. म्हणूनच या पायगाडीचा थोडक्या काळांत इतका प्रसार झाला आहे.

ज्याप्रमाणें अलीकडे किटसनचे दिवे गांवोगांवीं गेले आहेत, त्याचप्रमाणें पायगाड्याहि गांवोगांवीं पसरल्या आहेत. कारण, बैलगाडीपेक्षां पायगाडी ही कितीतरी जलद चालणारी आहे. बैलगाडीनें सबंध दिवसांत बाराचौदा कोसांचा प्रवास झाला म्हणजे शिकस्त. तोच प्रवास पायगाडीनें तीनचार तासांत करतां येतो.

मला ज्याप्रमाणें आगगाडीनें लांबलांब प्रवास करण्याचा नाद आहे, त्याप्रमाणें पायगाडीनेंहि लांबलांब सहल करण्याचा नाद आहे. यायोगें एक तर व्यायाम होतो, व जवळपासचीं प्रेक्षणीय ठिकाणें थोडक्या वेळांत पहातां येतात. मीं एकदां पायगाडीनें कोंकणांत बराच प्रवास केला होता. बैलगाडीनें जे मैलांचे दगड यावयाला अर्धाअर्धा तास लागावयाचा, तेच मैलांचे दगड पांचसात मिनिटांत मागें टाकतां येतात, हें पाहून प्रथमतः आपणाला किती आश्चर्य वाटतें ! आपल्याला काय पंख फुटले आहेत किंवा आपल्याला वायुगति आली आहे, असा भास होतो. या प्रवासांत मी एका दिवसांत जेव्हां साठपांसट मैलांचा पल्ला गांठला, तेव्हां तर मला अवर्णनीय आनंद झाला, व पायगाडीचा शोध अलीकडील सर्व शोधांत पहिल्या नंबरचा होय, असें मला वाटूं लागलें.

गेल्या दोन वर्षांत मला आगगाडीच्या लांबच्या प्रवासाला जाण्याची सवड सांपडली नाहीं. म्हणून या गेल्या सुट्टींत मी पायगाडीनें दररोज

लांबलांब चक्करें घेण्याचा परिपाठ सुरू केला. माझे एक स्नेही नुकतेच पायगाडीवर बसण्याला शिकले होते, त्यांना जास्त सराव करावयाचा होता. तेव्हां त्यांनीं व मीं रोज बरोबर सहल करण्याचा बेत केला.

आम्हीं आपल्या पायगाडीच्या चक्करांचे दोन भाग केले. एक **नित्य** व दुसरा **नैमित्तिक.** रोज सकाळीं किंवा सायंकाळीं शहराबाहेर दहापांच मैल जाऊन यावयाचें, हें आमचें '**नित्य**' चक्कर होय; व पुण्याच्या आसपासचीं प्रेक्षणीय व उपयुक्त स्थळें पहावयाला जावयाचें हें '**नैमित्तिक**' चक्कर होय.

असें नैमित्तिक चक्कर आम्ही आठवड्यांतून एकाद दुसरें घेत असूं. यापासून आम्हांला आनंद व ज्ञान असा दुहेरी फायदा होई. या आनंदाचा व ज्ञानाचा वांटा प्रिय वाचकांनाहि द्यावा असें मनांत येऊन या **नैमित्तिक** चक्करांची थोडीशी हकीकत या चक्करमालेंत देण्याचें योजिलें आहे. आमच्या पहिल्या चक्करांत पाहिलेल्या मांजरी येथील शेतकीच्या प्रयोग क्षेत्राच्या माहितीपासून या मालेस सुरवात केली आहे.

मांजरीचें सरकारी शेत पुणें सोलापूर रस्त्यावर पुण्यापासून आठनऊ मैलांवर आहे. आम्ही सकाळीं चहापान करून साडेआठ वाजतां मांजरीला जावयाला निघालों. स्वाराच्या गेटावरून शंकरशेट रस्त्याकडून आम्ही गेलों. कारण, हा रस्ता पायगाडीला फारच चांगला आहे; शिवाय या रस्त्यावर फारशी रहदारीहि नसते. शहरांतून निघाल्यावर पांच मैलांपर्यंत जरासा चढाव आहे, व येथून पुढें मांजरीपर्यंत उतार आहे. दोन्ही बाजूंना उंसांचे मळेच्या मळे लागतात. कारण, खडकवासल्याच्या कालव्याचें पाणी या सर्व प्रदेशाला मिळतें.

आम्ही पाऊण तासांत शेतावर जाऊन पोहोंचलों. तेथें प्रयोगक्षेत्रावरील मंडळीनें आमचें उत्तम स्वागत केलें. या शेतावर सुपरिंटेंडेंटसह शेतकी कॉलेजचे तीन पदवीधर अधिकारी असून ते सर्व दक्षिणी ब्राह्मण आहेत. थोडा विसावा घेऊन व फराळ करून आम्ही शेतकीसंबंधीं आउतें पहा-

वयाला गेलों. तेथें एका ठिकाणीं किती तरी तऱ्हेचे नांगर आम्हीं पाहिले. प्रत्येकांतले गुणदोष प्रत्यक्ष प्रयोग करून ठरविण्यांत आले होते; त्यांत एक अमेरिकन व एक ब्रिटिश असे दोन प्रकारचे नांगर आपल्या जमिनीला चांगले आहेत, असें आढळून आलें. इंग्रजी नांगरांच्याच धर्तीवर आपल्या इकडे हल्लीं किर्लोस्करांनीं नांगर तयार केले आहेत, व त्यांचा प्रसार शेतकरीवर्गांत चांगला होत आहे.

हे नांगर पाहून आम्हांला आमच्या गतानुगतिकत्वाची उत्तम साक्ष पटली. आमचे आपले ते लांकडी नांगर व त्यांना लोखंडी फाळ, हीं आज पिढ्यानुपिढ्या चालू आहेत. सुधारलेला माग ज्याप्रमाणें आपलें काम उत्तम करतो, त्याप्रमाणें लोखंडी नांगरानें नांगरणी चांगली होते. आधीं हे नांगर जमिनींत खोल जातात; दुसरें या नांगरांनीं जमीन व ढेंकळें उलथून पडतात; यामुळें वरची जमीन खालीं जाते, व खालची जमीन वर येते. या नांगरानें एकदां जमीन नांगरली म्हणजे पुरे होते, आणि त्यामुळें नांगरणीचा खर्च किती तरी कमी येतो.

हे निरनिराळ्या प्रकारचे नांगर पाहिल्यावर आम्हीं जमीन कुळविण्याचीं, बीं पेरण्याचीं, पीक कापण्याचीं वगैरे यंत्रें पाहिलीं. त्यांमध्यें हातानें चालवावयाचें कुळपें आपल्या शेतकऱ्यांच्या ऐपतींतील असून त्यानें खर्चहि दर एकरीं पुष्कळ वांचतो, असें आम्हांला सांगण्यांत आलें.

तेथून आम्ही गूळ तापविण्याच्या चुलाणाकडे गेलों. या प्रयोगक्षेत्रांत प्रयोग करून या चुलाणांतहि एक फार साधी सुधारणा घडवून आणलेली आम्हीं पाहिली. जुन्या चुलाणाच्या सर्व तऱ्हांत पुण्याचें चुलाण बरें. कारण, त्यांत सातारा व नगरकडील चुलाणांप्रमाणें बाहेरून निराळें सर्पण आणावें लागत नाहीं. या चुलाणांत सर्व काम उंसांचा चोथा व पाचट यांवर भागतें. पण सुधारलेल्या चुलाणानें यामध्येंहि बचत होते, व दर एकरीं एकतृतीयांश पाचट वांचतें, व या पाचटांचा शेताला खता-

सारखा उपयोग होतो. चुलाणांत झालेली ही सुधारणा पाहून आम्हांला कौतुक वाटलें, व अशा प्रयोगक्षेत्राचा देशाला केवढा उपयोग आहे, याचें पूर्ण प्रत्यंतर आलें.

जुन्या चुलाणांतील सुधारणा म्हणजे शास्त्रीय तत्त्वाचा साधा अंगीकार होय. जुन्या पुणेरी चुलाणांत धूर जाण्याला निराळी व्यवस्था नाहीं. ज्या भोंकांतून पाचट आंत घालावयाचें, त्याच्या वरच्या बाजूनेंच धूर बाहेर यावयाचा; यामुळें ज्वलनक्रिया बरोबर होत नाहीं, व पाचट घालणाऱ्या जाळ्याला फार त्रास होतो. सुधारलेल्या चुलाणांत धुराकरितां एक स्वतंत्र चिमणी काढून दिली आहे, व धूर जातांना जो जाळ फुकट जातो, तो जाऊं नये म्हणून वर एक कढई ठेविली आहे. या कढईंत रस तोटीनें येण्याची व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेमुळें दुहेरी-तिहेरी फायदा होतो. एक जाळ मुळींच फुकट जात नाहीं, आणि एक कढई कढत असतां दुसरीहि कढत रहाते; यामुळें पुढल्या कढयांना तापण्याला कमी वेळ लागतो. धुराला स्वतंत्र वाट असल्यामुळें ज्वलन-क्रियाहि उत्तम चालून उष्णता जास्त मिळते, व पाचट घालणाऱ्या जाळ्याचें काम कमी त्रासाचें होतें. ही चुलाणांतील सुधारणाहि ज्या ज्या ठिकाणीं गुऱ्हाळें आहेत, तेथें तेथें अवश्य करण्यासारखी आहे, असें आमच्या ध्यानांत आलें.

हें पाहून झाल्यावर आम्ही एंजिननें चालणाऱ्या चरकाकडे गेलों. तेथें रस काढण्याचें काम सुरू होत होतें. या चरकाची सर्व व्यवस्था आम्हीं लक्ष्यपूर्वक पाहिली. बैलानें चालणाऱ्या चरकापेक्षां या चरकानें शेंकडा ४ टक्के तरी रस जास्त निघतो, व यापासून एकरीं चाळीस रुपये तरी फायदा होतो. दुसरा व महत्त्वाचा फायदा म्हणजे रस पूर्ण पक्वदशेंत असतांनाच गाळण्याला सांपडतो, व हें काम उगाच रखडत पडत नाहीं. पण असे चरक घेणें खर्चाचें काम आहे, व जेथें पन्नासपासून शंभर एकरपर्यंत ऊंस गाळावयाचा असतो, तेथेंच या चरकापासून फायदा होतो.

शेतकऱ्यांमध्यें सहकारी तत्त्वाचा जसजसा प्रसार होईल, तसतसें असे चरक विकत घेणें शेतकऱ्यांना परवडेल.

यानंतर आम्हीं बैलानें चालवावयाच्या चरकांचे निरनिराळे नमुने पाहिले. जुन्या तऱ्हेच्या लांकडी चरकांपेक्षां लोखंडी चरकानें रस किती तरी जास्त निघतो. त्यांतल्या त्यांत अमेरिकन **पर्लेनल्प** या चरकापासून सर्वांत जास्त रस निघतो.

इतक्या सर्व गोष्टी पाहून होईपर्यंत साडेबारा होऊन गेले, म्हणून आम्ही शेताकडून रहाण्याच्या ठिकाणाकडे आलों, व जेवणखाण झाल्यावर इकडल्या तिकडल्या गप्पा मारण्यांत थोडा वेळ घालविला. नंतर पुन: राहिलेल्या गोष्टी पहाण्याकरितां शेतावर निघालों. प्रथमतः आम्हांला शेताच्या प्रयोगशाळेंत नेण्यांत आलें, व तेथील उपकरणें दाखविण्यांत आलीं. ऊंस पक्व झाला आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याच्या शेतकऱ्यांच्या कांहीं खुणा आहेत; पण त्या इतक्या खात्रीच्या नाहींत. हल्लीं हें समजण्याचें एक यंत्र तयार झालेलें आहे, त्याला '**ब्रिक्स सायक्रोमिटर**' म्हणतात. हें यंत्र दुधांत पाणी किती आहे, हें पहाण्याच्या यंत्रासारखेंच असतें. उंसाचा रस एका कांचेच्या ग्लासांत घालून त्यांत हें यंत्र अगर डिग्री सोडावी म्हणजे साखरेचें प्रमाण रसांत जसजसें वाढत जातें, तसतशी ही डिग्री वरवर जाते. यासंबंधानें प्रयोगशाळेंत ठेवलेले कांहीं नकाशे आम्हीं पाहिले, त्यांवरून कोणत्या महिन्यांत उंसामध्यें किती प्रमाणांत साखर झाली आहे, हें एकदम ध्यानांत येतें. या प्रयोगावरून असेंहि दिसून आलें आहे, कीं, सर्व ऊंस बारा महिन्यांतच पूर्ण तयार होतो, असा नियम नाहीं; म्हणून तो वर्षाचा झाल्याबरोबर गाळण्याला सुरुवात करणें योग्य नाहीं. त्यानें नुकसान होण्याचा संभव आहे.

आपल्या इकडल्या प्रांतांत जो 'पुंड्या' नांवाचा ऊंस लावतात—यांतच गूळसाखरेचें प्रमाण सर्वांत जास्त आहे. तो पक्व झाला म्हणजे १६ डिग्री गूळसाखर त्यांत असते. व आठदहा दिवसांत ती वीसपर्यंत

जाते, व पुढें लागलीच कमी होऊं लागून तो ऊंस बिघडतो. म्हणून रसांत १६ डिग्री साखर येऊं लागली, कीं, रस गाळण्याला सुरुवात करावी, म्हणजे गुळाचें प्रमाण दर एकरीं सर्वांत जास्त पडतें. या मर्यादेच्या पूर्वी किंवा मागाहून ऊंस गाळला गेल्यास गुळाचें प्रमाण फार कमी पडतें, व शेतकऱ्याचें नुकसान होतें. म्हणून या यंत्राचा उपयोग सर्व शेतकऱ्यांनीं करण्यासारखा आहे. या यंत्रांना किंमत फार पडत नाहीं. शेतकऱ्याच्या उपयोगीं पडणारीं अशीं लहान यंत्रें या प्रयोगक्षेत्रांत साडेतीन रुपयांना एक अशा भावानें विकत मिळतात.

रसाचा एक थेंब दुर्बिणीसारख्या एका यंत्राखालीं ठेवूनहि त्यांत साखरेचा अंश किती आहे हें पहातां येतें, व अशा रीतीनें सायक्रोमीटरनें दाखविलेल्या डिग्रींचा ताळा बघतां येतो.

प्रयोगशाळा पाहून झाल्यावर आम्ही उंसाच्या मळ्याकडे गेलों. तेथें निरनिराळ्या पंधरवड्यांत लावलेल्या उंसांच्या रांगा पाहिल्या. या प्रयोगावरून कोणत्या वेळीं ऊंस लावणें चांगलें हें समजून येतें. यानंतर आम्ही लागवडीच्या सुधारलेल्या पद्धतीनें ऊंस लावलेल्या मळ्याकडे वळलों. जुनी पद्धत दोनतीन फुटांच्या अंतरावर ऊंस लावण्याची आहे; पण सुधारलेली पद्धत अशी आहे, कीं, ऊंस पांचपांच फुटांच्या अंतरावर लावावयाचे, व उंसांच्या कांड्यांचे डोळे बाजूला रहातील, अशा काळजीनें ऊंस लावावयाचा. या पद्धतीनें उंसाला वाढण्याला मुबलक जागा मिळते, सर्व डोळे फुटून त्याचे ऊंस बनतात, व शिवाय अधिक कोंबांचे ऊंस होतात. या पद्धतीनें लावलेला मळा आम्हीं पाहिला, व त्यांतील ऊंस जोरदार वाढलेले आहेत, असेंहि आम्हांला उघड दिसून आलें. या पद्धतीनें उंसाच्या लागवडीच्या खर्चाच्या बाबतींत दर एकरीं तीस रुपयांची बचत होते. म्हणजे जुन्या पद्धतीनें दर एकरीं साठ रुपये खर्च येतो, तर या पद्धतीनें तीसच रुपये एकरीं खर्च येईल, असें आम्हांला सांगण्यांत आलें. यावरून उंसांच्या लागवडीच्या बाबतींत फारच महत्त्वाची सुधारणा घडून आली आहे, असें आम्हांला वाटलें.

पण यापेक्षांहि महत्त्वाची सुधारणा म्हणजे जावाबेटांतील पद्धति होय. या पद्धतींत उंसांचीं कांडीं फार खोल म्हणजे दोन फूट लावावयाचीं असतात, व त्यांना फक्त दोनअडीच महिनेच पाणी द्यावयाचें असतें, तेंहि जुन्या पद्धतीनें म्हणजे सर्व मळा जलमय करण्याइतकें नव्हे, तर वरवर शिंपडून द्यावयाचें, व पुढें पावसाळ्यांत त्याला मुळींच पाणी द्यावयाचें नाहीं. असा निपाणी उंसाचा मळा आम्हीं पाहिला, व तो ऊंस फारच चांगल्या स्थितींत आहे, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें. किटींगसाहेब जावाबेटांतून ही पद्धति पाहून आले. त्यांच्या सांगण्याप्रमाणें येथें उंसाची लागवड केलेली आहे. ही पद्धति अजून प्रयोगावस्थेंत आहे; पण ती यशस्वी ठरल्यास उंसाच्या लागवडींत एक मोठीच क्रांति घडून आल्यासारखें होईल; कारण, पाणी लावण्याचा खर्च पुष्कळ कमी होईल. अधिक पाण्यानें जमिनीला लोणा येण्याची भीति नाहींशी होईल. या पद्धतीनें जेथें विहिरींचें पाणी आहे, तेथेंहि ऊंस सहज लावतां येईल; आतांप्रमाणें पाटाच्या पाण्याची फार आवश्यकता रहाणार नाहीं. या लागवडीच्या पद्धतीचा अनुभव दोनतीन वर्षें घेऊन मग काय तो कायमचा निकाल लागेल.

हे मळे पाहून झाल्यावर आम्ही शेतांतील लाडिसवर बसून शेताच्या दुसऱ्या टोंकाकडे आलों. तेथें बैल न सोडतां खताची गाडी थोडीफार किंवा सबंध उलटतां येणारी बैलगाडी आम्हांला दाखविण्यांत आली. ही सुधारणाहि क्षुल्लक वाटणारी आहे; पण यायोगें एका मनुष्याला सर्व शेतभर खत पसरतां येतें, व बैलालाहि त्रास पडत नाहीं. तेथें आम्हांला मुंबई इलाख्यांतील उंसाच्या सर्व जाती एके ठिकाणीं पहाण्याला सांपडल्या. कारण, या सर्व जातींचे गुणदोष पहाण्याकरितां व त्यांच्याबद्दल प्रयोग करण्याकरितां त्या या मळ्यांत आणून लावलेल्या होत्या. येथून आम्ही परत आलों. तों उंसाच्या रसाच्या कढईला आधण आलेलें होतें. नंतर गूळ करण्याच्या कृतींत लहानलहान सुधारणा कशा केलेल्या आहेत, हें आम्हांला दाखविण्यांत आलें. मातींत खड्डे खणून ढेपा पाड-

ण्याच्या जुन्या रीतीपेक्षां पऱ्याच्या ढेपाळांत ढेपा पाडणें जास्त फायदेशीर व चांगलें. कारण, यायोगें ढेपेंतील काकवी जाळींतून खालीं पडते, व ती वायां जात नाहीं. शिवाय खाड्यांत ढेपा पाडल्या असतां काकवी जमिनींत मुरते, पुढील ढेपांतील सर्व काकवी जमीन आकर्षू शकत नाहीं, व म्हणून गूळ चिकट रहातो. ही सांचलेली काकवी व उंसाची मळी या दोहींनीं कमी दर्जाचा गूळ करतां येतो.

या सर्व गोष्टी पाहून झाल्यावर आम्ही सर्वजण सुपरिंटेंडंटसाहेबांच्या बंगल्यावर आलों, व प्रयोगक्षेत्राला अनुरूप असें ताज्या उंसाच्या रसाचें पान झाल्यावर तेथील मंडळींनीं खासगी रीतीनें सुरू केलेल्या दुसऱ्या संस्थांची माहिती आम्हांला दिली. या प्रयोगक्षेत्रावरील कामदारांनां साक्षर करण्याकरितां एक रात्रींची शाळा त्यांनीं चालविली आहे. तसेंच सर्वांच्या उपयोगाकरितां एक वाचनालयहि काढलेलें आहे. प्रयोगक्षेत्रावरील सर्व माणसांना अडचणींत उपयोगीं पडण्याकरितां सहकारी पतपेढी काढण्याचा विचार चालू आहे. ही सर्व हकीकत ऐकून येथील सुशिक्षित पदवीधरांच्या सामाजिक चळवळींविषयीं आम्हांला फार कौतुक वाटलें. सरकारी नोकर असलों तरी आपण हिंदी आहोंत, व नागरिक या नात्यानें आपल्या बांधवांच्या प्रगतीच्या मार्गाला हात लावणें आपलें कर्तव्यकर्म आहे, अशी जाणीव या मंडळींत पाहून तर आम्हांला या मंडळीबद्दल आदरयुक्त अभिमान वाटला. आम्हांला सर्व प्रयोगक्षेत्र दाखविण्याची व एकंदर माहिती देण्याची तसदी घेतल्याबद्दल सर्व मंडळीचे आम्हीं आभार मानले, व पुण्याला परत येण्याकरितां आपल्या पायगाड्या सज्ज केल्या. इतक्यांत आम्हांला पाणी पिण्याची इच्छा झाली, तेव्हां या प्रयोगक्षेत्राला लागूनच वहाणाऱ्या एका नाल्याजवळ उत्तम गार पाण्याचा जीवंत झरा आहे, तेथें आम्ही गेलों. तेथला देखावाहि मोठा आनंददायक आहे. त्या ओढ्यावर पुणें-सोलापुर रस्त्याचा एक लहानसा पूल आहे. पुलाच्या शेजारींच गर्दछायेचा एक पिंपरीचा प्रचंड वृक्ष आहे. या वृक्षाच्या मुळाशीं हा झरा आहे. झऱ्यांतून सारखें

बारा महिने झुळझुळ पाणी वहातें. तेथें जाऊन स्वच्छ कांचेच्या पेल्यांतून आम्हीं पाणी वर काढलें, तों स्फटिकवत् शुद्ध पाणी दृष्टीला पडलें. तोंडाला पेला लावण्याबरोबर त्या पाण्याच्या गोडीनें व गारपणानें आम्हांला फार आनंदित करून सोडलें. या सुंदर ठिकाणाचा फोटो घेतां येत नाहीं असें पाहून व आपल्याला फोटो घेतां येत असून फोटोचा कॅमेरा आणला नाहीं म्हणून माझ्या मित्रांना फार वाईट वाटलें. इतकें सर्व होईपर्यंत दिवस बराच खालीं गेला. तेव्हां आतां घरीं परत गेलें पाहिजे म्हणून आम्ही आपल्या गाड्यांवर आरूढ होऊन मार्गाला लागलों.

वाटेनें आमच्या मनांत किती तरी विचार उद्भवले. " खरोखरीच हें प्रयोगक्षेत्र किती उपयुक्त काम करीत आहे ! उंसाच्या बाबतींत कितीतरी सुधारणा या क्षेत्राच्या अनुभवानें उपयोगी ठरल्या आहेत. या सर्व सुधारणांचा जर देशांतील शेतकरविर्गामध्यें प्रसार होईल, तर लाखों रुपयांचा फायदा होईल. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत कोणतीहि सुधारणा अनुभवसिद्ध ठरली, कीं तिचा प्रसार सर्व देशभर तावडतोब होतो. मग आमच्या इकडे असें कां होत नाहीं ? याचीं दोन कारणें आहेत, असें माझ्या मनांत आलें. एक कांहींना वाटणारा आमच्या सरकारचा '**कानफाटेपणा.**' एकदां '**कानफाट्या**' नांव पडलें म्हणजे ज्याप्रमाणें त्या माणसाचें कोणी ऐकत नाहीं, तशी गत आमच्या सरकारी संस्थांची झालेली आहे. सरकार रयतेच्या हिताचे खरेखरे उपाय योजीत नाहीं, अशी आमच्या सुशिक्षित मंडळीची समजूत कांहीं खऱ्याखोट्या कारणांनीं झाली आहे; यामुळें अशा संस्थांकडे सुशिक्षितांचें लक्ष्य जात नाहीं. शेतकऱ्यांची समजूत अशी झाली आहे, कीं, या सुधारणा घडून आल्या, तर आपल्यावरील कर वाढेल. आतां या दोन्ही समजुतींना कांहीं आधार नाहीं. शेतीच्या सुधारणेच्या बाबतींत सरकारनें सुरू केलेल्या सुधारणा प्रजेच्या खऱ्या कल्याणाच्या आहेत, व त्यांत दुसरा कांहींएक अन्तःस्थ हेतु नाहीं, म्हणून या दोन्हींचा प्रसार सुशिक्षितांनीं बहुजनसमाजांत केला पाहिजे. पण हा

प्रसार व्हावयाला वरील समजाखेरीज दुसरा अडथळा आहे, तो आमच्या शेतकऱ्यांच्या अक्षरशत्रुत्वाचा होय. शेतकऱ्यांची मनःस्थिति कोणत्याहि सुधारणेचे फायदे कळण्यासारखी पाहिजे, व ती प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाल्याखेरीज होणें शक्य नाहीं."

असे विचार मनांत येत आहेत, तोंच आम्ही घरीं येऊन पोहोंचलों. ही सर्वतोपरी उपयुक्त संस्था पहाण्याची ज्या वाचकांना संधि येईल, त्यांनीं ती फुकट दवडूं नये, अशी विनंति आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.
ता. ............
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणें

# चक्कर २ रें

## तुकारामाचें जन्मग्राम

इंग्रजींत एक म्हण आहे–' मनुष्य बेत करतो, पण परमेश्वर त्याची व्यवस्था लावतो.' भाविक भोळे लोक याचा असा अर्थ करतात, कीं, कोणतीहि गोष्ट मनुष्यानें योजिली, म्हणजे ती घडवून आणणें न आणणें हें मनुष्याच्या हातीं नसतें; तर प्रत्यक्ष परमेश्वर त्याची आपल्या मर्जीप्रमाणें विल्हेवाट लावितो. बाईलबुद्धे लोक या म्हणीचा असा अर्थ असा करतात, कीं, मनुष्य बेत करतो, पण तो सिद्धीला नेणें हें त्यांच्या हातांत नसून त्यांच्या बायकांच्या हातांत असतें. कारण, त्यांचा नेहमीं असा अनुभव असतो, कीं, आपल्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडत नाहींत ! पण हे दोन्ही अर्थ मला बरोबर वाटत नाहींत. माझ्या मतें या म्हणीचा अर्थ इतकाच, कीं, बेत करतांना मनुष्य आपल्या एकट्याच्या इच्छेनें बेत करता खरा; पण बेत तडीला नेणें हें निवळ एकट्याच्याच इच्छेवर अवलंबून नसतें; त्याला दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची अनुकूलता लागते, व त्या गोष्टी स्वतःवरच अवलंबून असतात, अशांतला भाग नाहीं. यामुळें बेताच्या सिद्धतेंत एक प्रकारचा अनिश्चितपणा आपली इच्छा नसतांना सुद्धां रहातोच.

हेंच पहा ना, 'पायगाडीचीं चक्करें' या लेखमालेच्या पहिल्या लेखांकांत लिहिल्याप्रमाणें आठवड्यांतून किंवा पंधरवड्यांतून एकादें तरी नैमित्तिक चक्कर मारून एकादें प्रेक्षणीय स्थळ पहावयाचा आमचा बेत; तदनुरूप आम्हीं तुकरामाचें जन्मग्राम देहू येथें पायगाडीनें चक्कर मारण्याचा दिवस मुक्रर केलासुद्धां. पण एकदां '**शिष्टागमनेऽनध्यायः**' या कारणानें बेत फसला, तर दुसऱ्यांदां '**कार्यागमनेऽनध्यायः**' या

कारणानें आम्हांला बेताप्रमाणें जातां आलें नाहीं; तिसऱ्यांदां तर आमच्या मित्राच्या घरीं एकाएकीं लग्नाचा जानवसा आल्यामुळें '**लग्नागमनेऽनध्याय:**' असा प्रकार होऊन आमचा बेत लांबणीवर गेला. यामुळें मनाची कितीतरी निराशा झाली ! तरी पण एका दृष्टीनें या अनध्यायत्रयीपासून माझा फायदा झाला. कारण, आम्ही देहूचें चक्कर ठरविल्यापासून तुकारामाच्या चरित्राशीं व ग्रंथांशीं माझा जो काय थोडा परिचय होता, त्याचें दृढीकरण मीं चालविलें होतें, आणि विशेषत: **मनोरंजनानें' 'महाराष्ट्र वेद'** या नांवाखालीं जी तुकारामाच्या अभंगांची निवड केली आहे, तिचें पुस्तक मी काळजीपूर्वक वाचीत होतों. तेव्हां आमचा बेत लांबणीवर पडण्यानें तुकारामाच्या साध्या पण स्पष्ट, प्रसादगुणयुक्त पण जोरदार विचारांचें जास्त चिंतन माझ्याकडून झालें, हें मी आपलें सुदैव समजतों.

कांहीं कालानें आम्हीं पुन: एकदां चक्कराचा दिवस मुक्रर केला, व त्या दिवसाची मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात बसलों. शेवटीं तो दिवस उजाडला. त्या दिवशीं सकाळीं ' प्रथमग्रासे मक्षिकापात: ' असा प्रकार होतो कीं काय, अशी भीति वाटलीच. पण आमचा लोहमय अश्व आम्ही सज्ज करून अश्वारूढ होऊन आमच्या मित्राच्या घरीं गेलों व तेथें फराळ करून आमच्या सुधारलेल्या वारीची सामग्री—पताका नव्हे तर—दुर्बीण व कॅमेरा हीं घेऊन आम्ही मार्गस्थ झालों.

या चक्कराच्या खेपेला माझ्या स्नेह्याचे एक विद्यार्थिमित्र बरोबर होते. असे आम्ही तिघेजण झाल्यामुळें बोलतबोलत भराभर मैलचे मैल ओलांडूं लागलों. खडकीच्या पुढें मुठा नदीवरील हॅरीस पूल—याला पूर्वीं 'दापोडीचा पूल' म्हणत असत—ओलांडतांना तेथला देखावा सुंदर दिसला, म्हणून त्याचें आम्हीं छायाचित्र घेतलें व पुढें गेलों. वाटेनें केव्हां गर्द झाडी लागे, तर केव्हां केव्हां तुरळक झाडें लागत. चिंचवडपर्यंतचा रस्ता आमच्या नेहमींच्या परिचयांतला होता; तेथपर्यंत येण्याला एक तास

लागला. तेथून पुढें निगडी गांवापर्यंत साधारण चढण आहे; पण देखावा बहारीचा आहे.

चिंचवड सोडलें, कीं, आगगाडीचा व बैलगाडीचा रस्ता—जो पुण्यापासून बहुतेक जवळ जवळ आहे तो—बराच डावीकडे वळतो, आणि बैलगाडीपासून अगदीं दिसेनासा होतो. तो थेट शेलारवाडीशीं पुनः बैलगाडीच्या रस्त्याला येऊन मिळतो. निगडी हें गांव टाकून पुढें निघालें म्हणजे पुनः बराच चढावाचा रस्ता लागून एका टेंकडीला वळसा घालून रस्ता जातो, व चवदाव्या मैलाशीं आलों, म्हणजे उच्च पठारावर आल्याप्रमाणें होऊन तीन्ही बाजूंला फार दूरपर्यंतचा देखावा दिसूं लागतो.

हा दूरवर दिसणारा देखावा पाहून आम्हांला फार आनंद झाला व इतका पायगाडीचा प्रवास करून आल्याचा शीण पार गेला. तेथून पुढें दोन मैलपर्यंत पायगाडीवाल्यांना अत्यंत प्रिय असा भला मोठा उतार लागला. मग काय विचारतां ! आमच्या पायगाड्यांना वायुगति आली आहे कीं काय, असा आम्हांला भास झाला, व निमिषार्धांत आम्ही देहूला जाणाऱ्या लोकलफंडी रस्त्याशीं आलों. घड्याळांत पाहतों तों, आम्हांला घरापासून निघून बरोबर दीडतास झाला होता. अर्थात् दीडतासांत आम्हीं सोळा मैल प्रवास केला. या शीघ्रगतीची आम्हांला मौज वाटली. हाच प्रवास पायीं करावयाचा असता, तर चारपांच तास सहज लागले असते व इतका प्रवास केल्यानें थकवा जास्त आला असता.

येथपर्यंत आमचा प्रवास मोठ्या आनंदांत व मजेंत झाला. आतां देहू काय तें फक्त तीन मैल राहिलें होतें. पण देहूच्या त्या रस्त्याकडे पाहून मात्र धाबें दणाणलें व आतांपर्यंतचा आमचा आनंद मावळला. कारण, या रस्त्यावर इतका धुरळा व खांचखळगे दिसले कीं, कांहीं विचारूं नका ! अशा रस्त्यांतून पायगाडीनें जाणें म्हणजे एक दिव्य होय, यांत शंका नाहीं ! पण उशीर होत चालला, तेव्हां येथें रेंगाळणें

बरें नाहीं, असा विचार करून आम्हीं पायगाडीवर तर पाय टाकलाच न रस्त्याच्या अगदीं कडेकडेनें चालूं लागलों. थोडासा रस्ता आक्रमिल्या-वर दुसऱ्या बाजूला रस्ता बरा आहे, असें पाहून पायगाडी या बाजू-कडून त्या बाजूकडे घेऊं लागलों, तों रस्त्यावरील धुरळयांत पुढलें चाक इतकें रुतलें, कीं, पायगाडी एकदम थांबली व घोडा एकदम थांबल्यानें घोडेस्वाराची जी दशा होते, तीच माझी झाली. पण नकळत हा आपला तुकारामाच्या जन्मग्रामाला साष्टांग नमस्कार झाला, अशी मनाची समजूत करून आम्ही थोडी वाईट वाट होती तेथपर्यंत पायगाडी हातीं घेऊन चाललों व जरा रस्ता बरा लागल्यावर पुनः पायगाडीवर आरूढ होऊन पुढें चालू झालों.

शेलारवाडीपासून देहूपर्यंत रस्ता खलपट आहे. कारण, देहू इंद्रायणी नदीच्या अगदीं तीरावर आहे, व उंच पठाराकडून नदीच्या दरी-कडे खालींखालीं आपण चाललों आहों, असा जातांना भास होतो. देहू गांव जवळ येऊं लागलें, तोंच हिरवींगार शेतें दिसूं लागलीं. हा भाग नदीच्या दरीपैकीं असल्यामुळें येथें विहिरींना पाणी मुबलक आहे, व या पाण्यावर इकडे ऊंस पुष्कळ करतात असें दिसून आलें. वाटेंत उंच उंच जांभळीच्या वृक्षांचें एक जांभुळवन लागलें. उन्हांतून चालून आल्यावर अशा बनांतून जाण्यापासून अवर्णनीय आनंद होतो. हें बन टाकून आम्ही पायगाडीवरून उतरून पायीं देहूंतल्या तुकारामाच्या विठोबाच्या देवळाशीं आलों, आणि गाड्या देवळाच्या देवडींत ठेवून देवळाच्या पायऱ्यांवर बसलों.

अठरा मैल सारखे चालून आल्यानंतर या पायऱ्यांवर बसण्यानें मनाला किती समाधान वाटलें, याचें वर्णन करणें अशक्य आहे. ‘**देवाचीये दारीं उभा क्षणभरीं, तेणें मुक्ति चारी साधीयेल्या**’ या चरणांची आम्हांला तेव्हां आठवण झाली. मात्र आम्हां आधुनिक वारकऱ्यांना मुक्तीचा अनुभव न येतां ‘**देवाचीये दारीं बसा क्षणभरीं, तेणें शीण सारा जाई दूरीं**’ असा त्यावेळीं अनुभव आला.

देहू गांवाला जें हल्लीं तीर्थाचें स्वरूप आलें आहे, तें सर्व तुकारामामुळें आलेलें आहे. तेथल्या स्थळांचा तुकारामाच्या आयुष्यांतील प्रसंगांशीं निकट संबंध आहे. तेव्हां आमच्या वाचकांना तुकारामाच्या त्रोटक चरित्राची तरी आठवण करून देणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं.

तुकारामाचें घराणें पिढीजाद देहूचें रहाणारें होतें. तुकारामाला वाणी म्हणण्याचा प्रघात आहे, पण त्याचें घराणें अस्सल मराठ्यांपैकीं आहे. त्यांचें आडनांव 'मोरे' होतें. तुकारामाच्या पूर्वजांपासून त्यांच्या घराण्यांत विठोबाची भक्ति चालू होती. त्याचा पूर्ण विकास तुकारामाच्या ठिकाणीं झाला. तुकारामाचा बाप बोल्होबा व त्याची आई कनकाई हें मोठें भाविक जोडपें होतें. तीं पंढरीची वारी नेहेमीं करीत असत; शिवाय त्यांच्या एका पूर्वजानें त्यांच्या घराशेजारीं व इंद्रायणी नदीच्या तीराला जें विठोबाचें देऊळ बांधलें होतें, तेथें तीं विठोबाची भक्ति करीत.

बोल्होबाला व कनकाईला बरींच वर्षें मुलें होत नव्हतीं; पण बऱ्याच प्रौढ वयांत यांना पुढें चार मुलें झालीं, त्यांतला तुकाराम हा दुसरा मुलगा होय. बोल्होबाची घरची स्थिति चांगली होती. त्याचा धंदाहि चांगला चाले.

तुकाराम तेरा वर्षांचा झाला, तेव्हां बोल्होबानें आपला धंदा सोडला व सर्व संसारभार तुकारामावर सोंपविला. तुकारामास दोन बायका होत्या; पहिली दमेकरी होती, म्हणून त्याचें दुसरें लग्न झालें होतें. ही दुसरी बायको पुण्यांतील एका श्रीमंत सावकाराची मुलगी होती. हिचें नांव अवलाई. तुकारामामध्यें त्याच्या पूर्वजांची विठ्ठलभक्ति आनुवंशिक होती; पण तिचा विकास होण्याला विपत्ति व संकटपरंपरा पाहिजे होती; ती संकटपरंपरा तुकारामाच्या तरुणपणीं त्याच्यावर आली. आधीं आईबाप लागोपाठ वारले. नंतर थोरल्या भावाची बायको वारली व तो विरक्त होऊन तीर्थाटनाला गेला. तेव्हां संसाराचा सर्व भार तुकारामावर येऊन पडला, व तो संसार पाहूं लागला. पण त्याचेंहि लक्ष तिकडे लागेना.

अशा मनःस्थितींत त्याच्या व्यापारांत बूड येत चालली. तरी पण नांदत्या घराचा खर्चवेंच चालण्याकरितां तो बैलावरून गोण्या वाहून इकडचा माल तिकडे असा नेआण करण्याचा व्यापार करूं लागला. या व्यापारांतसुद्धां त्याला बरीच खोट आली. अवलाईनें आपल्या पतीवर खत लिहून देऊन तुकारामाला पुनः दोनशें रुपयांचें भांडवल उभारून दिलें आणि या खेपेला त्याला त्यांत चांगला फायदाहि झाला; पण तुकारामाला वाटेंत एक ब्राह्मण व त्याचें कुटुंब कर्जाकरितां भिक्षा मागतांना दिसलें. त्या कुटुंबाची दया येऊन तुकारामानें आपल्याजवळचे सर्व पैसे त्याला देऊन त्याला कर्जमुक्त केलें व आपण हात हलवीत घरीं परत आला !

त्या वेळीं दुष्काळाचा कडाका चालू होता. त्यांतच त्याचे बैल गेले. तुकारामाची थोरली बायको व तुकारामाचा थोरला मुलगा हीं या दुष्काळांत अन्नान्न करून मेलीं; त्याबद्दल तुकारामाला फारच दुःख झालें. तुकारामाचें दिवाळें निघालें. या सर्व संकटपरंपरेनें त्याचें लक्ष संसारांतून पार उडालें. त्यानें आपल्या हिश्याचीं खतेंपत्रें इंद्रायणी नदींत बुडवून टाकलीं व तो इंद्रायणी नदीपलीकडील **भांडार** पर्वतावर जाऊन एकांतांत बसूं लागला. तेथेंच त्यानें पारमार्थिक वाङ्मयाचा अभ्यास केला. **अवलाई** रोज नवऱ्याला त्या डोंगरावर भाकर व पाणी नेऊन पोहोंचवीत असे. परंतु रोज बायकोला याप्रमाणें त्रास देणें बरें नाहीं, असें वाटून तुकाराम घरीं रहाण्याला आला; पण त्याचा सर्व वेळ विठोबाच्या देवळांत जाऊं लागला. नेहमीं भजन करावें; कोणी कीर्तन करीत असेल तर त्याच्यामागें उभें रहावें; गांवांत पांथस्थ आला तर त्याची शुश्रूषा करावी; कोणीहि कांहीं काम सांगेल तें करावें; असा क्रम त्यानें सुरू केला. सारांश त्याची स्वार्थबुद्धि पार नाहींशी झाली व भक्ति व परोपकार यांत तो आपला देह झिजवूं लागला.

असा सर्व निदिध्यास लागल्यामुळें आपल्या स्वप्नांत देव येऊन त्यानें आपल्याला कवित्व करण्याला आज्ञा केली, असें तुकारामाला वाटलें,

व तो कविता करूं लागला आणि स्वतः कीर्तनहि करूं लागला. अशा त्याच्या वृत्तीमुळें तुकारामाची साधु व भगवद्भक्त म्हणून कीर्ति पसरूं लागली. त्याचें कीर्तन ऐकण्याला बरेच लोक जमूं लागले, व पुष्कळ लोक त्याचें शिष्यत्व पतकरूं लागले. कीर्तनांत तो स्वयंस्फूर्तीनें तेथल्या तेथें अभंग रची.

तुकारामाची अशी सर्वत्र कीर्ति झाल्यानंतर त्याच्या संबंधींच्या चमत्कारांचे समज उत्पन्न झाले असले पाहिजेत. **रामेश्वरभट** म्हणून एक विद्वान् ब्राह्मण होता; त्यानें तुकाराम कविता करतो व त्यांत वेदार्थ प्रतिपादन करतो, याबद्दल तक्रार केली, व तुकारामाला आपल्या कविता इंद्रायणींत बुडविण्याला सांगितलें; तुकारामानें त्याप्रमाणें केलें, पण त्याला त्याबद्दल फार दुःख झालें व तो विठोबाची अनन्यभावें भक्ति करीत एका दगडावर पडून तेरा दिवस उपास करीत राहिला. तेव्हां विठोबानें पुष्कळांच्या स्वप्नांत येऊन सांगितलें, कीं, 'तुकारामाच्या वह्या मीं कोरड्या ठेविल्या आहेत व त्या पाण्यावर तरंगतांना सकाळीं दिसतील.' इकडे रामेश्वर भटजीच्या देहाचा विलक्षण दाह होऊं लागला, व शेवटीं तो दाह तुकारामाचें दर्शन घेतल्यानें गेला व रामेश्वरभट तुकारामाच्या पट्टशिष्यांपैकीं एक झाला. हा एक मोठा चमत्कार तुकारामाच्या चरित्रांत सांगितलेला आहे. यावरून तुकारामाच्या अभंगांबद्दल लोकांत किती आदरबुद्धि उत्पन्न झाली होती, हें दिसून येतें.

तुकारामाचें महत्त्व वाढत चाललें, तसतसे त्याला शत्रूहि पुष्कळ झाले, व त्यांनीं तुकारामाचा छळहि फार केला. तुकाराम कीर्तन करण्याला लोहगांवाला वारंवार जाई. तेथेंच त्याच्या कीर्तनाला छत्रपति शिवाजी राजे येत असत, अशी आख्यायिका आहे. तुकारामाच्या चरित्रांत भाविक शिष्यांनीं पुष्कळ चमत्कार लिहिले आहेत. पण ते तुकारामाच्या प्रयाणानंतर शंभर वर्षांनीं लिहिलेले आहेत. तेव्हां ते कितपत खरे असण्याचा संभव आहे, हें उघड दिसतेंच आहे.

अत्यंत विलक्षण चमत्कार म्हणजे तुकाराम सदेह वैकुंठाला गेला, हा होय. पण अत्यंत मोठा साधु पुरुष झाला म्हणजे त्याबद्दलची आपली भक्ति अशा प्रकारें व्यक्त करण्याची भाविक लोकांची प्रवृत्ति असते, त्याला अनुसरून हा समज प्रचलित झाला असला पाहिजे. तुकारामाचें प्रिय **लोहगांव** हें लुटल्यानंतर तुकारामाला जगाचा वीट येऊन त्यानें जलसमाधि घेतली असण्याचा संभव आहे, किंवा इंद्रायणीनदींतील डोह फार खोल असून तेथें सुसरीहि फार आहेत, तेव्हां चुकून त्याला सुसरीनें नेलें असेल व त्याचें प्रेत पुरण्याचा किंवा जाळण्याचा विधि झाला नसेल; आणि अशा आकस्मिक मरणाचें रूपांतर **सदेह वैकुंठप्रयाण** या दंतकथेंत झालें असेल, असें संभवनीय आहे.

आतां आपण आपल्या प्रस्तुत वर्णनाकडे वळूं. आम्ही आमचा अठरा मैलांचा पायगाडीचा प्रवास संपवून ज्या विठोबाच्या देवळाच्या पायऱ्यांवर बसलों, तेंच देऊळ तुकारामाच्या पूर्वजांनीं बांधलेलें होय. येथें इंद्रायणीला मोठा चांगला घाट बांधलेला असून येथला देखावा रमणीय आहे. येथून थेट पश्चिमेकडे तीन मैलांवर **भांडार** डोंगर आहे. हा डोंगर व त्यावरील देऊळ हीं आम्हांला दुर्बिणीनें स्पष्ट दिसत होतीं. याच **भांडार** डोंगरावर तुकाराम जात असे. येथें **इंद्रायणीला** अगदीं उथळ पाणी आहे व डोंगर देवळाच्या अगदीं समोर आहे.

बराच वेळ विश्रांति घेतल्यावर आम्हीं हें विठोबाचें देऊळ पाहिलें. देऊळ बरेंच जुनें आहे, व त्याची बांधण्याची तऱ्हाहि जुनी हेमाडपंती आहे. घुमट हेमाडपंतीच आहे. देवळाच्या सभोंवार ओऱ्या आहेत, त्या नव्या दिसल्या. अर्थात् तुकारामाच्यानंतर भाविक लोकांनीं या बांधिलेल्या असल्या पाहिजेत. हें पाहून झाल्यावर आम्ही तुकारामाच्या वंशजांच्या समाधि पाहून पुढें गोपाळपुऱ्यांत गेलों.

देहू गांव सोडलें, कीं, इंद्रायणी नदीच्या खोल डोहाला प्रारंभ होतो. हा डोह बराच लांब पसरलेला आहे. नदीचा हा भाग काळ्या मातींतून

गेला आहे, व म्हणून येथें नदीचें पात्र एकदम खोल झालेलें आहे. नदीच्या कडेनें जातांना हा डोह भीतिप्रद वाटतो. कारण, येथें माती तटासारखी एकदम खोल गेलेली आहे. यामुळें नदींत पाऊल टाकलें म्हणजे पुरुषाच्या वर एकदम पाणी लागतें.

नदीच्या कांठानें थोडा वेळ गेल्यावर गोपाळपुरा लागतो. येथें तुकारामाच्या पादुका व मूर्ति आहेत. येथून तुकाराम वैकुंठाला गेला, असें सांगतात. येथेंहि नदीचा डोह खोल आहे. तेथें एक राधाकृष्णाचें देऊळ आहे. नदीच्या कडेकडेनें आणखी पुढें गेल्यावर जेथें तुकारामाच्या अभंगांच्या वह्या बुडविल्या असें म्हणतात, तें ठिकाण लागतें. तेथें एक लहानसा घाट असून शेजारच्या आवारांत एक तुकारामाची मूर्ति आहे, व ज्या दगडावर तुकाराम तेरा दिवस उपास करीत पडला होता असें म्हणतात, तो दगड मूर्तीपुढें ठेविलेला आहे. येथें घाटाजवळ एक औदुंबर वृक्ष आहे. त्यामुळें घाटावर चांगली छाया होती.

आम्ही येथें येऊन पोहोंचलों, तों बारावर एक वाजून गेला होता, व पोटांत काव काव करूं लागलें होतें. तेव्हां आम्हीं '**आधीं पोटोबा, मग विठोबा**' या म्हणीचा अवलंब केला, यांत नवल नाहीं.

फराळ करून आम्हीं बराच वेळ विश्रांति घेतली. झाडाच्या सांवलींत घाटावर व नदीच्या कांठीं असल्यामुळें भर दुपार असतांनासुद्धां आम्हांला उन्हाचा त्रास मुळींच झाला नाहीं, व येथें वेळहि मौजेनें गेला. या ठिकाणीं नदीच्या पात्रांत मोठा डोह आहे, व येथें सुसरी आहेत, असें लोक सांगत होते. बहुतेक सर्व तीर्थांच्या ठिकाणीं जशी माशांची मौज दिसते, तशी येथेंहि दिसत होती. या डोहांत पुष्कळ मोठमोठे मासे आहेत, व पाण्यावर शेंगा फेंकल्या, कीं, त्या खाण्याकरितां मासे खालून पटापट बाहेर येतात व उड्या मारून क्षणार्धांत सर्व शेंगा खाऊन टाकतात! येणारा प्रत्येक यात्रेकरू आपल्याबरोबर शेंगा आणल्याखेरीज रहात नाहीं. यामुळें येथले मासे चांगले पुष्ट दिसले.

नला येथें हरिद्वारची आठवण झाली. तेथें गंगेंत अशाच माशांच्या झुंडींच्या झुंडी दिसतात. मात्र तेथें माशांना गव्हांच्या पिठाचे गोळे किंवा पेढ्यांचे तुकडे टाकण्याची रीत आहे; तर येथें शेंगा टाकण्याची रीत आहे.

देहूमधील पहावयाचा बहुतेक सर्व भाग पाहून झाला होता. फक्त तुकारामाच्या घराची जागा पहावयाची राहिली होती. म्हणून आमची परत जावयाची वेळ होईपर्यंत आम्हीं येथेंच वेळ काढला. अडीच वाजल्याबरोबर आम्हीं प्रथम येथल्या तुकारामाच्या देवळाचें दर्शन घेतलें. त्याच मूर्तीपुढें तुकारामाची शिळा आहे. नंतर परत नदीकांठानें आम्हीं गांवाकडे परतलों, आणि आतां मोडकळीला आलेल्या गांवाच्या वेशींतून गांवांत शिरलों. देहू गांव फारच लहान आहे. आतां तुकारामाच्या वंशांतलीं येथें चाळीस पन्नास घरें झालीं आहेत. तुकारामाचें जुनें घर आतां राहिलेलें नाहीं. तेथें नवीन दोनतीन घरें दिसतात, व तुकारामाची एक मूर्तिहि तेथें आहे. तुकारामानें वैकुंठाला प्रयाण केल्यावर लवकरच ही मूर्ति स्थापन करण्यांत आली, असें आम्हांला सांगण्यांत आलें.

हल्लींची असलेली पिढी ही तुकारामापासून सातवी पिढी होय. तुकारामाचा कनिष्ठ मुलगा नारायणबुवा हा तुकारामाच्या पाठीमागून त्याचें व्रत पाळूं लागला, व त्यानें विठोबाला व तुकारामाच्या घराण्याला **देहू, किन्हई** व **एलवाडी** हे तीन गांव इनाम करून घेतले. यांतलें अर्धें उत्पन्न विठोबाच्या देवळाकडे चालतें व अर्धें सर्व भाऊबंदांत वांटलें गेलें आहे.

तुकारामाच्या अभंगांच्या पोथ्यांबद्दल येथें आम्हीं चवकशी केली. तुकारामाची एक पोथी येथल्या एका घराण्यांत आहे; पण त्या घराण्यांतील मुलगा हल्लीं अज्ञान असून त्याचा हिस्सा व इस्टेट सरकारच्या ताब्यांत आहे. यामुळें पोथी पहाण्याला मिळणें सध्यां शक्य नाहीं, असें आम्हांला समजलें. तुकारामाच्या वेळच्या कांहीं वह्या तळेगांवाला ( दाभाड्यांच्या ) एका तेल्याजवळ आहेत, असेंहि आम्हांला सांगण्यांत आलें.

ही जागा पाहून झाल्यावर आम्ही परत विठोबाच्या देवळांत आलों, व देवाचें दर्शन घेऊन जाण्याच्या तयारीला लागलों. आतां साडेतीन वाजले होते, व आम्हांला अठरा मैलांचा प्रवास करावयाचा होता. आमचे लोहमय अश्व तयारच होते. त्यांना उचलून देवळाच्या पायऱ्यांवरून खालीं आलों, व लागलींच मार्गस्थ झालों. सुमारें तीन तासांनीं आम्ही आमचें चक्कर संपवून घरीं परत आलों.

देहूला पायगाडीनें जाण्याचा बेत केल्यापासून तुकारामाच्या चरित्राचें व अभंगाचें वाचन व चिंतन मीं चालविलें होतें, असें आधीं सांगितलेंच आहे. तेव्हां तुकारामाच्या चरित्रापासून व त्याच्या अभंगांपासून सध्यांच्या समाजानें काय शिकण्यासारखें आहे, याविषयीं थोडक्यांत लिहून मी वाचकांची रजा घेणार आहें.

कर्तव्य म्हणून ज्या मला पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा नेहमीं व्यासंग ठेवावा लागतो, त्या मला प्रथमतः तुकाराम व सॉक्रेटीस यांच्या चरित्रांत व उपदेशांत विलक्षण साम्य आढळून आलें, यांत नवल नाहीं. हे दोघेहि आपापल्या देशांतील कमी दर्जाच्या मानलेल्या कुळांत उत्पन्न झालेले होते; दोघांची सांपत्तिक स्थिति साधारणपैकींच होती; दोघेहि संसारी साधु होते; दोघांच्याहि बायका कजाग होत्या; दोघेहि विषयसुखाविषयीं बेफिकीर होते; दोघांनाहि आत्मनिरीक्षणाचा विलक्षण नाद होता; दोघांचीहि आत्मिक वाढ हळुहळू होत गेली; दोघांनाहि आपल्या काळच्या लोकांचे दोष स्पष्टपणें दिसत होते, दोघांनींहि हे दोष निर्भीडपणें लोकांना दाखवून त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; दोघांच्या उपदेशाचा लोकांवर विलक्षण परिणाम घडला; पण दोघांनाहि पुराणाभिमानी लोकांपासून छळ सोसावा लागला, तो इतका कीं, सॉक्रेटीसाला आपल्या तत्त्वाखातर विषप्राशन करावें लागलें, तर तुकारामाला कदाचित् जलसमाधी घ्यावी लागली. मात्र या दोघां साधूंचे मोक्षमार्ग निरनिराळे होते. सॉक्रेटीस ज्ञानयोगी होते. त्याला ज्ञानाचें वेड लागलें होतें. सर्व लोकांना ज्ञानी करून सोडावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती; सारांश

‘ ज्ञानान्मोक्षः ’ असें त्यांचें तत्त्व होतें. तुकाराम भक्तियोगी होता. त्याला भक्तीचें वेड लागलें होतें; सर्व लोकांना भक्त्युद्रेक करून सोडावें अशी त्याची महात्त्वाकांक्षा होती; सारांश ‘ भक्त्या मोक्षः ’ असें त्याचें तत्त्व होतें.

तुकारामानें भक्तिमार्ग हा नवीन उत्पन्न केला होता, अशांतला भाग नाहीं. हा भक्तिमार्ग ज्ञानेश्वरापासून महाराष्ट्रांत रूढ झाला होता. पण प्रत्येक धर्ममार्गाचा आत्मा कालेंकरून नष्ट होऊन त्याचें शव शिल्लक राहतें,तोच प्रकार याहि भक्तिमार्गाचा झाला होता.भक्तीचा उपदेश करणारे हरिदास, पुराणिक, गुरु, उपदेशक हे धंदेवाले कोरडे उपदेशक बनले होते. उपदेशाकरितां बिदागी घ्यावी; स्वतःचें वर्तन हवेंतसें वाईट असलें तरी हरकत नाहीं; भोळ्या बायाबापड्यांना नादीं लावावें; ‘ पुराणांतलीं वांगीं पुराणांत ’ अशा भावनेनें वागावें; हा प्रकार तुकारामाच्या काळीं माजला होता. सारांश, खरी भक्ति जाऊन त्याचे जागीं दंभ आलें होतें. हा दंभस्फोट तुकारामानें फार उत्तम तऱ्हेनें केलेला आहे.

**सॉक्रेटिसाच्या** काळीं हीच स्थिति होती. तेथें **सोफिस्ट** नांवाचे लोकशिक्षक उत्पन्न झाले होते. ते पैसे घेऊन विद्या शिकवीत. पण त्यांचें ज्ञान खरें नसून पोपटपंची असे; लोकांना वक्तृत्वपूर्ण बडबड करण्याला मात्र ते शिकवीत. सॉक्रेटिसाचा अशा लोकांवर कटाक्ष असे. त्याप्रमाणें तुकारामाचेंहि होतें. तुकारामानें आपल्या काळच्या या धंदेवाल्या कोरड्या भक्तांची फार कडकपणानें खरडपट्टी काढलेली आहे, व त्यांच्या अनीतीच्या वर्तनाचा खासा समाचार घेतला आहे. असा प्रकार समाजांत सर्वदा चालत असतो, व यामुळें या दंभस्फोटासंबंधींचे तुकारामाचे अभंग हल्लींच्या काळालासुद्धां लागू होतात.

तुकारामाच्या काळीं शाक्तपंथाचा बराच प्रसार असावा, असें दिसतें; कारण, त्या पंथाच्यामुळें प्रचलित असलेल्या दारुबाजी व परनारीगमन या दोन व्यसनांबद्दल तुकारामाच्या अभंगांमध्यें वारंवार उल्लेख येतात.

ही जागा पाहून झाल्यावर आम्ही परत विठोबाच्या देवळांत आलों, व देवाचें दर्शन घेऊन जाण्याच्या तयारीला लागलों. आतां साडेतीन वाजले होते, व आम्हांला अठरा मैलांचा प्रवास करावयाचा होता. आमचे लोहमय अश्व तयारच होते. त्यांना उचलून देवळाच्या पायऱ्यांवरून खालीं आलों, व लागलींच मार्गस्थ झालों. सुमारें तीन तासांनीं आम्ही आमचें चक्कर संपवून घरीं परत आलों.

देहूला पायगाडीनें जाण्याचा बेत केल्यापासून तुकारामाच्या चरित्राचें व अभंगाचें वाचन व चिंतन मीं चालविलें होतें, असें आधीं सांगितलेंच आहे. तेव्हां तुकारामाच्या चरित्रापासून व त्याच्या अभंगांपासून सध्यांच्या समाजानें काय शिकण्यासारखें आहे, याविषयीं थोडक्यांत लिहून मी वाचकांची रजा घेणार आहें.

कर्तव्य म्हणून ज्या मला पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा नेहमीं व्यासंग ठेवावा लागतो, त्या मला प्रथमतः तुकाराम व सॉक्रेटीस यांच्या चरित्रांत व उपदेशांत विलक्षण साम्य आढळून आलें, यांत नवल नाहीं. हे दोघेहि आपापल्या देशांतील कमी दर्जाच्या मानलेल्या कुळांत उत्पन्न झालेले होते; दोघांची सांपत्तिक स्थिति साधारणपैकींच होती; दोघेहि संसारी साधु होते; दोघांच्याहि बायका कजाग होत्या; दोघेहि विषयसुखाविषयीं बेफिकीर होते; दोघांनाहि आत्मनिरीक्षणाचा विलक्षण नाद होता; दोघांचीहि आत्मिक वाढ हळुहळू होत गेली; दोघांनाहि आपल्या काळच्या लोकांचे दोष स्पष्टपणें दिसत होते, दोघांनींहि हे दोष निर्भीडपणें लोकांना दाखवून त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; दोघांच्या उपदेशाचा लोकांवर विलक्षण परिणाम घडला; पण दोघांनाहि पुराणाभिमानी लोकांपासून छळ सोसावा लागला, तो इतका कीं, सॉक्रेटीसाला आपल्या तत्त्वाखातर विषप्राशन करावें लागलें, तर तुकारामाला कदाचित् जलसमाधी घ्यावी लागली. मात्र या दोघां साधूंचे मोक्षमार्ग निरनिराळे होते. सॉक्रेटीस ज्ञानयोगी होते. त्याला ज्ञानाचें वेड लागलें होतें. सर्व लोकांना ज्ञानी करून सोडावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती; सारांश

'ज्ञानान्मोक्षः' असें त्यांचें तत्त्व होतें. तुकाराम भक्तियोगी होता. त्याला भक्तीचें वेड लागलें होतें; सर्व लोकांना भक्तियुक्त करून सोडावें अशी त्याची महात्त्वाकांक्षा होती; सारांश 'भक्त्या मोक्षः' असें त्याचें तत्त्व होतें.

तुकारामानें भक्तिमार्ग हा नवीन उत्पन्न केला होता, अशांतला भाग नाहीं. हा भक्तिमार्ग ज्ञानेश्वरापासून महाराष्ट्रांत रूढ झाला होता. पण प्रत्येक धर्ममार्गाचा आत्मा कालेंकरून नष्ट होऊन त्याचें शव शिल्लक राहतें,तोच प्रकार याहि भक्तिमार्गाचा झाला होता.भक्तीचा उपदेश करणारे हरिदास, पुराणिक, गुरु, उपदेशक हे धंदेवाले कोरडे उपदेशक बनले होते. उपदेशाकरितां बिदागी घ्यावी; स्वतःचें वर्तन हवेंतसें वाईट असलें तरी हरकत नाहीं; भोळ्या बायाबापड्यांना नादीं लावावें; 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' अशा भावनेनें वागावें; हा प्रकार तुकारामाच्या काळीं माजला होता. सारांश, खरी भक्ति जाऊन त्याचे जागीं दंभ आलें होतें. हा दंभस्फोट तुकारामानें फार उत्तम तऱ्हेनें केलेला आहे.

**सॉक्रेटिसाच्या** काळीं हीच स्थिति होती. तेथें **सोफिस्ट** नांवाचे लोकशिक्षक उत्पन्न झाले होते. ते पैसे घेऊन विद्या शिकवीत. पण त्यांचें ज्ञान खरें नसून पोपटपंची असे; लोकांना वक्तृत्वपूर्ण बडबड करण्याला मात्र ते शिकवीत. सॉक्रेटिसाचा अशा लोकांवर कटाक्ष असे. त्याप्रमाणें तुकारामाचेंहि होतें. तुकारामानें आपल्या काळच्या या धंदेवाल्या कोरड्या भक्तांची फार कडकपणानें खरडपट्टी काढलेली आहे, व त्यांच्या अनीतिच्या वर्तनाचा खासा समाचार घेतला आहे. असा प्रकार समाजांत सर्वदा चालत असतो, व यामुळें या दंभस्फोटासंबंधींचे तुकारामाचे अभंग हल्लींच्या काळालासुद्धां लागू होतात.

तुकारामाच्या काळीं शाक्तपंथाचा बराच प्रसार असावा, असें दिसतें; कारण, त्या पंथाच्यामुळें प्रचलित असलेल्या दारुबाजी व परनारीगमन या दोन व्यसनांबद्दल तुकारामाच्या अभंगांमध्यें वारंवार उल्लेख येतात.

तुकारामाला या शाक्तपंथाचा फार तिटकारा वाटत असे; त्याप्रमाणें निवळ कर्मठपणानें ईश्वरप्राप्ति होते, मग आपलें वर्तन कसेंहि असो— अशा तऱ्हेचा कर्मठपणाहि तुकारामाला पसंत नसे. अन्तःकरणांत उच्च भावना उत्पन्न झाली नसतांना वरचा बाह्य कर्मठपणा तुकारामाला आवडत नसे. धार्मिक बाबतींत असा कर्मठपणाचा प्रचार सदा असतो. या कर्मठपणावरहि तुकारामाचा फार कटाक्ष असे. अन्तःकरणाच्या शुद्धीवांचून, व मनांतील दुर्वासना, स्वार्थबुद्धि व अहंकार टाकल्यावांचून खरा मोक्ष मिळणार नाहीं, अशी तुकारामाची खात्री झाली होती. निवळ वरवरच्या टाळकुटीनेंहि कांहीं कार्य होणार नाहीं; तर खरी भक्ति व पवित्र आचरण हाच ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग आहे, असा स्वतःच्या अनुभवानें त्याला प्रत्यय आला होता. खऱ्या मोक्षमार्गाची ही जी गुरुकिल्ली आपल्याला सांपडली आहे, ती सर्व जनसमूहाला सांगण्यांत तुकारामानें आपलें सर्व आयुष्य खर्च केलें, व आपली सर्व कळकळ व आपलें वक्तृत्व उपयोगांत आणलें.

तुकारामाचे अभंग पुष्कळ आहेत; पण प्रसंगाप्रमाणें त्यांचें सार थोडक्यांत आहे. कारण, त्याचें मत ठाम असल्यामुळें तेच विचार निरनिराळ्या रूपांत तो मांडीत असे. यामुळें तुकारामाच्या अभंगांत विचाराचा सारखेपणा फार आहे व यामुळें त्यांचें सारहि थोडक्यांत सांगणें शक्य आहे.

सारांश, तुकारामाच्या रसाळ कळकळीच्या वाणीवरून त्याला समाजाच्या कल्याणाची कशी तळमळ लागून राहिली होती, हें दिसून येतें. खरोखरी तुकाराम हा त्या काळचा मोठा सामाजिक सुधारक होता. त्याला त्याच्या काळच्या समाजांतील दोष अगदीं स्पष्टपणें दिसत होते, व ते दोष नाहींसे करण्याकरितां तो लोकांच्या कानींकपाळीं ओरडत असे. त्याचें स्वतःचें वर्तन त्याच्या विचारांशीं तंतोतंत जुळे. लोकांनींहि बोलल्याप्रमाणें करण्याची संवय लावून घेतली पाहिजे, व दुटप्पी वर्तन

सोडलें पाहिजे, असें त्याचें आग्रहाचें सांगणें असे. या तुकारामाच्या शिकवणीमुळें तुकारामाचे ग्रंथ जुन्या भाविक लोकांप्रमाणेंच अर्वाचीन समाजसुधारकांना व धर्मसुधारकांना अत्यंत आदरणीय वाटतात. कारण ज्या प्रकारची समाजस्थिति तुकारामाच्या काळीं होती, तीच आतांहि नाहीं काय? आज जर तुकारामाचा आत्मा वैकुंठाहून येऊन त्यानें आपल्या दिव्यदृष्टीनें महाराष्ट्रावर नजर फेंकली, तर त्याला काय दिसेल? 'हल्लींसुद्धां भोंदू, ढोंगी साधूंचें व गुरूंचें बंड माजत चाललें आहे; या साधूंच्या नादीं बायकापुरुष लागून अनीतिमार्गाकडे चाललीं आहेत; हल्लींसुद्धां बोलण्यांत व कृतींत जमीनअस्मानाचें अन्तर असणारीं हजारों माणसें आहेत; हल्लींसुद्धां व्यसनासक्ति लोकांमध्यें आहे, व खरी भक्ति व अन्तःकरणाची शुद्धता नाहीं!' हाच प्रकार तुकारामाच्या ध्यानांत येईल, व पुनः एकदां आपण भरतभूमीवर येऊन आपल्या जोरदार वाणीनें या दोषांचें आविष्करण करून जनमनाची शुद्धि करूं, असें त्याच्या मनांत येईल. असें वैकुंठवासी तुकारामाच्या मनांत येवो, व अर्वाचीन काळाला अनुरूप असे तुकाराम उदयाला येवोत, अशी इच्छा प्रदर्शित करून, व तोंपावेतों तुकारामाचे स्फूर्तिदायक अभंग वाचण्याची आमच्या वाचकांना बुद्धि होवो, अशी आशा करून हें चक्रवर्णन संपवितों.

# चक्कर ३ रें

## जुन्नर व शिवनेरी किल्ला

पायगाडीनें प्रवास करण्याच्या बाबतींत आमची स्थिति 'उत्सर्पिणी खलु महताम् प्रार्थना' यासारखी झाली. पहिला प्रवास आम्हीं १० मैलांचा केला; म्हणजे सकाळीं दहा मैल मांजरीस गेलों, व तेथें बहुतेक सर्व दिवस राहून सायंकाळीं परत आलों. त्यानंतर आम्हीं एकदम १० मैल जावयाचें व लगेच परत यावयाचें असें करूं लागलों; व त्याप्रमाणें खडकवासल्याच्या तलावास जाऊन परत यावयाचें, किंवा चिंचवड स्टेशनला जाऊन परत यावयाचें, अथवा कातरजच्या घांटाच्या बोगद्यांत जाऊन परत फिरावयाचें, असा क्रम कित्येक दिवस चालू ठेविला. इतक्या मैलांचा प्रवास हा मग आम्हांस कांहींच वाटत नाहींसा झाला, व असले प्रवास आमच्या नित्यक्रमांपैकीं झाले. यानंतरचा मोठा प्रवास आम्हीं केला तो आळंदीचा होय. आळंदी पुण्याहून १३।१४ मैल होईल; या ठिकाणींही आम्ही एकदम जाऊन आलों; म्हणजे दोन प्रहरीं १ वाजतां निघून आम्ही आळंदीस ३ वाजतां पोहोंचलों, व लगेच तास दीड तासानें तेथून निघून परत आलों. त्या वेळीं एका दिवसांत २६ मैल मजल मारल्याबद्दल आम्हांला थोडा अभिमान वाटला. यापुढला प्रवास याहीपेक्षां मोठा केला. देहूस जाऊन यावयाचा आम्हीं निश्चय केला, व त्याप्रमाणें तो चांगल्या तऱ्हेनें तडीस गेला. या यशस्वी फेरीनें आमची महत्त्वाकांक्षा वाढत चालली, व तदनुरूप आम्हांला एक संधि मिळाली. पुणें न्यू इंग्लिश स्कूलच्या सुपरिंटेंडेंटनीं आपल्या कांहीं विद्यार्थ्यांना घेऊन **कार्ल्यास** जाण्याचा बेत केला होता. अर्थात ती मंडळी आगगाडीनें जाणार होती. या यात्रेला पायगाडीच्या फेरीची जोड देण्याची कल्पना निघाली, व आम्ही आठ जणांनीं पायगाडीनें

**काल्योंस** जाण्याचा बेत केला. कार्ला पुण्यापासून पसतीस मैल आहे. येवढी मोठी फेरी पायगाडीनें घालण्याच्या कामांत पुष्कळांनीं मोडता घातला. विशेषतः माझ्या मित्रांच्या नाजूक प्रकृतीमुळें असला प्रवास त्यांच्या प्रकृतीला अपायकारक होईल असेंही भय घातलें; पण आम्हीं ठरविलेला बेत फिरविला नाहीं, व हीही आमची फेरी मोठी यशस्वी झाली. आम्ही एकदम पस्तीस मैलांची फेरी घातली, व दोन दिवस **काल्योंस** मुक्काम करून व आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें पाहून मग परत आलों. या आमच्या यशस्वी फेरीनें आमच्या मित्राबद्दल केलेलीं भयप्रद भाकितें फोल झालीं, व त्यांना स्वतःला व मला त्यांच्या सामर्थ्याबद्दल व कंटकपणाबद्दल जास्त खातरी वाटूं लागली, व त्यामुळें आमच्या **जुन्नर शिवनेरी** प्रवासाचा बेत झाला. **जुन्नर** पुण्यापासून ५६ मैल आहे. येथले मामलेदार माझ्या स्नेह्याच्या घरोब्यांतील असल्यामुळें त्यांनीं त्यांना **जुन्नरास** बोलाविलें होतें, व आम्हांला प्रवासाचा नाद लागलाच होता; तेव्हां आम्हीं एवढ्या लांबचा पायगाडीचा प्रवास करण्याचा बेत केला. एवढा प्रवास एका दिवसांत करावयाचा आमचा बेत ऐकून तर आमची मंडळींनीं टर उडविण्याचा सपाटा चालविला, व आम्हीं निदान दोन हप्त्यांनीं तरी हा प्रवास करावा असें सुचाविलें. पहिल्यांदा आम्हांला तो बेत बरा वाटला, व पहिल्या दिवशीं दोन प्रहरीं २६ मैल असलेल्या **खेडास** जाऊन मुक्काम करावा, व रात्रीची तेथें विश्रांति घेऊन भर पहांटेस निघून पुढें तीस मैलांचा प्रवास करावा असें मनांत आलें. पण पुढें जाण्याचा मुकरर दिवस ठरविल्यास व आमच्या इतर कामाचा विचार करतां इतका वेळ या प्रवासास देण्यास नव्हता म्हणून आम्हीं एकाच दिवशीं पण दोन हप्त्यांनीं हा प्रवास करण्याचा बेत केला. ५६ मैलांस सरासरी ७ तास लागतील असा आम्हीं अदमास केला, व त्यांपैकीं तीन तासांचा प्रवास सकाळीं व चार तासांचा दोनप्रहरीं करावा असें ठरविलें, म्हणजे सकाळीं सहा वाजतां निघून **खेडास** मुक्काम करावयाचा, व तेथें तीन वाजेपर्यंत विश्रांति घेऊन पुढें मार्गस्थ व्हावयाचें; म्हणजे

रात्रीं ७।८ च्या दरम्यान **जुन्नरास** पोंचावयाचें, असें आम्हीं मैलांवरून व आमच्या सरासरीच्या चालीवरून गणितानें ठरविलें, व त्याप्रमाणें सात आठांच्या दरम्यान आम्ही येतों, गांवाचे वेशीवर मनुष्य पाठवावा असें मामलेदारसाहेबांस कळविलें.

या आमच्या प्रवासांत **देहूप्रमाणें** आम्हीं तिघेजण बरोबर होतों. माझे मित्र, माझा मुलगा व मी अशी आमची त्रयी झाली, व आमच्या मित्राच्या घरून आम्हीं सकाळचे बरोबर सहा वाजतां निघालों. पुणेंमुंबईरस्ता व पुणेंजुन्नररस्ता हा सहा साडेसाहा मैलपर्यंत एकच आहे. पुढें जुन्नरचा रस्ता उत्तरेस वळतो, व मुंबईचा पश्चिमेस जातो. हाही रस्ता लांब **नाशिकापर्यंत** जातो, व तो मुंबईच्या रस्त्यासारखाच आहे. आम्हीं गेलों तेव्हां तर रस्त्यावर, गाडीनें पडलेल्या चकारी व इतर खांचखळगे भरण्याकरितां, मलमा ( बारीक मुरमाचा पातळ थर )नुकताच टाकलेला होता, व यामुळें रस्ता पायगाडीला फारच चांगला झाला होता. म्हणून आमची मजल झपाट्यानें चालली होती. मुंबईरस्ता सोडून आम्हीं सातव्या मैलाच्या पुढें जातों, तों आमच्या उजव्या अंगास सूर्यबिंबाचा तांबडा लाल गोळा सपाट क्षितिजावर दिसूं लागला. त्या वेळची शोभा कांहीं विलक्षण वाटली. हां हां म्हणतां सूर्यगोल क्षितिजावर येऊं लागला, व म्हणूनच जणूं काय आम्हीं आपला वेगही वाढविला. पुढें एक हिरव्यागार शेतांनीं वेष्टित असें लहानसें गांव लागलें, व थोडें पुढें जातों, तों **इंद्रायणीची** खोल खोल दरी लागली. १३।१४ मैलांच्या दरम्यान आम्हीं **इंद्रायणी** नदी ओलांडली. या नदीला पूल नाहीं; धरणवजा फरसबंदी रस्ता बांधला आहे. इंद्रायणी नदीच्या आजूबाजूच्या भागांत पाणी पुष्कळ असल्यामुळें या भागांत विहिरीचें बागाईत बरेंच आहे. **देहूस** जातांना आम्हांस हेंच दृष्टोत्पत्तीस आलें. **आळंदीसही** तोच प्रकार व येथेंही तीच स्थिति दृग्गोचर झाली. **इंद्रायणीची** दरी टाकून आम्ही पुनः पठारावर आलों, व मैल दर मैल मार्ग आक्रमूं लागलों. सुमारें दोन तास झाले नाहींत तोंच आम्हीं **चाकण** गांवांत येऊन थडकलों. **पुण्या-**

हून **चाकण** १८ मैल आहे. येथें पोंचलों तों तहान व भूक या दोहींनी गर्दी केली, व रस्ता थेट गांवांतून जात असल्यामुळें आम्हीं पाण्याच्या चंवकशीकरितां पायगाड्यांवरून खालीं उतरलों, तोंच एक पडकेंसें देऊळ दिसलें. जवळपास चवकशी करितां त्या आवारांत चांगली पाण्याची विहीर आहे असें कळलें. तेव्हां आंत शिरून पायगाड्या भिंतीस टेंकून आम्हीं आपले बरोबरचें पाथेय काढलें व थोडा फराळ केला. श्रम करून आल्यानंतर साध्या अन्नालाही गोडी लागते असें म्हणतात त्याचा अनुभव आम्हांस आला. फराळ झाल्यावर विहिरीचें पाणी यथेच्छ प्यालों, व क्षणभर देवळांत थांबून रस्त्यावर आलों. आतां आमचें मुक्कामाचें ठिकाण अवघें सातच मैल होतें. तेव्हां पाऊण तासांत आम्हीं तेथें पोहचूं असा आम्हांस धीर आला, व आम्हीं मार्गस्थ झालों; व नऊ वाजतात तोंच **भीमा** नदीच्या कांठीं आलों. **खेड** याच नदीच्या पलीकडच्या तीराला आहे. गांव लहानच पण नदीच्या तटाकीं असल्यामुळें त्याचा देखावा चांगला दिसत होता. या नदीला अगदीं नवाच पूल बांधलेला आहे. गांवाची शोभा पाहात व पूल पाहात आम्ही पायीं चाललों. पूल ओलांडल्यावर पाहतों तों एक फार खोल ओढा लागला. याची खोली खरोखरच भयप्रद होती. या ओढ्याला पूल बांधण्याचें काम चालू आहे, व तें बहुतेक येत्या पावसाळ्याच्या आंत संपेल असें आम्हांस सांगण्यांत आलें. हा ओढा ओलांडून जरा पुढें गेल्यावर गांवाशेजारीं आणखी एक लहानसा ओढा लागतो. रस्त्याचे उजवे बाजूस फार जुने पडके असे-अर्धवट पूल व अर्धवट धरण व दगडी काम लागलें. हा पूर्वींच्या मुसलमानकाळीं पूल होता असें आम्हांस मागाहून समजलें. ओढा टाकून थोडें पुढें गेल्यावर गांवाची वेस लागली. आतां उतरावें कोठें हा प्रश्न आला. जवळपास धर्मशाळा दिसेना. पुण्याहून निघण्यापूर्वीं आम्हीं एका स्नेह्याच्यामार्फत त्याच्या **खेड** येथील **वेंडर** मित्रास पत्र लिहविलें होतें, व त्या **वेंडरचें** नांव व पत्ता लिहून देतों असें त्यानें सांगितलें होतें. पण आमच्या निघण्याच्या वेळेपर्यंत तो

पत्ता व नांव आम्हांस समजलें नव्हतें. गांवांत आल्यावर चवकशी करितां गांवांत तीन **वेंडर** आहेत असें कळलें; तेव्हां कोणच्या **वेंडरकडे** जावयाचें हें समजण्याची पंचाईत आली. वाटेंत कोठें धर्मशाळाही दिसेना. तेव्हां माझे मित्र म्हणाले, " आतां अगांतुकी केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. आमच्या वेळीं कॉलेजांत एक विद्यार्थी होते, त्यांचे वडील येथले प्रसिद्ध वकील आहेत, तेव्हां त्यांच्या घराचा पत्ता काढून तेथें जावें, " असा बेत करून आम्हीं पायगाड्या हातानें चालवीत चवकशी करीत चाललों व लवकरच आम्हांस पाहिजे तें घर सांपडलें. माझे मित्र दरवाज्यांतून आंत गेले व त्यांनीं तेथल्या गृहस्थास विचारलें, " **नागोपंत** आपटे घरांत आहेत का ? " त्यानें उत्तर दिलें, " **नागोपंत** चार वर्षांपूर्वींच वारले. तुम्हाला काय पाहिजे ? " आमचे मित्र म्हणाले, "अरेरे, वाईट झालें ! मला ठाऊक नाहीं. त्यांचे चिरंजीव आमच्याबरोबर कॉलेजांत होते. " इतका संवाद होत आहे तोंच एक तरुण विद्यार्थी बाहेर आला व त्यानें ताबडतोब आम्हांस ओळखून आदरानें घरांत बोलाविलें. आम्हीही मग येथें कसें व कशाकरितां आलों हें सांगितलें. अर्थात्च आमची जेवणाखाण्याची उत्तम व्यवस्था झाली. प्रथमतः चहा व फराळाचें आलें. आम्हींही २६ मैलांचा प्रवास करून आल्यामुळें भुकेनें व्याकुळ झालों होतों. तेव्हां या आदरातिथ्याचा पूर्ण समाचार घेतला. नंतर आंघोळीच्याबद्दल विचारपूस झाली. आमच्या कॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यानें सांगितलें कीं, या ठिकाणीं पोहावयाची सोय उत्तम आहे. तरी त्या ठिकाणीं इच्छा असल्यास चलावें, नाहीं तर घरींच ऊन पाण्याची तजवीज करतों. ते उन्हाळ्याचे दिवस व शिवाय इतका व्यायाम करून आम्ही आलेले, व आमच्या मित्रांना नेहमीं गार पाण्यानें स्नान करण्याची संवय; मग काय, आम्हांला ही सूचना ताबडतोब पसंत झाली, व आम्ही धोतरें, रुमाल घेऊन त्या ठिकाणाकडे निघालों. हें ठिकाण म्हणजे, गांवाबाहेर एक **वृद्धेश्वराचें** देऊळ आहे, त्याचे समोरील, एक जिवंत पाण्याचें मोठें कुंड होय. हें ठिकाण नदीच्या कांठाला आहे.

येथून भीमेवरील पुलाचा देखावा चांगला दिसतो. स्नानकुंड पाहून तर आम्हीं थक्क झालों. हें कुंड चतुष्कोणाकृति आहे व त्याच्या तीन बाजूंस चांगल्या फरसबंदी पायऱ्या आहेत, व एका बाजूस स्नान करण्याकरितां बऱ्याच ओऱ्या बांधल्या आहेत. कुंडाची एक बाजू चाळीस पन्नास फूट असावी. हें कुंड जिवंत पाण्यानें नेहमीं भरलेलें असतें, व ओऱ्यांच्या बाजूला एका मोरींतून सारखें पाणी वाहत असतें. यामुळें उन्हाळापावसाळा कुंडांत सारखें पाणी राहतें. मध्यें हें कुंड पुष्कळच खोल आहे. यामुळें हव्या तितक्या उंचीवरून उड्या मारल्या तरी खालीं पाय लागावयाची भीति नाहीं. तिन्ही बाजूंस पायऱ्या असल्यामुळें नवशिक्या माणसास व लहान मुलास बाजूबाजूनें पोहावयास शिकविण्याची सोय आहे. कारण, गळ्यापासून गुडघ्यापर्यंत हव्या त्या पायरीवर उभें राहून अलीकडे पोहत येण्यास सांपडतें. शिवाय कोपऱ्या कोपऱ्यानें पोहण्यास सोय उत्तम आहे. कारण सर्व बाजूस सारख्या पायऱ्या असल्यामुळें हवे तेव्हां पाय खालीं लागतात. इतकें उत्तम बांधलेलें सोईचें प्रचंड कुंड आम्हीं आजपर्यंत पाहिलें नव्हतें. अर्थात् आम्हांला हें कुंड पाहून फार आनंद झाला. या गांवांत या कुंडामुळें बहुतेक लहान थोर मंडळीस पोहतां येतें असें आम्हांस सांगण्यांत आलें, व त्याचें प्रत्यंतरही आम्हांस तेथें दिसलें. कारण आम्ही गेलों त्या वेळीं तेथें पांच पंचवीस मंडळी पोहत होती. कांहीं परत जात होती तर कांहीं नवी येत होती. हें देवालय व कुंड एका लिंगायत व्यापाऱ्यानें बांधलें असें आम्हीं ऐकलें. त्याच्या या कल्पनेबद्दल आम्हीं त्याचे मनापासून आभार मानले. कायमचा हजारों लोकांना असा उपयोग होणारा दानधर्म खरोखरीच चांगला. नाहीं तर मुंग्यांना किंवा माकडांना खाऊं घालण्याचा किंवा सहस्रभोजनें घालण्याचा दानधर्म काय कामाचा ? हें सुंदर कुंड पाहून आमच्या मनांत एक स्वार्थी विचार उत्पन्न झाला. असें पोहण्यालायक प्रशस्त कुंड **फर्ग्युसन** कॉलेजला मिळेल तर काय वहार होईल ! तेथल्या चवदाशें-पंधराशें विद्यार्थ्यांना व्यायामाचें एक उत्तम साधन

होईल, व स्वसंरक्षणाला अत्यंत उपयोगी अशी पोहण्याची कला शिकण्यास एक उत्तम ठिकाण होईल. पण आठदहा हजारांचा खर्च करून असें कुंड बांधून देणारा दाता भेटेल तेव्हां हें शक्य आहे. असा दाता आमच्या हयातींत मिळो अशी आम्हीं तेथें देवाची प्रार्थना केली. आमच्या मित्रास पोहावयास म्हणण्यासारखें येत नव्हतें, म्हणून त्यांनीं कुंडाच्या एका कोंपऱ्यापासून अगदीं नजीकच्या कोंपऱ्यापर्यंत पोहत जाण्याचा प्रयत्न केला, पण त्यांतही त्यांनीं एक गटांगळी खाल्ली. माझें पोहण्याचें अध्ययन माझ्या मित्राच्यापेक्षां एक इयत्ता जास्त होतें, म्हणून मी कुंडाच्या या तीरापासून समोरच्या तीरापर्यंत कसाबसा जाऊं शकलों.

आमचा **खेड** येथील मुक्काम फारच आनंदांत गेला. त्या घरीं दोन तरुण विद्यार्थी होत. एक आमचे कॉलेजांतील व एक डेक्कन कॉलेजांतील. या दोघांच्याबरोबर बोलण्याचालण्यांत आमचा वेळ सहज निघून जाऊन आमचा सकाळचा थकवा पार नाहींसा झाला. आमच्या करमणुकीकरितां त्या ठिकाणीं मधुकरीनें शिकणारा पण स्वाभाविक उत्तम गळा असलेला एक मुलगा त्यांनीं बोलावला, व त्यानें कांहीं पदें फार चांगल्या तऱ्हेनें म्हटलीं. इतकें होत आहे तों दोन वाजले, व आमची जाण्याची वेळ होत आली, व आम्हीं आपल्या पुढल्या प्रवासाच्या तयारीला लागलों. तीन वाजतां निघालों म्हणजे सात आठांच्या दरम्यान **जुन्नरास** पोंहोचूं अशी आमची अटकळ होती. पण येथें आम्हांस समजलें कीं, **खेडा**पासून पुढला रस्ता बराच चढावाचा आहे. आम्हीं चहा वगैरे घेतला, व आमचें इतक्या उत्तम तऱ्हेनें आम्ही अनाहूत असतांना आदरातिथ्य केलें याबद्दल घरांतील मंडळींचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानले, व त्यांनींही परत येतांना येथें अवश्य उतरून जा व **खेडांतील** सार्वजनिक व सरकारी इमारती वगैरे पहा असा आग्रह केला. आम्हीं उतरण्याचें कबूल करून मंडळीचा निरोप घेऊन निघालों. दोघे विद्यार्थी आम्हांला गांवाबाहेरपर्यंत पोंचवावयास

आले होते. गांवांतून आम्हीं पायींच चालत निघालों होतों. आम्ही पायगाडीवर चढून चालूं लागल्यावर ती मंडळी परतली.

सकाळच्याप्रमाणें आतांचा प्रवास सुखकर वाटेना. ती भर उन्हाची वेळ असल्यामुळें उन्हाचा बराच त्रास होऊं लागला. अशा स्थितींत रस्त्यावर झाडांची सावली आलेली असली म्हणजे आम्हांस काय विलक्षण आनंद होई! अशा तऱ्हेनें चार पांच मैल गेलों नाहीं तोंच आम्हांस मोठा घाट लागला, व चढावयास फार त्रास पडूं लागला. इतक्यांत रस्त्यावर मलमा टाकण्याचें काम चालू आहे असें दिसलें. तेव्हां आम्हीं खालीं उतरलों व पायींच चालूं लागलों. हा घाट बराच मोठा आहे. पुण्याशेजारच्या **कातरजच्या** घाटापेक्षां थोडा मोठा आहे असें आम्हांस वाटलें. **खेडापासून जुन्नरच्या** वाटेला असा एखादा घाट आहे याची आम्हांस मुळींच कल्पना नव्हती. हा घाट पाहून **जुन्नरास** पोहोंचण्यास जास्त वेळ लागणार असें दिसूं लागलें. कारण सर्व घाट आम्हांस पायीं चालावा लागला. पायीं पायीं पण शेवटीं एकदांचें आम्हीं घाटमाथ्यावर आलों. वर आल्यावर प्रचंड असा सपाट पठार दृष्टीस पडला, व आम्हीं पुन: पायगाडीवर आरूढ होऊन चालूं लागलों. पण आतां दुसरें एक त्रासाचें कारण उद्भवूं लागलें. जसजशी संध्याकाळ होत चालली तसतसा समोरून जोराचा वारा वाहूं लागला व पायगाडी वेगानें चालेना. दोन मैल गेल्यावर या पटारावर वसलेलें **पेठ** म्हणून गांव आहे तें लागलें व गांवामधून थेट रस्ता जात असल्यामुळें हें गांव आम्हांस सहज पाहण्यास मिळालें. आतां हा सारखा पठारच राहणार कीं काय असें आम्हांस वाटून **जुन्नरास** पोहोंचण्यास आम्हांस फार रात्र होणार कीं काय अशी भीति वाटूं लागली; म्हणून आम्हीं आपली सर्व शक्ति खर्च करून जोरानें चालूं लागलों. याप्रमाणें एकदोन मैल गेलों नाहीं तोंच चढावाप्रमाणें प्रचंड उतार लागला व आम्हांस आनंद झाला. कारण उतारावरून जातांना जोरानें मनुष्य जातो इतकेंच नव्हे तर पायगाडीवर बसणाराला यावेळीं पूर्ण विश्रांतिही मिळते. उताराला लागल्यावर आम्हीं वायुवेगानें जाऊं

लागलें, व थोड्याच अवकाशांत सर्व उतार उतरून खालीं येतां तों हिरव्यागार शेतांनीं व मळयांनीं आवृत असें **मंचर** गांव लागलें. हा गांव बराच मोठा आहे, व येथें व्यापारही मोठा आहे. हा गांव रस्त्याच्या थोडा बाजूस आहे. म्हणून आम्ही येथें न थांबतां तसेच पुढें निघालों कारण सायंकाळ होत चालला व मुक्काम गांठण्याची उत्कंठा लागली. वाट चढून आल्यामुळें व उन्हाच्या व वाऱ्याच्या त्रासानें आम्ही फार थकलों व सकाळच्याप्रमाणें हा प्रवास आनंददायी व सुखकर झाला नाहीं, तरी पण कसेंही करून सात सव्वा सातांच्या सुमारास आम्ही **नारायणगांवास** आलों. तेथून **जुन्नर** ९ मैल होतें. येथें आलों तसाच नेट धरून चाललों असतों तर आम्हीं ८॥ ला तरी **जुन्नरास** पोहोंचलों असतों. पण **नारायणगांवच्या** शेजारींच एक वाहत्या पाण्याची नदी लागली, व आम्ही उन्हानें फार थकल्यामुळें येथें फराळ करून मग पुढें जावें असें मनांत आलें; व त्याप्रमाणें पुलाखालीं उतरून चांगलासा खडक पाहून येथें थोडा फराळ केला, व यथेष्ट पाणी प्यालों, व मग पुढें जाण्याचा बेत करूं लागलों. आतां चांगला काळोख पडला. तेव्हां पाय-गाडीचे कंदील लावण्याला लागलों तों एकाचे कंदिलांत मुळींच तेल नाहीं असें दिसलें व लांबच्या प्रवासास निघतांना सर्व सामान बरोबर आहे किंवा नाहीं हें पाहिलें नाहीं, त्याचें प्रायश्चित्त आम्हांस भोगावें लागणार असें दिसलें. आमचा रस्ता गांवांतून होता तेव्हां गांवांत एका वाण्याच्या एथें खोबरेल व रॉकेल विकत घेऊन कंदील कसाबसा तयार केला. इतकें होत आहे तों रात्रीचे आठ वाजले. चांगलें चाललें तर एका तासांत पोहोंचूं असें वाटलें व **नारायणगांवा**पासून **जुन्नर**कडे उतार असल्यामुळें व आतां थोडा वाराही सुटल्यामुळें आम्ही जोरानें चालूं लागलों. पण रात्र अगदीं अंधारी असल्यामुळें पुढें कांहीं दिसत नव्हतें. इतक्यांत माझा कंदील विझला व तो एकदोनदां लावला असतांना सुद्धां जोराच्या वाऱ्यांत टिकेना, तेव्हां मला माझ्या मित्राच्या दिव्याच्या उजेडानें चालावें लागलें. आतां पायांतही पेटके येऊं लागले. यामुळें जरा

चढावाचा रस्ता आला कीं पाय अगदीं थकत, व पायगाडी थांबवावी लागे. याप्रमाणें कांहीं चालत व कांहीं पायगाडीवर असें करतां करतां जुन्नर गांवाची शीव आली. आतां मामलेदारसाहेबांचें ठिकाण किती दूर आहे याची विवंचना सुरू झाली तोंच, मामलेदारांचा शिपाई हातांत कंदील धरून आमची वाट पाहात असलेला दृष्टीस पडला. त्याला पाहून आमच्या जिवांत जीव आला. मामलेदार-साहेबांचें मकाण किती दूर आहे, असें त्या शिपायास विचारतां त्यानें सांगितलें, "प्लेगमुळें साहेब पडळीवर राहतात, व ती पडळ गांवाच्या पलीकडे अर्ध मैलावर आहे." हें ऐकून 'दुष्काळांत तेरावा महिना' या म्हणीची आम्हांस आठवण झाली. आधींच आम्हीं थकलेले त्यांतच मामलेदाराचें मकाण सगळा गांव टाकून पलीकडे, पण शिपायाबरोबर आम्हीं आतां चालत जाण्याचा निश्चय केला, व अर्ध्या पाऊण तासांत मामलेदारसाहेबांच्या पडळीवर येऊन पोहोंचलों, तों पावणेदहा झाले. शेवटीं एकदांचा मुक्काम गांठला म्हणून आम्हांस आनंद झाला. मामले-दारसाहेब आमची आठ वाजल्यापासून सारखी वाट पाहात होते. वाटेंत आमच्या पायगाडीला कांहीं तरी अपघात झाला अशी त्यांना धास्ती वाटली किंवा आम्हीं **नारायणगांवास** वस्तीस राहिलों असेंही एकदां त्यांना वाटलें. पण आम्हीं उशीरानें कां होईना पण सुखरूप येऊन पोचलों म्हणून त्या मंडळींना आनंद झाला. आमच्या मित्राचा व माम-लेदारसाहेबांचा फार घरोबा असल्यामुळें व माझी जरी त्यांची पूर्वीची ओळख नव्हती तरी त्यांच्या साध्या, सरळ व मोकळ्या स्वभावानें मला सुद्धां संकोच वाटला नाहीं, व आम्हांला सर्वांना घरीं आल्याप्रमाणें वाटलें. जेवणखाण झाल्यावर इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी झाल्या व जुन्नरांतल्या प्रेक्षणीय स्थळांबद्दल आम्हीं मामलेदारसाहेबांस माहिती विचारली. त्यांनीं असें सांगितलें कीं, "**जुन्नरांत** व **जुन्नराच्या** आसपास इतक्या प्रेक्षणीय गोष्टी आहेत कीं, त्या सर्व पाहण्यास आठ दिवसही पुरणार नाहींत. प्रथमतः, या भागांत **बौद्धधर्माचें** पूर्वकाळीं फार प्राबल्य

असल्यामुळें लेणीं पुष्कळच आहेत. एकंदर लेणीं १३५ असून त्यावर ३५ शिलालेख आहेत; हीं लेणीं निरनिराळ्या चार डोंगरांत आहेत ते डोंगर म्हणजे **मानमोडा** डोंगर, **शिवनेरीचा** डोंगर, **तुळजा** डोंगर व **सुलेमान** डोंगर. **जुन्नर**पासून १५ मैलांवर **नाणेघाट** आहे व तेथील देखावा फार चांगला असून तेथेंही फार जुने शिलालेख आहेत. शिवाय खुद्द **जुन्नरास** बऱ्याच गोष्टी पाहण्यासारख्या आहेत." ही सर्व माहिती ऐकून आम्हांला इतके दिवस राहण्यास सवड नाहीं याबद्दल वाईट वाटलें, व आम्ही पुन्हा केव्हां तरी जास्त सवड काढून येऊं असें मामलेदारसाहेबांस सांगितलें. सध्यां आम्हांस दोन दिवसांची सवड होती व तेव्हां 'आंथरूण पाहून पाय पसरावे' या आपल्या म्हणीप्रमाणें किंवा 'कापड पाहून अंगरखा बेतावा' या इंग्रजी म्हणीप्रमाणें आम्हांला आमच्या सवडीप्रमाणें येथला कार्यक्रम ठरवावा लागला; पहिल्या दिवशीं सकाळीं **सुलेमान**पर्वतावरील लेणीं व तेथल्या **लेण्याद्रि** नांवाच्या गणपतीचें स्थान पहावयाचें, व सायंकाळीं **जुन्नर** शहर व तेथील जुनीं व नवीं ठिकाणें पहावयाचीं, व दुसऱ्या दिवशीं **शिवनेरी** किल्ला व त्या डोंगरांतील लेणीं पहावयाचीं, व सायंकाळीं जुन्नराबाहेरील पण जवळचीं प्रेक्षणीय स्थळें पहावयाचीं, असा आम्हीं कार्यक्रम ठरविला. व मग विश्रांतीकरितां आमच्या डेऱ्यांतील आंथरुणावर पडलों; पण दिवसाच्या अति श्रमामुळें चांगली झोंप आली नाहीं.

सकाळीं उठल्यावर चहापाणी होऊन आम्हीं **सुलेमान**पर्वतावरील लेणीं पहाण्यास निघालों. या ठिकाणीं अष्टविनायकांतील एक स्वयंभूगणपतीचें देऊळ आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें. यावरून हिंदुलोक या डोंगरास गणेशडोंगर किंवा **लेण्याद्रीचा** डोंगर म्हणतात; मुसलमान लोक याला **सुलेमान** पर्वत म्हणतात. येथें पूर्वकालीं बौद्ध भिक्षूंची मोठी वस्ती होती. याप्रमाणें हें ठिकाण म्हणजे धर्माची सांगड घालणारें ठिकाण आहे असें आमच्या मनांत आलें. **लेण्याद्रीच्या** डोंगराची ओळ बरीच उंच आहे, व ती **जुन्नरच्या** उत्तरेस आहे.

तिकडे जाण्यास जुन्नरच्या बाजूनें वाहणारी **कुकडी नदी** उतरून जावें लागतें. नदीच्या दोन्ही बाजूंस झाडी असून [illegible] बागाईतही बरीच आहे. नदी उतरल्यावर एक बाग लागतो, व त्यांत एक महादेवाचें देऊळ आहे. महादेवाचें स्थान भुयारांत आहे व त्याला बऱ्याच पायऱ्या उतरून खोल जावें लागतें. हें पाहून आम्हांस नाशिकच्या **सीतागुंफेची** आठवण झाली. भाविक लोकांना भुरळ पाडण्याकरितां असलीं ठिकाणें भिक्षुकांनीं मुद्दाम केलेलीं असावीं असा माझा समज झाला. वाटेंत चांगली सुपीक काळी जमीन लागते, आणि आंब्याचीं झाडें लागतात. हीं झाडें **राघोबादादा** यांचा दत्तक पुत्र **अमृतराव** यांनीं लावलीं असें म्हणतात. आम्ही मधलीं शेतें टाकून लेण्याच्या डोंगराजवळ आलों. लेणीं डोंगराच्या साधारण मध्यावर आहेत. त्याला पुण्याच्या पर्वतीप्रमाणें दगडी फरशीच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. या पायऱ्या निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या माणसांनीं गणपति आपल्याला पावला म्हणून बांधलेल्या आहेत. अर्ध्याच्यावर चढाव बराच बिकट आहे, व त्याला खडकांत पायऱ्या खोदलेल्या आहेत. या पर्वतावर एकंदर २६ लेणीं आहेत, व यांचा आकार व ठेवण हीं नेहमींच्या बौद्ध विहाराच्या तऱ्हेचीं आहेत. हीं लेणीं पुष्कळ जुनीं आहेत असें शिलालेखावरून दिसतें. या लेण्यांतील खांब **शातकर्णी** काळचे आहेत. म्हणजे हीं लेणीं ख्रिस्तीशकापूर्वीं शंभर वर्षांच्या सुमाराचीं असावीं. यांतलें साहावें लेणें चैत्यविहार आहे. हें **कार्ल्याच्या** लेण्यांतील मोठ्या विहारासारखें आहे. मात्र त्यापेक्षां लहान आहे. हें लेणें ४५ फूट खोल व २२ फूट रुंद आहे. याला देवळाच्या सभामंडपाप्रमाणें खांबांची रांग आहे. खांबावर निरनिराळ्या प्राण्यांचीं खोदीव चित्रें आहेत. वाघ, सिंह, हत्ती वगैरे प्राण्यांचीं चित्रें हुबेहूब आहेत. लेण्याच्या टोकाला वाटोळा स्तूप आहे व त्याला घुमट आहे. लेण्याचा वरचा भाग अर्धवर्तुळाकार असून **कार्ल्याच्या** लेण्याप्रमाणेंच खडकाला कणे खोदलेले आहेत यामुळें हें छप्पर फार सुंदर दिसतें. एकंदर लेणें मोठें प्रमाणशुद्ध खोदलेलें

असल्यामुळें लेणें पाहिल्याबरोबर बुद्धकाळच्या कारागिरीबद्दल कौतुक व आनंद वाटल्याखेरीज रहात नाहीं. हें लेणें कल्याणच्या **हिरण्यकाचा** मुलगा **सुलासदत्त** याची देणगी आहे असा पाली भाषेंत स्पष्ट शिलालेख आहे.

या लेण्याच्या पुढचें लेणें म्हणजे हल्लींच्या स्वयंभू मानलेल्या अष्ट विनायकांपैकीं **लेण्याद्रि** नांवाच्या गणपतीचें स्थान होय. या लेण्याला प्रशस्त अशी पडवी आहे व त्यावरही सिंह, वाघ, हत्ती वगैरे पशूंचीं हुबेहुब खोदीव चित्रें आहेत. मुख्य दिवाणखाना फार भव्य आहे. तो ५७ फूट लांब व ५१ फूट रुंद आहे. मध्यें खांब वगैरे कांहीं नाहीं. बाजूस बसण्यासारखा चौथरा असून त्याचे पलीकडे राहाण्याच्या खोल्या आहेत. या स्वयंभू मानलेल्या देवळांत शिरल्याबरोबर प्रत्येक समंजस माणसास हें बौद्ध लोकांनीं खोदलेलें लेणें आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. हल्लीं लेण्यांच्या समोरच्या भिंतीजवळ गणपतीची मूर्ति असून लहान देवळाचा आकार त्या भिंतीला आणलेला आहे. बाजूच्या खोल्या कोठाराप्रमाणें उपयोगांत आणलेल्या आहेत. मूर्तिशेजारीं एक भटजीबोवा बसले होते व ते या स्वयंभू गणपतीची मोठी थोरवी गात होते. हा गणपति पुष्कळांच्या नवसास पावतो. देवळाच्या पायऱ्या नवसास पावल्यानंतर निरनिराळया लोकांनीं बांधल्या आहेत. आम्ही मनांतल्या मनांत या भोळेपणाबद्दल हंसत होतों, व भटजीजवळ कांहीं तरी बोलावयाचें म्हणून आम्हीं म्हटलें, "देवळाचा सभामंडप चांगला प्रशस्त आहे." तेव्हां भटजी मोठ्या कौतुकानें व अभिमानानें म्हणाला, "अहो, प्रशस्त म्हणून काय विचारतां? मागें एका श्रीमंत गणपतिभक्तानें येथें आपल्या सुनेचें फलशोभन केलें, तेव्हां या मंडपांत पांचशें पानें जेवावयास बसलीं होतीं." ही त्याची बढाई ऐकून हंसावें कीं रडावें हेंच आम्हांस समजेना. आम्ही गणपतीच्या मूर्तीकडे न्याहाळून पाहिलें तों, आम्हांस असें वाटलें कीं, ज्या गृहस्थानें येथें गणपतीची स्वयंभू (?) स्थापना केली त्यानें गणपतीची स्वतंत्र मूर्ति सुद्धां तयार केलेली

नसावी, त्याला एखादी बुद्धाची मांडी घालून ध्यानस्थ बसलेली मूर्ति जवळपास सांपडलेली असावी. त्या मूर्तीला गणपतीची सोंड चिकटवून ही 'गणपती'ची मूर्ति बनविलेली असावी.कारण बारकाईनें पाहणारास या मूर्तीच ध्यान अगदीं बुद्धमूर्तीसारखें दिसतें. या स्वयंभू अष्टविनायकाचें स्थान पाहून आमच्या मनांत आमच्या लोकांच्या अंधश्रद्धेची व विचारशून्यतेची कींव आली. आतां या स्वयंभू अष्टविनायकांपैकीं **लेण्याद्री**वर कशी भक्ति बसावी हें समजणें फार कठिण आहे. ज्यानें हा 'स्वयंभू' विनायक बनविला त्याचें संस्कृताचें ज्ञान यथायथाच दिसलें. ' लेण्याच्या डोंगरावरील विनायक ' अशा अर्थानें ' **लेण्याद्रि** ' हें नांव दिलेलें दिसतें. पण या समासांतील ' लेणें ' हा शब्द मराठी आहे, तर आद्रि हा शब्द संस्कृत आहे. व्याकरणाच्या नियमाप्रमाणें असा घेडगुजरी समास बरोबर नाहीं. शिवाय या दोन शब्दांचा समास केलाच तर तो ' **लेण्यद्रि** ' असा होईल, ' **लेण्याद्रि** ' होणार नाहीं. पण पहिला सामासिक शब्द उच्चारण्यास कठिण पडतो, म्हणून त्याचें दुसरें स्वरूप बनलें असावें, किंवा नांव ठेवतांना बनविलेलें असावें. हें झालें नांवाबद्दल; बरें, हा विनायक स्वयंभू स्थानांपैकीं आहे अशी भक्ति कशी बसली असावी ? एकंदर डोंगरांतील बौद्धधर्मीयांचीं लेणीं पाहिलीं म्हणजे हें विनायकाचें स्थान बौद्ध लेण्याचें बनविलेलें आहे हें लक्षांत आल्याखेरीज केव्हांही रहात नाहीं.

आम्ही या डोंगरावरील सर्व लहान मोठीं लेणीं पहातों तों, बराच उशीर झाला म्हणून आम्ही तावडतोब परतलों, व बारा एकाच्या सुमारास आमच्या बिऱ्हाडीं येऊन पोहोंचलों. जेवणखाण झाल्यावर अडीच तीन वाजेपर्यंत विश्रांति घेतली, व मग **जुन्नर** शहरांतील स्थळें पाहण्यास निघालों.

ज्या ठिकाणावरून एका जातीच्या कागदांना ' **जुन्नरी कागद** ' असें नांव पडलेलें आहे त्या जातीचे कागद तयार करण्याचा कारखाना प्रथमतः पहाण्यास गेलों. पूर्वकाळीं हा एक जुन्नरचा मोठा धंदा होता.

हा धंदा करणारे मुसलमान लोक आहेत, व त्यांना ‘कागदी’ अशी संज्ञा आहे. या जातीचे लोक चांगले पहिलवानही असत व यावरूनच ‘**कागदी पहिलवान**’ अशी म्हण पडली असावी. मात्र त्याचा मूळचा अर्थ चांगला असून मग ‘कागदासारखा पहिलवान’ असा अर्थ होऊन हल्लींचा उलट अर्थ झाला असावा, अशी एक कल्पना आम्हांस सांगण्यांत आली, व ती बरीच सयुक्तिक आहे असें दिसलें. पूर्वीं या मोहल्यांत पुष्कळ कागदी राहात असत. १८८५ सालीं प्रसिद्ध झालेल्या जिल्हा गॅझीटीयरमध्यें सुद्धां, या जातीचीं शंभर घरें असून चाळीस कारखाने आहेत असें लिहिलें आहे. पण आम्ही त्या मोहल्यांत गेलों तेव्हां आम्हांस पडक्या ओसाड घराखेरीज फारसें कांहीं दिसलें नाहीं. हल्लीं पांचसात सुद्धां कारखाने नाहींत असें सांगण्यांत आलें, व आम्ही गेलों तेव्हां तर जुन्नरांत थोडा प्लेग असल्यामुळें एकदोन कारखाने चालू होते. त्यापैकीं एका कारखान्यांत आम्ही गेलों. कारखाना म्हणजे एक चारपांच खणांची खोली होती, व थोडीशीं उपकरणें दिसत होतीं व व एकीकडे जुन्या चिटोऱ्यांचा एक ढीग दिसत होता. येथें सर्व कागद जुन्या चिटोऱ्यांचाच करतात असें आम्हांस दिसून आलें. जुनीं चिटोरीं फाडून तीं प्रथमतः कुटावयाचीं व मग तीं पाणी घालून वांटावयाचीं व त्याचा लगदा तयार करावयाचा. हीच कृति फार त्रासाची व फार मेहनतीची आहे, व यापेक्षांही खटपटीची व दगदगीची कृति म्हणजे लगदा शुभ्र करण्याची होय. कागदाचा लगदा तयार झाला म्हणजे तो फडक्यांत घालून नदीवर नेतात व तेथें मांडीभर पाण्यांत जाऊन तो लगदा पातळ करून सारखा हालवीत बसतात. यायोगें त्यांतली घाण पार निघून जातें व लगदा स्वच्छ होतो. या कामाकरितां कामकऱ्यांना पाण्यांत पांच पांच सहा सहा तास सारखें उभें राहावें लागतें. शुद्ध लगदा तयार झाल्यावर बारीक चाळणीवर त्याचा पातळ थर देण्यांत येतो, म्हणजे त्यांतून पाणी झिरपून जाऊन ओला कागद तयार होतो. व मग तो ओला कागद भिंतीला चिकटावितात, म्हणजे

भिंत कागदांतलें पाणी शोधून घेते व कागद सुकतो. नदींतील लगदा शुद्ध करण्याच्या पद्धतीखेरीज बाकी सर्व कृति त्या खोलींत चालल्या होत्या. एका भिंतीला सर्व कागद चिटकविलेले होते व एक माणूस ते वाळतील तसतसे काढीत होता, व नवे ओले कागद डकवीत होता. हा कारखाना पाहिल्यावर आम्ही तेथें तयार केलेले पुष्कळ कागद पाहिले. ते युरोपमधून येणाऱ्या कागदासारखे अर्थात् नव्हते; पण कागदावर तकाकी चांगली होती, व कागद पुष्कळ स्वच्छ होते. हा कारखाना पाहात असतांना मला मुंढवा येथील कागदाच्या गिरणीची सारखी आठवण होत होती. कोठें तो प्रचंड एंजिनानें चालणारा चिंध्यांपासून तों थेट कागदाच्या घड्या पाडून रिमें तयार करणारा व हजारों कृति यंत्रानें आपोआप होणारा आगीचा कारखाना व कोठें हा अल्प प्रमाणावर कागद तयार करणारा हातकारखाना; कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शामभटाची तट्टाणी ही जुनी म्हण, किंवा अर्वाचीन भाषेंत कोठें मोटार गाडी व कोठें बैलगाडी ही नवी म्हण, यांची आम्हांस आठवण झाली. आगीचे कारखाने चांगले किंवा हात कारखाने चांगले, याबद्दल पुष्कळ वेळां वाद पालण्यांत येतो, व देशाभिमानाच्या भरांत देशी हातकारखान्यांचें पुनरुज्जीवन करावें असें प्रतिपादण्यांत येतें. पण **आगकारखाना** व **हातकारखाना** यांची चढाओढ किंवा सहवास हा राक्षस आणि खुजा या क्रमिक पुस्तकांतील गोष्टीप्रमाणें आहे, असें मला वाटलें. ज्याप्रमाणें त्या गोष्टींत प्रत्येक प्रसंगीं खुजाचीच हानि झाली त्याप्रमाणें आगकारखान्यापुढें हातकारखान्यांचा निभाव कधींही लागावयाचा नाहीं, व जर आपल्याला आपल्या देशाची औद्योगिक उन्नति करून घ्यावयाची असेल तर **आगकारखान्यांची** व पाश्चात्य शास्त्रांची कास धरल्यावांचून गत्यंतर नाहीं. याच कागदाच्या कारखान्यांचें पहाना. विलायती स्वस्त कागदापुढें या जुन्नरी कागदाचा टिकाव लागवा कसा? इतक्या मेहनतीच्या धंद्याच्या मानानें कागद महाग विकूनही मजुरास फारशी मजुरी पडत नाहीं. या जुन्नरी कागदांना थोडी तरी

मागणी आहे. याचें कारण, हा कागद फार टिकाऊ आहे असें म्हणतात व म्हणून जुने व्यापारी लोक आपल्या हिशेबाच्या वह्यांना अझून या कागदाचा उपयोग करतात.

हा कागदाचा कारखाना पाहिल्यावर आम्ही मामलेदारसाहेबांचे कचेरींत गेलों. हल्लीं सर्व सरकारी कचेऱ्या 'कोट' या नांव्याच्या जुन्या गढीच्या आवारांत आहेत. मुसलमानांच्या अमदानींत जुन्नर परगण्याचा मुख्य अंमलदार या गढींत राहात असे. याला सर्व बाजूंनीं अर्धा दगडाचा व अर्धा मातीचा असा तट आहे. **कोटांत** जुन्या इमारती फारशा नाहींत. मुसलमानी अमलांतील एक मोठी विहीर व मोडकातोडका हमामखाना ऊर्फ स्नानगृह आहे, व एक जुनी वाड्यावजा इमारत आहे. या इमारतींत दुसऱ्या **बाजीराव**साहेबांस १७८५ पासून १७९५ पर्यंत प्रतिबंधांत ठेविलें होतें. हा 'कोट' पाहून होतो आहे तों, मामलेदारसाहेबांचें काम आटोपलें, व त्यांच्याबरोबर आम्हीं शहरांतली जुम्मामशीद, **पिरजादे** या नांवाच्या फार जुन्या मुसलमानी इनामदारांचें घर, व शहरांतलि एक दोन जुन्या विहिरी वगैरे जुनीं स्थळें पाहिलीं; **जुम्मामशिदीचें** लांकडी नकशीचें काम बरें आहे. पण उत्तर हिंदुस्थानांतील प्रचंड व भव्य दगडी मशिदी पाहिल्यावर या मशिदी मनांत मुळींच भरत नाहींत, असा मला अनुभव आला. इतकींच स्थळें पाहतों तों बरीच संध्याकाळ झाली. तेव्हां आम्ही मामलेदारसाहेबांच्या ठिकाणास परत आलों. या दिवशीं संध्याकाळीं मोठें वादळ होऊन थोडा पाऊस पडला. कालच्याप्रमाणें रात्रींचीं जेवणें झाल्यावर आम्हीं गप्पागोष्टींत वेळ घालविला. तेथले मुनसफ मामलेदारांचे शेजारींच रहात होते, यामुळें गांवाबाहेर असूनही आम्हांला बोलाचालायला पुष्कळ मंडळी होती; यामुळें आनंदानें बोलत बोलत आम्ही निद्रावश झालों.

मराठी राज्याचे प्रस्थापक **शिवाजी** महाराज यांचें जन्मस्थान पाहण्याचें माझ्या मनांत किती दिवस तरी होतें. आतां आपला फारा दिवसांचा मानस तडीस जाणार हें पाहून माझ्या मनाला फार आल्हाद

वाटत होता. मामलेदारसाहेबांच्या मातुःश्री फार पहांटेस उठल्या व त्यांनीं आमची फराळाची व चहाची तजवीज आज फारच लवकर केली. कारण परत येतांना ऊन होऊं नये म्हणून आम्हीं अगदीं पहांटेस निघण्याचा बेत केला होता. आम्हीं ज्या राहुटींत रहात होतों त्याचे अगदीं समोर **शिवनरीचें** उत्तरेकडचें सुळक्यासारखें टोंक दिसत होतें. या आमच्या ठिकाणापासून **शिवनेरी** किल्ला हा एखाद्या प्रचंड आगबोटीसारखा दिसत होता. आमच्या समोर असलेलें टोक म्हणजे बोटीची थेट नाळ आहे असें वाटे, व बाकीचा भाग बोटीच्या लोखंडी पऱ्याच्या बाजूसारखा दिसे. कारण **शिवनेरी** किल्ल्याचा डोंगर वरच्या भागाला निवळ काळ्या खडकाच्या भिंतीचा बनलेला आहे. यामुळें या किल्ल्याला तटाची मुळींच जरूर नाहीं. मूळ डोंगरच तटासारखा तुटलेला व काळा कुळकुळीत आहे. या नावेसारख्या दिसणाऱ्या किल्ल्यांची नाळ थेट उत्तर दिशेकडे आहे. हा देखावा पाहून या किल्ल्यांतील शिवाजीच्या जन्मापासून मराठीराज्यरूपी नौका हिंदुस्थानच्या अफाट समुद्रावर लोटण्यांत येऊन ती जणूं काय उत्तर दिशेच्या रस्त्यानें चालली आहे कीं काय असा मला भास झाला व एका दृष्टीनें हें खरेंही आहे. **शिवाजीनें** मराठी राज्यस्थापना केली, व या राज्याचा विस्तार सारखा होत जाऊन **राघोबादादांनीं** मराठ्यांचा झेंडा अटकेस नेऊन रोविला, तोंपर्यंत या विस्तारास कोठेंही अडथळा आला नाहीं. पुढें मराठी राज्यांत एकोपा न राहिल्यामुळें या नावेचीं शकलें झालीं ही गोष्ट निराळी. पण पहिल्यानें जी नाव हाकारण्यांत आली तिनें हिंदुस्थानचें उत्तर टोंक न थांबतां गांठलें हें खोटें नाहीं, व ही गोष्ट महाराष्ट्रीयांस अझूनही अभिमानाची वाटावी यांत नवल नाहीं.

अशा प्रकारचे विचार मनांत येत असतां आम्ही वाट चालू लागलों. आम्ही ज्या शेताच्या पडळींत होतों तेथून जरी **शिवनेरी** किल्ला आम्हांस अगदीं समोर दिसत होता, तरी किल्ल्यावर चढण्याची वाट पश्चिमेकडून होती व आम्हांला किल्ल्याला बहुतेक प्रदक्षिणाच घालावी

लागली. किल्ला आमच्या उजव्या बाजूस घालून खालूनच किल्ल्याची सर्व लांबी आम्हीं ओलांडली, व **पीरवाडी** खिंडीजवळ आलों. **मान-मोडा** नांवाच्या डोंगराची रांग व **शिवनेरीचा** डोंगर यांचे दरम्यान ही खिंड आहे, व या खिंडींतून बाहेर पडलें म्हणजे शिवनेरी डोंगराचा चढ लागतो. पहिल्यांदा चढ फारसा कठीण नाहीं, पण पुढें पुढें चढ बिकट होत जातो ही किल्ल्याची दक्षिण बाजू होय. ही बरीच रुंद आहे, व यांतून किल्ल्यावर जाण्यास वाट आहे. बाकीच्या तीन बाजू अगदीं तुटक्या कड्याप्रमाणें आहेत. ही बाजू इतकी तुटकी नसल्यामुळें किल्ल्याच्या सुरक्षिततेकरतां या बाजूस एकावर एक असे तीनचार तट आहेत. किल्ल्याचा पहिला दरवाजा किल्ल्याच्या उंचीच्या सुमारें अर्ध्यावर आहे. यामुळें प्रथमतः प्रवाशास आपण किल्ल्यावर लवकर चढून आलों म्हणून आनंद वाटतो. पहिल्या दरवाजांत आल्यावर तेथल्या देवडींत आम्हीं थोडी विश्रांति घेतली व पुढें चालूं लागलों. थोड्याच वेळांत **परवानगी** नांवाचा दुसरा दरवाजा लागतो. या दरवाजाच्या खांबावर वाघाचीं व हत्तीचीं खोदलेलीं चित्रें सुबक आहेत. दरवाजाचें काम दगडी असून फार मजबूत आहे. तेथून थोडा सपाटीचा पण चिंचोळा रस्ता टाकला म्हणजे हत्तीदरवाजा लागतो. येथून वीसपंच-वीस कदमांवरच **पीरदरवाजा** लागतो. हा दरवाजा इतर दरवाज्यांपेक्षां मोठा असून याचें दगडीकाम मजबूत असून सुबक आहे. येथून पुढें बराच चढाव आहे, व एका बाजूस तट व दुसऱ्या बाजूस डोंगर असा चिंचोळा रस्ता आहे. बराच चढाव चढून गेल्यावर पांचवा **शिवाबाईचा** दरवाजा लागतो. येथून उजवीकडे गेलें म्हणजे **शिवाबाईचें** देऊळ लागतें. वाटेनें खडकांत खोदलेले होद व टांकीं लागतात. या डोंगराच्या भागांत बौद्ध लेणीं बरींच आहेत, व ज्याप्रमाणें **लेण्याद्रि** हें गणपतीचें देऊळ बौद्ध लेण्यांचें बनविलें आहे तीच **शिवाबाई**च्या देवळाची स्थिति आहे. हेंहि पूर्वीं लेणेंच असावें. त्या ठिकाणीं देवीची मूर्ति स्थापून मग लांकडी सभामंडप वगैरे करून हिंदु देवळाचा त्या लेण्याला आकार



नं. १ ] शिवनेरी किल्ला : दूरूनचा देखावा. [ पान ४४





नं. ३



नं. ४

नं. २ ] शिवनेरी : शिवाईचें देऊळ. [ ४५ नं. ३ पुरंदर-किल्ला. नं. ४ पुरंदर कदारेश्वर देऊळ.

आणिला आहे. पण हें देऊळहि फार जुनें असावें यांत शंका नाहीं. देवळाशेजारीं पाण्याचा एक मोठा खोदीव हौद आहे. **शिवाबाईच्या** दरवाज्यापासून पुन: बराच चढाव आहे, व तो खोदीव पायऱ्यांनीं चढावा लागतो. हा चढाव चढला म्हणजे फाटक दरवाजा लागतो व येथून चाळीस कदमांवर किल्ल्याचा शेवटचा सातवा **कुलूपकर** दरवाजा लागतो. आम्ही येथें येऊन पोहोंचलों तों आम्हांस बराच दम लागला, व म्हणून येथें आम्हीं विश्रांति घेतली हें सांगावयास नको.

**शिवनेरी** किल्ल्याचा माथा त्रिकोणाकृति आहे. ज्या बाजूकडून वर येण्यास वाट आहे ती बाजू दक्षिणेस आहे, व तो त्रिकोणाचा पाया आहे. पश्चिमेच्या व पूर्वेच्या बाजू उत्तरेच्या टोंकांत मिळाल्या आहेत. या आकृतीमुळेंच खालून हा किल्ला एखाद्या अर्वाचीन आगबोटीसारखा किंवा नौकेसारखा दिसतो. कारण हल्लींच्या आगबोटींची मागची बाजू अशीच रुंद असते, व पुढच्या बाजूस बोट निमूळती होत जाते. या किल्ल्याच्या माथ्यावर आणखी एक उंच टेकडी आहे, व त्या टेकडीचें टोंक हें किल्ल्याचें सर्वांत उंच टोंक होय. पण ही टेकडी खालून मुळींच दिसत नाहीं. शेवटच्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे बऱ्याच मोडक्या-तोडक्या इमारती दिसतात; त्यांतल्या एकाला **अंबरखाना** म्हणतात; एकाला **सदर** म्हणतात. नुसते चौथरे तर कितीतरी दिसले. किल्ल्यावर खोदलेले हौद व टांकीं तर जागोजाग आहेत. किल्ल्याच्यावर जी उंच टेकडी आहे, तिच्या माथ्यावर आम्ही चढलों. तेथें थोडीच पण अगदीं सपाट जागा आहे. या ठिकाणीं एक खडकांत खोदलेला तलाव आहे, कांहीं पडकीं घरें व घरांच्या जागा आहेत. शाबूत अशा फक्त दोन गोष्टी येथें राहिल्या आहेत. पैकीं एक **इदगा** म्हणजे मुसलमान लोकांची प्रार्थना करावयाची भिंत होय. या भिंतीवर चढण्यास पायऱ्या आहेत, व दोन बाजूस मनोरे असून मध्यें तट्टासारखे अर्धवर्तुलाकार दगड लावलेले असतात तसे दगड लावलेले आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे लहानसें थडगें हें एका चतुष्को-

-नाकृति जोत्यावर बांधलेलें आहे. चारी बाजूंस चार कमानी आहेत, व वर विटांचा घुमट आहे. हें थडगें बरेंच जुनें दिसतें. एका दगडावर कुराणांतील उतारे कोरले आहेत. या चबूतऱ्यावर उभें राहिलें म्हणजे चारी दिशांचा प्रदेश व देखावा मजेचा दिसतो. पूर्वेस लहान लहान टेकड्या व त्यांचेपुढें सपाटच सपाट प्रदेश दृग्गोचर होतो; पश्चिमेस व उत्तरेस डोंगरच डोंगर दृष्टीस पडतात, व पूर्वेच्या एका टोंकास किल्ल्याखालीं **जुन्नर** शहर व त्यांतील लहान मोठीं घरें, झाडी, व **कुकडी** नदी हीं सर्व दिसतात. हा मजेदार देखावा बराच वेळ पाहून आम्हीं किल्ल्यावरील ही उंच टेकडी उतरून उत्तरेच्या टोंकाकडे जाऊं लागलों. या उंच टेकडीच्या पायथ्याशीं एक मशीद लागते. ही लहान आहे, पण सुबक दिसते. व हिचा विशेष म्हणजे हिला दोन मनोरे असून त्या मनोऱ्यांला लागून एक उंच कमान बांधली आहे. ही कमान भव्य असून ती **जुन्नरच्या** आसपासच्या प्रदेशांतून स्पष्ट दिसते. यामुळें **शिवनेरी** किल्ल्याचा हा एक विशेष झाला आहे. या मशिदीखालीं उत्तम पाण्याचें एक मोठें टाकें आहे. हें ८० फूट लांब, ४० फूट रुंद व १६ फूट खोल आहे. याला मध्यें दोन दोन खांब खोदतांना ठेवलेले आहेत. टांक्यापुढें पडवी आहे व तिचें खोदीव काम नीटनेटकें आहे. हें टाकें देवगिरीच्या हिंदू राजांच्या कारकीर्दींत बांधलेलें असावें असा त्याच्या खोदीव कामाच्या पद्धतीवरून तर्क केलेला आहे, व हा किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत गेल्यावर वरची मशीद बांधलेली असावी असा अंदाज आहे.

किल्ल्याचा बहुतेक भाग आम्ही पहात आलों, पण ज्या दृष्टिविषयाकरितां आम्हीं एवढा लांबचा प्रवास करून आलों, त्या **शिवाजीच्या** जन्मगृहाचा अझून मागमूस लागत नाहीं म्हणून मला हुरहूर लागली होती. पण वर वर्णन केलेली मशीद पाहून आम्हीं जरा उत्तरेकडे पुढें जातों तोंच एक दुमजली, पण पडका बंगला आमच्या दृष्टीस पडला व **लार्ड कर्झनच्या** कारकीर्दींत जुन्या ठिकाणांचा जीर्णोद्धार करण्या-

करितां काढलेल्या खात्यानें त्या बंगल्याच्या भिंतींत नवाच बसविलेला संगमरवरी दगडाचा शिलालेखही चटकन् दृग्गोचर झाला. शेवटीं एकदांचें आपल्याला **शिवाजीमहाराज** ज्या घरांत जन्मपावले तें घर पाहण्यास सांपडलें म्हणून अत्यंत आनंद वाटला. पण घराची व आसपासच्या जागेची स्थिति पाहून तो आनंद पार मावळला व त्या ठिकाणीं खेदाची व लज्जेची छटा मनावर उमटली. आम्हीं या पडक्या बंगल्याच्या दारांतून आंत शिरलों तों तेथें अत्यंत घाण पडलेली होती. गुराढोरांनीं तेथें आपले नैसर्गिक विधि केले होते. पक्ष्यांनीं घरटीं केलीं होतीं. मुंग्या-माशांचीं तेथें वारुळें होतीं. घराच्या सभोंवार कमर कमर गवत उगवलें होतें. घराच्या भिंतींत वांडगुळें व निवडुंग वाढलेच होते. वरच्या मजल्यावर जाण्याच्या जिन्यांत माती व घाण सांचलेली होती, व दुसऱ्या मजल्याच्या भिंती पडायाला झाल्या होत्या. ही सर्व घराची अंतःस्थिति व परिस्थिति पाहून मनाला फार वाईट वाटलें, माझ्या सोबत्यांनीं युरोपमध्यें राष्ट्रीय विभूतींच्याबद्दल लोकांमध्यें किती भक्ति असते याविषयींची माहिती सांगितली. अशा विभूतींच्या आयुष्याशीं संलग्न असलेल्या स्थळांचें तिकडे किती आस्थेनें व किती काळजीपूर्वक रक्षण केलेलें असतें; अशीं ठिकाणें किती स्वच्छ ठेवलेलीं असतात; तीं बिघडलीं जाऊं नये म्हणून कशी खबरदारी घेतली जाते; अशा ठिकाणांचें वायु, पर्जन्य वगैरे नैसर्गिक अरिष्टांपासून संरक्षण होईल अशाबद्दल किती तजवीज केलेली असते; सारांश, अशा ठिकाणीं प्रवासी गेला म्हणजे त्याच्या मनाला आनंद व अभिमान वाटल्याखेरीज रहात नाहीं. ही माहिती ऐकून युरोपांतील खरा देशाभिमान व आमच्या इकडील शाब्दिक देशाभिमान यांमध्यें किती अंतर आहे हें माझ्या ध्यानांत आलें. आमच्या महाराष्ट्रांत **शिवाजी**बद्दल आदर व अभिमान काय कमी आहे ? शिवाजीचे ठिकठिकाणीं उत्सव होतात. पुण्यांत दर वर्षीं असा उत्सव होतो, व त्या वेळीं देशाभिमानानें भरलेलीं पुराणें, भाषणें व प्रवचनें काय थोडीं होतात ? पण या पुराण–भाषण–प्रवचन-

कारांची मजल शाब्दिक देशाभिमान व परनिंदा या पलीकडे गेली आहे काय ? शिवाजीचा ज्या ज्या स्थळांशीं निकट संबंध आहे, त्यांची नीट व्यवस्था ठेवणें, त्या ठिकाणीं स्वच्छता राखणें, याबद्दल विधायक सूचना कधीं पुढें आल्या आहेत काय ? तशा जर आल्या असत्या व त्याप्रमाणें करण्याची व्यवस्था झाली असती तर आजपर्यंत **शिवनेरी** किल्ल्यावर **शिवाजीच्या** जन्मगृहाची अशी अन्तःस्थिति व परिस्थिति कां राहिली असती ? बरें, अशा व्यवस्था करण्यास पैसे फार लागतात किंवा पैसे नाहींत अशांतला भाग नाहीं. शिवाजीचा कित्येक हजारांचा तरी फंड आज कित्येक दिवस धूळ खात पडला आहे तो सुरक्षित आहे इतकें करून काय उपयोग ? त्या फंडाचा किंवा त्याच्या व्याजाचा शिवाजीचीं स्वाभाविक स्मारकें दुरुस्त ठेवण्याकडे खर्च कां होऊं नये ? या **शिवनेरी** किल्ल्यावरील **शिवाजीच्या** जन्मगृहाचीच गोष्ट घ्याना. या घराभोंवतीं चांगला तारांचा कठडा केला म्हणजे गुरें आंत जाऊन घाण करणार नाहींत. तसेंच एकदां हें घर अगदीं साफसूफ केलें, घराच्या तळमजल्याच्या जमिनीला फरसबंदी केली, भिंतीवरील बांडगुळें काढून टाकलीं, तर हें घर जास्त दिवस टिकेल व पाहणाऱ्यांच्या मनाला आनंद होईल. इतकी व्यवस्था करण्यास हजारपांचशें रुपयांपेक्षां जास्त रुपये खर्च येणार नाहीं. पण अशी व्यवस्था करण्याची बुद्धि होण्यास खरा देशाभिमान पाहिजे, खरा आदर पाहिजे. निव्वळ शाब्दिक किंवा स्वार्थी देशाभिमानानें व आदरानें हीं कामें कशीं होणार ?

**शिवाजीचें** जन्मगृह पाहून असे विचार माझ्या मनांत आले तरी पण आम्हीं हें घर स्वस्थपणें पाहिलें; या घराच्या सभोंवार हिंडलों. एका बाजूला दुसऱ्या मजल्यावर दगडी सज्जाचा भाग फार उत्तम दिसत होता. यावरून हें घर दुरुस्त असतांना चांगलें बांधलेलें असावें अशी कल्पना झाली. हें घर पाहून झाल्यावर आम्ही पुढें गेलों तों किल्ल्याचें उत्तरेचें टोंक लागलें. हें फारच निमुळतें होऊन शेवटीं अगदींच लहान झालेलें आहे, व तेथें एक बुरुज आहे. या बुरु-

जावरून पूर्वीं गुन्हेगारांचा कडेलोट करीत असत असें आम्हांला समजलें. या टोंकावरूनही **जुन्नर**शहरचा देखावा चांगला दिसत होता. याप्रमाणें सर्व किल्ला पाहून झाल्यावर आम्हीं परत फिरलों, व आदल्या दिवसाप्रमाणें बारांच्या सुमारास बिऱ्हाडीं परत आलों.

दोन प्रहरीं जुन्नराबाहेरील **ऑफिझ** बाग व **सौदागर**घुमट हीं दोन ठिकाणें पाहण्यास जाण्याचा आमचा बेत होता. पण तीन वाजल्यापासून मोठें वादळ होऊन चारांच्या सुमारांस एकाएकीं जोराचा पाऊस सुरू झाला, व त्यानें पडळीच्या अंगणांत पाणीच पाणी करून सोडलें; आमच्याकरितां उभारलेली राहुटी पडली, व आमचे कपडे थोडेसे भिजले; आमच्या पायगाड्याही पावसानें ओल्या केल्या. वळवाचाच पाऊस तो, मग काय विचारतां ? हा पाऊस सुमारें दोन तास फारच जोरानें पडला, व पुढें बारीक बारीक पडत होता. यामुळें आमचा राहिलेलीं स्थळें पाहण्याचा बेत जागच्याजागींच राहिला. उलट आम्हांस अशी धास्ती पडली कीं, उद्यां पहांटेस आम्हांस परत जाण्यास सांपडतें कीं नाहीं ? पण रात्रीकडेस पाऊस अगदीं थांबला व आकाश निरभ्र झालें. या पावसामुळें हवा मात्र फार चांगली झाली, व सकाळचा प्रवास फार सुखाचा होईल असा भरंवसा वाटूं लागला. ठरल्याप्रमाणें आम्हीं पहांटेस उठलों व फराळ, चहा वगैरे झाल्यावर मामलेदार व मुनसफ व त्यांच्या घरांतील मंडळी यांचा आभारपूर्वक निरोप घेऊन आम्ही आपल्या लोहमय अश्वावर आरूढ झालों. कालच्या पावसानें रस्त्यावरील धूळ वगैरे पार धुवून गेली होती, व पायगाडीच्या प्रवासाला रस्ता फारच चांगला झाला होता. कोठें कोठें मात्र चिखल पडला होता. आदल्या दिवशीं पाऊस पडून थंड झालेली सकाळची वेळ; तसेंच पावसानें मऊ झालेला रस्ता; मग आमचा प्रवास जलद व सुखकर व्हावा यांत काय नवल ?

आम्ही पाऊण तासांत **नारायणगांवास** आलों. तेथून **मंचरचा** पल्लाही लैवकरच गांठला. या सर्व प्रांतांत पाऊस खूपच पडला होता. रस्त्यानें ओहोणें वाहल्याच्या खुणा दिसत होत्या. कांहीं कांहीं ठिकाणीं तर

रस्त्यावरून अझून पाणी वाहत होतें. आम्हांला वाटेनें जी घोडनदी–पूल नसलेली मोठी नदी–ओलांडावी लागली तिला चांगलें पाणी आलें होतें. **खेडाहून जुन्नरास** जातांना आम्हांला फार त्रास झाला होता, पण आज सकाळचा प्रवास फार सुखकर झाला. या वेळीं आम्हीं निश्चय केला कीं, लांबचा पायगाडीचा प्रवास तिसऱ्या प्रहरीं कधींही करूं नये. कारण या वेळीं प्रथमतः उन्हांतून जावें लागतें; सायंकाळीं वारा सुटतो, व त्यानें पायगाडीला फार अडथळा होतो, व मनुष्य थकलेला असतो. तोच पहांटेस प्रवास केला म्हणजे पहिल्यांदा मनुष्याचा ताजातवाना दम असतो. सकाळची वेळ थंड असते, व हवा शांत असते, यामुळें पायगाडीचा प्रवास फार आनंददायक होतो. ज्या प्रवासाला जातांना आम्हांला नाकीं नऊ आले तो तीस मैलांचा प्रवास आम्ही चार साडेचार तासांत लीलेनें आटपून १०॥ च्या सुमारास **खेडास आपटे** वकीलांच्या घरीं येऊन पोहोंचलों. मंडळी आमची वाटच पहात होती. त्यांना आम्हीं आपल्या **जुन्नर** व **शिवनेरी**च्या प्रवासाची सर्व हकीगत सांगितली, व गप्पागोष्टी झाल्या. **सिद्धेश्वरा**समोरील, सुंदर व प्रशस्त कुंडांत आम्ही पोहोण्यास गेलों हें सांगावयास नकोच. जेवणखाण झाल्यावर थोडा वेळ विश्रांति घेऊन मग गांवांतील देवळें व **चंडीरामबोवांचा** मठ हीं स्थळें पहाण्यास गेलों. चंडीरामबोवांचा मठ भीमेच्या अगदीं कांठावर असल्यामुळें येथला देखावा बरा आहे. या मठाचे हल्लींचे शिष्य यांनीं आमचें आदरातिथ्य योग्य प्रकारें केलें. या मठाची बरीच शिष्यशाखा आहे. त्यांच्या मदतीनें येथें **चंडीरामबोवांची** पुण्यतिथि मोठ्या थाटानें केली जाते, व येथें एक सदावर्तही चालविलें जातें. आळंदीस ज्याप्रमाणें **नृसिंहसरस्वतीचा** नवा मठ स्थापन झाला आहे, तसाच येथलाही प्रकार दिसला. गांवांतून परत येतों तों आमची निघण्याची वेळ झाली, व चहापाणी घेऊन व घरच्या मंडळीचा निरोप घेऊन आनंदित मनानें आम्ही घरीं येण्यास निघालों. **खेडापासून पुण्याकडे** थोडा उतार आहे व वाराही पाठचा लागतो, यामुळें

आम्ही फार जलद जाऊं लागलों. व आम्ही अगदीं दिवसाउजेडी पुण्यास आलों असतों, पण वाटेंत आमच्यापैकीं एकाच्या पाय-गाडीच्या धावेस छिद्र पडलें तें नीट करण्यांत अर्धा पाऊण तास खोटी झाली. तरी पण आम्हीं काळोख पडण्याच्या पूर्वीं घरीं येऊन पोहोंचलों. ज्या आमच्या पायगाडीच्या प्रवासाबद्दल अनिष्ट भविष्यें करण्यांत आलीं होतीं, व आजपर्यंतच्या आमच्या प्रवासांत जो सर्वांत लांबचा होता असा प्रवास करून आम्ही सुखरूप परत आलों म्हणून आम्हांस फार आनंद झाला हें सांगावयास नकोच. आतां **जुन्नर**-शहराची थोडीशी ऐतिहासिक माहिती देऊन हीं आमच्या सायकलच्या लांबच्या प्रवासाची लांबलेली हकीगत पुरी करतों.

**जुन्नर** हें फार जुनें शहर असून पुरातन कालापासून त्याचें महत्त्व फार आहे. आतां आगगाडीच्या बदललेल्या मार्गामुळें तें बाजूस आहे असा भास होतो, पण हें शहर जुन्या काळीं हमरस्त्यावर होतें. **दिल्ली–आग्र्यासारख्या** उत्तरेच्या शहरांकडून किंवा **औरंगाबाद दौलताबाद** या शहरांकडून दक्षिणेंत यावयाचें म्हणजे या शहरा-वरून यावें लागे. तसेंच **ठाणें, कल्याण** या कोंकणांतील शहरां-वरून येणारा घाट याच शहरावर येतो. तसेंच **जुन्नरच्या** आसपास सुपीक प्रांत असल्यामुळें येथें व्यापारही मोठा चाले. ख्रिस्ती शकापूर्वीं १०० वर्षांपासून ख्रिस्ती शकानंतर २००।३०० वर्षेंपर्यंत **जुन्नर** हें बौद्धधर्माचें एक मोठें ठाणें होतें, हें जुन्नरच्या आसपासच्या पुष्कळ लेण्यांवरून स्पष्ट होतें. इतकीं लेणीं एकाच भागांत फार थोड्या ठिकाणीं आहेत. पुढें हें शहर **पैठणच्या तहपान** या क्षत्रपाची राजधानी बनलें असावें, असें एका शिलालेखावरून अनुमान करण्यांत आलेलें आहे. अकरा, बारा व तेरा या शतकांत **जुन्नर** व **शिवनेरी** हीं ठिकाणें **देवगिरीच्या** यादव राजांच्या ताब्यांत होतीं. इ. स. १४४३ मध्यें ब्राह्मणी राज्यांतील सरदार **मलीक ऊलतजार** यानें शिवनेरी किल्ला काबीज केला व **जुन्नरहून** कोंकणावर स्वारी केली.

१४७० मध्यें रशियन प्रवासी **अथेनेशी निकिटिम** हा **चौलाहून** पिंपरी घाटानें चोवीस दिवसांत **जुन्नरास** आला होता, व त्यानें पावसाळ्याचे दोन महिने जुन्नरांत घालविले होते. या ठिकाणीं सारखा चार महिने रात्रंदिवस पाऊस पडतो असें त्यानें लिहून ठेविलें आहे. १४८५ मध्यें **अहमदनगरच्या** निजामशाही बादशाहीचा प्रस्थापक **मलिक अहमद** याला ब्राह्मणी बादशहाकडून महाराष्ट्राचा व्यवस्थापक नेमण्यांत आलें, व त्यानें **जुन्नर** हें आपलें मुख्य ठाणें केलें. त्यानें **शिवनेरी** किल्ल्यावरील हिंदु किल्लेदारास किल्ला स्वाधीन करण्यास सांगितलें पण तो करीना, म्हणून **मलिक अहमदनें** किल्ल्याला वेढा दिला. कित्येक महिन्यांच्या वेढ्यानंतर किल्ला **अहमदच्या** स्वाधीन झाला. तेथें त्याला महाराष्ट्राचा पांच वर्षांचा जमविलेला वसूल मिळाला, यायोगें त्याला पुण्याच्या आस-पासचा सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घेतां आला. १४८६ मध्यें **अहमदानें** ब्राह्मणी राजाचें वर्चस्व झुगारून दिलें, व **निजाम उल्मुल्ख बहिरी** असा किताब धारण केला. ब्राह्मणी बादशाहानें अहमदच्या प्रांतांवर हल्ला करण्याकरितां फौज पाठविली. पण **अहमदानें** त्या फौजेचा पराभव केला, व तेव्हांपासून तो खराखुरा स्वतःच राजा झाला. १४९४ मध्यें **अहमदानें** स्वतः वसविलेल्या **अहमदनगर** नांवाच्या शहरांत आपली राजधानी केली. तेव्हांपासून **जुन्नर** प्रांत निजामशाहीच्या ताब्यांत राहिला. १५९५ मध्यें दुसरा **बहादुर निजाम** यानें **शिवाजीचा** आजा **मालोजी** यास सरदारकीचीं वस्त्रें देऊन **पुणें** व **सुपें** या परग-ण्यांची जहागिरी दिली, व **शिवनेरी** व **चाकण** या प्रदेशांची देखरेख करण्याचें काम दिलें. याप्रमाणें या किल्ल्याशीं व या प्रांतांशीं मराठ्यांचा प्रथम संबंध आला. **शिवनेरी** किल्ल्यांत १६२७ मध्यें **जिजाबाई** प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झालें, व त्याचें नांव **शिवाबाई** देवीच्या नांवापासून **शिवाजी** असें ठेवण्यांत आलें. **शहाजीच्या** कारकीर्दीमध्यें **विजापूर** व **दिल्लीचे** मोंगलबादशाह यांच्यामध्यें महाराष्ट्राच्या वर्चस्वाकरितां झटापटी चालल्या असतांना हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत गेला व **जुन्नर** येथें

एक मोंगल अंमलदार रहात असे. पुढें **शिवाजीनें जुन्नर** प्रांत व आपलें जन्मस्थान **शिवनेरी** किल्ला मोंगलांकडून घेण्याचा प्रयत्न केला, पण त्याला यश आलें. नाहीं. १६७५ च्या सुमारास मोंगल अंमलदाराच्या बोलावण्यावरून **फ्रायर** नांवाचा इंग्रज वैद्य व प्रवासी जुन्नरला आला होता. **फ्रायर** २३ एप्रिलला मुंबईहून निघून जुन्नरला ३० एप्रिल रोजीं आला. तो **कल्याणमुरबाडकडून आवा** घाटानें वर आला. जुन्नरच्या सुभेदाराच्या बायकांपैकीं एक आजारी होती म्हणून **फ्रायरला** बोलाविलें होतें. सुभेदाराच्या ४४ बायका व ३०० ठेवलेल्या बाया होत्या. **फ्रायर** या फिरंगी वैद्याची परीक्षा पाहण्याकरितां प्रथमतः एका गुलामाचा हात त्याला पडद्याबाहेर दाखविण्यांत आला. **फ्रायरनें** तो हात पाहून या बाईला कांहीं होत नसावें, प्रकृति उत्तम आहे, असें सांगितलें. तेव्हां **फ्रायरच्या** ज्ञानाबद्दल विश्वास पटून त्याला पडद्याआडून खऱ्या बाईला हात दाखविण्यांत आला, व **फ्रायरच्या** योजनेपासून त्या बाईला व इतरांना गुण आला. **फ्रायरनें** या वेळीं **जुन्नरचा** किल्ला पाहिला. त्याचे म्हणण्याप्रमाणें या काळीं **जुन्नर** प्रांताची धड ना मोंगलाचा व धड ना मराठ्याचा अंमल अशी स्थिति होती. यामुळें प्रांतांत सुरक्षितपणा मुळींच नव्हता, व इतका सुपीक प्रदेश असून त्याची स्थिति वाईट होती.

१६८४ मध्यें **औरंजेबानें जुन्नर** व **सिंहगड** यांचे दरम्यान ठाणीं बसविलीं, व **विजापूरावर** स्वारी करण्यापूर्वीं १७०५ मध्यें **औरंजेब** जुन्नराजवळ ७ महिने राहिला होता. **शाहुमहाराजांचे** कारकीर्दीत **जुन्नर** प्रांत मराठ्यांच्या खराखुरा ताब्यांत आला, व मग या प्रांताची भरभराट झाली व या प्रांताचें मराठ्यांस उत्पन्नही चांगलें होत असे. १७८६ पासून १७९४ पर्यंत दुसरे **बाजीराव** जुन्नरच्या कोटांत अटकेंत होते हें वर सांगितलेंच आहे. **सवाई माधवरावाच्या** मरणानंतर **परशुरामभाऊंनीं जुन्नरास** येऊन शपथपूर्वक **बाजीरावास** पेशवाईपद देऊं केलें व ते **बाजीरावास** पुण्यास घेऊन गेले. आपल्या राज्याची आहुति **एलफिस्टनसाहेबांच्या** हातीं देण्यापूर्वीं म्हणजे १८१७ मध्यें

**रावबाजी** जुन्नरास् आले होते. १८१८ मध्यें **जुन्नर** शहर व **शिवनेरी** किल्ला इंग्रजांच्या हातांत आला.

वरील हकीगतीवरून **जुन्नर** किती पुरातन आहे हें दिसून येईल. या ठिकाणानें पांच मालकांचें वर्चस्व पाहिलें आहे. दोन हजार वर्षांपूर्वी हीं ठिकाणें बुद्ध भिक्षूंच्या मोठ्या वसाहतीचीं ठाणीं होतीं. बुद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर १४ व्या शतकापर्यंत तीं हिंदुराजांच्या ताब्यांत होतीं. पुढें दोन अडीच शतकें मुसलमानांच्या ताब्यांत होतीं. पुनः तीं मराठ्यांच्या अमलाखालीं शंभर दीडशें वर्षें होतीं, व शेवटीं हल्लींच्या आपल्या इंग्रज सरकारच्या हातीं आलीं. हल्लीं नव्या ठिकाणाहून मोठमोठे रहदारीचे रस्ते झाल्यामुळें **जुन्नरचें** रहदारी व व्यापारी महत्त्व कमी झालें आहे, व तेथले जुने धंदे मोडत चालले आहेत. यामुळें या शहरांत पडकीं घरें, ओसाड जागा व **चारुदत्तानें** आपल्या वाड्याच्या केलेल्या वर्णनाप्रमाणें वाडे दृग्गोचर होतात, व काळाच्या प्रचंड परिवर्तनांत शहरांचें वैभव कसें वर खालीं जातें याचें उत्कृष्ट उदाहरण या शहरांवरून दिसून येतें.

# चक्कर ४ थें

## पुरंदर-किल्ला

' **अतिपरिचयादवज्ञा** ' या म्हणीची सत्यता आपल्याला पदोपदीं दिसून येते. पवित्र गंगातटाकीं राहून नदीस्नान न केलेले, ' **सागरः सर्वतीर्थानाम्** ' अशा समुद्राच्या समीप असून समुद्रस्नान अगर समुद्रदर्शन न केलेले, एकाद्या उत्तंगशिखर अशा पर्वताच्या पायथ्याशीं रहात असून कधींहि शिखरावर आरोहण न केलेले, प्रसिद्ध किल्ल्याच्या शेजारच्या गांवाचे रहिवासी असून किल्ल्यांत आजन्म पाऊल न घातलेले, गांवांत असलेल्या पदार्थसंग्रहालयाचें तोंड न पाहिलेले, आपल्या वस्तीच्या नजीक असलेल्या जुन्या देवालयांत किंवा लेण्यांत पाऊल न ठेवलेले, आपल्याच गांवांतील प्रसिद्धीला आलेला हरिदास, वक्ता, गायक किंवा दुसरा एकादा ललितकलाकोविद यांची कृति न पाहिलेले, अशा तऱ्हेचे **हरीचे लाल** म्हणजे **परिचयावज्ञेचे** उत्तम मासलेच होत. माझीच गोष्ट घ्याना. मला लहानपणापासून डोंगर, पर्वत, किल्ले वगैरे-सारखे देखावे पाहण्याची फार हौस. लहानपणीं आमच्या गांवच्या शेजारीं असलेल्या, टेंकड्या, डोंगर, किल्ले वगैरे सर्व मीं पाहून टाकलेले होते. पुण्यांत शिकण्यास असतांना मीं सिंहगड पुष्कळ वेळ पाहिला होता. परंतु इतिहासांत सिंहगडाशीं अगदीं निगडित झालेला पुरंदर आजपर्यंत मीं पाहिला नाहीं कसा, याचें मला आश्चर्य वाटतें. याला कारण अतिपरिचय हेंच होय, असें म्हणावें लागतें. कां कीं, या किल्ल्याचा मला मराठी शाळेंत महाराष्ट्राचा इतिहास वाचीत असल्यापासून श्रुतिपरिचय होता; इतकेंच नव्हे, तर या किल्ल्याचा मला दूरदृष्टिपरिचयहि लहानपणापासून होता. मी पुण्याला इंग्रजी शिकण्यास असतांना माझ्या मूळ महाड गांवाहून येण्याचा एक मार्ग बैलगाडीचा

होता; व आम्ही विद्यार्थी मंडळी वर्षांतून एकदोन वेळां तरी या बैलगाडीच्या मार्गानें जात असूं. आमचा मार्ग भोर संस्थानच्या बाजूनें होता. आमच्या गांवाहून प्रचंड सह्याद्रि ओलांडून भोराला यावयाचें, व भोराहून पुण्याला जावयाचें. भोराहून पुण्याला येतांना वाटेंत **कापुरवहाळ** म्हणून गांव लागतो. तेथून पुरंदर किल्ला उत्तम दृग्गोचर होतो. **कापुरवहाळे**पासून हल्लीं **पुरंदराला** जाण्याला उत्तम सडक आहे. या गांवीं आलें, व ती **पुरंदरची** सडक पाहिली, म्हणजे पुरंदराला जाण्याची इच्छा होई. परंतु, आपली सडक सोडून मध्येंच दुसरीकडे जाणें शक्य नसल्यामुळें ती इच्छा मनांतल्या मनांत राही. पुढें विद्याभ्यास संपल्यावर या बैलगाडीच्या प्रवासाचे फारसे प्रसंग येत नसत. यामुळें हा किल्ला पाहण्याचें आजपर्यंत झालें नाहीं. महाराष्ट्रांतील दुसरे पुष्कळ किल्ले पाहिले असतांना हा इतका इतिहासप्रसिद्ध किल्ला आजपर्यंत पाहून न होण्यालीं एक माझा गैरसमजहि कारण झाला. **पुरंदराला** युरोपियन लष्करी फौज असते, तेव्हां तो किल्ला लष्करी ठिकाण असल्यामुळें आपल्याला तो पाहण्यास अडचण पडेल कीं काय, असें मनांत येत असे. परंतु, एकदां हा किल्ला पाहण्याचा मला सुयोग मोठ्या अचानकपणें आला, व म्हणून या किल्ल्याचें वर्णन करणें शक्य झालें. एका पावसाळ्याच्या शेवटीं पोस्ट खात्यांत नोकर असलेले माझे एक जवळचे नातेवाईक यांची **पुरंदरच्या** पोस्टमास्तरच्या जागीं बदली झाली, व तेथें कांहीं दिवस राहिल्यावर त्यांचें मला पत्र आलें, कीं, " मी येथें तीन महिन्यांकरितां बदलून आलों आहें. हा किल्ला पाहण्यासारखा आहे. येथें लष्करी आरोग्यगृह आहे. जे जे युरोपियन शिपाई सैन्यांत आजारी पडून अशक्त होतात, त्यांना हवा पालटण्याकरितां येथल्या आरोग्यगृहांत पाठवितात. बाकी येथें लष्करी ठिकाणाचे निर्बंध कांहीं एक नाहींत. मी येथें असल्यामुळें आपली राहण्याची अडचण पडणार नाहीं; तरी माझी येथून बदली होण्यापूर्वी तुम्ही येथें आल्यास मला फार आनंद होईल. " अशा मजकुराचें पत्र आल्यामुळें मला आनंद झाला; व मी

वेळांत वेळ काढून हा किल्ला पाहून आलों. किल्ल्यावर जाऊन आल्यावर तर मला माझ्या जाण्याबद्दल जास्तच आनंद झाला. कारण, हा किल्ला सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें, हवापाण्याच्या दृष्टीनें, अजिंक्यपणाच्या दृष्टीनें व लष्करी ठिकाणाच्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील बऱ्याच किल्ल्यांना मागें टाकील, यांत शंका नाहीं. या किल्ल्याचें ऐतिहासिक महत्त्वहि फार मोठें होतें, हें या लेखांतील ऐतिहासिक भागावरून ध्यानांत येईल. प्रथमतः सध्यांच्या वस्तुस्थितीकडे वळणें बरें.

**पुरंदर** हा किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला सुमारें वीस मैलांवर आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची जवळजवळ पंचेचाळीसशें फूट आहे. अर्थात् हा महाबळेश्वरापेक्षांहि किंचित् उंच आहे. सिंहगडापेक्षां दोनशेंफूट जास्त उंच आहे, व पुण्याच्यावर पंचवीसशें फूट आहे. हल्लीं पुण्याहून पुरंदराला जाण्याला तीन रस्ते आहेत. दोन बैलगाड्या व टांगे जाण्यासारखे चांगले आहेत. एक रस्ता जुना आहे व हल्लीं त्यानें गाड्या जात नाहींत. पण, हाच पूर्वींचा हमरस्ता होता. हाच रस्ता पुण्यापासून सरळ पुरंदराला जातो. जुन्या काळचा पुण्याहून साताऱ्याला जाण्याचा हाच रस्ता होता. याला **बापदेवखिंडीचा** रस्ता म्हणतात. या रस्त्यानें पुण्याहून **पुरंदर** फक्त वीस मैल आहे. पण, वर लिहिल्याप्रमाणें हल्लीं हा रस्ता फारसा वापरण्यांत नाहीं. हल्लींचा रहदारीचा रस्ता म्हणजे **सासवडवरून** होय. पुण्याहून सासवड वीस मैल आहे, व सासवडपासून पुरंदर सहा मैल आहे. तिसरा रस्ता **कापुरवहाळे**कडून आहे. **कापुरवहाळेहून** पुरंदर आठ मैल आहे व पुण्याहून **कापुरवहाळें** सुमारें चोवीस मैल आहे. हा रस्ता लांबचा आहे. पण या रस्त्यानें गेल्यास **पुरंदरचें** खरें वैभव व उंची दिसून येते. **सासवडच्या** बाजूनें हा किल्ला फारसा उंच भासत नाहीं. कारण पुण्यापेक्षां सासवड हें पठारावर असल्यामुळें बरेंच उंच आहे. पुण्याहून सासवडाला जावयाचें, म्हणजे **दिव्याच्या** घाटानें जावें लागतें, व पुण्याकडून सासवडकडे चढाव फार आहे. पण सासवडाच्या बाजूला उतार अगदीं थोडा आहे.

आम्ही पुण्याहून संध्याकाळीं निघालों, ते सासवडाला पहांटे पांच वाजतां जाऊन पोहोंचलों. तेथें नवीन गाडी करून लागलेंच पुढें गेलों. पुरंदरच्या पायथ्याशीं जाण्यास सुमारें साडेआठ झाले. सासवडीहून पुरंदरचा रस्ता फार वांकणें घेऊन गेलेला आहे. सासवडापासून पुरंदर पहिल्यांदां दिसत नाहीं, तर सासवडच्या बाजूला जरा पुढें असलेला **वज्रगड** दिसतो. हा किल्ला अगदीं सासवडच्या समोरच आहे. पण तो फारच लहान आहे व पुरंदरापेक्षां उंचहि कमी आहे. पण तो पुरंदराच्या जरा पुढें असल्यामुळें सासवडच्या बाजूनें येतांना तो वज्रगड पुरंदराला झांकून टाकतो, व सासवड सोडून बरेंच पुढें आल्यावर पुरंदर दिसूं लागतो. पुण्याहून **बापदेवखिंडी**कडून आलें, म्हणजे मात्र **वज्रगड** डाव्या बाजूला, तर **पुरंदर** उजव्या बाजूला दिसतात, व तेंव्हां पुरंदरची उंची, त्याचा विस्तार व बालेकिल्ल्याचा बिकटपणा स्पष्टपणें दृग्गोचर होतात. सासवडहून निघणाऱ्या रस्त्यालाच **नारायणपुराजवळ कापुवहाळे**कडून येणारा रस्ता येऊन मिळतो. व तेथून किल्ल्याच्या पायथ्याशीं **पेठ** म्हणून खेडें आहे, तेथपर्यंत बैलगाडीचा रस्ता जातो. किल्ल्याच्या पायथ्याशीं एक सरकारी विश्रांतिगृह बांधलेलें आहे. येथून किल्ल्यापर्यंत चांगली पायवाट केलेली आहे. **माथेरान** किंवा **सिंहगड** यांसारखी ही वाट आहे. येथें पाहिजे तर वरच्या ठिकाणाप्रमाणें किल्ला चढण्यास खुर्च्याहि मिळतात. एका खुर्चीला बारा आण्यांपासून रुपयापर्यंत भाडें व हमालांची मजुरी मिळून भाडें द्यावें लागतें. बेगारी दीडदोन आणे वर जाण्याबद्दल घेतात. या बाजूनें चढाव सिंहगडाइतका भासत नाहीं. अर्ध्यापाऊण तासांत मनुष्य सहज माचीवर जाऊं शकतो. किल्ल्याच्या पहिल्या भागाला माची म्हणतात. याच भागांत पूर्वीची सर्व वस्ती होती, व हल्लींसुद्धां लष्करी बराकी, बंगले व हॉस्पिटल वगैरे सर्व इमारती याच भागांत आहेत. येथें दोनतीन बाजूंना बरेच मोठे पठार आहेत; त्यांवरच ही सर्व वस्ती आहे. येथून मुख्य किल्ला किंवा बालेकिल्ला आणखी तीनशें फूट उंच आहे, व हाच बालेकिल्ला फार दुर्भेद्य

आहे. माचीपर्यंतचा डोंगर फार बिकट नाहीं. त्याला जाण्यास पूर्वींहि पुष्कळ वाटा होत्या, व आतांहि पुष्कळ बाजूंनीं या भागावर चढतां येतें. पण बालेकिल्ला मात्र निवळ तुटलेल्या कड्याचा बनलेला आहे, आणि त्यावर जाण्यास दिल्लीदरवाज्याखेरीज दुसरी कोणतीहि वाट नाहीं. पहिल्या माचीभोंवतींहि पूर्वकाळीं सर्व बाजूंनीं तट व बुरूज होते. पण या तटांपैकीं बराच भाग आतां पडला आहे. तरी पण या तटाचा दरवाजा चांगल्या स्थितींत आहे; त्याला **बिनीदरवाजा** म्हणतात. या दरवाज्याचें व त्या लगतच्या भागाचें छायाचित्र दिलें आहे, त्यावरून या माचीच्या प्रवेशद्वाराची कल्पना होईल. या दरवाज्यांतून आंत गेलें, म्हणजे उजवीकडे व डावीकडे असे दोन सुंदर नवे रस्ते लागतात. उजवीकडचा रस्ता कमांडिंगसाहेबांचा बंगला, कुटुंबी शिपायांच्या राहण्याची जागा व दवाखाना इकडे जातो, व डावीकडचा रस्ता बराकी, पोस्ट ऑफिस, पब्लिक वर्क्स खात्याचें स्टोअर ऑफिस इकडे जातो. आम्ही बिनीदरवाज्याशीं येऊन पोहोंचलों, तों माझे नातेवाईक आम्हांला सामोरे आले व आम्हीं प्रथमतः पोस्ट ऑफिसांत गेलों. तेथें चहापाणी व स्नानविधि वगैरे उरकले, व मग किल्ला पहाण्यासंबंधींचा बेत ठरविला; आणि बालेकिल्ल्यावर सायंकाळीं बरोबर पांच वाजतां जाण्याचा बेत कायम केला. मला तेथें राहण्यास दीड दिवस सवड होती. परंतु किल्ला फारसा मोठा नसल्यामुळें इतक्या वेळांत सर्व पाहून होईल, असें आम्हांला वाटलें. यामुळें घाईघाईनें आल्याबद्दल आम्हांला कांहींएक वाईट वाटलें नाहीं. पुरंदरच्या पोस्टऑफिसची जागा व इमारत अगदीं किल्ल्याच्या मध्यवस्तींत असल्यामुळें तेथून सभोंवारचा देखावा उत्तम दिसत होता. तो देखावा पहाण्यांत आमचा कितीतरी वेळ गेला. आम्ही उभे होतों, तेथून पुण्याचे तिन्ही रस्ते साफ दिसत होते. **सासवडच्या** बाजूचा रस्ता आमच्या डाव्या बाजूकडे नागमोडीनें जात होता. उजव्या बाजूला त्याच तऱ्हेनें जाणारा **कापुरव्हांळेकड**चा रस्ता दिसत होता; आणि आमच्यासमोर

बापदेवखिंडीवरूनचा पुण्याचा जुना रस्ता थोडा अस्पष्टपणें दिसत होता. पण, हाच रस्ता पुरंदराहून पुण्याला अगदीं सरळचा असल्यामुळें आम्हांला दुर्बिणींतून पुण्याचा व लष्करचा भाग स्पष्टपणें दिसला, व तो पाहून मनाला फार आनंद वाटला; आणि पेशवाईत पुण्याचा व पुरंदरचा एवढा निकट संबंध कां होता, हें ध्यानांत आलें.

या रस्त्यानें पुण्याहून पुरंदर केवळ वीस मैल आहे, म्हणजे घोड्यावर बसून मनुष्य पुण्याहून सकाळीं निघून प्रहरदीडप्रहरानें पुरंदराला येऊं शके. तेव्हां त्या काळीं पुरंदर जवळ वाटे, हें साहजिक आहे. पुणें व पुरंदर यांचा संबंध हल्लींच्या मुंबई व महाबळेश्वरसारखा होता. मुंबई ही मुंबईसरकारची राजधानी आहे, व महाबळेश्वर हें सूर्याच्या तापापासून लोकांचें व राजाचें संरक्षण करण्याचें स्थान आहे. पूर्वींच्या काळीं सूर्यापेक्षां शत्रूंचा ताप लोकांना व राजांना जास्त वाटत असे, व पुरंदर हें राजाचें शत्रुतापापासून संरक्षण करण्याचें ठिकाण होतें. हेंच ठिकाण पेशवाईत कां पसंत करण्यांत आलें. याचें मर्म आमच्या ध्यानांत पुरंदरच्या शिखरावरून पूर्ण आलें. परंतु, पुण्यपत्तनदर्शनापेक्षांहि जास्त आनंद आम्हांला **सिंहगड** पाहून झाला. कारण, पुरंदराहून सिंहगड फारच स्पष्टपणें दिसतो. सिंहगडचे ते पांढरे बंगले आम्हांला तेथून पुण्यापेक्षांहि जास्त स्पष्ट दिसले. कारण, पुरंदर व सिंहगड हे दोन्ही किल्ले पर्वतराजींनीं एकमेकांना जोडलेले असल्यामुळें व दोन्ही फारच उंच असल्यामुळें अगदीं समोरासमोर दिसत होते. सह्याद्रीची **सिंहगड-भुलेश्वर** म्हणून एक डोंगराची रांग आहे, त्या रांगेंतील कातरजघाटाशीं एक आग्नेयी दिशेनें जाणारी पर्वताची रांग लागते, त्या रांगेंतील सर्वांत उंच शिखर म्हणजे पुरंदर किल्ला होय. **पुणें, पुरंदर** व **सिंहगड** यांची भूगोलविषयक स्थिति प्रत्यक्ष पाहून आम्हांला फारच कौतुक वाटलें. पुण्याहून सिंहगड जितका दूर आहे, तितकाच किंवा किंचित् थोडा जास्त पुरंदराहून सिंहगड आहे. म्हणजे सिंहगड, पुणें व पुरंदर यांचा एक समद्विभुज त्रिकोण होतो, असें म्हटलें तरी चालेल. या त्रिकोणाचा शिरो-

बिंदु सिंहगड होतो, त्रिकोणाच्या उजव्या बाजूला पुणें व डाव्या बाजूला पुरंदर पडतें. व **पुणें पुरंदर** हा त्या त्रिकोणाचा पाया होतो आणि **सिंहगड–पुणें** व **सिंहगड–पुरंदर** या दोन बाजू समसमान होतात.

पोस्ट ऑफिसच्या समोरून दिसणारा सुंदर देखावा पाहिल्यानंतर आम्हीं हल्लींच्या वस्तीचा मुख्य रस्ता पाहून आलों. ज्या बाजूला दवाखाना आहे, त्या टोंकाला बराच रुंद्ट असा सपाट पठार आहे व दवाखान्याजवळ एक सुंदर लहानसें तळें आहे. हें तळें जुनेंच आहे. त्याचें नांव **मुकारशी** तलाव आहे. हा थोरल्या माधवरावांनीं बांधला, असें सांगतात. तलावाच्या चारहि बाजू चांगल्या दगडांनीं बांधलेल्या आहेत. हल्लीं या तळयाच्या कडेला एक लहानसें चर्च आहे. माचीचा हा अगदीं पश्चिमेकडील भाग आहे. येथून रस्त्यानें परत फिरलें म्हणजे पुष्कळ नवे बंगले लागतात. यांतले कांहीं बंगले खासगी आहेत. पण, बहुतेक लष्करी ऑफिसरांकरितां व कौटुंबिक शिपायांकरितां आहेत. या निरनिराळ्या बंगल्यांच्या जागेवर पूर्वीं सवाईमाधवरावांचा व नाना-फडनवीस यांचा असे वाडे होते. त्याप्रमाणें सखारामबापूंचाहि वाडा होता. नाना फडनवीसांनीं बांधलेलें एक लहानसें देऊळ मात्र अजून आहे. या रस्त्यानें अगदीं माचीच्या पूर्व टोंकाकडे आलें, म्हणजे शिपायांच्या बराकी आणि कँटोन्मेंट लागतात. या बाजूलाहि एक लहानसें सुंदर तळें आहे. त्याला **पद्मावती** तलाव म्हणतात. याचें कांहीं बांधकाम **शिवाजी** महाराजांच्या वेळचें आहे, असें सांगतात. माचीच्या या भागाला **भैरवखिंड** म्हणतात. येथें वरच्या बालेकिल्ल्याचा तुटलेला कडा दिसतो. पुरंदर व वज्रगड यांमधीलच ही खिंड आहे. येथून डोंगराला थोडा वळसा घालून वज्रगडावर जातां येतें.

याप्रमाणें माचींतील सध्यांची वस्ती पाहून आणि त्याबरोबर **सासवड; नारायणपूर** वगैरे गांवें असलेला पुण्याच्या वरील पठाराचा देखावा पाहून आम्ही आपल्या मुक्कामाला परत आलों. येथें हिंडतांना आम्हांला

माथेरान किंवा महाबळेश्वर या ठिकाणांसारखीच हवा वाटली. येथें सूर्य कितीहि वर आला असला, तरी उन्हाचा ताप होत नाहीं. जेवणखाण आटोपल्यावर क़िल्ल्याला प्रदक्षिणा घालणारा एक रस्ता आहे, असें समजल्यावरून त्या रस्त्यानें किल्ल्याला प्रदक्षिणा घालून येण्याचा निश्चय करून आम्ही तडक निघालों. आम्ही पोस्टऑफिसांतून उजव्या बाजूनें म्हणजे दवाखान्याच्या बाजूनें गेलों. दवाखान्यापर्यंतचा भाग व तेथून दिसणारा खालचा देखावा आम्हीं सकाळीं पाहिला ; असल्यामुळें दवाखान्यापर्यंत तडक गेलों. **सासवड-नारायणपूर** हा उंचावरचा पठार असल्यामुळें इकडे हा किल्ला फारसा उंच दिसत नाहीं, असें वर म्हटलें आहे. पण दवाखान्याच्या जरा पुढें गेल्यावर आम्हांला किल्ल्याच्या उंचीची थोडथोडी कल्पना होऊं लागली. दवाखाना ओलांडून पुढें आलों नाहीं, तोंच आम्हांला ज्या खिंडींतून कापुरवहाळेकडचा रस्ता गेला आहे, ती खिंड दिसली. सकाळीं हा रस्ता आम्हीं पाहिला होता. तेव्हां तो साधारण सासवडच्या सपाटीनें चालला आहे, असें दिसलें, व तो रस्ता कोठें डोंगरावर चढत आहे, असें दिसलें नाहीं. परंतु, दवाखान्याच्या पुढें आल्यावर तो खिंडी-खालील खोलखोल जाणारा रस्ता पाहून आम्ही थक्कच झालों. सासव वडच्या बाजूनें जी खिंड म्हणजे दोन डोंगरांच्या मधली अगदीं सखल अशी खिंड आम्हांला वाटत होती, ती इतकी सखल नसून एका प्रचंड डोंगराच्या वरची पर्वताची त्याच्या उंच असणाऱ्या दोन टेंकडांमधील खिंड आहे, असें आमच्या दृष्टोत्पत्तीला आलें. सारांश, **कापुरवहाळेच्या** बाजूनें हा रस्ता म्हणजे एक मोठा घांट आहे, असें दिसूं लागलें, व **पुरंदरचा** प्रचंडपणा ध्यानांत येऊं लागला. या बाजूला आल्यावर सभोंवरच्या डोंगरावरील रान फारच दाट आहे, असें कळून आलें. जसजसें आम्ही आमच्या अरुंद वाटेनें पुढें चाललों, तसतसा निरनिराळा देखावा आम्हांला दृग्गोचर होऊं लागला.

कांहीं ठिकाणीं तर डोळे दिपण्यासारखी स्थिति या वाटेनें होते. उजव्या बाजूला बालेकिल्ल्याचा प्रचंड सुळका उभा आहे, तर डाव्या बाजूला खोलच खोल दरी लागली आहे, व आम्हीं चाललेली अरुंद पाऊल वाटच काय ती मध्यें! किल्ल्याला वळसा घातल्याबरोबर आम्हांला पंतसचिव यांच्या संस्थानाचा पुष्कळ भाग व त्यांचें राहण्याचें ठिकाण **भोर** हीं दिसूं लागलीं. खालीं सातार्‍याकडे जाणारा गाडीचा रस्ता दिसूं लागला. जरा पुढें गेल्यावर रामायणाचा कर्ता वाल्मीकी याचें जन्मस्थान मानलेलें गांव **वाल्हें** हें दिसूं लागलें. भाटघरचा तलाव एक डोंगर आड असल्यामुळें आम्हांला दिसला नाहीं. आतां आम्ही किल्ल्याच्या अगदीं मागच्या बाजूला आलों. येथून पश्चिमेला सह्याद्रीच्या रांगाच रांगा लांवपर्यंत दिसूं लागल्या. सभोंवतालच्या देखावाहि रमणीय दिसत होता. **भाटघराला** व **वीरवाल्याला** बंधारा घातल्यामुळें नीरा नदीला सर्वत्र पाणी असल्याचें दिसून येत होतें. नुकताच पावसाळा संपला असल्यामुळें अजून शेतें कापलीं नव्हतीं, व सर्व डोंगर आणि माळ हिरवेगार दिसत होते. अशा प्रकारचा सुंदर देखावा पहात चालल्यामुळें आम्हांला चालण्याचे श्रम मुळींच वाटले नाहींत. आणखी पुढें गेल्यावर आम्हांला **बोपलेश्वरांचें** उंच शिखर दिसूं लागलें. थोडेसें अधिक चालल्यावर आमची किल्ल्याची प्रदक्षिणा संपत येत चालली आहे, असें आमच्या ध्यानांत आलें. कारण आम्हांला **पुरंदरच्या** डाव्या बाजूला असलेला **वज्रगड** दिसूं लागला. आम्हांला एक लहान स्मशानभूमिकाहि लागली. ही येथें मरणार्‍या गोर्‍या शिपायांकरितां केलेली आहे. पुढें एक लहानसा कसाईखानाहि आढळला; तेव्हां आम्ही बराकीच्या व कॅन्टोन्मेंटच्या जवळ आलों, असें आम्हांला समजलें. थोड्याच वेळांत आम्हांला बराकी लागल्या, व सकाळीं पाहिलेलें **पद्मावतीचें** तळेंहि लागलें. या रम्य ठिकाणीं आम्ही थोडा वेळ विश्रांति घेऊन मग आमच्या मुक्कामाला आलों, व घड्याळांत पाहतों, तों आम्हांला किल्ल्याच्या प्रदक्षिणेला बरोबर दोन तास लागले, असें दिसून आलें. मंडळी आमची

वाट पहात होती, व आम्ही वाट चुकलों कीं काय, अशा शंकेंत होती. कारण, आम्हीं आमचा किल्ल्याला प्रदक्षिणा करण्याचा बेत त्यांना सांगितला नव्हता.

पूर्वीं ठरल्याप्रमाणें बरोबर पांच वाजतां आम्ही बालेकिल्ल्यावर जाण्यास निघालों. या किल्ल्याचा दरवाजा बंद असतो, व वर जाण्यास परवानगी काढावी लागते. माचीवर बरीच वस्ती असते, आणि बालेकिल्ल्यावर जाणारे लोक कड्यावरून दगड खालीं लोटितात व त्यापासून मनुष्यांना इजा होते, म्हणून कांहीं वर्षांपासून बालेकिल्ल्याचा दरवाजा बंद करून ठेवण्याचा नियम झाला आहे, व व पब्लिक वर्क्स खात्याकडून लेखी परवानगी घेतल्याखेरीज कोणालाहि वर जाऊं द्यावयाचें नाहीं असें ठरलें आहे. आम्ही वर जाण्याची आधींच परवानगी आणून ठेविली होती म्हणून स्टोअर डेपोमधून किल्ल्याच्या दरवाज्याची किल्ली घेऊन आम्ही वर जाण्यास निघालों. माचीवरून बालेकिल्ल्याचा चढाव फार नाहीं; पण तो बिकट आहे. कांहीं ठिकाणीं तर खडकांत ओबडधोबड व अरुंद पायऱ्या खोदून रस्ता केलेला आहे. थोड्याच वेळांत मनुष्य बालेकिल्ल्याच्या भव्य दिल्लीदरवाज्याजवळ येतो. या दरवाज्यांतून आंत गेलें, कीं, वांकडे वांकडे एका मागून एक दरवाजे व बुरूज लागत जातात. हे सर्व दरवाजे किल्ल्याच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें बांधलेले आहेत, व त्यावरून किल्ल्याची दुर्भेद्यता ध्यानांत येते. याची छाया-चित्रावरून कल्पना येईल. येथून पुढें डावीकडे उजवीकडे वाट जाते. बालेकिल्ला म्हणजे पुरंदर डोंगराचा शेवटचा पठार होय. पण हा पठार पूर्वपश्चिम लांबट असा आहे. सर्व दरवाज्यांतून आंत गेल्यावर थोडी रुंदी जास्त आहे. पण कांहीं ठिकाणीं पठार मुळींच नाहीं; तर फक्त अत्यंत अरुंद अशी डोंगराची पातच आहे. या बालेकिल्ल्याभोंवतीं तटबंदी आहे, व मधून मधून संरक्षणाकरितां बुरूज आहेत. दिल्लीदरवाज्यांतून डाव्या बाजूनें गेलें, म्हणजे अत्यंत अरुंद अशा डोंगराच्या कड्यावरून मनुष्य कंडकडा नांवाच्या बुरुजावर येतो. हें बालेकिल्ल्याचें पूर्वेकडील

टोंक होय. येथून **वज्रगड** व **भीमा**नदीच्या कांठचा प्रदेश दिसतो. येथून परत दिल्लीदरवाज्याकडे येऊन उजव्या बाजूनें पुढें गेलें, म्हणजे एक लहानशी खोली दाखवितात. हीमध्यें शिवाजीमहाराजांचे वडील शहाजीराजे यांना १६४९मध्यें कोंडून ठेविलें होतें, असें सांगतात. येथून पुढें गेलें, म्हणजे बावटाबुरूज लागतो, व त्याजवळ धान्य ठेवण्याची एक उत्तम इमारत लागते. पश्चिमच्या बाजूला पुढें पुढें गेलें, म्हणजे किल्ल्यांतील शिबंदीकरितां तेलतुपाचे सांठे करण्याचे हौद दाखवितात. याच्या जरा पुढें गेलें, म्हणजे एक डोंगराचें उंच टेकाड लागतें. याला राजाचा वाडा म्हणतात. कारण, शाहूमहाराजांनीं येथें एक राजवाडा बांधण्यास सुरुवात केली होती; पण काम अर्धवट राहिलें. जवळ म्हसोबाटाकी म्हणून उत्तम पाण्याचें टाकें आहे. येथून पुढें किल्ल्यांतील सर्वांत उंच टेंकाडाचा रस्ता लागतो. हा रस्ता कांहीं ठिकाणीं पाऊलवाटेइतकाच रुंद आहे. दोन्ही बाजूला सारखा तुटलेला कडा व खालीं अफाट दऱ्या! येथून जातांना आमच्यापैकीं एकांना खरोखरच घेरी आली. कारण, यांनीं पूर्वीं किल्ले किंवा पर्वत फारसे पाहिले नव्हते; तेव्हां त्यांना डोळे मिटून दुसऱ्याच्या हाताला धरून चालण्याची पाळी आली. पण अशी भयंकर वाट थोडीच आहे. लागलीच देवळाला जाण्याच्या पायऱ्या लागतात. पायऱ्या एकंदर सुमारें १४० आहेत. पहिल्या सत्तरांचा बराच भाग मोडला आहे, परंतु दुसऱ्या सत्तर मात्र उत्तम स्थितींत आहेत. पांचपांच पायऱ्यांचा एक पंचक असे चवदा पंचक आहेत. या पायऱ्यांना दोन्ही बाजूंना सुंदर कठडा आहे. एकाद्या उंच वाड्याच्या अगदीं वरच्या गच्चीवर जाण्याकरितां जसा दगडी जिना असतो, त्याप्रमाणें या पायऱ्या दिसतात. सर्व काम चिरेबंदी असून तें अगदीं उत्तम स्थितींत आहे. येथून जाण्याची फारच मौज वाटते. हेंच ठिकाण सर्व किल्ल्यांत सर्वांत उंच आहे. हें समुद्रसपाटीपासून पंचेचाळीसशें फुटांच्या वर उंच आहे! पायऱ्या चढून वर गेलें, म्हणजे फरसबंदीचा चबुथरा लागतो, व लागलीच आपण देवळाच्या जवळ येऊन पोहोंचतों. हें देऊळ फार चांगलें

आहे आणि अजूनहि तें चांगल्या स्थितींत आहे. या देवळाचें छायाचित्र दिलें आहे, त्यावरून याची कल्पना वाचकांच्या ध्यानांत येईल. हें देऊळ महादेवाचें आहे. त्याला **केदारेश्वर** म्हणतात. हें देऊळ **पुरंदरे** यांच्या घराण्यांतील पहिले पुरुष माधवराव पुरंदरे यांनीं बांधलें.या देवाची रोज पूजा होते. पुजाऱ्याला सालीना ९० रुपयांचें वतन आहे.हें देऊळ या पर्वतराजी-मध्यें सर्वांत उंच ठिकाणीं असल्यामुळें येथून दिसणारा देखावा अद्वितीय आहे. या उंच ठिकाणीं सपाटी फारच थोडी आहे, व ती फरसबंदी चवथऱ्यांनीं व्यापलेली आहे. यामुळें या चवथऱ्यावर उभें राहून नुसती दृष्टि फिरविली, कीं, लांबपर्यंत चारी दिशांचा प्रदेश एकसमयावच्छेदें-करून दृग्गोचर होतो आणि मनाला विलक्षण आश्चर्य वाटतें. पश्चिमे कडे दृष्टि फेंकली, कीं, सिंहगड, राजगड व तोरणा हे किल्ले दिसतात, व सह्याद्रीची प्रचंड पर्वतराजि आपल्यासमोर दिसते. जरा दृष्टि वळविली, कीं, पंतसचिवांचें भोर व नीरेजवळचा प्रदेश दिसतो, दुसरीकडे मल्हारगड पानशे घरण्यानें बांधलेला आपल्या नजरेला येतो. पूर्वेकडे दृष्टि फेंकल्यास जेजुरी, वाल्हें, भीमा व नीरा यांच्या कांठचा प्रदेश दृष्टीला पडतो. दक्षिणेकडे पाहिल्यास महाबळेश्वराकडील पर्वतराजि दिसूं लागते. आम्ही हा विविध देखावा पहावयाला कितीतरी वेळ त्या देवळाजवळ उभे होतों. या ठिकाणीं उभें राहिलें, म्हणजे पुरंदर हें महाराष्ट्राचें केंद्र भासतें, व पूर्वकाळीं या ठिकाणाला प्रतिराजधानीचें महत्त्व कां होतें, हें ध्यानांत येतें. आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं बालेकिल्ल्यांत येऊन पुनः एकदां केदारेश्वराचें दर्शन घेऊन व सभोंवतालचा देखावा पाहून परत फिरलों. नंतर जेवणखाण आटोपून लवकरच पुण्याला निघण्याच्या तयारीला लागलों. पुरंदर पाहून खरोखरी मनाला फार आनंद वाटला व आमच्या नातेवाईकांनीं आम्हांला आग्रहानें बोलावल्याबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानले.

येथें किल्ल्याचें स्थलवर्णन संपलें. पण, या किल्ल्याचें ऐतिहासिक महत्त्व फारच आहे. मराठेशाहींतील पुणें व सातारा यांच्या खालोखाल

या किल्ल्याचें महत्त्व आहे. प्रथमतः पेशव्यांचा या किल्ल्याशीं व शेजारच्या सासवड गांवाशीं निकट संबंध आहे. कारण, प्रथमतः बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनाहून घाटावर आले, ते जाधवघराण्याच्या आश्रयाला आले, व जाधवांचें ठिकाण येथून जवळच आहे. यामुळें बाळाजी विश्वनाथांचें राहण्याचें ठिकाण सासवड होतें, व सासवडला सुरक्षित जागा म्हणजे जवळचा पुरंदर किल्लाच होय. मराठी राज्याचे प्रस्थापक शिवाजी-महाराज यांच्या आयुष्यांतील दोनचार विशेष महत्त्वाच्या गोष्टी या किल्ल्यावर घडल्या आहेत. पेशवाईमध्यें भाऊबंदकी उपस्थित होऊन पेशवाई बुडण्याची वेळ आली असतां ज्या बारभाईच्या कारस्थानामुळें ती कांहीं दिवस टिकली, त्या कारस्थानाचें केंद्र पुरंदरच होतें. येथेंच **सवाई-माधवरावांचा** जन्म झाला. **राघोबादादांचा** पक्ष इंग्रजांनीं सोडण्याबद्दलचा तह येथेंच झाला. याप्रमाणें पुरंदर हें प्रतिराजधानीच होतें. तरी त्याच्या इतिहासाकडे थोडें लक्ष्य देऊन हा लेख पुरा करूं.

पुरंदर किल्ला केव्हां बांधला, याबद्दल दाखला मिळत नाहीं. पण हा किल्ला फार जुना असावा, यांत शंका नाहीं. **बाहमनी** राज्याचा प्रस्थापक **अल्लाउद्दीन हसन कांगो** याच्या कारकीर्दीमध्यें प्रथमतः या किल्ल्याचा उल्लेख आलेला आहे. त्याच्या ताब्यांत बहुतेक महाराष्ट्र आलें, व त्यानें १३५० मध्यें पुरंदर किल्ल्याची दुरुस्ती केली. पुढें १३८४ मध्यें पांचव्या बाहमनीराजानें अर्धवर्तुळाकार बुरूज नवे बांधले. १४८६ मध्यें हा किल्ला निजामशाहीच्या ताब्यांत गेला व नंतर १०० वर्षें तो त्यांच्या ताब्यांत होता. विजापूर व अहमदनगर या बादशाहीच्या पहिल्या अमदानींत पुरंदर किल्ला हा खास बादशाहीकडे होता, तो कोणत्याहि जहागीरदाराला दिला नव्हता. परंतु १५९६ मध्यें अहमदनगराच्या बहादुर निजामशाहानें **शिवाजीचा** आजा **मालोजी** भोसले याला **पुणें** व **सुपें** यांची जहागिरी दिली, त्या वेळीं **पुरंदर** हा किल्ला मालोजीच्या ताब्यांत आला. तो मालोजीचा मुलगा **शहाजी** याच्या ताब्यांत १६२७ पर्यंत होता. त्या वर्षीं तो मोंगलांनीं घेतला. १६३७

मध्यें **शहाजीनें** विजापुरची नोकरी धरली, तेव्हां त्यानें हा किल्ला मोंगलांपासून सर केला. विजापुरकर व मोंगल यांच्यामध्यें तह झाला, त्याप्रमाणें हा किल्ला विजापुरकरांकडे राहिला. तरी पण किल्ल्यावरचा अधिकारी हिंदुच होता. १६४७ मध्यें पुरंदरचा किल्लेदार **नीलकंठ नाईक** हा वारला. याच्या तिघां भावांमध्यें कांहीं तंटा उपस्थित झाला, व म्हणून त्यांनीं शिवाजीला मध्यस्थीकरितां बोलाविलें. शिवाजीनें धाकट्या भावांना आपल्याकडे वळवून त्यांच्यामार्फत थोरल्या भावाला कैद करवून आपल्या मावळ्यांना किल्ल्यांत घेऊन रक्तपात मुळींच होऊं न देतां किल्ला आपल्या ताब्यांत घेतला, व सर्व भावांना जमिनी इनाम करून दिल्या. याप्रमाणें हा किल्ला प्रथमतः मराठेशाहीच्या प्रस्थापकाच्या ताब्यांत आला. पुढें दक्षिणेंतील या प्रमुख किल्ल्याचा संबंध मराठेशाहींतील कितीतरी महत्त्वाच्या प्रसंगीं आलेला आहे. प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांच्या आयुष्यांतील एक कठिण प्रसंग या किल्ल्यासमोर घडून आला. १६४३ पासून शिवाजीची भक्ति भरतीच्या वेळच्या लाटांप्रमाणें भराभर वाढत चालली. कारण, विजापुर व मोंगल यांच्यामध्यें युद्ध चालू होतें, व शिवाजीच्या वाढत्या शक्तीकडे कोणाला लक्ष्य देण्यास सवड नव्हती; पण, शिवाजीची आतां गय करणें चांगलें नाहीं, असें **औरंगजेबाच्या** ध्यानांत आल्यापासून तो शिवाजीमहाराजांच्या सारखा पाठीला लागला. औरंगजेबानें **शाहीस्तेखान** व राजा **जसवंतसिंग** यांना प्रथम शिवाजीच्या मोहिमेवर पाठविलें. **शाहीस्तेखानानें** पुणें काबीज करून खुद्द शिवाजीच्या रंगमहाल नांवाच्या वाड्यांत तळ दिला. परंतु शिवाजीनें लग्नाच्या मंडळीच्या घोळक्यांतून गुप्तपणें निवडक लोकांनिशीं शहरांत शिरून व खुद्द **शाहीस्तेखान** रहात असलेल्या वाड्यांत जाऊन त्याचीं बोटें कापून त्याची खोड जिरविली. **जसवंतसिंगालाही** कोंढाणा किल्ल्यापुढें हात टेंकावे लागले; हें पाहून १६६५ मध्यें औरंगजेबानें त्या दोघां सरदारांना परत बोलावून **मिरझाराजा** जयसिंग व **दिलेरखान** या दोघां विख्यात सरदारांनां शिवाजीचा बींमोड करण्यास धाडलें. या

दोघां सरदारांनीं शिवाजीच्या मुलखांत शिरून किल्ले घेण्याचा सपाटा सुरू केला, व **कोंडाणा** व **पुरंदर** हे दोन्ही शिवाजीच्या किल्ल्यांचीं नाकें असे किल्ले कावीज करण्याचा या सरदारांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें **मिरझाराजा** जयसिंग यांनीं कोंडाण्यास वेढा दिला, व **पुरंदरास दिलेरखानांनीं** वेढा दिला. या लेखांत कोंडाण्याशीं आपल्याला फारसें कर्तव्य नाहीं, तेव्हां **पुरंदरच्या** वेढ्याकडेसच वळणें बरें. या किल्ल्यावरचा किल्लेदार शिवाजीच्या पदरचा अत्यंत शूर शिपाई महाडचा **बाजी देशपांडे** हा होता. **दिलेरखानानें** पुरंदर व **वज्रगड** या दोन्ही किल्ल्यांना वेढा दिला, व पुरंदरच्या किल्ल्याच्या एका बुरुजाखालील खडकाला भगदाड पाडून तेथून हल्ला करण्याचा मनसबा केला. परंतु किल्ल्यांतील मावळी व हेटकरी यांनीं खडकाला भोंक पाडणाऱ्या लोकांवर वरून असा निकराचा मारा चालू केला, कीं, कित्येक दिवस **दिलेरखानाचा** बेत सिद्धीला गेला नाहीं. तरी शेवटीं दिलेरखानाच्या लोकांनीं तटबंदीला भोंक पाडून तेथून हल्ला करून खालचा किल्ला कावीज केला. **दिलेरखानाचे** लोक जयप्राप्तीनें बेफिकीर झाले होते व खालच्या वस्तींत लुटालूट करूं लागले होते, तोंच बालेकिल्ल्यांतून बाजी देशपांड्याच्या सेनानायकत्वाखालीं मावळे लोक दरवाज्याच्या खालीं येऊन त्यांनीं मोंगल लोकांवर असा निकराचा हल्ला केला व त्यांची कापाकाप चालविली, कीं, त्यामुळें किल्ल्याच्या कोनाकोपऱ्यांत मोंगल लोक पळून गेले. आपल्या लोकांनीं माघार घेतली, हें पाहून **दिलेरखानानें** खालून निवडक पठाणलोक घेऊन पुनः किल्ल्यावर चाल केली. दिलेरखान स्वतः हत्तीवर बसून शत्रूंवर मारा करीत होता. बाजी देशपांडे आपल्या थोड्या लोकांसह मोठ्या शौर्यानें लढत असतां नेमका त्यावर वार करून त्यानें त्याचें शीर उडविलें. परंतु, बाजी प्रभु इतक्या धैर्यानें व आवेशानें काम करीत होता, कीं, शिरापासून वेगळें झालेलें त्याचें कबंध घटकादोनघटका लढाई करीत होतें, असें मराठी बखरकारांनीं लिहून ठेविलें आहे. आपला नायक पडला, असें पहातांच मावळे व हेटकरी

झटकन् बालेकिल्ल्यांत सुरक्षितपणें गेले व त्यांनीं दरवाजे बंद केले उत्तरेकडून हा किल्ला घेणें अशक्य आहे, असें पाहून दिलेरखानानें प्रथम वज्रगड घेऊन तेथून मुख्य किल्ल्यावर मारा चढविण्याचा विचार केला व त्याप्रमाणें त्यानें वज्रगडावर तोफा वगैरे चढवून पुरंदरच्या मुख्य किल्ल्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली नाहीं, तोंच पावसाळा सुरू झाला, व यामुळें त्याचे प्रयत्न शिथिल पडले. आतां आपल्याच्यानें फार दिवस टिकाव धरवणार नाहीं, असा निरोप शिवाजीला किल्ल्यावरील शिबंदीच्या मुख्यानें धाडला. कोंडाणाकिल्ल्याचीहि अवस्था धड नव्हती; ही सर्व स्थिति पाहून शिवाजीनें या वेळीं मोंगलांपुढें हार खाऊन सलोखा करणें अवश्य आहे, असें जाणून आपल्या हाताखालच्या एका नोकराला राजा **जयसिंगाकडे** पाठविलें, व आपण घेतलेला सर्व मुलुख व घेतलेले सर्व किल्ले परत देऊन दिल्लीपतीची नोकरी करण्यास खुषी आहोंत, अशी विनंति केली. प्रथमतः **जयसिंगाला** हें खरें वाटेना; पण **शिवाजी** राजे आपल्या वचनापासून फिरणार नाहींत, अशी त्याची खातरजमा झाल्यावर **जयसिंगानें** शिवाजीराजाला बादशहाकडून माफी मिळविण्याची हमी देऊन त्याला भेटीला बोलाविलें. दुसरे दिवशीं शिवाजीराजे राजगडाहून कोंडण्याला जयसिंगाला भेटण्यास आले. शूरवीराला योग्य अशा तऱ्हेनें जयसिंगराजांनीं शिवाजीची मुलाखत घेतली, व दुसरे दिवशीं ते दोघेजण पुरंदराला **दिलेरखानाच्या** छावणींत आले. दिलेरखानाला या समेटाबद्दल कांहींएक वार्ताहि नव्हती, यामुळें तो रागावला, व आपण पुरंदर काबीज करून प्रत्येक माणसाची कत्तल करूं, असें म्हणूं लागला. पण शिवाजीमहाराजांनीं कोंडाणा व पुरंदर या दोन्ही किल्ल्यांच्या किल्ल्या दिलेरखानापुढें टाकल्या व किल्ले आपलेच आहेत, असें म्हटलें. याप्रमाणें मोठ्या खुबीनें शिवाजीराजांनीं दिलेरखानाचा राग शांत केला. पुरंदर येथें शिवाजीनें आपले चाळीस लक्ष उत्पन्नाचे वीस किल्ले व त्यांसभोंवतालचा मुलुख जयसिंगाच्या ताब्यांत देण्याचें कबूल केलें; आणि आपल्याला फक्त बारा किल्ले व पुणें व सुपें येथील

जहागीर ठवून बादशहाची नोकरी करण्याचें कबूल केलें. अशा अटीचा अर्ज नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें शिवाजीनें केला, आणि दिल्लीपतीकडून त्याप्रमाणें खलिता येऊन शिवाजीनें आपल्या सैन्यानिशीं विजापुरकरांविरुद्ध जयसिंगाला मदत करावी, असा हुकूम झाला. त्याप्रमाणें शिवाजीनें विजापुरकरांचा बराच मुलुख घेतला. पुढें औरंगजेबानें शिवाजीला दिल्लीस बोलाविलें व तेथें त्याचा अपमान केला. शिवाजीराजांच्या वैभवामध्यें पुरंदरचा तह म्हणजे अत्यंत हीनपणाचा होता. ज्याप्रमाणें समुद्रामध्यें फार मोठी लाट यावयाची असली, म्हणजे समुद्राचें पाणी फारच मागें जातें, व मग प्रचंड पर्वतप्राय लाट येऊन जिकडे तिकडे जलमय होतें, त्याप्रमाणें मराठेशाहीचा पाय पुरंदरच्या तहानें फारच मागें नेला, तर शिवाजी दिल्लीहून सुटून परत आल्यापासून थोड्याच वेळांत मराठ्यांच्या राज्यविस्ताराला प्रचंड लाट येऊन सर्व दक्षिणमहाराष्ट्रभर मराठी राज्य पसरलें. १६७४ मध्यें शिवाजीनें समारंभानें राज्याभिषेक करवून घेतला. दिल्लीहून परत आल्यावर शिवाजीनें प्रथमतः **कोंडाणा** व **पुरंदर** किल्ले सर करण्याचा निश्चय केला. कोंडाणा घेण्याचें काम तानाजीनें आपल्या अंगावर घेतलें व बोलल्याप्रमाणें त्यानें किल्ला सर केला; पण तो स्वतः त्या हल्ल्यांत पडला; म्हणूनच शिवाजीनें कोंडाण्याला सिंहगड असें नांव दिलें; हें महशूरच आहे. ज्याच्या मदतीनेंच तानाजीला कोंडाणा सर करतां आला, त्या तानाजीच्या सूर्याजी नांवाच्या शूर भावानें पुरंदर किल्ला १६७० मध्यें मोंगलांपासून हिरावून घेतला. शिवाजीच्या मरणानंतर व संभाजीच्या चैनी कारकीर्दीमध्यें औरंगजेबानें पुनः सर्व महाराष्ट्र बहुतेक पादाक्रांत केलें. त्या वेळीं म्हणजे १७०५ मध्यें हा किल्ला पुनः मोंगलांच्या ताब्यांत गेला. पण १७०७ मध्यें औरंगजेबाच्या मरणानंतर मराठ्यांनीं पुनः आपला सर्व मुलूख मोंगलाकडून परत घेतला. या वेळीं ताराबाई व शाहू असे दोन पक्ष मराठ्यांत झाले होते. त्या धांदलींत हा किल्ला ताराबाईच्या पक्षाचे शंकराजी नारायण सचिव यांनीं मोंगलांपासून परत घेतला. शाहूनें

त्याजबद्दल त्यांजकडे मागणी केली. पण, शंकराजीच्या सचिवांनीं ती गोष्ट नाकारली. परंतु, लवकरच ताराबाईचा पक्ष धरल्याबद्दल वाईट वाटून त्यांनीं आत्महत्या केली, व शाहूनें थोरपणानें त्यांच्या दोन वर्षांच्या मुलाला सचिवाचें पद दिलें; यामुळें पंतसचिव अक्षयीचे सातारकरांच्या पक्षाचे झाले.

याच सुमाराला पुण्याच्या पेशवाईचा प्रस्थापक बाळाजी विश्वनाथ पुढें आला. तो प्रथमतः धनाजी जाधवाकडे कारकून म्हणून राहिला. पण आपल्या पराक्रमानें त्यानें शाहूपासून पेशवाईपद मिळविलें. बाळाजीचें प्रथमचें राहण्याचें ठिकाण सासवड होतें. दमाजी थोरात नांवाचा सरदार ताराबाईच्या पक्षाचा असून त्यानें पुण्यापासून जवळ **हिंगणगांव** येथें किल्ला बांधला, व तो आसपासच्या मुलखावर ताबा चालवूं लागला होता. त्यावर पंतसचिवांना पाठविलें. पण त्यांचा पराभव होऊन तच दमाजीचे कैदी झाले. नंतर बाळाजीला त्याचें पारिपत्य करण्यास पाठविलें. बाळाजीनें हल्ला करण्यापूर्वी युक्तीनें पंतसचिवांची सुटका करून घेतली. या उपकाराची फेड करण्याकरितां पंतसचिवांच्या मातुःश्रीनें पुरंदर किल्ला **बाळाजी विश्वनाथाला** सासवडच्या जवळचें अत्यंत सुरक्षित ठिकाण म्हणून खासगी आश्रयाकरितां दिला, व ही देणगी शाहूनें कायम केली. याप्रमाणें पेशवाईच्या प्रस्थापकाचा पुरंदराशीं निकट संबंध जडला, व तो पेशवाईच्या अंतापर्यंत सारखा राहिला. या निकट संबंधामुळें पुढील पेशवाईंतील कित्येक महत्त्वाच्या गोष्टी या किल्ल्यावर घडल्या. १७६२ मध्यें **रघुनाथरावांनीं** हा किल्ला पुरंदरे घराण्याच्या मुख्य पुरुषाला दिला. **नारायणरावाच्या** वधानंतर **गंगाबाईला** सुरक्षिततेसाठीं याच किल्ल्यावर आणून ठेविलें होतें. येथेंच **सवाई माधवराव** यांचा जन्म १७७४ मध्यें झाला. बारभाईचे मुख्य **नानाफडणवीस** व **सखाराम बापू** कांहीं काळ येथूनच सर्व कारभार पहात असत. ज्या तहाच्या योगानें पेशवाईंतील भाऊबंदकीचा निकाल लागून मराठेशाईच्या कारभाराची स्थिरस्थायेकता झाली, तो

तह १७७६ मध्यें **पुरंदर** येथेंच झाला. स्वतःच्या जीवाला किंवा सवाई-माधवरावांच्या जीवाला धोक्याचा प्रसंग आला असतां नानाफडणवीस बालपेशव्यासह याच किल्ल्याचा आश्रय करीत असत. **रावबाजींची** कारकीर्द सुरू होऊन त्यांच्या अत्याचाराला उत्तेजन देणाऱ्या व पेशवाईची इतिश्री जवळ आणण्यास कारणीभूत झालेल्या **त्रिंबकजी डेंगळ्याला** स्वाधीन करण्याबद्दलच्या हमीखातर जे किल्ले **एलफिन्स्टननें** मागितले होते, त्यांत पुरंदर किल्ला होता. शेवटचें मराठ्यांशीं युद्ध झालें व रावबाजी पळून गेले, त्या वेळीं सिंहगड व पुरंदर हे किल्ले सर करण्याचें काम मेजर एलट्रिज यांनीं केलें. मराठेशाईच्या उदयकाळीं मोंगलापासून हे किल्ले बहुतेक एकाच शूरानें म्हणजे सूर्याजीनें घेतले, तोच प्रकार मराठेशाईच्या अंतकाळींहि झाला. ही दोन किल्ल्यांच्या इतिहासांतील विचित्र गोष्ट आहे. इंग्रजसरकारच्या ताब्यांत हा किल्ला आल्यानंतर तेथली कायमची वस्ती कमी कमी होत गेली. १८४२ सालीं हा किल्ला हवापाण्याच्या दृष्टीनें आरोग्यगृह करण्यास योग्य आहे, असें पाहून तेथें युरोपियन शिपायांकरितां लष्करी आरोग्यवसतिस्थान करण्याचा ठराव झाला, म्हणून तेथें राहणारे सर्व खासगी लोक निघून गेले असून तेथें बहुतेक लष्करी वस्ती राहिली. तरी थोडे फार खासगी बंगले तेथें होते व अजून आहेत. पण यापुढें येथें कोणताहि खासगी बंगला न ठेवतां सर्व किल्ला लष्करी अंमलदारांच्या ताब्यांत देण्याचा नवा ठराव झाला आहे. तदनुरूप जे कांहीं थोडे बंगले आहेत, त्यांच्या मालकांना मोबदल्याचे पैसे देऊन ते बंगले व जागा लष्करी खात्याच्या ताब्यांत देण्यांत येत आहे. येथली सर्व प्रकारची दुरुस्ती व इतर देखरेख सरकारी पब्लिक वर्क्स खात्याकडून होते व पुढेंहि ती त्याचप्रमाणें चालणार आहे. मात्र येथें सर्व फौजदारी अधिकार लष्करी अंमलदाराला आहेत. याप्रमाणें पुरंदर किल्ल्याचा प्राक्कालीन व अर्वाचीन इतिहास आहे. सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें त्याबद्दल मला काय वाटलें, हें आरंभीं सांगितलें आहे.

---

# चक्कर ५ वें

## सज्जनगड सातारा किल्ला

आस्ट्रियाच्या बोसनिया प्रांतांतील सुराजोव्ह या गांवीं आस्ट्रियाचा युवराज व युवराज्ञी यांचा खून होतो काय, व त्रिखंड पसरलेलें व अप्रत्यक्ष रीतीनें सर्व खंडांस भोवणारें विलक्षण युरोपीय युद्ध सुरू होतें काय? वर वर पाहणारास या गोष्टी किती आकस्मिक वाटतात; पण युरोपच्या इतिहासाकडे थोड्या बारकाईनें पाहिलें म्हणजे युवराजाचा खून हें या युद्धाचें निवळ निमित्त होतें. खरीं कारणें निराळींच होतीं असें कळून आल्याखेरीज रहात नाहीं, व ज्या गोष्टी घडून आल्या त्या आकस्मित नाहींत, असें समजून येतें.

हल्लींच्या युद्धाचें मूळ फार लांबवर पोंचलेलें आहे. त्याचा धागा १८७०।७१ मधल्या जर्मनींच्या फ्रान्सवरील अद्वितीय विजयापर्यंत पोंचतो. या जयानें जर्मन जनतेला आत्मविश्वास व आत्मप्रत्यय पटला असा विश्वास जर्मनीच्या धोरणी मुत्सद्यांमध्यें होताच; पण तो जनतेला पटला नव्हता; व तो जनतेला पटावा, जर्मनीचें सावकाश व नकळत वाढलेलें सामर्थ्य जगाच्या निदर्शनास यावें, या हेतूनेंच हें युद्ध सुरू करण्यांत आलें. या आत्मप्रत्ययानें जर्मनीचें ताबडतोब एकीकरण होऊन जर्मनीचें साम्राज्य बनलें. जर्मन लोक म्हणजे कल्पनासृष्टीत व तत्त्वज्ञानांत गढून जाणारे बिनलढवय्ये लोक असा जो युरोपांत वृथा समज पसरला होता, तो पार नाहींसा झाला. कारण, १८७०।७१ मध्यें जर्मनीनें ज्या राष्ट्रामध्यें अलेक्झांडर व सीझरसारख्या पूर्वकालीन जगज्जेत्यांच्या व जगद्वीरांच्या तोडीचा—नव्हे थोडासा वरचढ असा जगज्जेता व जगद्वीर उदयास आला, त्या फ्रान्स राष्ट्राचा सपशेल पराभव करून त्या राष्ट्राकडून अपूर्व खंडणी घेतली. या पराभवानें

फ्रान्सला मरणप्राय दुःख झालें. व फ्रान्सचे **आलसेस** व **लोरेन** हे प्रांत आपल्या ताब्यांत घेऊन जर्मनीनें फ्रान्सच्या हृदयांत या पराभवाचें कायमचें शल्य करून ठेवलें. जर्मनीमध्येंही जास्त महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली व म्हणून विजयानें फुगून न जातां त्यानें आपली औद्योगिक, शिक्षणविषयक व शास्त्रीय प्रगति करून घेण्याचा निश्चय केला व आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्याकरितां सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू केलें. जर्मनीनें तसें केल्याबरोबर फ्रान्सला आत्मसंरक्षणाकरितां तोच मार्ग स्वीकारावा लागला व युरोपमध्यें इंग्लंड खेरीज करून सर्वत्र सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा क्रम सुरू झाला. जर्मनीला इंग्लंडच्या जगड्व्याळ साम्राज्याचा व विशेषतः जगद्व्यापी व्यापाराचा हेवा वाटूं लागला व शास्त्रीय शोधांनीं जरी जर्मनीनें व्यापारांत सावकाशपणें व नकळत वरचें वर्चस्व मिळविलें होतें, तरी हें वर्चस्व कायम राहण्यास व वाढण्यास आरमाराची जरूरी आहे, असें पाहून जर्मनीनें आरमार बांधण्यास सुरवात केली. ही सुरवात झाल्याबरोबर इंग्लंडाच्या नेहमींच्या धोरणाप्रमाणें त्यानेंहि आपलें आरमार वाढविण्यास सुरवात केली. यामुळें फ्रान्सलाहि तेंच करणें प्राप्त झालें. तसेंच, जर्मनीनें आपलें सामर्थ्य वाढविण्याकरितां व आपल्या बाजूचा पक्ष युरोपांत करण्याकरितां राष्ट्रांचे संघ बनविण्याचा क्रम सुरू करून इटाली व आस्ट्रिया हीं दोन राष्ट्रें या संघांत सामील करून घेतलीं. फ्रान्सनें रशियाशीं संगनमत केलें. आतां युरोपांतील मोठ्या राष्ट्रांपैकीं राहतां राहिलें इंग्लंड, व त्यालाही आपण एकटेच एकीकडे पडलों असें वाटलें; फ्रान्सशीं पिढ्यानुपिढ्यांची चढाओढ असतां व रशियाशीं तर कित्येक वर्षांची तेढ असतांना हळूहळू त्यानें या राष्ट्रांशीं मिळतें घेऊन त्यांशीं सख्य संपादन केलें. याप्रमाणें युरोपांत राष्ट्रांचे दोन परस्पर विरुद्ध असे डाव तयार झाले. अशा स्थितींत युरोपमध्यें केव्हां तरी प्रचंड युद्ध माजणार असें भाकीत कित्येक वर्षें करण्यांत आलें होतें, व कित्येक प्रसंग अचानकपणें टळले म्हणून, नाहीं तर हें युद्ध आधींच सुरू झालें असतें; पण **सराजो येथील** खुनानंतर

युद्धाचा प्रसंग टळला नाहीं. सारांश, ज्या गोष्टी वरकरणी आकस्मिक भासतात त्या खोल पाहिलें असतां आकस्मिक नसतात. त्या सकारण घडून येतात. असो.

सज्जनगड-सातारा किल्ला या सफरीच्या बाबतींत माझीच गोष्ट घ्याना; बाकी जगद्व्यापी चळवळीच्या दाखल्यानंतर एका यःकश्चित् व्यक्तीच्या वर्तनाकडे वळणें म्हणजे कोणासही हास्यास्पद वाटेल; पण हालचाली लहान असोत किंवा मोठ्या असोत, कार्यकरणाचे धागे सर्वत्र सारखे असतात, हें तरी त्यावरून दिसून येईल. मला माझ्या साताराच्या मित्राकडून आपण रचलेल्या व आपण एका नाटक मंडळीकडून बसविलेल्या सामाजिक नाटकाच्या प्रयोगाचें आमंत्रण येतें काय व मी पुण्याहून साताऱ्यास कॉलेज चालूं असतां व सुटी नसतां ८० मैलांचा पायगाडीचा प्रवास करण्याचा बेत करतों काय ? हें प्रथमदर्शनीं किती आकस्मिक वाटतें ? पण खरोखरीं पहातां तें आकस्मिक नाहीं. या माझ्या बेताची कारणपरंपरा माझ्या पूर्ववर्तनांत व पूर्वप्रवृत्तींत आहे. मला आधीं पायगाडीची हौस फार; रोज पंधरापंधरा मैल चालण्याची संवय; शिवाय मीं पायगाडीच्या किती तरी चक्करा मारलेल्या; मी जुन्नरसारख्या लांब लांब ठिकाणच्या पायगाडीचा प्रवास यशस्वी रीतीनें केलेला; तेव्हांपासून लांबचा प्रवास मुळींच न केलेला बरेच दिवसांत पायगाडीवर पायही न ठेवलेला; अशा स्थितींत माझ्या मित्राचें पत्र आलें व मला पायगाडीनें जाण्याची हुक्की आली, यांत आश्चर्य काय ? पण अशा आयत्यावेळीं केलेल्या बेतांत सामील कोण होतो ? माझे नेहमींचे पायगाडीच्या चक्राचे सोबती यांनींही आयत्या वेळीं पाय गाळले. पण मीं बेत केला तो केलाच. इतका लांबचा प्रवास एकट्यानें करणें अगदीं त्रासदायक व कंटाळवाणें म्हणून ‘ प्राप्ते षोडशवर्षे तु पुत्रे मित्रवत् आचरेत् ’ या न्यायानें मी आपल्या मुलाला बरोबर घेण्याचें ठरविलें व तीन वाजतां कॉलेजचें काम आटोपून तांतडीनें बरोबर चार वाजतां साताऱ्यास व तेथून सज्जनगडास पायगाडीनें जाण्यास निघालों.

सातारा हें शहर पुण्याच्या थेट दक्षिणेस आहे व साताऱ्याचे थेट दक्षिणेस कोल्हापुर आहे. पुण्याहून **सातारा कोल्हापूर** व पुढें **बेळगांव** हा रस्ता फार रहदारीचा होता, व या रस्त्यावर सर्व मोठमोठीं गांवें वसलेलीं आहेत. सदर्न मराठा रेलवे ज्या मार्गानें नेली आहे तो स्वाभाविक व नैसर्गिक नाहीं. तो खर्च कमी करण्याकरितां व कृष्णा, वेण्या, **कोयना** वगैरे सह्याद्रिपर्वतांतून निघणाऱ्या नद्यांवरील वेगवेगळे पूल वांचविण्याच्या बुद्धीनें आडमार्गानें व आडरानांतून नेला आहे. मीं तरं असें ऐकिलें आहे कीं, ह्या रेलवेचा बेत चालला असतां पांच लाख रुपये दिल्यास कोल्हापुराहून आगगाडी नेऊं असें कोल्हापुर–दरबारला विचारण्यांत आलें होतें. पण कोल्हापुर दरबारनें अदूरदृष्टीनें तें म्हणणें नाकबूल केलें. रेलवेरस्ता **मिरजे**वरून गेला, व मग कोल्हापुर सरकारास मिरजपासून कोल्हापुरच्या फांट्याकरितां तीस लाख रुपये खर्च करावे लागले. हें सांगण्याचें कारण इतकें कीं हल्लीं रेलवेनें प्रवास करणाऱ्या माणसाला या जुन्या रस्त्याची माहिती नसते; पण पुण्याहून साताऱ्यास जाण्यास हाच रस्ता सरळ आहे. असो.

पुणें हें मुळा–मुठा या नद्यांच्या कांठीं असल्यामुळें एका प्रकारें दरींत वसलेलें आहे. त्यामुळें पुण्याहून पायगाडीनें जाणारास प्रथमतः बहुधा चढावाचा रस्ता चढावा लागतो. आम्हांला जावयाचें त्या बाजूला तर **कातरजचा** मोठा घाट होता. पुणें सोडून चार मैल आल्यावर शहराच्या सरहद्दीदर **आंबील** ओढा लागतो. रावजींच्या कारकीर्दींत पर्वतीच्या खालीं रमण्यांत दक्षिणेला जमणाऱ्या भटाभिक्षुकांची रात्रीं अपरात्रीं पुरानें तुडुंब भरलेल्या याच ओढ्यांतून जातांना कशी फजिती होत असे, याच्या हरदासी कथा मीं ऐकल्या होत्या. त्यांची मला या वेळीं आठवण झाली. पांचपासून सहा मैलांपर्यंत एक मैलभर फार मोठा चढाव लागतो. ही एक लहानशी टेकड्यांची ओळ आहे. हा चढाव चढतांना फार जड जातें. मुख्य **कातरजचा** डोंगर व या टेकड्या यांचे दरम्यानचे दरींत जुना पेशव्यांचा कात्रजचा तलाव आहे; व तेथून पुण्यांत

पाणी आणिलें आहे. सहा मैलांपासून ८ मैलांपर्यंत म्हणण्यासारखा चढाव नाहीं. आठ मैलांपासून अकरा मैलांपर्यंत मात्र सारखा घाटाचा चढाव आहे व कांहीं ठिकाणीं तर तो बराच कठिण आहे. नवव्या मैलाच्या जवळ आम्ही कसेबसे आलों, व तेथून वर चढण्यास एक पाऊलवाट आहे व तिनें गेल्यास एक मैलाचा हिसका वांचतो, हें मला ठाऊक होतें म्हणून आम्ही पायगाड्या हातांत घेऊन ती पाऊलवाट पायीं चाललों. असें करतांना आपलेंच वाहन आपल्या खांद्यावर घेण्याचा केव्हां केव्हां प्रसंग येतो, तसा आमच्यावरही आला. हा कातरजचा सर्व घाट उत्तम बांधलेला आहे व यंदा पाऊस खूप पडल्यामुळें जिकडेतिकडे हिरवींगार झाडें व शेतें दृग्गोचर होत होतीं. यामुळें सभोंवारचा देखावा दृष्टिमनोहर होता. १० मैलांपर्यंत आम्ही पायीं चाललों तोंच घाटांतल्या सर्वांत उंच टेकडींत असलेला बोगदा दिसूं लागला. येथपासून एक मैल चढाव आहे; पण तो फार बेताचा आहे. शेवटीं एकदांचे आम्ही बोगद्याशीं आलों; परंतु सर्व घाटाचा चढाव चढून आल्यामुळें फार दम लागला व तहानही फार लागली, म्हणून तेथें असलेल्या पब्लिक वर्कसच्या स्टोअरमध्यें गेलों व तेथील कारकुनाजवळ पाणी मागितलें. त्यानें बोगद्यांतील टाक्याचें स्वच्छ व गार पाणी आणून दिलें व तें आम्ही यथेच्छ प्यालों. या जलपानानें आमचा थकवा पार नाहींसा झाला व आम्हांला पुढें जाण्यास हुरूप व हुशारी आली. आतां आमच्या आजच्या पुढच्या प्रवासांतील पुष्कळ भाग उताराचा व निवळ सपाटीचा होता. यामुळें मनाला आनंद होत होता. परंतु घड्याळांत पाहतां सहा वाजले. म्हणजे या दोन तासांत आमचा प्रवास ताशीं सहा मैल पडला व पुढें तर रात्रीपर्यंत आम्हांला आणखी वीस एकवीस मैल जावयाचें होतें; म्हणून आम्हीं पायगाडीवर पाय टाकला व बोगद्यांतून जाऊं लागलों. हा बोगदा जवळजवळ दोन फर्लांगांचा आहे. याच्यामध्यें रात्रीचे दिवे लावतात. बोगद्याच्या या टोंकापासून दुसऱ्या टोंकाचा उजेड दिसतो. पण बोगद्याच्या मध्यें. अगदीं अंधार

असतो व पायगाडीच्या खालींवर कांहींच दिसत नाहीं. यामुळें जातांना जरा भीति वाटते. पण लवकरच दुसऱ्या टोंकांतून उजेड दिसूं लागतो व मग भीति कमी होते. तरी पण बोगद्यांतून एकंदरींत पायगाडीनें जाण्याची मजा वाटते यांत शंका नाहीं. बोगद्याच्या टोंकाला एक टुमदार डाकबंगला आहे. आमच्या पायगाड्या उताराला लागल्यावर अर्थात् वाऱ्यासारख्या वेगानें जाऊं लागल्या. येथून तीस मैलांवर असलेल्या नीरानदीच्या पुलापर्यंत रस्ता सपाट किंवा उतरताच आहे, असें म्हटलें तरी चालेल. आपण एका दरींतून चाललों आहोंत असा भास होतो. कारण आपल्या दोनही बाजूंस लहानमोठ्या टेंकड्यांची रांगची रांग लागते व रस्ता व टेकड्या यांच्या दरम्यानच्या सपाट भागांत हिरवींगार शेतें लागतात. चवदा व पंधरा मैलांच्या सुमारास **शिवापूर** हें गांव लागतें. हें गांव आंब्याकरितां फार प्रसिद्ध आहे. पुण्यास शिवापूरचा आंबा फार येतो व आंबाही चांगल्या जातीचा असतो. येथें मैल दीडमैल सारखी आंबराई लागते. पण ही जुनी आंबराई आतां कमी होत चालली आहे. नवी लागवड विशेष होत नाहीं; यामुळें थोड्या वर्षांनीं ही आंबराई पार नाहींशी होण्याची भीति आहे शिवापुरच्या बाजूनें एक चांगला ओढा वाहात जातो; येथें आम्हांला बराच गारवा वाटूं लागला. आमच्या पायगाडीचा प्रवास मात्र आतां झपाट्यानें चालला होता व हां हां म्हणतां मैलावर मैल येत होते.बरोबर सात वाजतां आम्हीं बावीसाव्या मैलाशीं आलों. येथून उजव्या हातास पंतसचिवांचें **नसरापूर** म्हणून एक तालुक्याचें गांव आहे, त्याची वाट फुटते. नसरापुराहून दोनतीन फर्लांगांच्या अंतरावर **बनेश्वर** म्हणून एका नदीच्या कांठीं महादेवाचें देऊळ आहे. या देवळासमोरच्या बऱ्याच भागांत झाडी फार दाट आहे, म्हणून या ठिकाणास **बनेश्वर** म्हणतात. देऊळ चांगलें काळ्या दगडांनीं बांधलेलें आहे व देवळासमोर दोन सुंदर कुंडें आहेत. या कुंडांत काळसर निळसर रंगाचे खूप मासे आहेत. पुण्याहून **बनेश्वर** चोवीस मैल आहे व पायगाडीनें एका स्वतंत्र दिवसाची

ही सफर आहे. मीं हें ठिकाण लहानपणीं पुण्यास शिकण्यास असतांना तर पाहिलें होतें. पण गेल्या मे महिन्यांत मी बैलगाडीनें सकुटुंबसपरिवार याठिकाणीं येऊन दोन दिवस राहिलों होतों. यामुळें या मैलाशीं आल्या-वर त्या आमच्या मे महिन्यांतील आनंदायी प्रवासाची मला आठवण झाली.

येथून आमचें रात्रींच्या मुक्कामानें ठिकाण **शिरवळ** हें बरोबर दहा मैल होतें. तेव्हां आठांच्या आंत आम्हीं आपलें ठिकाण गांठूं असा आम्हांला भरंवसा वाटूं लागला, व आम्हीं आमच्या लोहाश्वावर आरूढ होऊन लीलेनें चालूं लागलों. चौवीस मैलाशीं कामथडी म्हणून वाटेवर गांव लागतें. येथून डाव्या हाताला पुरंदर किल्ल्याची वाट फुटते. पुरंदर किल्ला येथून अकरा मैल आहे व येथून जरा पुढें गेल्यावर उजव्या हाताला भाटघरचें प्रचंड धरण याची व भोरची वाट लागते. कामथडीहून भाटघर सहा मैल आहे व तेथून पुढें भोर चार मैल आहे. आम्हीं आमच्या मे महिन्याच्या बैलगाडीच्या प्रवासांत भाटघर व पुरंदर अशीं दोन्हीं स्थळें पाहिलीं होतीं. यामुळें हे सर्व रस्ते व हीं सर्व ठिकाणें मूर्तिमंत माझ्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं. व एका प्रवासांत दोन प्रवासांचा अनुभव मला आल्यासारखें वाटलें; आतां साधारण रात्र झाली होती; पण चांदणें थोडेसें होतें. तरी पण आतां सभोंवारचा देखावा दिसेनासा झाला व यामुळें हा प्रवास थोडासा कंटाळवाणा व भयप्रदही वाटूं लागला. इत-क्यांत आम्हीं थोडे खोलखोल जाऊं लागलों, असें आम्हांस वाटलें व पहातों तों एका लोखंडी कठड्याच्या अरुंद अशा पुलावर आम्ही आलों व हा **नीरा**नदीचाच पूल काय अशी आम्हांस शंका आली. पण पुला-वर नांव दिसेना. कदाचित् नांव पुलाच्या प्रारंभींच्या दगडीकामावर असेल असें समजून आम्ही थोडेसे परतलों. पण पुलावर कोठेंहि नांव दिसेना. घड्याळांत पाहतां आंठ वाजले. तेव्हां हाच **नीरेचा** पूल असला पाहिजे असा आम्हीं मनाचा निश्चय केला. येथून **शिरवळ** दोनच मैल होतें तेव्हां मुक्कामाला आलोंच; असें आम्हांल वाटलें. शिर-

वळ गांवच्या बाहेर रावबहादुर **देशपांडे** म्हणून रेव्हेन्यू खात्यांत मोठ्या हुद्यावर असलेले पेन्शनर गृहस्थ राहतात. त्यांची माझी एकदां भेट झाली होती, त्याचा फायदा घेऊन त्यांच्या बंगल्यांत रात्रीची विश्रांति घेण्याचा मीं बेत केला होता. माझ्या पायंगाडीच्या प्रवासाचा एकाएकीं बेत झाल्यामुळें त्या गृहस्थांना आधीं पत्र पाठविणें शक्य नव्हतें. पुण्याहून निघतांना तार करावी असें एकदां मनांत आलें होतें. पण त्या ठिकाणास तार असेल किंवा नाहीं, या शंकेनें व इतकें करण्यास स्वस्थपणाही नसल्यामुळें तें तसेंच राहून गेलें होतें. अर्थात् त्या गृहस्थाकडे अनपेक्षितपणानें जाणें आम्हांस भाग होतें. **शिरवळ** गांवाच्या जवळ आल्यावर आम्हीं रावबहादूरांच्या बंगल्याची चवकशी करूं लागलों, तों त्यांचा बंगला शिरवळाच्या पलीकडे आहे असें कळलें. अशा वेळीं अशी बातमी म्हणजे दुष्काळांत तेराव्या महिन्याप्रमाणें वाटतें. कारण, आतां आमचीं घोडीं थकत आलीं होतीं. रात्रीमुळें फार वेगानेंही जातां येईना. विचारपुस करीत करीत आम्हीं शिरवळ गांवाला फुटणाऱ्या रस्त्याशीं आलों. तेथें समजलें कीं, देशपांड्यांचा बंगला पुणें–साताऱ्याच्या रस्त्यावर आणखी दोन मैलांवर डाव्या बाजूस आहे. माझी कल्पना बंगला गांवाच्या आसपास असेल, अशी होती. पण तो दोन मैलांच्या लांबीवर आहे असें ऐकून आमच्या थकलेल्या जीवाचें धाबें दणाणलें, व शिवाय त्या गृहस्थांच्या घरीं जाण्यास अवेळ होणार असें वाटूं लागून त्यांना उगाच आपल्याकरितां त्रास पडणार अशी भीति वाटूं लागली. आतांची वेळ रात्रीची; रस्ताही चढावाचा लागूं लागला; समोर काळा कभिन्न डोंगर दिसूं लागला व सभोंवार भयाण साड माळच माळ लागूं लागले. जवळपास काठ झोंपडीची किंवा वस्तीची खूण दिसेना, यामुळें आपण वाट तर चुकलों नाहीं; किंवा त्यांच्या बंगल्याच्या पुढें तर आलों नाहीं अशी शंका येऊं लागली. इतक्यांत उजव्या हाताला एक जुनें देऊळ दृष्टीस पडलें. आतां बंगला सांपडला नाहीं तर या पडक्या जुन्या देवळांत रात्र

काढण्याचा आम्हीं बेत केला व तसेच हळूहळू पुढें चाललों, तों डाव्या बाजूस बंगल्यासारखें कांहींतरी दिसूं लागलें, व आमच्या जीवांत जीव आला. थोड्याच अवकाशानें उजव्या बाजूस सडक फुटलेली दिसली. हाच रावबहादुरांच्या बंगल्याची सडक असली पाहिजे, असा आम्हीं तर्क केला. इतक्यांत बंगला स्पष्टपणें दिसला व **चक्षुर्वैसत्यं** या म्हणीचा आम्हांला प्रत्यय आला. आम्ही बंगल्याच्या दाराशीं येऊन रावबहादुरांची चवकशी केली. रावबहादूर आपल्या खोलींत जाऊन अंथरुणावर जाऊन पडले होते. त्यांना मीं आपलें नांवगांव सांगून ओळख पटविली व रावबहादुरांनीं आमचें मनापासून स्वागत केलें. बंगल्याचें ठिकाण बरोबर ठाऊक नसल्यामुळें फार विचारपूस करीत यावें लागलें, यामुळें फार रात्र झाली असें आम्हीं रावबहादुरांस सांगितलें. रावबहादुरांचे घरीं आमची जेवण्या-निजण्याची उत्तम सोय झाली हें सांगणें नकोच. परत येतांना दिवसा-उजेडीं यावें म्हणजे आमची शेतवाडी व बागबागाईत पाहण्यास सांपडेल, असें रावबहादुरांनीं सांगितलें व मीही त्यांचे म्हणण्याप्रमाणें करण्याचें कबूल केलें. इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी झाल्यावर आम्ही झोंपीं गेलों व चारपांच तासांच्या पायगाडीच्या श्रमानें दमल्यामुळें आंथरुणावर पडल्याबरोबर निद्रादेवीनें आमच्यावर अनुग्रह केला.

पुढें जाण्याकरितां आम्ही पहांटेस सहाच्या सुमारास उठलों व चहा-पाणी झाल्यावर बरोबर साडेसहा वाजतां रावबहादुरांचा निरोप घेऊन पायगाडीवर पाय ठेवला. आतां सकाळ झाल्यामुळें सभोंवारचा प्रदेश स्पष्टपणें दिसूं लागला. ज्याप्रमाणें पुण्यापासून कातरजच्या घाटापर्यंत साधारण चढताच रस्ता आहे, तसेंच येथेंही दृष्टीस पडलें. नीरा नदी सोडल्यापासून खंडाळ्याच्या घाटापर्यंत साधारण चढताच रस्ता आहे. आम्ही रावबहादुरांच्या बंगल्याहून निघून वाटेला लागलों तोंच पसतीसावा मैल लागला. शिरवळपासून रावबहादुरांचा बंगला तीन मैल दूर आहे; म्हणून आदल्या रात्रीं आम्हांला बंगला लागतां लागेना. पण

आदल्या दिवशीं याप्रमाणें बरेंच पुढें आल्यामुळें सातारा बरोबर पसतीस मैल राहिलें, व रावबहादुरांचें ठिकाण पुणें व सातारा यांचे मधोमध आहे असें आढळून आलें. आतां पांच मैलानें आम्हांला खंडाळा घाट लागावयाचा होता. हा सर्व भाग अगदीं खडकाळ माळरानी असल्यामुळें दृष्टीला रुक्ष व ओसाड भासतो. हिरवीं शेतें कोठें कोठें अगदीं तुरळक दिसत. अर्ध्या तासानें आम्ही ४० व्या मैलाशीं आलों. येथें खंडाळें नांवाचें गांव लागतें व येथून घाटास सुरुवात होते. आपल्यासमोरच काळी भोर व मध्यें मध्यें हिरवी अशी डोंगरांची रांग दत्त म्हणून उभी राहते. या रांगेच्या मधला एक सुळका तर फारच उंच व भयंकर दिसतो व खडक तर त्या सुळक्याकडे थेट जातो; व हा डोंगर आपण ओलांडणार कोठें, अशाबद्दल शंका उत्पन्न होते. इतक्यांत रस्ता डाव्या बाजूस एकदम वळतो व डाव्या बाजूस डोंगराची रांग बरीच सखल होत गेल्यामुळें इकडून ओलांडण्याची वाट आहे, असें वाटतें. पण डाव्या बाजूस बरेंच गेल्यावर रस्ता पुनः एकदम उजव्या बाजूस वळतो व मनुष्य त्या सुळक्याच्या अगदीं थेट खालीं येतो. येथून त्या सुळक्याची उंची, त्याचा प्रचंडपणा व त्याचा बिकटपणा यांची चांगलीच कल्पना मनांत येते. रस्ता उजवीकडे जातजात व वळणें घेत घेत डोंगराच्या माथ्यावर येतो. या घाटाचा चढाव कातरजपेक्षां थोडा जास्त आहे, असें आम्हांस वाटलें. कारण तो साडेतीन मैलांच्यावर आहे. ४३ मैलांचे पलीकडे आम्ही गेलों तों रस्त्याला लागून डाव्या हाताला सुंदर पाण्याचें एक टांकें लागलें. तेथें अर्थात् दगडाला शेंदूर फासून एक झसोबा तयार केलेला होता. तेव्हां या सुंदर ठिकाणीं बसून फराळ करावा असा आम्हीं बेत केला व त्याप्रमाणें बरोबरचें पाथेय काढलें. 'भुकेला कोंडा व निजेला धोंडा' या म्हणीचा प्रत्यय आम्हांला येथें आला. आदल्या दिवशींची साधी व शिळी झुणका दशमी आम्हांला किती तरी गोड लागली व त्यावर टांक्यांतील स्वच्छ व गार पाणी पिऊन आमचा आत्माराम गारेगार झाला व पुढच्या प्रवासास आम्ही ताजेतवाने झालों. पण येथें

आम्हांला साडेआठ झाले. थोड्याच वेळांत घाटमाथा आला व आम्ही आमच्या पायगाडीवर चढून पायगाडीस टांच मारून भराभर चालूं लागलों व थोड्याच वेळानें सपाटीवर आलों. खंडाळा घाटाच्या अलीकडील भाग रुक्ष आहे, तसा इकडे नाहीं. इकडचा भूमिभाग सुपीक व नयनमनोहर दिसला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस शाळू, गहूं, हरभरा, भुईमुग इत्यादि पिकांचीं हिरवींगार निळसर किंचित् धूसर रंगाचीं शेतेंच्या शेतें लागतात. यंदा जिकडे तिकडे पाऊस पुष्कळ पडल्यामुळें पिकें विशेष जोमांत दिसलीं. अठेचाळीस मैलांच्या सुमारास सुंकूल नांवाचें गांव लागलें. हें गांव बरेंच मोठें आहे व येथून वाईकडे उजव्या बाजूस वाट फुटते. वाई येथून ८ मैल आहे. आतां आम्हांला पुढें एकवीस मैल जावयाचें होतें व नऊ तर वाजून गेले होते. तेव्हां सातार्‍यास पोंचण्यास अकरा साडेअकरा वाजणार असें वाटलें. हा प्रांत बराच सपाटीचा आहे. यामुळें आमचा प्रवास जोरानें चालला होता. पन्नास मैलांनंतर वाठारकडून वाईला जाणारा रस्ता आम्हांला लागला. येथूनही वाई आठच मैल आहे. पुढें एकदां सातार्‍याकडून वाईचा रस्ता लागतो. तेथूनही वाई आठच मैल आहे. यावरून पुणें सातारा रस्ता या ठिकाणीं कांहींसा वर्तुलाकार असावा म्हणून वांई या तिन्ही रस्त्यांपासून आठच मैल आहे.

पुण्यापासून छपन्न मैलाशीं भुंजगांवाजवळ कृष्णा नदीवरील पूल लागला. या ठिकाणीं नदी फारशी मोठी नाहीं. नीरेच्या पुलापेक्षां हा पूल बराच लहान आहे. सातारारोड स्टेशनपासून सातार्‍यास येतांना कृष्णेवर जेवढा पूल आहे, तेवढाही हा पूल नाहीं. यामुळें प्रथमतः हा पूल कृष्णेवरचा आहे हें ध्यानांतहि येत नाहीं. येथून पुढें एकसष्ट मैलाजवळ असलेल्या लिंबगांवच्या खिंडीपर्यंत चढावाचा रस्ता आहे. आतां ऊनहि झालें होतें. यामुळें प्रवासाचा फारच त्रास झाला. तहानहि फार लागूं लागली. मग वाटेंत एका ठिकाणीं चांगलीं पिकलेलीं केळीं घेतलीं व तीं खाल्लीं. यामुळें जरा बरें वाटलें. ही लिंबची खिंड व येथला एक-

दूर देखावा पुणें-लोणावळें रस्त्यावरील वडगांवच्या खिंडीसारखा दिसतो. लिंबच्या खिंडीच्या माथ्यावर कसेबसे आम्ही आलों व तेथून पुनः जी उतारास सुरुवात झाली ती आम्हांस वेण्या नदीच्या पुलापर्यंत पुरली. वेण्येचा पूल पुण्याहून सदुसष्टाव्या मैलाजवळ आहे. आतां सातारा दोन अडीच मैल राहिलें. एकदांचे मुक्कामाला आलों, असें आम्हांस वाटूं लागलें. पण सातारा उंचावर असल्यामुळें या दोन अडीच मैलांला वाजवीपेक्षां जास्त वेळ लागला. तरी शेवटीं एकदांचे सातारा गांवाकडे जाणाऱ्या रस्त्याशीं आम्ही येऊन पोंचलों व गांवच्या रस्त्याला लागलों. गांव चढत्या किल्ल्याच्या बाजूवर वसलेला असल्यामुळें आम्हांस गांवाहून चालत जावें लागलें. शेवटीं बाराच्या सुमारास आमच्या मित्राच्या घरीं आम्ही सुखरूप येऊन पोंचलों. आम्ही पुण्याहून पायगाडीनें आलों, हें पाहून माझ्या मित्राच्या मंडळींना साश्चर्य आनंद वाटला.

अर्थात् रात्रीं आम्ही आमच्या मित्राचें पुनर्विवाह या सामाजिक विषयावरील नाटक पहावयास गेलों. साताऱ्यासारख्या शहरीं पुनर्विवाहासारख्या सामाजिक विषयावरील एका कर्त्या सुधारकानें लिहिलेलें नाटक पाहण्यास पुष्कळ प्रेक्षक जमावे हें स्वाभाविक होतें. मंडळीनें एकंदरींत प्रयोग चांगल्या प्रकारें केला, यांत संशय नाहीं. मात्र नाटक मोठें असल्यामुळें प्रयोग संपण्यास रात्रीचे तीन वाजले.

दुसरे दिवशीं आम्हांला उठण्यास उशीर झाला व सज्जनगडास दोनप्रहरनंतर जाण्याचें ठरलें. यावेळीं माझ्याबरोबर चारजण आणखी पायगाडीवाले होते. साताऱ्याहून सज्जनगड सहासात मैल आहे. तेव्हां चार वाजतां निघून सात साडेसात वाजतां आम्ही सहज परत येऊं, असा आमचा अंदाज होता. सातारा शहर हे किल्ल्याच्या पायथ्याशीं आहे, हें वर लिहिलें आहे. पण हा किल्ल्याचा डोंगर म्हणजे एकटा सुळका नाहीं, तर ही एक पूर्वपश्चिम जाणारी डोंगराची रांग आहे व या रांगेंत एकीकडे सातारचा किल्ला आहे व दुसरीकडे यवतेश्वराचा डोंगर आहे व

सातारच्या किल्ल्यावरून, यवतेश्वराच्या डोंगरावरून, डोंगरांच्या पठारा-पठारानें महाबळेश्वरापर्यंत पायवाट जाते. किल्ला व यवतेश्वराचा डोंगर यांचेमध्यें डोंगरांची रांग सखल असून खिंडीसारखी तुटली आहे व या खिंडीचे खालीं लहानसा बोगदा केलेला आहे व पुणें-कोल्हापुर रस्ता या बोगद्यांतून गेला आहे. बोगद्याच्या डाव्या हातास कोल्हापुरचा रस्ता वळतो व उजव्या हातास **परळीचा** रस्ता फुटतो. साताऱ्या-शेजारचा बोगदा टाकल्यावर मात्र मैल दीड मैल खूब उतार लागतो; व येथपर्यंतचा रस्ता चांगला खडीचा आहे. पुढला रस्ता नुसत्या मुरमाचा आहे, व त्याला भयंकर चढउतार आहेत. कारण, उजव्या हाताच्या यवतेश्वराच्या डोंगरांतून कितीतरी ओढेनाले खालीं येऊन ते **उरमोडी** या नदीला जाऊन मिळाले आहेत. परळीच्या मैल दीड मैल अलीकडे **उरमोडी** नदी लागते. या नदीला अगदीं अरुंद असा लाकडी साकू बांधलेला आहे. त्यावरून पायगाडी जेमतेम आम्हीं नेली. पुढें हा रस्ता **परळी** गांवाकडे जातो. सज्जनगड किल्ल्यास जाण्याकरितां हा रस्ता टाकून अर्धा एक मैल अगदीं खांचखळग्याच्या पाऊलवाटेनें जावें लागतें. यामुळें सज्जनगडाच्या पायथ्याशीं असलेल्या वाडीशीं येईतों पांच वाजून गेले होते. तेथें एका शेतकऱ्याच्या गोठ्यांत आम्हीं आपल्या पाय-गाड्या ठेवल्या व किल्ला चढण्यास लागलों. प्रथम एक लहानशी टेकडी चढून गेल्यावर किल्ल्याचा सुळकाच्या सुळका लागतो. हा किल्ला फार मोठा नाहीं. पण किल्ल्याच्या सभोंवारचे काळेकभिन्न खडक अगदीं भिंती-सारखे तुटलेले आहेत. पूर्वीं या किल्ल्याला जाण्यास चांगल्या पायऱ्या असाव्यात असें वाटतें. कारण पायऱ्यांच्या खुणा सारख्या दिसत होत्या. या सज्जनगडच्या किल्ल्याची वाट व पायथ्यापर्यंतची वाट या पाहून मला देहूच्या वाटेची आठवण झाली. देहूची तीनचार मैलांची वाट अशीच अगदीं वाईट आहे. या दोन्ही ठिकाणीं मोठमोठ्या यात्रा जमतात. परळीला दासनवमीस सात हजारांपर्यंत यात्रा जमते, असें मला समजलें. शिवाय साताऱ्याहून सज्जनगडास वारंवार जाणारे लोक पुष्कळ असतात. असें


असून या वाटेची इतकी वाईट स्थिति कां ? लोकलफंडांकडून या यात्रेकरूंनीं चांगली वाट लावण्याबद्दल दाद लोवून घेऊं नये कां, असें माझ्या मनांत आलें. निदान किल्ल्याची वाट तरी चांगली कां नसावी ? रामदासांच्या समाधीचें ठिकाण हें, रामदासाच्या वडील बंधूंचे वंशज हयात असून महाराष्ट्रांतले पहिल्या प्रतीचे सरदार आहेत. चाफळकरांना मोठी जहागीर आहे. शिवाय रामदासी पंथाची शिष्यशाखाही मोठी आहे. तव्हां या सरदारांनीं किंवा त्यांच्या शिष्यांपैकीं संपन्न गृहस्थांनीं किल्ल्याचा रस्ता दुरुस्त करून लोकांना सुखदायक होईल असा कां करूं नये ? अशा प्रकारचे प्रश्न माझ्या मनांत वारंवार येत होते. इतकी या सर्व रस्त्याची वाईट स्थिति होती. शेवटीं सहा साडेसहाच्या सुमारास आम्ही एकदांचे सज्जनगडच्या किल्ल्यावर येऊन पोंचलों व पुण्याहून सज्जगनडाची आमची पायगाडीची सफर एकदांची संपली, असें मनांत येऊन मनाला एकप्रकारें आनंद झाला.

महाबळेश्वरच्या सह्याद्रीच्या मुख्य डोंगराच्या ओळीपासून ज्या पुष्कळ पोटओळी सातारा जिल्ह्यांत पसरल्या आहेत, त्यांपैकीं एका विस्कळित ओळीमधील एका स्वतंत्र सुळक्यावर परळीचा किल्ला बांधलेला आहे. सातारच्या आसपासच्या भागाला, सातारचा **अजिमतारा** व परळीचा **नौरसतारा** ( हीं दोन्ही नांवें औरंगझेबानें दिलेलीं आहेत हें पुढें या लेखाच्या ऐतिहासिक भागांत येईल ) हे जयविजयासारखे आहेत. सातारचा अजिमतारा परळीच्या नौरसतारापेक्षां उंचीनें, मजबुतीनें व विस्तारानें जरा मोठा आहे. सातारचा किल्ला समुद्रसपाटीपासून ३३०० फूट आहे तर परळीचा किल्ला ३०२० फूट उंच आहे. परळीच्या किल्ल्याला दोन वाटा आहेत; एक **परळी** गांवाच्या अलीकडून **उरमोडा** नदी ओलांडल्याबरोबर सरळ वर जाते व दुसरी परळी गांवांतून जाते. साताऱ्याकडून जाणाऱ्यास हा दुसरा रस्ता दोन मैलांनीं अधिक लांब पडतो. कारण एका टेकडीला वळसा घालून परळी

गांवामधून जावें लागतें. हा रस्ता पहिल्यापेक्षां जास्त विकट आहे. किल्ल्याच्या दरवाजाखालीं दोन्ही रस्ते एके ठिकाणीं मिळतात. किल्ल्याच्या दरवाजाशीं येईपर्यंत किल्ल्याचा दरवाजा अगदीं दिसत नाहीं. कारण दरवाजाचें तोंड पूर्वेस आहे व मनुष्य जरा बाजूनें चढतो. शिवाय दरवाजाच्या वर तुटलेला कडा आलेला आहे. पहिला दरवाजा उत्तम दगडांनीं बांधलेला आहे व त्याचे बाजूस बुरूज असून ते मजबूत आहेत. दरवाजाच्या कमानीच्या वरच पर्शियन भाषेंत लिहिलेला एक शिलालेख आहे. पण या किंवा किल्ल्यांत असलेल्या आणखी एक दोन शिलालेखांचें भाषांतर अजून झालेलें नाहीं. निदान पुष्कळ चौकशी करूनसुद्धां तें मला कोठेंही मिळालें नाहीं. पर्शियन जाणणाऱ्या वाचकांचें याकडे लक्ष जाईल काय?

दरवाजाच्या खालपासून अगदीं दुसऱ्या दरवाजाच्या वरपर्यंत चांगल्या दगडी बांधीव पायऱ्या आहेत. पहिल्या दरवाजांतून जरासें वर गेलें म्हणजे दुसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा चांगला मजबूत आहे. याच्या देवडीच्या आंत गेल्यावर उजव्या हाताच्या भिंतींत एक पर्शियन शिलालेख आहे. पायवाट चढून वर गेलें कीं किल्ल्याच्या सपाटीवर मनुष्य येतो. येथें जवळ डाव्या हाताला एक लहानशी मुसलमानी कबर लागते व उजव्या हाताला एक लहानसा तलाव लागतो. याला दगडी पायऱ्या आहेत व हा अगदीं अलीकडे बांधलेला आहे असें तेथल्या संगमरवरी शिलालेखावरून दिसून येतें.

हा किल्ला फार मोठा नाहीं; त्याची रुंदी तर फारच थोडी आहे. एकंदर घेर पंचावनशें फुटांच्या वर नाहीं. तलाव व कबर टाकून जरा पुढें गेलें म्हणजे डाव्या हाताला राहण्याचीं घरें लागतात व डाव्या हाताला पहिल्यापेक्षांही मोठा तलाव लागतो. हा तलाव चांगल्या बांधकामाचा असून त्याला तीनींकडून आंत जाण्यास चांगल्या घाटवजा पायऱ्या बांधल्या आहेत. एका लहानशा खोपटांत तलावांतून तोटी



नं. ५ ] सज्जनगडावरील राममंदिर. [ पान ८८



नं. ६ ] सज्जनगड दुरूनचा देखावा. [ पान ८९

लावून पंपानें पाणी नेण्याची व्यवस्था केली आहे. येथें ही अर्वाचीन यांत्रिक सुधारणा शिरली आहे, असें पाहून मला आश्चर्य वाटलें.

पुढें राममंदिराच्या फरशी केलेल्या पटांगणांत शिरतों तों तेथें फुट-बॉलचा डाव चालू होता. हा प्रकार पाहून तर आमचें आश्चर्य दुणावलें! काय अर्वाचीन पाश्चात्य सुधारणेचा व पाश्चात्य संस्थांचा जोर आहे पहा! श्रीसमर्थ रामदासांच्या वसतिस्थानांतसुद्धां इंग्रजी फुटबॉलनें प्रवेश केला ना? यावरून अर्वाचीन सुधारणेच्या अप्रतिहत गतीची चांगली कल्पना माझे मनांत आली. नंतर आम्ही राममंदिराच्या सभामंडपाचे पायऱ्यांशीं आलों. येथें एक जुना गणपति मंदिराकडे पाठ करून पण मंदिरांत शिरणाराकडे तोंड करून बसविलेला आहे. पायऱ्यां-वर पादत्राण वगैरे काढून ठेवून आम्हीं सभामंडपांतून वर देवाकडे गलों. सभामंडपाचें काम लांकडी आहे, मात्र खालीं पांढऱ्या काळ्या अलीकडील संगमरवरी विटांची फरशी केलेली आहे. राममंदिर बरेंच जुनें दिसतें. त्याच्या सभोंवार मोठमोठ्या मुसलमानी पद्धतीच्या कमानी असून त्या कमानींवर घुमट केलेला आहे. आंत गाभारा आहे व त्यांत राम, लक्ष्मण, सीता, मारुती व रामदास अशा पांच मूर्ति आहेत. गाभाऱ्याच्या डाव्या बाजूकडून गाभाऱ्याचे खालीं भुयारांत जाण्यास अगदीं काळोखाचा वांकडा जिना आहे. त्यांतून आम्ही खालीं गेलों. तेथें गाभाऱ्याचे खालीं रामदासस्वामींची समाधि आहे. त्यावर फुलांच्या माळा घातलेल्या दिसल्या. समाधीच्या पलीकडे भिंतींत कोनाड्यांत त्यांच्या पितळी पादुका आहेत. हें सर्व पाहून झाल्यावर आम्हीं समोरून पण तळघरवजा गाभाऱ्याचे पुढील प्रशस्त दालनांतून पायऱ्या चढून सभामंडपाशीं आलों.

राममंदिर व रामदास स्वामींची हा समाधि थेट उत्तर हिंदुस्थानां-तील मुसलमानी कबरस्थानाप्रमाणेंच आहे. म्हणजे कबरस्थान खालीं तळघरवजा बांधलेल्या भागांत असावयाचें व वर आणखी कबरस्थानाचा

आकार असावयाचा; त्याऐवजीं येथें राममूर्ति आहेत. यावरून जुन्नरच्या लेण्याद्रिप्रमाणें हें राममंदिर मूळचें कबरस्थान असून त्यांच्याच अवशेष भागावर हें मंदिर बांधलेलें आहे का काय असा भास होतो. कदाचित् त्याच धर्तीवर ही समाधि बांधली असेल. राममंदिरांचें शिखर चुन्याविटांचें असून त्यावर उत्तम गिलावा करून जागोजाग चित्रें केलेलीं आहेत. एकंदर देऊळ, त्याच्या सभोंवारचें पटांगण व त्याचें शिखर याचें काम फार सुबक आहे, यामुळें हें ठिकाण पाहून मनाला आनंद होतो व रामदासाच्या शिष्यांनीं रामदासासारख्या विख्यात स्वामीला साजेशीच समाधि व मंदिर बांधलें आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. समाधियुक्त मंदिर पाहिल्यावर आम्ही देवळाशेजारींच असलेल्या सोप्यावजा लांकडी इमारतींत गेलों. तेथें देवळाचे पुजारी वगैरे रहातात. याच घरांत रामदास स्वामी रहात असत असें आम्हांला सांगण्यांत आलें. आम्ही समर्थांची निजावयाची खोली, त्यांचा मच्छरदाणीसकट पितळी छपरपलंग पाहिला. ता लांबीला थोडा कमी भासला, पण रामदास स्वामी त्या पलंगावर निजत नसत तर तेथें घातलेल्या विटांच्या ओट्यावर निजत असत असें आम्हांस कळलें. स्वामींची गुप्ती असलेली लांब कुबडी, त्यांची उंच वेताची काठी, त्यांचा पाण्याची कळशी, तांब्या, भांडें, पळीपं ..त्रा वगैरे सर्व जिनसा आम्हीं पाहिल्या. श्रीसमर्थांच्या हयातींतील व त्यांनीं वापरलेल्या जिनसा जितक्या श्रद्धेनें व भक्तिभावानें येथें ठेवण्यांत आल्या आहेत, तितक्या श्रद्धेनें व भक्तिभावानें महाराष्ट्रांतील इतर पूर्वकालीन थोर पुरुषांच्या जिनसा ठेवण्यांत आल्या असत्या तर हल्लींच्या पिढीला त्याचा बराच उपयोग झाला असता, असें माझ्या मनांत आलें. पण परळी ह गांव व हें ठिकाण रामदासांना इनाम असून त्यांच्या ज्येष्ठ बंधूच्या वंशाकडे म्हणजे चाफळकर सरदाराकडे हें इनाम सारखें चालत आल्यामुळें अशा जिनसा व वस्तु राहू शकल्या. इतर थोर पुरुषांच्या बाबतींत अशा तऱ्हेची वंशपरंपरा चालली नसेल म्हणून वस्तू शिल्लक राहिल्या नसतील असें मला वाटलें.

इतकें पाहून होत आहे तों साडेसहाचा सुमार होऊन अंधार पडूं लागला म्हणून आम्हांला परतावें लागलें. परत येतांना आम्हांला एक गबाळे पोषाक केलेले गृहस्थ उतरतांना दिसले. ते व आम्हीं पहिल्या दरवाज्याशीं आलों. आमचे जवळ दुर्बीण होती तीं त्यांनीं मागितली व तींतून दरवाजावरील शिलालेख पाहूं लागले. आम्हीं जातांना तो लेख पाहिला होता व त्यावर परशियन अक्षरें आहेत असें स्पष्ट दिसत होतें. पण थोडा वेळ दुर्बिणीनें पाहून ते गृहस्थ आम्हांला विचारूं लागले "तुम्हांला या लेखांत 'वंदे मातरं' हीं अक्षरें दिसत नाहींत? मला तर तीं स्पष्ट दिसतात."

आपल्या काळीं कवन झालेल्या बंकिमचंद्राच्या 'वंदे मातरं' या पद्यांतील अक्षरें परळीच्या शिलापटावर या गृहस्थांना दिसतात हें पाहून त्यांच्या सुलभश्रद्ध स्वभावाबद्दल मला कींव आली व **डिकिन्सच्या 'पिकविक पेपर्स'**मधल्या एका प्रसंगाची आठवण झाली.

दुसऱ्या खेपेस आम्हीं परळीचा किल्ला पाहिला, त्या वेळीं आम्हीं परळीगांवाकडून गेलों. इकडून रस्ता थोडा बिकट आहे हें वर सांगितलेंच आहे. परळी हें गांव रामदासाच्या वंशजांना इनाम आहे. येथेंही एक राममंदिर आहे. त्यांत विशेष पाहाण्यासारखें कांहीं नाहीं, पण येथें दोन हेमाडपंती जुनीं देवळें आहेत त्यांचें काम मात्र पाहण्यासारखें आहे. त्यांपैकीं एक देऊळ मोडलें आहे. दोन्हींही देवळें महादेवाचीं आहेत. त्यांना तेथले लोक विरूपाक्षाचें देऊळ म्हणतात. दुसरें देऊळ चांगलें शाबूत आहे. हीं देवळें पूर्वाभिमुख आहेत. देवळाला गाभारा व सभामंडप आहे. सभामंडप चोवीस फूट औरस चौरस आहे व खांबांच्या चार चार ओळी आहेत. खांबांचें नक्षीकाम अप्रतिम आहे. या खांबांनीं जे लहान लहान चौक पडले आहेत त्यांवर कोपऱ्या कोपऱ्यानें चार पाटथरे टाकून त्याची तक्तपोशी केली आहे. मंडपाच्या मुख्य दरवाजावरही पुष्कळच नक्षी आहे.

मंडपाला लागून थोडीशी चिंचोळी जागा असून त्याचे पुढें देवाचा गाभारा आहे. गाभाऱ्याचा दरवाजा चांगल्या कोरलेल्या दगडाचा आहे. देवळासमोर एक दीपमाळ आहे. ती मोठमोठ्या अखंड दगडांची केलेली आहे. या देवळांचें काम खरोखरी आश्चर्य करण्यासारखें आहे. मला हीं देवळें पाहून ग्वालेरच्या किल्ल्यांतील सारूबाहु नांवाच्या देवळाची आठवण झाली. ग्वालेरच्या किल्ल्यांतील देवळें याहून मोठीं आहेत व तीं या देवळांपेक्षां जास्त चांगल्या स्थितींत आहेत. पण हीं देवळें हेमाडपंती पद्धतीचे उत्तम मासले आहेत यांत कांहीं एक शंका नाहीं. पण या देवळांत एक गोम आहे ती अजून सांगावयाची आहे. गोम मात्र पठाडी आहे. यामुळें इतकीं सुंदर देवळें अदर्शनीय झालीं आहेत. या देवळांतील उत्तम नक्षीच्या कामाबरोबर या ठिकाणीं अश्लील व बीभत्स अशीं पुष्कळ चित्रें आहेत व हीं चित्रें पुढच्या दरवाजाच्या बाजूस जे मोठमोठे एकसंधी दगड बसविलेले आहेत त्यांवर आहेत. तसेंच गाभाऱ्याच्या दरवाजावरही आहेत. इतक्या सुंदर नक्षीच्या महादेवाच्या देवळांत अशीं चित्रें कोठून आलीं असा प्रश्न आमच्या मनांत उभा राहिला. मी आजपर्यंत बुद्धकालीन व तदनंतरच्या दगडी इमारती व देवळें पाहिलीं, पण अशा प्रकारचीं बीभत्स व अश्लील चित्रें पाहिलीं नव्हतीं. फार झालें तर वस्त्रहीन अशा मूर्ति व चित्रें पाहण्यांत आलीं होतीं, पण या देवळावरील चित्रें फारच किळसवाणीं यांत शंका नाहीं.

या बाबतींत पुराणसंशोधनांत ज्यांचीं बरींच वर्षें गेलीं आहेत अशा रा. **देवदत्तराव भांडारकर** यांना विचारतां असें समजलें कीं, हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं भागांतील देवळांत अशीं बीभत्स चित्रें आहेत खरीं. अर्थात् हीं असलीं चित्रें फार क्वचित् सांपडतात, पण हिंदुस्थानांत शाक्तपंथासारखे जे वाममार्ग होते, त्या वाममार्गी लोकांच्या काळच्या त्यांच्या देवळांवर अशीं चित्रें असतात असें दिसतें, असें रा. भांडारकरांचें मत आहे. पूर्वकाळीं या वाममार्गाचा गुप्तपणें बराच प्रसार असावा असें या चित्रांवरून दिसतें.

येथपर्यंत सद्यःस्थितीचें वर्णन झालें. आतां थोडेसें सिंहावलोकन करूं या.

परळी गांवांतील या जुन्या देवळांवरून व परळीच्या किल्ल्याच्या तटबंदीवरून हा किल्ला मोंगलांच्या पूर्वींचा असावा असें दिसतें. पण हा किल्ला कोणीं बांधला व केव्हां बांधला हें कळण्यास सध्यां साधन नाहीं. किल्ल्यावर व देवळांत असलेल्या शिलालेखांचा जर कोणी अर्थ लावला तर जास्त माहिती मिळण्याचा संभव आहे. सातारा ग्याझीटीयर तयार करतांना हे लेख लावण्याचा कां प्रयत्न झाला नाहीं हें समजत नाहीं; पण या परळीच्या किल्ल्यांतील शिलालेखांच्या उदाहरणावरून ग्याझीटीयरची माहिती केव्हां केव्हां किती अपुरी असते हें दिसून येतें.

पण येवढी गोष्ट खास दिसते कीं, सातारचा किल्ला व परळीचा किल्ला हे या प्रांतांचे जयविजय असल्यामुळें जोडकिल्ल्यासारखे आहेत व म्हणून बहुधा ते एकाच काळीं बांधलेले असावेत व ते कदाचित् बाहामनी राज्याच्या आधींच्या हिंदुराजाच्या वेळचे असतील किंवा ब्राह्मणी राज्यांत बांधलेले किंवा दुरुस्त केलेले असतील. इतकें निःसंशय आहे कीं, या किल्ल्यांचा उल्लेख चवथा बहामनी राजा महमदशहा ( १३५८ ते १३७५ ) याच्या कारकीर्दींत येतो.

पुढें बहामनी राज्याचे तुकडे तुकडे झाल्यावर सातारा प्रांत व हे किल्ले विजापुरराजांच्या ताब्यांत आले व ते मराठेशाहीपर्यंत त्यांच्या ताब्यांत होते. १६७३मध्यें शिवाजी महाराजानीं प्रथमतः परळीचा किल्ला सर केला; नंतर सातारच्या किल्ल्याला वेढा देऊन तोही किल्ला सर केला.

परळीचा किल्ला सर केल्यावर लागलीच महाराजांनीं हा किल्ला आपले गुरु रामदास यांस राहावयास दिला असावा. शिवाजीच्या मरणानंतर औरंगझेबानें मराठ्यांचें राज्य काबीज करण्याकरितां भगीरथ प्रयत्न

केले त्यामध्यें १७०० सालीं त्यानें हे किल्ले काबीज केले व त्यांना अझीमतारा व नौरसतारा अशीं नवीं नांवें ठेविलीं; परंतु औरंगझेबाच्या दुसऱ्या नांवाप्रमाणें तीं त्याच्या पश्चात् लुप्तप्राय झालीं. शाहु महाराज महाराष्ट्रांत परत आल्यावर हे दोन्ही किल्ले परत मराठ्यांच्या ताब्यांत आले व मराठेशाहीचा शेवट होईपर्यंत ते त्यांच्या ताब्यांत होते. १८१८ मध्यें हे दोन्ही किल्ले इंग्रजांच्या ताब्यांत आले.

१६७३ मध्यें शिवाजीमहाराजानीं हा किल्ला सर केल्यावर तो सातारा किल्ल्याच्या शेजारीं आहे असें जाणून आपले गुरु रामदासस्वामी यांस रहावयास दिला व १६७३ पासून १६८१ पर्यंत म्हणजे आपल्या आयुष्याचीं शेवटचीं आठ वर्षें स्वामींनीं परळीच्या किल्ल्यावर काढलीं तेव्हांपासून त्याला सज्जनगड असें नांव पडलें. शिवाजीच्या पश्चात् संभाजीला रामदासांनीं एका प्रसिद्ध पत्रानें जो उपदेश केला तें परळीस लिहिलें व तेथूनच रवाना झालें. या सुंदर पत्रांतील उपदेश सद्यःस्थितीलाही लागू आहे. म्हणून त्याचें अवतरण येथें देतों.

"॥ श्री ॥ अखंड सावधान असावें । दुश्चित्त कदापी नसावें ।
तजवीज करीत बसावें । एकांत स्थळीं ॥ १ ॥

कांहीं उग्र स्थिती सोडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी । अन्तर्यामीं ॥ २ ॥

मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावें । कामाकडे ॥ ३ ॥

पाटांतील तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तैसे जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥

जनाचा प्रवाहो चालला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।
जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥

श्रेष्ठीं जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसलें ।
तर मग जाणावें फावलें । गनीमासीं ॥ ६ ॥

ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसऱ्याचा जय।
धीर धरूनी महत्कार्य। समजूना करावें॥ ७॥

आधींच पडली धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ति।
या कारणें समस्ती। बुद्धि शोधावी॥ ८॥

राजी राखितां जग। मग कार्यभागाची लगबग।
ऐसें जाणोनी सांग। समाधान करावें॥ ९॥

सकल लोक एक करावे। गनिम लोटोनि काढावे।
ऐणें करितां कीर्ति धावे। दिगंतरीं॥ १०॥

आधीं गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळ धाके।
ऐसें न होतां धक्के। राज्यास होती॥ ११॥

समय प्रसंग ओळखावा। राग निपटून सांडावा।
आला तरी कळों न द्यावा। जनांमध्यें॥ १२॥

राज्यामध्यें सकल लोक। सलगी देऊनि करावे साक।
लोकांचे मनामध्यें धाक। उपजोंचि नये॥ १३॥

बहुत लोक मेळवावे। एक विचारें भरावे।
कष्ट करोनी घसरावें। म्लेंच्छांवरी॥ १४॥

आहे तितकें जतन करावें। पुढें आणीक मेळवावें।
महाराष्ट्रराज्यचि करावें। जिकडे तिकडे॥ १५॥

लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणें॥ १६॥

शिवराजास आठवावें। जीवित तृणसमान मानावें।
इहलोकीं परलोकीं तरावें। कीर्तीरूपें॥ १७॥

शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा साक्षेप ।
शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळीं १८ ।


शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाचें कैसें चालणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसी असे ॥ १९ ॥

सकळ सुखाचा त्याग । करोनी साधिजे तो योग ।
राज्य साधण्याची लगबग । कैसी केली ॥ २० ॥


याहुनि करावें विशेष । तरिच म्हणावें पुरुष ।
या उपरि आतां विशेष । काय ल्याहावें ॥ २१ ॥

सातारा शहर व सातारा किल्ला हीं दोन स्थळें जुळया भावंडासारखीं आहेत. यामुळें आधीं कोणतें झालें हें ठरविणें कठीण आहे. **सातारा** नांवाच्या संभवनीय किंवा सयुक्तिकप्राय व्युत्पत्तीवरून किल्ला आधींचा ठरतो. किल्ल्याला **सतरा** तट होते म्हणून किंवा किल्ल्यावर सप्तर्षींचें देऊळ होतें म्हणून शहराला **सातारा** नांव पडलें असें म्हणतात. भाषाशास्त्रदृष्ट्या ही व्युत्पत्ति कितपत सयुक्तिक किंवा शास्त्रसंमत होईल हें सांगतां येत नाहीं. किल्ला आधींचा असो कीं शहर आधींचें असो पण सध्याचें किल्ल्याचें नांव शहरावरून पडल्याप्रमाणें आहे. पण वस्तुस्थिति मात्र असें दर्शविते कीं, शहर किल्ल्याच्या निदान किल्ल्याच्या डोंगराच्या आश्रयानें व छत्राखालीं म्हणून वसलें असावें व या दृष्टीनें **सातारचा किल्ला** या नांवापेक्षां **किल्ल्याचा सातारा** हें नांव जास्त अन्वर्थक होईल असें वाटतें. कारण सातारा किल्ल्याच्या डोंगराची ओळ सातारा शहराच्या उत्तरेखेरीज सर्व दिशांची जणूं कांहीं तटबंदी करते.

ज्या पर्वतराजीवरील एका उंच भागावर सातारचा किल्ला बांधला आहे ती रांग सह्याद्री पर्वताच्या सर्वांत उंच अशा महाबळेश्वर पठारापासून साधारणतः पश्चिम पूर्वदिशेनें निघून सातारा गांवच्या पूर्वेस दोनअडीच मैलपर्यंत येऊन संपते. यामुळें सातारा किल्ल्यापासून पठारा-



नं. ७ ] सातारच्या किल्ल्याचें प्रवेशद्वार [ पान ९६



नं. ८ ] सातारचा किल्ला : शहराकडून देखावा. [ पान १७

पठारानें महाबळेश्वरापर्यंत पायवाटेनें जातां येतें. ही डोंगराची ओळ सातारा गांवाच्या ठिकाणीं नाल्यासारखी किंचित् लंबवर्तुळाकार झाली आहे; वं मागें सांगितल्याप्रमाणें या ओळीच्या पश्चिम टोंकाला **यवतेश्वराचा** पठार आहे, वर पूर्व टोंकाकडे साताऱ्चा किल्ला बांधला आहे. लंबवर्तुळाच्या मधोमध सर्वांत सखल भाग आहे व त्या खालून सध्यां लहानसा बोगदा करून सातारा-बेळगांव व सातारा-सज्जनगड हे रस्ते केलेल आहेत हें मागें सांगितलें आहे.

साताऱ्चा किल्ला पर्वताच्या पश्चिम-पूर्व पठारावर बांधलेला आहे.त्याचें पश्चिम टोंक फार निमुळतें असून तो पठार पूर्वेकडे रुंदावला आहे म्हणजे किल्ल्याचा आकार अर्वाचीन काळच्या प्रचंड आगबोटी सारखा-सुकाणूकडे रुंदावलेला व नाळेकडे निमुळता आहे. या आकाराच्या बाबतींत सातारा किल्ला व शिवनेरी किल्ला यांमध्यें विलक्षण साम्य आहे. याच शिवनेरीचें निमुळतें नाळेचें टोंक उत्तराभिमुख आहे; तर साताऱ्च्या किल्ल्याचें तसलें टोंक पश्चिमाभिमुख आहे. बाकी साताऱ्च्या किल्ल्याचा हा आगबोटवजा आकार सातारा शहराकडून मुळींच दिसत नाहीं. कारण किल्ल्याची लांबच लांब बाजू व त्याचा तो काळा भोर भिंतीसारखा तीसचाळीस फूट उंचीचा तुटलेला अगर तोडलेला खडक व त्यावरील दहाबारा फुटांचा बांधलेला तटही मात्र दृष्टीस पडतो. खालून हा किल्ला थेट ग्वालेरच्या किल्ल्यासारखा दिसतो. दोन्हीही किल्ल्यांची दुर्भेद्यता सारखीच आश्चर्यकारक आहे; पण अर्वाचीन काळीं दोन्ही किल्ल्यांवर जाण्यास सडका केलेल्या आहेत. मात्र ग्वालेरच्या किल्ल्यांची सडक मोटार जाण्यासारखी सुलभ चढाची व राजरस्त्यासारखी सुंदर आहे, तर सातारा किल्ल्याची सडक जास्त चढावाची व लोकलफंडी सडकेसारखी भिकार आहे. ही सडक किल्ल्याच्या डोंगराच्या पूर्वेकडील टोंकाला वळसा घालून मग सातारा शहराच्या **माचीच्या** वरच्या बाजूनें चढत जाऊन किल्ल्याच्या पश्चिम टोंकाच्या बुरुजाच्या अलीकडे अस-

लेल्या प्रवेशद्वाराशीं येऊन पोंहोचली आहे. पण या सडकेनें किल्ल्याचा पल्ला बऱ्याच लांबीचा पडतो. किल्ल्याला जाण्याची नेहेमींची पायवाट माचीच्या जरा वर असलेल्या मारुतीच्या देवळावरून जाते. माचींपासून देवळापर्यंत ओबडधोबड दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत.

आम्हीं या पायवाटेनें किल्ला पहाण्यास गेलों. मारुतीच्यासमोर थोडी खुली व सपाट जागा असून त्याचेपुढें मोठा थोरला एकसंधी खडक (Boulder) आहे. येथें क्षणभर उभें राहिलें म्हणजे खालच्या सातारा शहराचा मोठा मनोवेधक देखावा दिसतो. शहराचे एकाखालीं एक असे तीन पश्चिमपूर्व रस्ते आहेत व त्या रस्त्यांना काटकोन करून जाणारे दक्षिणोत्तर असे कितीतरी रस्ते गेलेले आहेत असें दिसून येतें व शहरांत हिरवी हिरवी दाट झाडी व पांढऱ्या शुभ्र पत्र्याचीं घरांचीं व वाड्याचीं छपरेंच छपरें दृष्टीस पडून मोठी मौज वाटते. मारुतीचें देऊळ टाकून जरा वर चढल्यावर पूर्व टोकाकडून येणारी सडक लागली व मग त्या सडकेनें सरळ किल्ल्याच्या मुख्य दरवाजाशीं आम्हीं येऊन पोंहोचलों. येथून **वेण्या-कृष्णा** नद्यांच्या खोऱ्याचा सबंद देखावा दृग्गोचर झाला व सातारा राजधानी या प्रांताची चारी बाजून डोंगरांनीं कशी तटबंदी केलेली आहे हें चांगलें समज़ून आलें.

किल्ल्याचा पहिला मुख्य दरवाजा अझून अगदीं शाबूद आहे. दोन बाजूंचे ते मजबूत बुरूज मध्यें मोठा थोरला भव्य दगडी कमानींत बसविलेला लांकडी दरवाजा; कमानीच्या मध्यावर खोदलेली ती गणपतीची मूर्ति, बाजूच्या भागांत खोदलेलीं, तीं हत्तींचीं व इतर जनावराचीं हुबेहुब चित्रें, हा सर्व देखावा राजधानीच्या किल्ल्याला शोभेसा आहे यांत शंका नाहीं. दरवाज्यांतून आंत गेलें कीं डाव्या हाताला पाहारेकऱ्यांना बसण्याकरितां ओऱ्या बांधलेल्या आहत. दगडी पायऱ्यांनीं जरासें चढल्याबरोबर किल्ल्याचा दुसरा दरवाजा लागला. हा साध्या बांधणीचा असून पहिल्या दरवाजाइतका मोठा नाहीं. या दरवाज्यांतून

थोड्याशा पायऱ्या चढून वर गेलों तोंच किल्ल्याचा पठार लागला. या किल्ल्यावर रायगड, पुरंदर वगैरे किल्ल्यांप्रमाणें बाले किल्ल्यासारखा उंचवट्याचा भाग मुळींच नाहीं. सर्व पठार साधारण सारख्याच उंचीवर आहे. पश्चिमेकडे अगदीं निमुळतें टोंक असून मग पूर्वेकडे पठार रुंदावत गेलेला दिसला. थोडेसें पुढें गेल्यावर किल्ल्यावरील राजवाड्याची इमारत लागली. हा वाडा दुमजली असून लांकडी बांधणीचा दुसोपी वाड्याच्या धाटणीचा आहे. आतां फक्त एक सोपाच काय तो शाबूद आहे. एका सोप्याचें निवळ जोतेंच शिल्लक आहे. वाड्याच्या सोप्यांत पुष्कळ दालनें व खोल्या आहेत. सुरूच्या लाकडी नक्षीकामाच्या खांबांनीं शोभायमान झालेला एक प्रशस्त दिवाणखाना दुसऱ्या मजल्यावर आहे तो प्रमाणशीर असल्यामुळें सुंदर दिसतो. या वाड्यानजीकच एक बुरुजासारखा पडिक भाग आहे त्याचेमध्यें जमिनींत बांधलेला एक मोठा रांजण आहे, हल्लीं दुसऱ्या रांजणावर भिंत पडून तो बुजून गेला आहे. नंतर आम्ही किल्ल्याच्या पूर्व टोंकाला गेलों. त्या टोंकालाच **मंगलाई** नांवाच्या देवीचें छोटेसें देवालय आहे. त्याचा सभामंडप नवाच आहे; मात्र देवळाचा गाभारा जुना आहे. देवीची चतुर्भुज काळया दगडाची मूर्ति आहे. या देवीची पूजाअर्चा अझून साताऱ्याच्या महाराजांच्या मार्फत होते. गुरवाला सालीना ९० रुपये नेमणूक आहे. येथून आम्हीं किल्ल्याच्या दक्षिण अंगानें परतलों. इकडला तट व दगडी कठडा पडला आहे. यामुळें चालत जातांना जरा भीति वाटली. इकडून जातांना **उरमोडी** नदी, सज्जनगड व दक्षिणेकडचा कऱ्हाडपर्यंतचा प्रांत दृग्गोचर होतो. या किल्ल्यावर जागोजाग तलाव केलेले दृष्टीत्पत्तीस येत होते, यावरून पूर्वकाळीं पुष्कळ माणसें किल्ल्यावर राहण्यासारखी सोय केलेली होती असें दिसलें. अशा एका तलावाच्या कांठावर एक पडकें महादेवाचें देवालय दिसलें. गाभाऱ्यांतील शंकराची पिंडी चांगली शाबूद आहे. पण पुढच्या नंदीची मूर्ति मात्र

दुभंगलेली व मोडलेली दिसली. या देवळाला सप्तर्षींचें देऊळ म्हणतात व या देवळावरून सातारा हें नांव पडलें असें आम्हांला सांगण्यांत आलें तें कितपत खरें खोटें आहे हें ठरवितां येत नाहीं. झालें. किल्ल्यावर सध्यां प्रेक्षणीय अशा एवढ्याच गोष्टी आहेत. हा किल्ला पहाण्यास अर्धा पाऊण तासापेक्षां जास्त वेळ लागत नाहीं. इतका हा किल्ला लहान आहे. उतरतांना तर हल्लीं एकदां दरवाज्याबाहेर आलें म्हणजे कोठूनही गांवांत येतां येतें. हव्या तितक्या पाऊलवाटा आतां झाल्या आहेत. त्या घसरड्या व उभ्या चढाच्या असल्यामुळें उतरतांना तोल संभाळून उतरावें लागतें इतकेंच. बाकी पंधरा वीस मिनिटांत मनुष्य माचीच्या किल्ल्याच्या रस्त्यावर येतो. झालें. या किल्ल्याच्या सद्यःस्थितीचें वर्णन संपलें. त्याची ऐतिहासिक उपलब्ध माहिती खालीलप्रमाणें आहे.

हा किल्ला कोल्हापुरानजीकच्या पन्हाळा किल्ल्याच्या **शिलाहार** राजघराण्यांतील दुसऱ्या **भोज** राजानें (सन ११७८ ते ११९३) बांधला अशी दंतकथा आहे. पण मुसलमानी बाहमनी साम्राज्यस्थापनेनंतर हा किल्ला मुसलमानी अंमलाखालीं आला. विजापुरच्या बादशहांच्या सर्व कारकिर्दींत हा किल्ला चांगल्या बंदोबस्तांत ठेवलेला असे व या किल्ल्यांत मोठमोठे राजबंदी ठेवीत असत. उ. प्रख्यात चांदबिबीला या किल्ल्यावर बंदिवासांत ठेविलें होतें. तसेंच विजापुरचा प्रख्यात सरदार व वकील **दिलावरखान** हा या किल्ल्यांत बंदीवासांत असतांना येथें वारला. शिवाजीनें परळीचा व साताराचा किल्ला असे दोन्ही किल्ले एकामागून एक पण सन १६७३ या एका वर्षींच घेतले. सातारा किल्ल्याला तर कित्येक महिन्यांचा वेढा देऊन तो शिवाजीस सर करावा लागला. सन १६९९ मध्यें रामचंद्र पंत अमात्य याचे सल्ल्यावरून राजारामानें सातारा ही आपली राजधानी केली. तेव्हांपासूनच तर सातारा किल्ल्याला जास्तच महत्त्व आलें. पण सन १७०० मध्यें औरंगजेबानें एकाएकीं या प्रांतावर स्वारी करून सातारा किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्याचा अधिकारी प्रागजी प्रभु यानें किल्ल्याचें मोठ्या धैर्यानें व

चिकाटीनें पुष्कळ महिनेपर्यंत संरक्षण केलें. पण दाणागोटा सरल्यामुळें शेवटीं प्राग्जी प्रभूला किल्ला औरंगझेबाचे स्वाधीन करावा लागला. औरंगझेबाचा मुलगा अझीमशाह या वेढ्याचे वेळीं हजर होता, म्हणून किल्ल्याला वर उल्लेख केल्याप्रमाणें **अझीमतारा** असें नवें नांव देण्यांत आलें. पण सन १७०६ मध्यें सातारच्या पंतप्रतिनिधींनीं सातारा किल्ला मोंगलांकडून परत घेतला. लवकरच शाहूमहाराज राज्यावर आले व तेव्हांपासून मराठी राज्याचा विस्तारच होत गेला. पेशवाईमध्यें साताऱ्याचें महत्त्व कमी होऊन **पुणें** शहर मराठी साम्राज्याचें केन्द्र बनलें. अर्थात् पेशवाईच्या अंताबरोबर म्हणजे सन १८१८ मध्यें सातारचा किल्ला जनरल स्मिथनें काबीज केला व त्यावर ब्रिटिश निशाण लावलें. पण एल्फिनस्टनच्या कराराप्रमाणें शिवाजीच्या वंशांतील प्रतापसिंह महाराजांना सातारच्या छोट्या गादीवर बसविण्यांत आलें व किल्ल्यावर पुनः भगवा झेंडा फडकूं लागला. पण सातारची गादी सन १८४८ मध्यें खालसा झाली; तेव्हांपासून सातारा किल्ल्यावर पुनः ब्रिटिश निशाण फडकूं लागलें. याप्रमाणें सातारच्या किल्ल्यानें कितीतरी राज्यपरिवर्तनें पाहिलीं आहेत.

त्या किल्ल्याच्या गतवैभवाचें व सध्यांच्या शोचनीय स्थितीचें वरील सिंहावलोकन कांहींसें उद्वेगकारी आहे, यांत शंका नाहीं. राजकीयदृष्ट्या सातारा किल्ला सज्जनगड व सातारा शहर यांचें महत्त्व कितीही कमी झालें असलें तरी या प्रांताचें निसर्गरमणीयत्व कधींही कमी झालेलें नाहीं. म्हणून माझ्यासारख्या प्रवासप्रिय व निसर्गप्रिय माणसाला साताऱ्याचा प्रवास व निवास सदानंद देणारा होतो, असा माझा अनुभव आहे. अशा प्रकारचे विचारतरंग मनांत येत असतां माझें पायगाडीचें चक्कर संपलें. यानंतर आम्हीं एकच पायगाडीचें चक्कर मारलें. पण तें आमच्या पायगाडीच्या चक्करांचा कळस असल्यामुळें त्याचें शब्दचित्र शेवटल्या प्रकरणांत देणार आहें. त्या आमच्या चिरंस्मरणीय चक्करानंतर माझा पुण्यनिवास संपला व मी दक्षिण महाराष्ट्रांत कायमचा राहण्यास आलों. पुढील तीन प्रकरणांत त्या काळांत पाहिलेल्या स्थळांचें वर्णन करण्याचा बेत आहे.

# चक्कर ६ वें

## कृष्णावारणा—संगमग्राम

नच न परिचितो न चाप्यगम्य-।
श्चकितमुपैमि तथापि पार्श्वमस्य ॥
सलिलनिधिरिव प्रतिक्षणं मे ।
भवति स एव नवो नवोऽयमक्ष्णोः ॥

**भावार्थ**:—तो मला परिचित नाहीं असेंहि नाहीं, किंवा अगम्य आहे असेंहि नाहीं; तरी पण मी त्याच्याजवळ ( आश्चर्य- ) चकित होऊन जातों. तो जरी आहे तसाच असला, तरी माझ्या डोळ्याला मात्र तो समुद्राप्रमाणें नवीन नवीन भासतो.

ज्या निसर्गरमणीय स्थळाचें मी या चक्करांत वर्णन करणार आहें तें मी केव्हां पायीं तर केव्हां पायगाडीनें, केव्हां टांग्यानें तर केव्हां मोटारीनें जाऊन किती तरी वेळां पाहिलेलें आहे. प्रत्येक वेळीं अवतरणांतील श्लोकांत वर्णिलेल्याप्रमाणें माझ्या मनाची हुबेहूब स्थिति झालेली आहे. हें वर्णन वाचतांना वाचकांना सुद्धां माझ्यासारखाच अनुभव येईल; कारण न कळत पण नांवांतरानें हें स्थळ सर्वतोमुखी झालेलें आहे. कां कीं, महाराष्ट्रांतील एका प्रख्यात नाटककारानें आपल्या एका लोकप्रिय नाटकाचा सर्व प्रसंगच या निसर्गरमणीय ठिकाणीं घडवून आणिलेला आहे. यामुळें या ठिकाणचें प्रत्येक प्रेक्षणीय स्थळ वाचकांना परिचयाचें वाटेल. शिवाय तें ठिकाण त्या नाटककाराचें

जन्मस्थान असल्यामुळें सर्व मराठी जाणणारांना या ठिकाणाबद्दल आपुलकीची भावना वाटेल. अर्थात् या माझ्या चक्कर वर्णन विषयाचें स्थळ म्हणजे कै. देवलांचें व त्यांच्या शारदा नाटकाचें जन्मग्राम **हरिपुर** ह होय. तेव्हां हें **लहान मूर्ति पण मोठी कीर्ति** या कोटी-पैकीं एक ठिकाण आहे यांत शंका नाहीं.

मिरजमळा संस्थानच्या अंमलाखालील हा गांव सांगली शहराच्या नैऋत्येस सुमारें दोन अडीच मैलांचे अंतरावर कृष्णा व वारणा या नद्यांचे संगमावर वसलेला आहे. **सांगली-कोल्हापुर**-रस्त्यानें सांगली गांवाबाहेर आल्याबरोबर उजवीकडे **हरिपुर**चा रस्ता फुटतो. लवकरच कृष्णेला मिळणाऱ्या ओढ्यावर एक छोटा पूल लागतो. हा ओढा पुष्कळ खोल आहे. ओढा टाकला कीं उजव्या बाजूस नदीचे कांठावर एका उंचवट्याच्या ठिकाणीं एक छोटेसें दगडी देऊळ आहे. येथें कृष्णा नदी एकदम काटकोन करून वळण घेते. यामुळें सांगली, सांगलवाडी व कृष्णेवरील पांढऱ्या पिवळसर दगडांचा सुंदर पूल हीं एकसमयावच्छेदेंकरून दिसतात व हा सर्व देखावा फारच आकर्षक वाटतो. येथून जरा पुढें गेलें कीं सांगली संस्थानची हद्द संपून मिरजमळा संस्थानची हद्द लागते,व लगेच उजव्या हाताला भलें मोठें चिंचबन लागतें. शिवाय रस्त्याच्या दुतर्फा चिंचेचे वृक्ष लावलेले दिसतात. चिंचबन हें खरोखरीच आश्चर्य करण्यासारखें आहे. येवढें मोठें चिंचेचें बन फार क्वचित् दृष्टीस पडतें. या चिंचबनांतून जातांना जिकडेतिकडे हिरवा हिरवागार असा देखावा दिसतो. कारण या चिंचबनाला लागून कृष्णा नदी गेलेली आहे. शिवाय येथें कृष्णेला एक ओहोळ पडल्यामुळें व डावीकडून एक छोटासा आहोळ आल्यामुळें येथें डाव्या हातास एक छोटेसें लांबट बेट बनलें आहे. चिंचेच्या मोठमोठ्या व हारीनें लावलेल्या वृक्षांची दाट छाया सदासर्वदा पडलेली असते. यामुळें येथल्या माळ जमिनीवर सदा हिरवळ गवत दिसून येतें. उष्ण

प्रदेशांत सदा हिरवळीचा देखावा क्वचित् दृष्टीस पडतो. या हिरवळ जमिनीवरून जातांना फार मौज वाटते. या चिंचबनांतील दुतर्फा लावलेल्या वृक्षांच्यामधील प्रशस्त वाट एखाद्या सुधारलेल्या सुंदर शहरांतील गर्द छायावृक्षांनीं अलंकृत अशा सुंदर रस्त्याप्रमाणें दिसते, हें सोबतच्या छायाचित्रावरून दिसून येईल. हें बन संपतें तोंच एक छोटेंसें गणपतीचें देऊळ लागतें. देवळासमोर पडवीसारखा कौलारू छपराचा एक सोपा काढलेला आहे. पण त्यानें देवळाची शोभा कमी केली आहे असें मला वाटलें. उजव्या हाताला एक छोटीशी समाधी बांधलेली आहे. येथून नदीच्या बेटाचा व मागें वळून पाहिलें म्हणजे चिंचबनाचा मोठा मनोहर देखावा दृष्टीस पडून मनाला फार आनंद होतो. हरिपुर गांवचें हें पूर्वचिन्ह फार आकर्षक आहे यांत शंका नाहीं. हें चिंचबन कोणीं तयार केलें याची चवकशी करतां असें कळलें कीं, पुण्यानजिकच्या चिंचवड गांवच्या मोरया ( गणपति ) देवाचा कोणी भक्त हरिपुरास आला व त्यानें हें गणपतीचें स्थान पाहून येथेंच **चिंचवड** बनविण्याच्या इराद्यानें त्यानें या माळावर चिंचेचीं व वडाचीं खूप झाडें लावलीं. त्यांपैकीं वडाचीं झाडें मागाहून तोडण्यांत आलीं. आतां एखाद दुसरें वडाचें झाड येथें आहे. पण चिंचबन मात्र कायम राखण्यांत आलें आहे. पण हल्लीं कांहीं कांहीं चिंचेचीं झाडें मरून या बनांत मध्यें मध्यें उघडीं खिंडारें पडूं लागलीं आहेत. तेव्हां श्रीमंत बाबासाहेबांना माझी विनंति आहे कीं, त्यांनीं नवीं चिंचेचीं झाडें लावून हीं खिंडारें भरून काढावीं. कारण हें चिंचबन म्हणजे हरिपुर गांवचाच नव्हे तर त्याच्या सर्व मुलुखाचा एक अपूर्व व आनंददायक अलंकार आहे.

हे देऊळ टाकून गर्दछाय रस्त्यानें जरासें पुढें गेलें म्हणजे हरिपुर गांवचें उंच कुसूं लागतें. कारण पूर्वकाळीं या गांवासभोंवार भिंतीचा तट होता. आतां तो बहुतेक पडला आहे. या कुसवांतून समोर गेलें कीं



नं. ९ ] हरिपुरः चिंचवनांतील राई. [ पान १०४



नं. १० ] हरिपुरः चिंचवनांतील गणपतीचें देऊळ. [ पान १०४



नं. ११ ] हरिपुर कृष्णेवरील घाट. [ पान १०५



नं. १२ ] कृष्णा-वारणा संगम-स्थळ. [ पान १०५


लवकरच पश्चिमेकडील कुसूं लागतें; व लगेच कृष्णा-वारणा नद्यांचीं पात्रें व त्यांचा संगम दृष्टीस पडतात. कुसुवाबाहेर हल्लीं वस्ती झाली आहे. संगमेश्वराचें पुरातन देऊळ डाव्या हातास कुसुंवाबाहेरच आहे. आम्ही प्रथमतः दोन्ही बाजूंला बुरुजांनीं अलंकृत केलेल्या सुंदर दगडी प्रशस्त पायऱ्यांच्या घाटावर गेलों. घाटाचे प्रारंभींच्या फरशीच्या पटांगणांमध्यें छोटेसें पण सुबक बांधणीचें कृष्णाबाईचें देवालय आहे. पूर्वीं घाट बराच खोल असून कृष्णेचा प्रवाह अगदीं घाटाला लागून वहात असे असें आम्हांला सांगण्यांत आलें. सध्यां या बाजूला मळीव वाळू सांचत चालली असल्यामुळें घाटाच्या पायऱ्यांच्या बऱ्याच रांगा मातींत वाळूंत गडदून गेल्या आहेत. घाटाचे बाजूस आतां बारिक वाळूचें लांबच लांब वाळवंट बनलें आहे. सध्यां तें समुद्रकांठच्या मऊ व बारिक वाळूच्या वाळवंटाप्रमाणें ( beech ) दिसतें. या वाळूवर आम्हीं क्षणभर विश्रांति घेतली. ही वाळू इतकी स्वच्छ, मऊ व गुळगुळीत आहे कीं वाळूवर बसण्यास संकोच वाटत नाहीं व मऊ मखमलीच्या रुजाम्यावर बसल्याप्रमाणें भास होतो, हल्लीं नदीचा प्रवाह पलीकडच्या दरेला खेटून गेलेला आहे. आम्ही होडींतून नदीचे पलीकडे जाऊन व वारणा नदीच्या प्रवाहांत थोडेसें फिरून मग कृष्णा व वारणा जेथें मिळतात तेथल्या तिकोरी उंच जमिनीच्या टोंकावर उतरलों. येथें कृष्णा नदी उत्तर-दक्षिण-दिशेनें वहात आहे म्हणजे सांगलीस ज्याप्रमाणें ती उत्तर-दक्षिण-वाहिनी आहे त्याप्रमाणेंच येथें आहे. पण या दोन अडीच मैलांतच कृष्णानदीनें मोठें थोरलें पूर्व-पश्चिम वांकण करून मग पुनः हरिपुरच्यानजीक ती नदी उत्तर-दक्षिण वाहिनी झाली आहे व तिला वारणा पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात येऊन या ठिकाणीं कृष्णा-वारणांचा सुंदर संगम झाला आहे. या संगमामुळें व पूर्वकाळीं अगदीं संगमावर असलेल्या पुरातन संगमेश्वराच्या देवळामुळें हरिपुर हें एक यात्रास्थान बनलें. संगमाचे ठिकाणीं झालेला चिंचोळ्या व उंच जमिनीच्या टोंकावर आम्ही किती

तरी वेळ उभे होतों. येथून चारी दिशांचा हिरवा हिरवागार देखावा दिसतो व तो सुंदर देखावा सारखा पहात बसावें असें वाटतें. येथला देखावा कांहींसा कृष्णा-पंचगंगा-संगमावरील नरसोबाच्या वाडीसारखा आहे. नरसोबाच्या वाडीस ज्याप्रमाणें पंचगंगेचें पात्र अरुंद पण खोल दिसतें, वर कृष्णेचें पात्र रुंदच रुंद व म्हणून उथळ दिसतें, त्याप्रमाणेंच येथें वारणेचें पात्र फार अरुंद पण खोल आहे, तर कृष्णेचें पात्र रुंद पण उथळ आहे. नंतर आम्ही होडींतून परत अलिकडच्या वाळवंटावर आलों व मग वाळवंटांतून बरेंच दूर चालत गेलों. कृष्णेच्या दोन्ही तीरांला मळीच्या सुपीक जमिनी असल्यामुळें दोन्ही बाजूंस हिरवीं हिरवींगार नानातऱ्हेचीं पिकेंच पिकें दृष्टीस पडून कृष्णाकांठच्या सुपीकतेचा प्रत्यय येतो.

नंतर आम्ही घाटावर येऊन मग उजव्या हाताकडेस असलेल्या संगमेश्वराच देवळांत गेलों. या देवळाचा गाभारा व त्यावरील कंगोऱ्या-कंगोऱ्याचें निमुळतें शिखर येवढाच जुना भाग शिल्लक राहिला आहे. बाकी पुढचा सभामंडप, त्याला लागून असलेली बाजूची दुमजली इमारत या दुरुस्त करून नव्यासारख्याच केलेल्या आहेत. देवळाचे सभोंवार फरशी आहे. व भिंतींमध्यें मोऱ्या काढलेल्या आहेत. हें शंकराचें देऊळ पूर्वाभिमुख आहे. पूर्वेच्या बाजूस बऱ्याच पायऱ्या असून नंतर मोठें प्रवेशद्वार आहे व तेथें तटवजा भिंत बांधली आहे. ती बाहेरून किल्ल्याच्या तटासारखीच भासते. संगमेश्वराच्या देवालयाची बांधणी कोल्हापुरांतील अंबाबाईच्या देवालयाच्या बांधणीच्या पद्धतीचीच आहे. अर्थात् हें संगमेश्वराचें देऊळ लहान आहे व त्यावर फार नक्षी व खोदकाम केलेलें नाहीं. तरी पण देऊळ एकंदरींत मनावर फार अनुकूल परिणाम करतें यांत शंका नाहीं. हें संगमेश्वराचें देऊळ, त्याच्या शेजारचा तो प्रशस्त घाट, त्याच्यां कडेनें वहाणारा तो कृष्णा-वारणेचा संगत प्रवाह हा एक अपूर्व त्रिवेणी संगम वाटतो यांत शका नाहीं. या निसर्गरमणीय स्थळानें कै. देवलांची प्रतिभा



नं. १३ ] हरिपुर कृष्णाबाईचें देऊळ. [ पान १०६



नं. १४ ] हरिपुरः संगमेश्वराचें देऊळ. [ पान ७०७.

प्रज्वलित करावी व त्या प्रतिभेच्या स्फूर्तीनें रा. देवलांनीं आपल्या कृष्णातटवासी गांवाला व तेथल्या **संगमनाथाच्या** देवळाला खालील भक्तिकरुणरसप्रधान पदानें अजरामरत्व द्यावें हें साहजिक आहे.

" जय कृष्णातटवासा ॥ निजजनभयविध्वंसा ॥
करितें मी नवस असा ॥ ध्रु० ॥
भुलुनी मनिं द्रव्याला ॥ मज द्यावें जरठाला ॥
कुमति अशी जनकाला ॥ नच झाली तरि तुजला ॥
लक्षवाति वरसाला ॥ लाविन रे गिरिजेशा ॥ १ ॥

किंवा

"शंभो शिवहर, करुणाकर, हे विश्वेशा, गौरिप्रियकर ॥ ध्रु०
अज्ञानी बलहीन अम्ही ॥
शरणागत तव चरणा धरिं शिरिं
करुणायुतकर । मार्गी आम्हां सर्वपरीं ।
हे शशिमौली, तूं सांभाळी जय कालीश्वर ॥१॥ "

हें आबालवृद्धांच्या तोंडीं असलेलें पद गुणगुणतच आम्ही संगमेश्वराच्या देवळाच्या आवाराबाहेर आलों.

हरिपुर गांवची मांडणी व रचना मोठी मासलेवाईक आहे. मागें उल्लेखिलेला पूर्व पश्चिम जाणारा हा गांवचा मुख्य रस्ता; या रस्त्यावर उजव्या बाजूला एक रामाचें प्रशस्त आवाराचें देऊळ आहे; तर डाव्या हाताला राधाकृष्णाचें देऊळ आहे. पहिलें देऊळ एका खासगी माणसानें बांधलें तर दुसरें देऊळ काव्यविहारी रा. गद्रे यांच्या दूरच्या एका नातेवाईक देवभक्त बाईनें बांधलें. रा. गद्रे यांचें घर या देवळामागें आहे तर छोटिशी बंगलीवजा माडी पुढें रस्त्यावर आहे. दोन्ही देवळांच्या चालू खर्चाकरितां थोडी फार नेमणूक आहे. त्याच मुख्य रस्त्याला पण कुसवाबाहेर डाव्या हातास संगमेश्वराच देऊळ आहे हें मागें सांगितलेंच

आहे. या मुख्य रस्त्याच्या डाव्या उजव्या हाताला दक्षिणोत्तर व नदी-प्रवाहाला समांतर अशा वस्तींच्या आळया वसलेल्या आहेत.

उजव्या हाताकडच्या बाजूस तीन आळया आहेत. यांतील सडका अगदीं सरळ असून पूर्व काळीं मोठमोठे वाडे या आळयांमधून होते. आम्हीं जोशी खाडिलकर लागू पंडित वगैरेनीं या गांवच्या तैनातदार व इनामदार मंडळीचे पूर्वीचे प्रचंड पण सध्यां मोडकळीस आलेले वाडे व त्यांचीं मोठमोठीं आवारें पाहिलीं. तेव्हां मला मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्ताच्या वाड्याची व त्याच्या शुष्क वाटिकेची आठवण झाली. खरोखरीं एके काळीं हें मोठें टुमदार व भरभराटलेलें गांव असावें असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. पहिल्या प्लेगच्या पूर्वी येथें वस्ती दोन हजारांवर होती, पण त्या प्लेगमध्यें गांवांत कहर उडून अर्धीअधिक वस्ती मृत्युमुखीं पडली व तेव्हांपासून गांव मोडकळीस आलें तें कायमचेंच मोडकळलें असें मला सांगण्यांत आलें. नदीकडच्या व दक्षिणोत्तर असलेल्या पहिल्या आळींतील उजव्या बाजूच्या मोडकळीस आलेल्या घरांत कै. गोविंदराव देवल हे राहत असत. पण त्यांचें मूळ घर मुख्य रस्त्याच्या डाव्या हातच्या ओळीला व गांवाच्या दक्षिण टोंकाला डॉ. बापट व रावसाहेब बापट यांचे घरासमोरच होतें व आतां तेथें फक्त घराचा ओटा राहिला आहे अशी माहिती मला देण्यांत आली तेव्हां माझ्या मनांत मिश्र मनोविकार उद्भूत झाले.

एवढें छोटेंसें गांव पाहून होण्यास कितीसा वेळ लागणार ! एका दोन प्रहरीं आमचें गांवचें दृश्य दर्शन संपलें. एकंदर गांव पाहून झाल्यावर मला गोल्डस्मिथच्या **टाकलेला गांव** या प्रख्यात काव्याची आठवण झाली. खरोखरीं पूर्वीचें **गजबजलेलें** हें हरिपुर सध्यां **टाकलेलें** गांव वाटतें यांत शंका नाहीं. कारण हल्लींच्या वाढलेल्या गरजांच्या काळांत या गांवीं उपजीविकेचें साधन राहिलें नाहीं. म्हणून लोकांना गांव सोडून पोटाच्या पाठीमागें लागून इतर ठिकाणीं जावें लागलें.

जे लोक अजून गांवांत राहतात त्यांनासुद्धां दिवसभर नोकरीकरितां किंवा मजुरीकरितां किंवा दुकानदारीकरितां सांगली येथें जावें लागतें असें मला कळलें. बाकी छोट्या गांवाच्या मानानें येथील लोक पुष्कळच शिकलेले असून ते इतर ठिकाणीं स्वतंत्र व्यवसाय तरी करीत आहेत किंवा वरच्या दर्जाच्या नोकरींत तरी आहेत असें समजलें. तेव्हां मला असें वाटलें कीं या सुस्थितींतील मंडळींनीं आपले येथले मोठमोठे वाडे मोडून त्या मालमसाल्यांतून आटोपशीर आरोग्यवर्धक खेडवळ घरें ( Country houses ) बांधलीं व आवार साफसुफ करून तेथें लहानशी फळबाग केली तर किती चांगलें होईल. कारण हरिपुर सांगलीपासून तीनच मैल दूर आहे खरें. पण येथलें हवापाणी सांगलीपेक्षां चांगलें आहे. कारण आधीं गांवाची रचना चांगली आहे. शिवाय वारणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात येत असल्यामुळें नेहमीं पण विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत त्या वारणेच्या खोऱ्यांतून पाण्यावरचा गार वारा नेहमीं वाहत येतो. यामुळें येथें सांगलीपेक्षां पुष्कळ कमी उन्हाळा भासतो. शिवाय मागें सांगितल्याप्रमाणें या गांवच्या आसपास सदा हिरवळ असते व झाडीही पुष्कळ आहे, यामुळें हें ठिकाण थंड आहे.

या गांवची एकंदर स्थिति पाहतां येथें दूधदुभत्याचा कारखाना ( dairy ) मोठ्या प्रमाणावर करतां येण्यासारखा आहे, असें मला वाटलें. कारण या गांवाच्या दोन नद्यांच्या कांठाला सकस हिरवें गवत सतत देणारीं सुपीक अशीं कुरणें पुष्कळ आहेत. तेव्हां गुरांना खायला प्यायला गवत पाणी पुष्कळ आहे. शिवाय इकडे मका, कडबा व कापूसहि पुष्कळ पिकतो यामुळें गुरांना दाणा वैरणीची सुबत्ता आहे. शिवाय सांगली, मिरज, जयसिंगपुर, कऱ्हाड इत्यादि मोठमोठीं गांवें नजीक असल्यामुळें दूधदुभत्याच्या मालाला हवें तितकें गिऱ्हाईक आहे. तेव्हां ज्याप्रमाणें गुजराथेमध्यें दूधदुभत्याचे मोठमोठे कारखाने निघाले आहेत त्याप्रमाणें मोठमोठे कारखाने निघण्याची या गांवीं शक्यता आहे. या

गांवचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब मनांत आणतील तर एखादा अर्वाचीन दूधदुभत्याच्या शास्त्रांतला तज्ज्ञ ( Dairy expert ) मनुष्य नेमून त्याचे सल्ल्यानें असा दूधदुभत्याचा कारखाना यशस्वी रीतीनें चालवितां येईल. असें घडून आल्यास सध्यांचें **टाकलेलें** गांव पुनः **गजबजलेलें** गांव बनेल यांत शंका नाहीं. इतकें या गांवच्या सद्यः व भावि स्थितीचें वर्णन पुरें झालें. आतां त्याची पूर्वपीठिका पाहूं या.

हरिपुर येथील संगमेश्वराचें देऊळ बरेंच जुन्या काळचें असावें असें त्याच्या बांधणीवरून दिसतें. तें केव्हां बांधलें असावें हें सांगतां येत नाहीं. पण हें दोन नद्यांच्या संगमाचें स्थान पवित्र म्हणून गणलें गेलें असून तेथें सांगलीचे आसपासचे लोक यात्रेकरितां जमत असें सांगतात. हा भूमिभाग, सांगली गांवच्या हद्दींत मोडत असे. पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष हरभट यांचेबद्दल पेशव्यांना फार आदरबुद्धि असे म्हणून त्यानीं सन १६६७ मध्यें हा गांव त्यांचे नावानें (हरिपुर म्हणून)वसविला व तेथल्या जमिनी ब्राह्मणांना इनाम करून दिल्या यामुळें येथलीं पुष्कळ ब्राह्मणी घराणीं इनामदार आहेत. यामुळें पूर्वकाळीं या गांवीं वेदशास्त्रपठन केलेले पुष्कळ पुरुष असत व गांवामध्यें पट्टीचे विद्वान् ब्राह्मण बरेच असत असें सांगतात. येथली जमीन फार सुपीक असल्यामुळें येथें जुन्याकाळीं घरोघर मोठमोठीं धान्याचीं पेवें असत. अर्वाचीनकाळीं तीं धान्याचीं पेवें नाहींशीं झालीं खरीं तरी येथल्या जमिनीचा असा विलक्षण गुण सांगतात कीं येथल्या पेवांत हळद ठेवल्यास ती चांगली टिकते इतकेंच नाहीं तर तिला चांगला रंग चढतो व तिचें वजनही वाढतें ! म्हणून हल्लीं या पेवांचा उपयोग सांगलीचे व्यापारी हळद ठेवण्या-करितां करतात. अशी हळद दरसाल वीस पंचवीस हजार पोत्यांपर्यंत येथल्या पेवांत ठेवण्यांत येते. सध्यां मिरजमळा संस्थाननें या पेवावर अल्पशी पट्टी बसविली असून त्याच्या उत्पन्नांतून या गांवचे रस्ते दुरुस्त केले जातात म्हणून एक हजार वस्तीच्या खेडेगांवच्या मानानें येथले रस्ते फारच चांगले वाटतात. पटवर्धन सरदार घराण्यांच्या

वांटण्या होऊन सांगली व मिरज हीं निरनिराळीं संस्थानें झालीं तेव्हां हरिपूर गांव पहिले आप्पासाहेब सांगलीकर यांचे वहिवाटास आलें. त्यांनींच चिंचबनानजीकचें गणपतीचें देऊळ बांधलें असून सुद्धां तें देऊळ व त्याचें आवार सांगली संस्थानचे ताब्यांत आहे. सन १८५९ च्या सुमारास मिरजमळा राजघराण्यांतील एक वृद्धबाइसाहेब कृष्णाकांठीं म्हणून हरिपुरास राहावयास आल्या. मिरजमळा संस्थानच्या सर्व मुलुखांत कृष्णाकांठचें एखादेंही गांव नव्हतें म्हणून हें हरिपूर गांव मळेकरांनीं सांगलीकरांजवळ मागितलें व त्याचे मोबदला आपलें **कवलापुर** सांगलीकरांस देऊं केलें. याप्रमाणें सन १८५९ मध्यें या दोन गांवच्या मालकांची अदलाबदल करण्यांत आली. तेव्हांपासून हरिपुर हें मिरजमळा संस्थानच्या अंमलाखालीं आलें व अजूनही तें त्यांचेच ताब्यांत आहे. जरी हें गांव सध्यां **टाकलेल्या** सारखें भासतें तरी येथें मुलांची व मुलींची अशा दोन शाळा आहेत; व त्यांत इंग्रजी चार इयत्तांपर्यंत शिकविण्याची सोय संस्थाननें केली आहे. तसेंच संस्थानच्या मदतीनें येथें एक संस्कृतपाठशाळाही चाललेली आहे. तसेंच येथें एक छोटेसें वाचनालय सुद्धां आहे.

झालें माझें हरिपुर या निसर्ग रमणीय स्थळाचें वणन संपलें.

# चक्कर ७ वें

## सिंधुदुर्ग–विजयदुर्ग

महाराष्ट्राच्या इतिहासांत किल्ल्याचें महत्व पुष्कळच दिसून येतें. हें महत्त्व दिल्ली व विजापुर येथील बादशाह पूर्णपणें जाणत होते, म्हणून त्यांच्या काळीं कांहीं किल्ले बांधण्यांत आले होते; कांहींची डागडुजी करण्यांत आली होती व सर्वांवर चांगली शिबंदी ठेवण्यांत आली होती. खरोखरींच हे महाराष्ट्रांतील किल्ले म्हणजे दिल्लीविजापुरच्या साम्राज्यसंपत्तीच्या खजिन्याचीं कांटच्याचीं कुलपें होतीं. शिवाजी महाराजांना हें कळून चुकलें होतें व म्हणून त्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रारंभीं या किल्ल्याच्या कुलपांना सामदामदंडभेदादि किल्ल्या चालवून त्यांनीं दिल्ली–विजापुरकरांची साम्राज्यसंपत्ति लुटली व मराठी साम्राज्यसंपत्ति सुरक्षित ठेवण्याकरितां पूर्वींच्या किल्ल्यांच्या कुलुपांचा कडेकोट बंदोबस्त केला व जागोजाग असलीं नवीं कुलुपें केलीं. शिवाजी महाराजांनीं दक्षिण कोंकणांतील एका नव्या केलेल्या व एका काबीज केलेल्या किल्ल्याचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा योग या सुटींत आला. मथळ्यांत निर्दिष्ट केलेले ते दोन किल्ले होत. त्या किल्ल्यांचें वर्णन येथें देण्याचें मनांत आहे. मी दक्षिणमहाराष्ट्रांत कायमचा राहण्यास आल्यापासून पायगाडीच्या दूरच्या प्रवासाचा योग आला नव्हता, तोही जुळून आला; त्यामुळें मनाला विशेषच आनंद झाला. या माझ्या चक्करमालेंत अर्थात माझे ' चक्करमालेंतील ' सततचे सोबती नव्हते. पण माझ्या येथील सहाध्यापकांपैकीं एकाचें घर कोंकणांत असल्यामुळें त्यांना सुटींत कोंकणांत जावयाचें होतें. तेव्हां आम्हीं सांगलीहून कोल्हापुरास आगगाडीनें जाऊन तेथून पायगाडीनें **फोंडाघाटानें देवगडास** जाऊन मग

तेथून सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या किल्ल्यांच्या ठिकाणास आगबोटीनें जाण्याचा बेत केला व तदनुरूप एका सायंकाळच्या गाडीनें कोल्हापुरास जाऊन तेथें रात्रीची वस्ती केली व पहांटेस पायगाडीचा पोषाख करून निघालों. या पायगाडीच्या प्रवासांत 'विंचवाचें घर पाठीवर' या म्हणीप्रमाणें आपलें सामान आपण न्यावें लागतें. पाठीवर बांधावयाची पिशवी असल्या प्रवासाला ज्यास्त सुखकर असें समजल्यामुळें तशी पिशवी करविली होती. पण ती पिशवी शिवल्यापासून तिचा उपयोग करण्याचा योग आला नव्हता. तो आतां आला म्हणून ती पिशवीच मीं घेतली होती. तेव्हां पोशाख केल्यावर ती सामानाची पिशवी पाठीस लटकावून आम्ही दोघे पहांटेस शाहूपुरींतून पायगाडीवर पाय ठेवून मार्गस्थ झालों.

शाहूपुरींतून आमच्या मार्गाला लागण्याकरितां जुन्या कोल्हापुरांतून जावें लागतें. जातांना आम्हांला कितीतरी वांकणावांकणाचे रस्ते व बोळ लागले. मला तर या रस्त्यांची मुळींच माहिती नव्हती. शिवाय अजून काळोख होता; पण माझे सोबती कोल्हापुरांत पुष्कळ काळ राहिलेले असल्यामुळें त्यांना सर्व आडव्यातिडव्या रस्त्यांचा पूर्ण परिचय होता. शिवाय गांवाबाहेर जाईपर्यंत आमच्याबरोबर एक पायगाडीवाला शिपाई आम्हीं रात्रीस ज्यांच्या घरीं वस्तीस उतरलों होतों—त्या गृहस्थांनीं आमच्याबरोबर दिला होता; म्हणून आम्ही सुखरूपपणें एकदांचें कोल्हापूर सोडून आमच्या वाटेस लागलों व तो शिपाई परत गेला. आतां चांगलें उजाडलें होतें व रस्ताही स्पष्टपणें दिसूं लागला होता तेव्हां आम्हांला आनंद झाला व आम्ही लीलेनें आमच्या लोहमय अश्वावरून दौडत चाललों. कोल्हापूर सोडल्यापासून उंचसखल असा भूमिभाग लागला व हा प्रांत पुण्याकडील मावळासारखा आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. इतक्यांत सूर्यनारायण बराच वर आला व आमच्या सांवल्या आम्हांला चांगल्या दिसूं लागल्या. माझ्या पाठीवरील पिशवीच्या ओझ्यानें माझ्या पाठीला कड आला व त्यानें माझें लक्ष तिकडे वेधलें व त्याच वेळीं माझी दृष्टि माझ्या पडलेल्या सांवलीकडे गेली. ती माझी

सांवली पाहून मला लहानपणीं वाचलेल्या **बनीयनच्या यात्रेकरूचा प्रवास** या पुस्तकांतील **क्रिस्चन** नांवाच्या यात्रेकरूंची आठवण झाली. त्या यात्रेकरूचा तो प्रवाशाचा पोशाख व ती पाठीवर बांधलेली ओझ्याची पिशवी व त्या पिशवीचे छातीवर दिसणारे ते चौकाटण्या-प्रमाणें बंद हें सर्व चित्र माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें. त्या प्रवाशांत व माझ्यांत कितीतरी साम्य आहे असें मला वाटलें. तो **क्रिस्चन** नांवाचा प्रवाशी आपला सुखकर संसार सोडून बायकामुलांना टाकून त्रासाचा—हालअपेष्टांचा प्रवास करण्यास निघाला होता! मीसुद्धां सुख-कर प्रवासाचीं आगगाडी—आगबोटीचीं साधनें सोडून हा पायपिटीचा प्रवास आपण होऊन पतकरला होता! त्या **क्रिस्चनच्या** पूर्वसंचितरूपी ओझ्याची पिशवी त्याच्या पाठीवर होती व त्याच्या भाराखालीं तो वांकला होता. माझ्या पाठीवरसुद्धां प्रवासाच्या पाथेयाच्या ओझ्याची पिशवी होती व तिच्या भाराखालीं मी वांकलों होतों. त्या **क्रिस्चन** प्रवाशाचें तें संचिताचें ओझें त्याला त्याच्या बिकट प्रवासांत वागवा-वयाचें होतें. येशू क्रिस्ताचा क्रॉस किंवा चौकटणें ज्या स्वर्गांतील प्रवेश-द्वाराजवळ होतें त्या प्रवेशद्वाराजवळ पोंचल्यावर त्या चौकटण्याच्या दर्शनाबरोबर त्या प्रवाशाचें संचितरूपी ओझें पाठीवरून पडून जावयाचें होतें. माझीही पाथेयाची पिशवी देवगडांत प्रवेश केल्यानंतर माझ्या मित्राच्या घराच्या दर्शनाबरोबर माझ्या पाठीवरून खालीं पडावयाची होती. याप्रमाणें **क्रिस्चनच्या** आध्यात्मिक प्रवासाचें व माझ्या व्यावहारिक प्रवासाचें साम्य मनांत येऊन मला कौतुक वाटलें.

या दिवसांत पायगाडीचा प्रवास केल्यास सभोंवार मनोहर सृष्टिशोभा दिसते. आधीं जिकडे तिकडे हिरवेंगार गवत असतें; तसेंच झाडांना मुबलक पानें व पालवी असते. सभोंवार उन्हाळ्यासारखी रुक्षता भासत नाहीं. शिवाय शेतांत पिकें तयार झालेलीं असतात. तींही नयनमनोहर दिसतात. यंदां पाऊस चांगला पडल्यामुळें पिकें फारच जोमांत दिसत होतीं. भाताचीं शेतें तर बहुतेक तयार झाल्यामुळें पिवळीं जरद झालीं

होतीं. यामुळें सर्वत्र गालीच्याप्रमाणें हिरव्या, पिवळ्या रंगाच्या मिश्रणाचा भूमिभाग दिसत होता. पायगाडीवरून चालत असतांना आम्ही आम्हांला लागणाऱ्या गांवांचीं नांवें जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंस विचारीत असूं. यामुळें **वाशी, हळदी, आनंद** वगैरे गांवें टाकून आम्ही पुढें चाललों असें आम्हांला समजलें. या रस्त्याला मैलाच्या दगडांची आंकडेमांडणी मात्र आमच्या बराच वेळ ध्यानांत आली नाहीं; पण शेवटीं या रस्त्याला मैलाचे सोळा भाग केले असून प्रत्येक भागाच्या दगडावर मैलाचा आंकडा व अर्धफर्लांगाचा आंकडा घातलेला आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. जसजसा सूर्यनारायण वर येत चालला तसतसें ऊन भासूं लागलें व मग आमचें लक्ष या रस्त्याच्या एका उणीवीकडे गेलें. या इतक्या मोठ्या व लांबच्या रस्त्याच्या दोन्हीं बाजूंस एकही झाड दिसेना. हा रस्ता बांधला तेव्हां या रस्त्याला दुतर्फा झाडेंच लावलीं नव्हतीं असें आम्हांला वाटलें व आम्हीं रस्ता करणाऱ्या एंजिनियरला मनांतून शिव्याशाप देऊं लागलों. रस्त्याच्या दुतर्फा झाडें असलीं म्हणजे वाटसरूंना किती आराम वाटतो व ते अशी सुंदर झाडी लावणारांना दुवा देतात; पण या रस्त्याचा उलट प्रकार कां हें कोडें आम्हांला उकलेना, पण पुढें आम्हांला समजलें कीं, कांहीं कालापूर्वी या रस्त्यालाही दुतर्फा उत्तम झांडाची रांग होती व भर दिवसासुद्धां या रस्त्यानें जातांना उन्हाचा कवडसा लागत नसे, पण मोटारगाडीला कांट्याचा त्रास होतो म्हणून म्हणा किंवा झाडांना पुष्कळ किंमत येऊं लागली म्हणून म्हणा, किंवा चुन्याच्या भट्ट्यांना कोळसा हवा होता म्हणून म्हणा, यांपैकीं कोणत्यातरी कारणांकरितां कां होईना इतकें खरें कीं, ही सुंदर झाडी तोडण्यांत आली. या कृत्यानें तात्पुरत्या फायद्याकरितां केव्हां केव्हां कायमच्या उपयोगाकडे कसें दुर्लक्ष होतें हें चांगलें दिसून येतें.

सुमारें एकवीस मैल आल्यावर इकडे तांबड्या मातीचे रस्ते व तांबडी माती लागूं लागली. आतां सपाटी संपून आम्ही एका डोंगराच्या बाजू-

बाजूनें पण वरवर चढत चाललों होतों. हिला गैबीची खिंड म्हणतात असें माझ्या मित्रांनीं सांगितलें. येथून सर्व डोंगर झाडांनीं गर्द झालेले दिसत होते. ही खिंड बरींच मोठी आहे व चढावही बराच आहे म्हणून आम्ही ती पायींच चढलों. सुमारें पंचवीस मैलाशीं चढाव संपून उतार लागला व आम्हीं पुनः पायगाडीवर चढून भराभर खालीं उतरूं लागलों. तोंच एका गड्यानें आम्हांला हटकून थांबण्यास सांगितलें. आम्हांला त्याच्या हटकण्याचा अर्थ कळेना. त्यानें आमचीं दोघांचीं इंग्रजींत नांवें असलेली एक चिठी दाखवून म्हणाला ‘ नगरचे शिराळकर वकील आजच कुडुत्री या खालच्या गांवीं आले आहेत व त्यांनीं तुम्हांला पुढें घालून घेऊन येण्यास मला सांगितलें आहे.’ आम्हीं मोठ्या बुचकळ्यांत पडलों. कोठें नगर (अहमदनगर) व कोठें हें दरीखोऱ्यांतील गांव व तेथें आम्हांस कोण बोलावीत आहे. पण या वेळीं पावणेदहा वाजले होते व आम्हाला तहानभूक लागली होती. तेव्हां आम्ही त्या गड्याबरोबर कडोत्री गांवीं गेलों. हें गांव रस्त्यापासून बरेंच खोलांत आहे, यामुळें पुष्कळ वेळां आमची पायगाडी आम्हांस उचलून न्यावी लागली. रा. शिराळकरांचें घर डोंगराकडच्या बाजूला होतें; तेव्हां आम्ही लवकरच त्यांचे घरीं पोंचलों. ते गृहस्थ म्हणाले, “ मला कोल्हापुरास डॉ. सबनीस यांनीं सांगितलें, कीं, आपण पायगाडीनें कोंकणांत जाणार आहां तेव्हां राधानगरीस आपली जेवण्याखाण्याची व्यवस्था करावी. मी राधानगरीस वकीली करतों. पण त्या गांवीं थोडासा प्लेग होता म्हणून मीं येथें राहण्यास आलों आहें. तेव्हां आपली येथें सोय केली आहे. ’ तेव्हां आम्हांस नगराचें व आमच्या नांवाच्या चिट्टीचें कोडें उमगलें. इकडे नवीन वसविलेल्या राधानगरीस नुसतें नवें ‘नगर’ म्हणतात. माझे मित्र यांनीं राधानगरीस जेवणखाणाची व्यवस्था करण्यास डॉ. सबनीस यांस सांगितलें होतें खरें; आमच्याकरितां इतका त्रास घेतल्याबद्दल आभार मानून आम्हीं घामानें ओलेचिंब झालेले कपडे काढून . दुसरे घालीपर्यंत गरम चहा व चिवडा त्या गृहस्थांनीं आणून दिला.अशा तहान-

वेळीं आम्हीं या पदार्थांचा उत्तम समाचार घेतला हें सांगावयास नकोच. आणखी अर्ध्या पाऊण तासानें जेवणाचीही वर्दी आली व आम्ही जेवणास बसलों. ताजें सुग्रास अन्न त्यांतल्या त्यांत चांगलें आंबट दही-ताक मिळालें. कोंकणांतील माणसाला आणखी ती मेजवानी काय पाहिजे? आमचें जेवण आटोपलें व मनांतल्या मनांत आम्हीं 'अन्नदाता सुखी-भव' असें म्हटलें व अर्वाचीन पद्धतीप्रमाणें पुनः एकदां रा. शिराळकरांचे आभार मानून लागलीच पुढें जाण्याच्या तयारीला लागलों. कारण आम्हाला सायंकाळपर्यंत अजून अर्धा पल्ला गांठावयाचा होता. येथून राधानगरी तीनचार मैल असून त्याचे पुढें एक मैलावर हत्तीमहाल आहे व येथें रा. **शाळीग्राम** म्हणून जपानहून आलेले गृहस्थ राहतात. ते माझ्या मित्राच्या थोड्याफार ओळखीचे होते व त्यांना कोल्हापुराहून आमच्या येण्याची वर्दीही दिलेली होती. तेव्हां तेथें जाऊन दोनतीन तासांची विश्रांति घेऊन मग सायंकाळच्या वस्तीच्या ठिकाणास जावें म्हणजे बरें असें ठरवून आम्ही **कडोत्रीहून** निघालों.

आतां उताराचा रस्ता. मग काय विचारतां? आम्ही मोठ्या झपाट्यानें चाललों होतों. सभोंवार सर्वत्र डोंगरच डोंगर दिसूं लागले व हे सर्व डोंगर दाट झाडींनें आच्छादलेले दिसत होते. आम्ही चाललों होतों त्या डोंगरांच्या जवळपास घायपाताची खूप लागवड केलेली दिसली. अठ्ठावीस मैलाचे सुमारास राधानगरीची नवी वस्ती लागली. आणखी थोड्याच वेळानें आम्ही रा. **शाळिग्राम** यांचे बंगल्याला आलों. ते आमची वाट पहात होते; पण आम्हीं जेवूनखावून आलों आहों असें त्यांना सांगितलें. नंतर ते जेवणास गेले. हा बंगला चांगला उंचवट्यावर असून येथून सभोंवार मोठी मनोहर सृष्टिशोभा दिसते. इकडे रान फार दाट होतें; पण अलीकडे बरेंच रान तुटलें; तरी देखील अजून तेथें रात्रीं वाघ आंगणांत येतात असें रा. **शाळिग्राम** यांनीं सांगितलें. येथें हवा-पाणी उत्तम असून उन्हाळ्यांतील शीतल वसतिस्थान होण्यास हें ठिकाण फार योग्य आहे असें आम्हांस वाटलें.

आमची निघावयाची वेळ झाली तेव्हां रा. **शाळिग्राम** यांनीं येथें नुकत्याच काढण्यांत आलेल्या स्पीरिटस काढण्याच्या कारखान्याकडे आम्हांस नेलें. भट्ट्या वगैरे बांधून तयार झाल्या होत्या व कारखान्याचें काम लवकर चालू व्हावयाचें होतें असें आम्हांस दिसलें.

कारखाना पाहून झाल्यावर आम्ही पुढें चालूं झालों.अर्धापाव मैल गेलों नाहीं तोंच आम्हांस राधानगरीच्या तलावाचा बंधारा वीसपंचवीस फूट झालेला असावा, त्याचेवरून पाणी वहात होतें. यामुळें येथला देखावा प्रेक्षणीय दिसत होता. बंधाऱ्याच्या दोन्हीं बाजूंस उंच उंच टेंकड्या व या दोन टेक्कड्यांना सांधून बंधारा बांधलेला होता. हल्लीं हें काम बंद आहे व आतां तें चालू होण्याचा संभव नाहीं असें आम्हांस कळलें. तलावाला पसंत केलेली जागा मात्र उत्तम आहे यांत शंका नाहीं. तसाच हा बंधारा हवा तितका उंच करण्याची सोय आहे व तलावांत हवें तितकें पाणी राहण्याचीही सोय आहे हेंही खरें आहे; तरी **पण** या कामाला आधीं दहावीस लाख रुपये खर्च झाले आहेत व काम पुरें करण्यास आणखी इतके रुपये खर्च येणार व इतक्या खर्चावर व्याज सुटण्यासारखें नाहीं; कारण जरी पाटाला पाणी हवें तितकें आहे तरी पण पाटाखालीं भिजण्यासारखी जमीन जवळपास नाहीं. कालवा जेव्हां पांचपन्नास मैल न्यावा तेव्हां चांगली काळी जमीन व तीही पाटाखालीं भिजण्यासारखी लागते. अलीकडे शेतीची किंवा बागाईती जमीन कमी आहे व जी आहे ती पाटाच्यापेक्षां जास्त उंचवट्यावर असल्यामुळें पाटाचें पाणी त्या जमिनीकडे जाऊं शकत नाहीं, यामुळें येवढ्या मोठ्या प्रमाणावर केलेलें हें पाटबंधाऱ्याचें काम निकामी झाल्यासारखें झालें आहे असें आम्हांस समजलें व हें ऐकून आम्हांस वाईट वाटलें. उपयुक्ततेच्या दृष्टीनें या तलावावरील खर्च व्यर्थ गेला असेल. पण सौंदर्याच्या दृष्टीनें या तलावानें या स्थळाला विलक्षण शोभा आणिली आहे. यांत शंका नाहीं. तलावाच्या बंधाऱ्याच्या बाजूनें गेल्यावर टेंकडीवर जाण्याकरितां थोडें वळण घेतलेलें आहे; तें वळण चढून आम्ही टेंकडी ओलांडून

थोडेसें खालीं आलों तोंच तें समुद्रासारखें सुंदर सरोवर आमच्या समोर येऊन ठाकलें. या सरोवराच्या सर्व बाजूला हिरव्या हिरव्या गर्द झाडींनें आच्छादलेल्या अशा प्रचंड टेंकड्या आहेत. सभोंवार त्या हिरव्या गार टेंकड्या मधोमध शुभ्र पाण्याचें सरोवर हा देखावा मला हिमालयांतील थेट नैनितालसारखा भासला. हें सरोवर बांधण्यास लागलेल्या लाखों रुपयांचा जरी व्यावहारिक उपयोग कांहीं एक झाला नसला तरी हिमालयांतील शीतलनिवासस्थानाची प्रतिकृति या खर्चानें बनविली आहे यांत कांहीं एक शंका नाहीं. आतां आमचा रस्ता सरोवराच्या कडेकडेनें पण सारखा वळणें वळणें घेत चालला होता. तांबडा लाल रस्ता, डाव्या बाजूला हिरव्यागार टेंकड्या व उजव्या बाजूला शांत व निर्मळ पाण्यांचा तो तलाव या तीन गोष्टींचा येथें त्रिवेणीसंगम झाला आहे असें मला वाटलें. आतां आमचा रस्ता अगदीं सपाटीचा होता व तो पाण्याच्या सपाटीबरोबर चालला होता; एके ठिकाणीं तर तलावाच्या पाण्याचा ओघ ओढ्यांच्या आंत घुसला होता व तेथें ओढ्यावर पूल केला होता व यामुळें आमच्या दोन्ही बाजूंस पाणी असून आमचा रस्ता मधून गेला होता. येथें आम्ही पायगाडीवरून खालीं उतरलों व किती वेळ तरी सभोंवारची सृष्टिशोभा पहात उभे राहिलों. खरोखरीच असल्या वनवेष्टित पर्वतप्रदेशाची शोभा शब्दांना वर्णन करणें अशक्य आहे. असलीं अवर्णनीय ठिकाणें प्रत्यक्ष पाहिलीं पाहिजेत तरच त्यांची बरोबर कल्पना करतां येईल. उशीर होत चालला म्हणून येथें आम्हांला फार वेळ थांबतां आलें नाहीं व आम्ही पुनः झपाट्यानें चालूं लागलों. या तलावाच्या कांठाकांठानें सुमारें पांचसहा मैल सारख्या रस्त्यानें सभोंवारच्या मनोहर देखाव्यानें मन वेधल्यामुळें मनाला वेळाचें भान रहात नाहीं. पण कांहीं वेळानें तलाव मागें टाकून मनुष्य पुनः शेतांनीं व्याप्त अशा उंचसखल प्रदेशांत येतो. आतां **दाजीपूर** नांवाच्या गांवाजवळ आम्ही येत चाललों होतों. हें घाटमाथ्यावरचें एक गांव आहे. येथेंच कोल्हापूर संस्थानची हद्द संपते व रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्याची हद्द

लागते. आम्ही **दाजीपुरास** साडेपांच वाजतां आलों. येथून अर्धा-पाऊण मैलावर कोल्हापूर संस्थानचें दस्तुरीचें नाकें आहे. येथें आल्यावर आम्हीं पांचदहा मिनिटें विश्रांति घेतली व सभोंवारच्या देखाव्याचें एकदां शेवटचें दर्शन घेतलें. येथें चाळीसावा मैल आहे. येथून घाटाचा उतार सारखा आठ मैल आहे. येथल्या घाटाची रचना विलक्षण आहे. येथें वरच्या बाजूला म्हणण्यासारख्या टेकड्या नाहींत व दाजीपुराकडून थोडासा सुद्धां चढाव नाहीं. सपाटीवरून एकदम खालींच कोसळल्या-सारखा घाट उतरण्याचे ठिकाणीं द्वारासारखा थोडासा भाग खोदलेला आहे. या खोदलेल्या भागांतून पलीकडे गेल्याबरोबर एकदम सर्व कोक-णाचा प्रदेश दिसतो. येथला डोंगर जवळ जवळ भिंतीसारख्या तुटक्या कड्याचा आहे व डोंगरांची रांग किंचित् अर्धवर्तुलाकार आहे व घाटाचें प्रवेशद्वार साधारणतः मधोमध आहे व रस्ता प्रवेशद्वाराच्या डाव्या हाता-कडून अगदीं तळापर्यंत गेला आहे. रस्त्याला वांकणें वांकणें पुष्कळ आहेत; पण तीं फार दूरदूर नाहींत. यामुळें घाटाचें प्रवेशद्वार आप-ल्याला सारखें दिसत राहतें. सर्व डोंगरभर रान मात्र खूब दाट आहे. उघडेबोडके काळे काळे सुळक्यासारखे खडक येथें दृग्गोचर होत नाहीं. सर्वत्र शांत शीतल झाडी व हिरव्यागार गालीच्या-सारखें गवत दृष्टीस पडत असल्यामुळें हा घाट भयाण किंवा भीतिप्रद वाटत नाहीं. या बाबतींत हा **फोंड्याचा** घाट व अहमदनगर जिल्ह्यांतील संगमनेरच्या आधीं लागणारा **चन्नापुरीचा** घाट या मधला फरक फारच विलक्षण वाटला. तो **चन्नापुरीचा** घाट फारच भयंकर व भीषण भासतो. आपण एखाद्या प्रचंड प्राण्याच्या जबड्यांतच शिरतों कीं काय असा त्या घाटांत पदोपदीं भास होतो. याच्या उलट या घाटांत आपण एखाद्या सुंदर उपवनांतून चाललों आहों असें वाटतें. अशा प्रकारचे तुलनात्मक विचार मनांत येत असतांना आम्ही घाटाचे तळाशीं आलों व थोड्याच वेळानें घाटाखालील **फोंडा** या नांवाच्या गांवाशीं आलों. धर्मशाळेपेक्षां जवळच असलेलें देऊळ स्वच्छ दिसलें म्हणून आम्ही तेथें

तळ दिला. फराळ वगैरे आटोपून आम्ही लवकरच निद्रादेवीची आराधना केली व आमच्या इतक्या प्रवासाच्या तपश्चर्येमुळें तीही आमच्यावर प्रसन्न झाली हें सांगावयास नकोच.

पहांटेस उठून व पायगाडीचा पोषाख करून आम्हीं सहा वाजतां पुढील मार्गाला लागलों. गांव सोडून जातों तों चांगलें उजाडलें. सभोंवार भाताचीं, वरी व नाचणीचीं पिकलेलीं पिकें दिसत होतीं व माळरानांत खूब दाट गवत उगवलेलें दिसत होतें. हा कोंकणाचा भाग तांबड्या मातीचा आहे. आतां रस्त्याच्या दुतर्फा झाडी व सभोंवारचा हिरवागार भूमिभाग हा सर्व देखावा चित्ताकर्षक व आल्हादकारक वाटला. आम्ही उंचसखल अशा भागांतून जात होतों. या प्रांतांत रानाची व माळ-रानाची जमीन जास्त दिसते; व शेतीची व लागवडीची जमीन फार कमी दिसते. म्हणून या कोंकणांत गरीबी फार आहे. कारण वस्तीच्या मानानें उत्पन्नाची जमीन फार कमी व म्हणून या प्रांतांतील लोकांस उदर-निर्वाहाकरितां मुंबईस व घाटावर जावें लागतें.

**फोंडा** गांव टाकल्यावर कांहीं वेळानें उजव्या हातास उत्तरेस जाणारा **खारेपाटणचा** रस्ता लागतो, पुढें डाव्या हातास **कणकवलीचा** रस्ता रस्ता टाकून पश्चिमेस थेट देवगडचा रस्ता लागतो. आणखी कांहीं मैल गेल्यावर पुनः डाव्या हाताकडे **मालवणा**कडे जाणारा रस्ता लागतो. नंतर **गैबी** खिंडीसारखी एक बरीच मोठी खिंड लागते. ही आम्ही पायींच चढलों. मग पुढें उतार लागतो व उतार संपल्यावर मग अगदीं सपाट प्रदेश लागतो व तो थेट **देवगड**पर्यंत संपत नाहीं. आतां झाडी व दऱ्या दूर जातात व एकसारखा माळरानामधून जाणारा रस्ता लागतो. या रस्त्याला दुतर्फा झाडेंही फारशीं लागत नाहींत. कारण हें सर्व माळ-रान खडकाचें आहे. त्यावर फार मोठें गवतही उगवत नाहीं. यामुळें हा भाग दृष्टीला रुक्ष वाटला इतकेंच नाहीं तर कोंकणप्रांत बराच नापीक कां हें या भूमिभागावरून कळून आलें. देवगड पांचचार मैल राहिल्यावर या खडकाळ माळावर सभोंवार दगडाचे गडगे घातलेले असे चौक एकामागून

एक लागूं लागतात. याचा पहिल्यांदा पहाणारांस अचंबा वाटतो. पण माझ्या मित्रांनीं या गडग्याचा उद्देश सांगितल्यावर मी या कोंकणांतील लोकांच्या श्रमाच्या शेतीची गोष्ट ऐकिली होती तिचा मला प्रत्यय पटला. अगदीं तव्यासारख्या खडकाळ व सपाट जागेभोंवतीं हे गडगे घालतात. म्हणजे पावसांत या गडगा घातलेल्या जागेंत पाणी व गाळ सांचतो. यांत लोक घरांतला केरकचरा व इतर खत टाकतात. अशीं एक दोन वर्षें गेलीं म्हणजे या कातळावर दोन इंचाचा मातीचा थर बसतो व मग येथें गवत उगवूं लागतें व अशीं आणखी एकदोन वर्षें गेलीं म्हणजे गाळ व माती यांचा मोठा थर होतो व मग त्या जमिनींत नाचणी, वरी पेरतात व आणखी जाड थर बनला म्हणजे मग या जागेचें भातशेत बनतें. त्यांत भात करूं लागतात. इतक्या श्रमानें येथील लोक निवळ कातळाची जागा लागवडीस आणतात. नुसतेच गडगे घातलेली; गवत उगवूं लागलेली; नाचणी वरी होऊं लागलेली व शेवटीं भातशेतीची जमीन बनलेली अशा अवस्थांत असलेल्या जमिनी वाटेनें जात असतां आमच्या दृष्टीस पडल्या. लवकरच आम्ही आमच्या मित्राच्या घरीं जाऊन पोंचलों.

**देवगड** हें लहानसें टुमदार गांव **जामसद** नांवाच्या नदीच्या मुखाशीं वसलेलें आहे. ही नदी सपाट व खडकाळ माळ रानाला भेदून आल्यामुळें व मुखाशीं असलेल्या टेंकड्यांना फोडून समुद्राला मिळाल्यामुळें खाडीचें पात्र फार रुंद नाहीं व खाडीचें मुखही अरुंद पण खोल आहे. शिवाय दक्षिणेच्या भागाच्या टेंकडीच्या पूर्वेस खाडी जमिनींत घुसून अर्धवर्तुळाकार तलाव बनलेला आहे व तलावाच्या कांठावरच गांव वसलेला आहे. या तलावांतही पाणी खोल आहे. यामुळें या ठिकाणीं मोठें सुरक्षित बंदर झालेलें आहे. येथें एकदां मुखांतून गलबत आंत आलें कीं दक्षिणेकडची टेंकडी तटासारखी आड येते. यामुळें समुद्रांत कितीही वादळ असलें तरी या तलावासारख्या बंदरांत अगदीं शांत असतें. यामुळें हें दक्षिण कोंकणांतील सर्वकाळीं सुरक्षित बंदरांपैकीं एक आहे. हा जो खाडीचा तलावासारखा भाग सांगितला तिकडून नदीला दुसरें एक समुद्राशीं


जोडणारें मुख असावें व कालेंकरून वाळूच्या व गाळाच्या संचयानें तें मुख बुजून तेथें जमीन झाली असावी व त्या जमिनीवर हें गांव वसलें असावें; यामुळें या गांवच्या पश्चिमेस मुंबईच्या बॅकबेप्रमाणें एक सुंदर सपाट वाळवंट आहे. येथच्या शुद्ध शुभ्र वाळूची व समुद्राच्या लाटांची मोठी मौज वाटते. गांवाच्या दक्षिणच्या टेंकडीला सभोंवार तट बांधून किल्ल्याचें रूप दिलें आहे. अशी या गांवची चमत्कारिक व चित्ताकर्षक रचना आहे. या गांवचें हवापाणी फार उत्तम आहे व तेथें रोगराई कांहीं एक नाहीं. या गांवच्या जवळचीं दोन तीन खेडींही आम्हांला पहावयास सांपडलीं. हीं दऱ्यांतून वसलेलीं असल्यामुळें सभोंवार खूप झाडी आहे व पाणी मुबलक आहे. यामुळें हीं खेडींही सुबक दिसतात.

देवगडास दीड दिवस विश्रांति घेतल्यावर आगबोटीनें आम्हीं विजयदुर्ग व सिंधुदुर्ग पहाण्यास निघालों.

सिंधुदुर्ग हा शिवाजीनें खास बांधलेला पाण्यांतील किंवा जंजिरा आहे. तो शिवाजीच्या आरमाराचें मुख्य ठाणें असून कोंकणपट्टीच्या प्रांताच्या राज्यव्यवस्थेचें मुख्य ठिकाण होतें. मावळ व पुण्याजवळील व कोल्हापुराकडील प्रांत घेतल्यावर शिवाजीनें कोंकणाकडे आपला मोर्चा फिरविला. त्याचे मनांत हबशीचें मुख्य ठाणें राजादंडापुरी किंवा मुरूड व पाण्यांतील किल्ला जंजिरा हीं ठिकाणें काबीज करून हबशाला आपल्या पूर्णपणें अंकित करून घ्यावयाचें होतें. त्याखेरीज कोंकणप्रांताचा ताबा सुरक्षित नाहीं असें शिवाजीला वाटत होतें. यामुळें त्यानें हबशाच्या या दोन्ही ठिकाणांवर निकराचे हल्ले केले. जमीनीला लागून असलेलें दंडाराजापुरी शहरही त्यानें काबीज केलें. पण किल्ला त्याला सर करतां आला नाहीं. कारण हबशाजवळ मोठें आरमार होतें व त्याला किल्ल्यांत अन्न व लढाऊ सामुग्री जलमार्गानें आणतां येत असे. हें पाहून शिवाजीनें स्वतःचें आरमार करण्याचा व आरमाराच्या सुरक्षिततेकरितां हबशाच्या जंजिऱ्याप्रमाणें पाण्यांतील किल्लाही बांधण्याचा बेत केला. या कामाला मालवण बंदर हें फार सोईचें आहे; कारण तें बंदर भर समुद्रावर

असून या ठिकाणीं समुद्रांत आसपास खडक फार आहेत, यामुळें बाहेरून येणाऱ्या परकी गलबतांना हें बंदर फार धोक्याचें आहे असें पाहून शिवाजीनें येथें पाण्यांतील किल्ला १६६४ मध्यें बांधला व त्याचें सिंधुदुर्ग असें नांव ठेवलें.

**मालवण** हें देवगडच्या दक्षिणेस सुमारें वीस मैल आहे. आगबोटीनें आम्ही **मालवणास** पहांटेस पोंचलों. सकाळीं किल्ल्याकडे जाण्याकरितां बंदरावर येऊन जातांयेतांची होडी करून होडींत बसलों. मालवण हें समुद्रकिनाऱ्यावरील बंदर असून त्याचा आकार कांहींसा मुंबईच्या बॅकवेसारखा आहे. उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत सात मैलांचा किनारा आहे. येवढें मोठें हें बंदर आहे. किनाऱ्याच्या बाजूस माडांची सारखी झाडी आहे व सर्व किनाऱ्यावर सफेत बारीक वाळू आहे. सिंधुदुर्ग किल्ला बंदराच्या समोरच एका बेटावर असून तो किनाऱ्यापासून एक मैल दूर आहे. या किल्ल्याच्या आंत आलें म्हणजे गलबतांना नांगर टाकण्यास सुरक्षित जागा आहे. पण किल्ल्याच्या बाजूनें बंदरांत शिरतांना जागोजाग खडक आहेत. ते दाखविण्याकरितां जागोजाग बोयरे आहेत व तांबड्या कंदिलाचें एक गलबत विशेष धोक्याच्या जागीं डांबून ठेवलेलें आहे. त्या दिव्याच्या खुणेनें बोटींना व गलबतांना बंदरांत यावें लागतें. इतकें हें बंदर भयंकर आहे. यावेळीं समुद्राचें पाणी अगदीं शांत होतें व यामुळें तलावांत वल्हवीत आमची होडी चालली आहे कीं काय असा भास होत होता. आम्ही किल्ल्याच्या जवळ जाऊं लागलों तों पांढरे खडक दिसूं लागले. त्या खडकांना वळसा घालून आमची होडी गेली व आम्ही किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशीं आलों. किल्ल्याच्या अगदीं दारांत होडी लागली. कारण येथें चांगला धक्का बांधलेला असून पाणी खोल आहे. किल्ल्याचें दार तांबूस काळसर दगडाचें केलेलें असून त्याच्या दोन्ही बाजूंस बुरूज आहेत. किल्ल्याचा तट सुमारें तीस फूट उंचीचा असावा असें आम्हांस वाटलें. पहिला 'दरवाजा टाकून जरा तिरका असा दुसरा दरवाजा लागतो; तो टाकून आंत गेलें,



नं. १५ ] सिंधुदुर्ग-दुरूनचा देखावा. [ पान १२४



नं. १६ ] सिंधुदुर्ग-प्रवेशद्वार, [ पान १२५

कीं, किल्ल्याचें आवार लागतें. किल्ल्यांतील जमीन समुद्रसपाटीपासून फार उंच नाहीं व आंतील बहुतेक भाग सखल आहे. तटाच्या एका बाजूस मात्र तांबूस पांढऱ्या दगडाचीं एक लहानशी टेकडी आहे व तिला लागूनच एक पाण्याचा लहानसा तलाव आहे. किल्ल्यांत गेल्यावर प्रथमतः आम्ही शिवाजीच्या छत्रीकडे गेलों. या छत्रीचा पुढला सभामंडप नवाच केलेला दिसतो. तो हल्लींच्या कोल्हापुरच्या महाराजांनीं बांधला असा लेख आहे. शिवाजीची ही नकली छत्री आहे. खरोखरी शिवाजी रायगडीं वारले व तेथें त्यांना मूठमाती मिळाली व तेथें एक छत्री बांधण्यांत आली. मालवणचा किल्ला सिंधुदुर्ग हा शिवाजीचें कोंकण प्रांतांतील मुख्य ठाणें होतें म्हणून येथेंही एक छत्री बांधण्यांत आली, म्हणून याला नकली छत्री म्हणणें रास्त आहे. या छत्रीच्या देवळांत शिवाजीची एक दगडी मूर्ति आहे. आम्ही गेलों तेव्हां त्या मूर्तीची पूजा होऊन तिला पोषाख घालून व चांदीचा मुखवटा बसवून त्यावर एक मराठीशाही पगडी घालून फुलें व माळा घातल्या होत्या. तेथला पुजारी एक मराठाच होता. त्याची पूजा आटपून तो परत चालला होता. या छत्रीला कोल्हापुर सरकारकडून वार्षिक सुमारें पंधराशें रुपयांची तैनात चालू आहे असें कळलें.

शिवाजीची छत्री पाहून झाल्यावर आम्ही तटावर चढलों व तटावरून समुद्राची शोभा पहात पहात चाललों. तट कांहीं कांहीं ठिकाणीं पडत चालला आहे; जागोजाग त्याला बुरूज केलेले आहेत. हा किल्ला साधारण काळसर दगडाचाच आहे. नंतर आम्ही खालीं उतरून दुसरीं एक दोन देवळें व पाण्याच्या विहिरी वगैरे पाहिल्या. आंत जिकडे तिकडे पडलेल्या इमारतींचे दगड व मालमसाला दिसत होता. यावरून पूर्वीं या किल्ल्यांत बरीच वस्ती असावी. किल्ल्यांत नारळीचीं झाडें बरींच आहेत. त्या झाडांच्या उत्पन्नाचा मक्ता घेतलेले कांहीं गाबीत (मच्छेमारीचा धंदा करणारी मराठ्यांची एक जात) लोक राहतात असें कळलें. नंतर एका जिन्यानें पुनः एकदां आम्ही तटावर चढलों. जेथें चुन्याच्या गिलाव्यांत शिवाजीच्या हाताच्या पंजाचे व पायाच्या पावलाचे छाप उठविलेले आहेत

तथल्या भागीं गेलों. छाप अगदीं स्पष्ट व हुबेहुब आहेत. त्या दोहोंवर लहान लहान घुमट केलेले आहेत. या बाजूला तटावर देवळाच्या देवडी-प्रमाणें व नगारखान्याप्रमाणें एकावर एक अशी दोनमजली इमारत आहे. पण ती आतां अगदीं पडकी झाली आहे व थोडक्या दिवसांतच ती पडेल यांत शंका नाहीं. तटावरून चालतांना किल्ल्याची मजबुती व त्यांतील माऱ्याच्या जागा याची चांगली कल्पना येते. याचे सर्व बाजूस समुद्र असल्यामुळें या किल्ल्यावर मारा करणें कठिण आहे व जवळ येणाऱ्या गलबतांवर किल्ल्यावरून सहज मारा करितां येईल अशी व्यवस्था केली आहे. हा सर्व किल्ला पाहिला म्हणजे शिवाजीच्या धोरणाची, त्याच्या कल्पकतेची व त्याच्या दूरदर्शित्वाची उत्तम कल्पना मनांत येते. कोंकणप्रांताचें संरक्षण करण्यास आरमाराची गरज आहे व त्या आरमारास सुरक्षित ठिकाण पाहिजे; हबशाच्या ताब्यांत असलेला जंजिरा किल्ला मिळत नाहीं; तेव्हां नवें ठिकाण शोधून काढून तेथें भक्कम किल्ला बांधून त्याठिकाणीं आरमारी ठाणें करणें ही गोष्ट लहानसहान नाहीं. या किल्ल्याचा अगदीं शेजारच्या लहानशा **पद्मगड** नांवाच्या बेटावर शिवाजीनें **पांडवगड** म्हणून लहानसा किल्ला बांधला होता. तेथें शिवाजीचीं गलबतें बांधण्याचा कारखाना होता. आतां दोनचार माडाच्या झाडांखेरीज तेथें कांहीं दिसलें नाहीं. म्हणून आम्हीं होडींतून ती जागा पाहून परत बंदरावर आलों. बंदराच्या उत्तरेच्या टोंकाला **राजकोट** व **सर्जेकोट** या नांवाचे दोन किल्ले शिवाजीनें बांधले होते. हे किल्लेही पार पडून गेलेले आहेत व त्यांची फार समक्षा राहिली नाहीं असें आम्हांस कळल्यावरून आम्ही तिकडे गेलों नाहीं. बंदरावरून या किल्ल्याच्या तटाचा कांहीं भाग दिसत होता. पण या सभोंवारच्या तटबंदीवरून शिवाजीनें या सिंधुदुर्गाला व मालवण बंदराला निरनिराळ्या प्रकारांनीं जितकी सुरक्षितता आणणें शक्य होतें तितकी सुरक्षितता अतोनात पैसा खर्च करून आणिली होती यांत शंका नाहीं.

याप्रमाणें किल्ला पहाण्याचें काम सकाळीं संपलें. सायंकाळीं आम्ही थोडें गांवच्या बाहेर फिरावयास गेलों व घरांतून बाहेर पडल्यावर माझे गुरुवर्य सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा जन्म ज्या घरांत झाला तें घर पाहून घेतलें. पहाटेस मालवणाहून निघालों.

**विजयगड** देवगडच्या उत्तरेस बारा मैल आहे. देवगडकडून बोट तेथें सायंकाळीं जाते. त्याप्रमाणें आम्हीं सायंकाळीं **विजयगडास** जाऊन तेथें बंदरावर एका ठिकाणीं उतरण्याची व खाणावळींत जेवणाखाणाची सोय केली. आम्हांला येथें राहण्यास एकच दिवस सवड होती.

तेथें राहणारे रा. लेले यांची आमच्याबरोबर एका गृहस्थांनीं ओळख करून दिली. येथें पहाण्यासारखीं स्थळें म्हणजे एक महादेवाचें देऊळ, आंग्र्याच्या वेळची जुनी गोदी व किल्ला होत असें त्यांनीं सांगितलें. मग त्यांच्या सल्ल्यानें दुसऱ्या दिवशींचा स्थलदर्शनक्रम आदल्या रात्रीं ठरविला व त्याप्रमाणें उजाडतांच रा. लेले यांना घेऊन बाहेर निघालों. गांवाकडून जातांना थोड्याशा चढावानंतर रा. लेले यांनीं आम्हांला आनंदराव धुळप (पेशव्यांचे कोकणांतील आरमारी सुभेदार) यांचा वाडा दाखविला. वाडा लाकडीच पण बराच प्रशस्त आहे. तेथें सध्यां माणसें फारशीं कोणीं रहात नव्हतीं. धुळप घराण्यांतील हल्लींचे हयात वंशज हे सावंतवाडी संस्थानांत लहानशा हुद्यावर आहेत असें रा. लेले यांनीं सांगितलें. हा वाडा पाहून झाल्यावर गांवाच्या पलीकडे आम्ही गेलों. एका मैलानंतर रामेश्वराचें देऊळ लागलें. हें देऊळ एका दरींत आहे व म्हणून प्रवेशद्वाराकडून देवळाकडे जातांना खोल जावें लागतें. हा सर्व रस्ता खडक फोडून करावा लागला आहे. शेवटीं शेवटीं पन्नास फूट खडक खोदलेला रस्ता सुमारें २५० यार्ड लांब आहे. हा रस्ता फार भव्य दिसतो व देवळासमोर द्वार येण्याकरितां केलेल्या या कामाचें कौतुक वाटतें. या खोदलेल्या मार्गानें आंत गेल्यावर देऊळ दृष्टीस पडतें. देवळाच्या सभोंवार ओऱ्या आहेत व सर्व आवार फरसबंदी आहे. देऊळ महादेवाचें असून तें नसरापुराजवळील **बनेश्वर** किंवा यवतेश्वरचा

**येवतेश्वर** या सारखें आहे. सभामंडपाला मात्र अगदीं अलीकडे नव्या तऱ्हेचा तेलाचा रंग दिला आहे. यामुळें सभामंडप सुंदर दिसतो. महादेवाची पिंडी नेहमींप्रमाणें गाभाऱ्यामध्यें खोलांत आहे. पालखींतून मिरवणूक काढण्याकरितां बैलावर बसविलेली रुप्याची मूर्ति आहे. पुजाऱ्यानें ती मूर्ति सभामंडपांत आमच्या चांगली दृष्टीस पडावी म्हणून आणून ठेवली. ती मूर्ती उचलून वर आणण्यास त्यास बरीच मेहनत पडली, इतकी ती जड आहे. मूर्तीचें काम सुबक आहे. हें देऊळ **नाना फडणवीसाचे** बंधु **गंगाधरराव भानु** यांनीं बांधलें असें कळलें. देवळाच्या आवाराच्या जरा पलीकडे आंग्रे घराण्यापैकीं एकाची लहानशी छत्री आहे. ती पाहून आम्ही परतलों. परत येतांना रा. लेले यांनीं विजयदुर्गांत गेल्या सात आठ वर्षांत मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला ॲल्युमिनीयमच्या दागिन्यांचा कारखाना दाखविला. या कारखान्याचे मालक पिढीजाद सुतार असून, गव्याच्या शिंगाच्या मूर्ति व चित्रें करण्यांत फार कसबी होते. या कारखान्यांत अल्युमिनीयमचे टाकाऊ तुकडे, चुरा, वगैरे माल आणून तो गाळतात व त्याचे बारिक पत्रे करून ते वाकवून त्याचे बायकांच्या हातांत घालण्याचे गोट करतात. विरवल्या, मासोळ्या, पाटल्या, वाळे वगैरे दागिनेही करतात. पण मुख्यतः गोटांचा खप फार होतो म्हणून गोटच करतात. हल्लीं या प्रांतांत व मुंबईकडेसुद्धां चांदीच्या ऐवजीं या आल्युमिनीयमच्या दागिन्यांचा विलक्षण खप वाढलेला आहे असें आम्हांला सांगण्यांत आलें. या धातूवर जिल्हई उत्तम चढते व दागिने हलके, स्वस्त व दिसण्यांत सुबक असे असल्यामुळें गरीब लोकांमध्यें या दागिन्यांचा फार थोड्या काळांत विलक्षण फैलाव झालेला आहे असें कारखान्याचे मालक सांगत होते. असले येथें दोन कारखाने आहेत व दोन्ही कारखान्यांच्या मालकांनीं थोड्या वर्षांत लाखों रुपये मिळविले आहेत असें कळलें. हा एक अश्रुतपूर्व पण मोठ्या प्रमाणावर चाललेला कारखाना पाहून आम्हांला मनुष्याच्या प्रसाधनासक्तीचें व ती आसक्ती तृप्त करण्याकरितां समाजांत उत्पन्न होणाऱ्या धंद्यांचें व कारखान्याचें आश्चर्य वाटलें.

हा कारखाना पाहून झाल्यावर रा. लेले यांनीं आम्हांला आपल्या घरीं नेलें. रा. लेले हे पूर्वीं धुलप सुभेदारांचे दिवाण होते. त्यांचेजवळ पूर्वीं जुने कागदपत्र पुष्कळ होते. पण **धुळप** व **लेले** यामधील एका तंट्याचे प्रसंगीं ते कागदपत्र जाळण्यांत आले असें रा. लेले यांजकडून कळलें. विजयदुर्ग किल्ल्याच्या अंदाजी खर्चाचें एक टिपण सुमारें शंभर वर्षांचे पूर्वींचें पाहण्यास सांपडलें. त्याचप्रमाणें १५० वर्षांपूर्वींचें एक जमाखर्चाचें टिपणही मिळालें. त्यांत आपल्या व्यवहारांत लागणाऱ्या धान्यादि पदार्थांपासून कापडचोपड छत्री, जोडा सोनेंरुपें वगैरे सर्व जिनसांच्या किंमती दिलेल्या होत्या. त्यावरून हल्लीं सर्व पदार्थ चौपट पांचपट कांहीं कांहीं तर दसपट महाग झाले आहेत असें दिसून आलें. तिसरें एक फारच विलक्षण पत्र रा. लेले यांच्या संग्रहीं सांपडलें. ही एक शके १६९१ सन १७६९ मधील पावती आहे. ती एका गृहस्थानें आपली कुळंबीण दुसऱ्यास ६० रुपयांला विकल्याबद्दलची पावती आहे. तेव्हां त्याकाळीं इकडे गुलामगिरीची पद्धत असून गुलामांची विक्री-खरेदी होत असे असें स्पष्ट होतें. रा. लेले यांच्या येथें इतके कागदपत्र पाहून झाल्यावर उशीर झाला म्हणून आम्हीं आपल्या उतरण्याच्या ठिकाणीं आलों.

सुमारें एक वाजतां एक पडाव करून आम्ही रा. लेले यांचे समवेत गोदी पहावयास निघालों. सुमारें दोन मैल खाडींतून जावयाचें होतें. वारा अनुकूल असल्यानें व भरतीही थोडी फार असल्यामुळें आम्ही लवकरच गोदीच्या ठिकाणीं आलों व जवळच किनाऱ्यावर उतरलों. गोदीच्या आसपास आतां पुष्कळ गवत उगवलेलें आहे. पण आम्ही गवतांतून गोदीच्या तोंडाशीं आलों तों ती प्रशस्त गोदी दृग्गोचर झाली. गलबतें आंत येण्यास खाडीच्या बाजूनें चांगला दगडांनीं उत्तम बांधलेला दरवाजा होता. ही गोदी लांबट चौकोनी आहे. २५५ फूट लांब व २२७फू. रुंद आहे. यांत ५००टनाचीं गलबतें येऊं शकत. ही गोदी टेंकड्यांमधील खडक खोदून तयार केली आहे व यामुळें पश्चिम पूर्व व दक्षिण या तीन्ही बाजूंला टेंकडीचा

आडोसा आहे. गोदीचें तोंड उत्तरेस आहे. यामुळें येथें गलबतांना वाऱ्यापासून किंवा वादळापासून त्रास होणें शक्य नाहीं. गोदी-शेजारीं गलबतें बांधण्याचें व डोलकाठ्याचें अशीं दोन दालनें होतीं. पण त्यांचा आतां मागमूसही दिसत नाहीं. या गोदीची उत्त-रेची बाजू व गोदीचें तोंड हीं उत्तम तांबड्या दगडांनीं बांधलेलीं आहेत. गोदीचें तोंड वरच्या बाजूस ३० फूट असून खालच्या बाजूस २३ फूट आहे. आपल्या लोकांनीं गलबतांच्या सोईकरितां अशा प्रकारच्या गोद्या बांधलेल्या मीं पूर्वीं कधींच पाहिलेल्या व ऐकलेल्या नसल्यामुळें मी गोदी पाहून आश्चर्यानें थक्क झालों. पूर्वकाळीं आरमारी व दर्यावर्दीपणाचें ज्ञान आपल्या लोकांत किती होतें हें यावरून दिसून येतें असें मला वाटलें. ही गोदी विजयदुर्ग ही आंग्र्यांची राजधानी असतांना बांधलेली होती असें कळलें

उशीर होत चालला तेव्हां पूर्वकाळच्या आपल्या लोकांच्या ज्ञाना-बद्दल, त्यांच्या कल्पनेबद्दल व त्यांच्या धाडसाबद्दल कौतुक करीत आम्ही आपल्या पडावावर चढलों; परत येतांना वारा उलट असल्यामुळें नावाड्यांनीं प्रथम खाडीच्या दुसऱ्या तीराला तिरकस गलबत नेलें व मग पुनः शीड बदलून किल्ल्याच्या अगदीं पायथ्याशीं गलबतांतून आम्हांला उतरविलें. आम्ही आमच्या बिऱ्हाडीं गेलों व तेथें अर्धा पाऊण तास विश्रांति घेऊन विजयदुर्ग किल्ला पाहण्यास निघालों.

**विजयदुर्ग** किंवा **घेरीयाचा** किल्ला **वाघोटन** खाडीच्या दक्षिण बाजूच्या एका समुद्रांत घुसलेल्या टेकडीच्या टोंकावर बांधलेला आहे. यामुळें समुद्राकडून पाहतांना हा किल्ला पाण्यांतील किल्ला किंवा जंजिरा आहे असा भास होतो. समुद्रावरून दिसणारा त्याचा देखावा किल्ल्याची अभेद्यता मनाला पटविणारा आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची; त्याचे समुद्राच्या थेट पाण्यांत बुडालेल्या तांबड्या प्रचंड दगडाचे मजबूत तट; जागोजाग वर्तुलाकार पुढें आलेले ते बुरुज; बुरुजाच्या तटांतील ती तोफा मारण्याचीं हिंस्र प्राण्याच्या भीषण जबड्याप्रमाणें भासणारीं

झोकें; एकावर एक दिसून येणारे ते तट; एका बाजूस तीन मजली प्रचंड बुरुज; किल्ल्याच्या या सर्व गोष्टी प्रथमतः किल्ल्यावर दृष्टि फेकणाराला आश्चर्यचकित करून सोडतात यांत शंका नाहीं.

आम्ही किल्ल्याच्या पहिल्या तटाच्या दरवाजांतून आंत गेलों. तट व दरवाजा अगदीं बंदराला लागून असून सपाटीवरच आहे. आंत गेल्यावर उंचावर दुसरा तट दिसूं लागतो; रस्ता चढावाचा आहे. दुसरा दरवाजा पहिल्यापेक्षांहि मोठा असून त्याच्या दोन्ही बाजूंस बुरुज आहेत. त्याच्या भिंती कांहीं ठिकाणीं स्वाभाविक खडकाच्या खोदून केलेल्या आहेत; त्यावर आणखी बांधकाम केलेलें आहे. या प्रांतांत मुबलक असलेल्या तांबड्या दगडाचा केलेला सर्व तट आहे, यामुळें हा किल्ला पाहिला, कीं, दिल्लीआग्र्याच्या किल्ल्याची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं; कारण ते किल्लेही असेच तांबड्या दगडाचे आहेत. दिल्लीआग्र्याकडे मिळणारा तांबडा दगड जास्त सफाईदार दिसतो व त्यावर नक्षीकामही उत्तमप्रकारें करतां येतें तसें कोंकणांतील तांबड्या दगडावर करतां येत नाहीं; तरी दुरून हा किल्लाही त्याच्या रंगामुळें महाराष्ट्रांतील इतर किल्ल्यांपेक्षां फार प्रेक्षणीय दिसतो यांत शंका नाहीं. दुसऱ्या दरवाज्यांतून आंत जाण्यास बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात व मग तिसरा दरवाजा लागतो. या दरवाज्यावर तर मोठा थोरला मजला आहे. जिना चढून गेल्यावर दोन चांगल्या प्रशस्त खोल्या लागतात. हल्लीं त्या खोल्यांना अर्वाचीन तऱ्हेचें खुर्च्या, टेबलें इत्यादि सामान ठेवून डाकबंगल्याचें स्वरूप आणलेलें आहे. दरवाज्यावरील इमारती टाकून पुढें गेलें म्हणजे मोडक्या तोडक्या इमारती लागतात. दोन मोठीं प्रचंड धान्याचीं कोठारें म्हणून दाखविण्यांत येतात. आतां त्यांच्या फक्त सभोंवारच्या चार भिंतीच शिल्लक आहेत. वरचें छप्पर पडून गेलेलें असावें. नंतर आम्ही तिसऱ्या तटाच्या बाजूनें पश्चिमच्या बाजूपर्यंत चालत गेलों. तट फारच रुंद आहे. यामुळें तटासभोंवतीं फिरण्यास प्रशस्त मार्ग आहे. हा सर्व मार्ग बारीक दगडाचा चूर व चुना यांच्या मिश्रणानें मढविलेला आहे.

इतक्या काळानंतरसुद्धां वारा, पाऊस, हवा, ऊष्णता इत्यादि नाशकारक कारणांना दाद न देतां ही लादी अजून इतकी शाबूद व अभग कशी राहिली याचें पदोपदीं आश्चर्य वाटतें. तटावरून जातांना बुरुज लागतात. येथें अर्थात् वर्तुळाकार असा मोठा मार्ग झालेला आहे. प्रत्येक बुरुजाचे प्रारंभीं पाण्याकरितां केलेलें एक टाकें लागतें. तें रखवालदार शिपायांना पाणी ठेवण्याकरितां असलें पाहिजे हें उघड आहे. थेट पश्चिमेस आल्यावर समोर आपल्याला अफाट समुद्राचें हिरवें निळसर पाणीचपाणी दिसतें. आतां सायंकाळ होत चालली होती यामुळें सूर्यनारायणही क्षितिजाखालीं जावयाच्या बेतांत होता; याचवेळीं देवगडाकडून येणारी बोट बंदरांत शिरण्याकरितां आमच्या समोरूनच चालली होती. हा सर्व देखावा त्याक्षणीं तर आम्हांला आल्हाददायक वाटला पण किल्ल्याची कौशल्याची योजना पाहून आश्चर्य वाटलें. खरोखर या किल्ल्याच्या माऱ्यांतून समुद्रकिनाऱ्यानें जाणारीं येणारीं गलबतें सुटणें शक्य नाहीं. कारण हा किल्ला समुद्रसपाटीपासून शंभर फूट उंच असल्यामुळें येथून माऱ्याचें अंतर ज्यास्त आहे व बऱ्याच लांबवर गलबतें दिसण्याची सोय आहे. या पश्चिमेच्या बाजूचा एक बुरुज व तटाचा कांहीं भाग बराच ढासळलेला दिसला. हा दुरुस्त न केल्यास लवकरच पडून जाईल यांत शंका नाहीं. पण हल्लींच्या काळांत किल्ल्यांचें महत्त्व कमी झाल्यामुळें या गोष्टीकडे सरकारचें लक्ष कसें जावें. पण पुराणवस्तुखात्याकडून या किल्ल्याच्या तटाची तात्पुरती तरी डागडुजी होणें अवश्य आहे असें मला वाटलें. पश्चिमेकडील एका बुरुजाखालीं समुद्राच्या अगदीं पाण्याशीं जाण्याकरितां एक दार दिसलें. आतां हें दार बरेंच ओहोरून गेलें आहे व तेथें निवडुंगें फार वाढलीं आहेत, यामुळें आम्हांला तेथपर्यंत जातां आलें नाहीं. तसेंच दक्षिणेकडच्या तटाकडे जाण्यासही चांगला मार्ग नव्हता म्हणून आम्हीं येथून थोडें मागें परतलों व या तटाशेजारीं असलेल्या एका जुन्या इमारतीकडे गेलों. ही इमारत जुनीच आहे. हिचा पहिला मजला तळघरवजा जमिनींत खोल

बांधलेला आहे. आंत उतरल्यावर प्रशस्त असें दालन लागतें. यांच्यावर एक मजला बांधला आहे, पण तो अर्वाचीन तऱ्हेचा असून पब्लिकवर्क्स खात्याकडून बांधलेला आहे. या मजल्यावर प्रशस्त दालनें आहेत; त्यांत स्नानगृह, निजावयाच्या खोल्या वगैरे अर्वाचीन तऱ्हेची व्यवस्था असून टेबलें व खुर्च्या आहेत. गव्हर्नर साहेब किंवा असेच दुसरे बडे पाहुणे किल्ला पाहण्यास आले म्हणजे या ठिकाणींच उतरतात असें आम्हांस समजलें. या मजल्याच्या समोरच समुद्राकडे तोंड करून असलेली मोठी गच्चीवजा जागा आहे. येथूनही समुद्राचा देखावा अवर्णनीय दिसतो. आम्ही या गच्चीवर किती वेळ तरी समुद्राची मजा पहात बसलों होतों. संध्याकाळ असल्यामुळें समुद्राच्या सपाटीवर लहान मोठ्या लाटा उसळत होत्या. त्यामुळें पाण्यावर फेंस तरंगत होता. कितीतरी लहानमोठ्या होड्या समुद्राकडे चालल्या होत्या. या होड्या मासे धरण्याकरितां चालल्या आहेत असें आम्हांला सांगण्यांत आलें. तो मासे धरण्याचा हंगाम होता. या दिवसांत कोळी, गाबीट वगैरे लोकांचा सर्व रात्रभर मासे धरण्याचा उद्योग चाललेला असतो. किनाऱ्यापासून तों थेट दूरवर समुद्रांत अशा कामांत गुंतलेल्या हजारों होड्या आम्हीं त्या सायंकाळीं पाहिल्या. बराच वेळ त्या गच्चीवरून दिसणारा अद्वितीय देखावा पाहून झाल्यावर आम्ही खालीं उतरलों. या इमारती शेजारींच भला थोरला खोल चौकोनी तलाववजा हौद चुन्यानें उत्तम बांधलेला आमच्या दृष्टीस पडला. आतां तो नादुरुस्त असल्यामुळें त्यांत पाणी नव्हतें. पण पूर्वीं पाणी असतांना हा हौद पोहण्यास चांगला उपयोगीं पडत असला पाहिजे असें आम्हांला वाटतें. येथून किल्ल्याच्या पूर्व दरवाज्यावर असलेला तीन मजली बुरुज अगदीं नजीक दिसत होता. पण जिना पार पडून गेला असल्यामुळें वर जाण्याची सोय नव्हती. हौद सोडून जरा पुढें आलों तों वर्तुळाकार अशी एका पातळींत केलेली नवी फरशी दृष्टीस पडली. ही फरशी कांहीं वर्षांपूर्वीं पूर्ण खग्रास सूर्यग्रहणाचे शोध घेण्याकरितां जे परदेशस्थ ज्योतिषशास्त्रज्ञ आले होते त्यांच्याकरितां

केली होती असें मला कळलें; त्यावेळीं ती मंडळी जवळ जवळ एक महिना त्या किल्ल्यावर राहिली होती. ही जागा फार उंच व समुद्र-कांठींच असल्यामुळें वेध घेण्यास फार चांगली व जागेच्या अक्षांशांवर सूर्यग्रहण उत्तम तऱ्हेनें दिसणार होतें म्हणून हें ठिकाण तात्पुरती वेध-शाळा ( घाटावरील जेऊर प्रमाणें ) बनविण्यांत आलें होतें, असें सांगण्यांत आलें.

या सपाटीवरून जरा पुढें गेलें म्हणजे बराच बिकट असा मातीचा बुरुज लागतो. याला **बावटा बुरुज** म्हणतात. यावर आम्ही मोठ्या कष्टानें चढलों. वर सपाट जागा अगदीं थोडी आहे. पण येथून किल्ल्याच्या चारी बाजूचा देखावा दिसतो. पूर्वेकडे तो लहानसा गांव, पश्चिमेकडे अफाट समुद्र, उत्तरकडे **वाघोटनची** खाडी व त्याच्या पलीकडे **जैता-पुरचें** बंदर व डोंगर व दक्षिणेकडे गांवचा कांहीं भाग, नारळाच्या झाडांची रांगचीरांग हा सर्व देखावा प्रेक्षणीय नाहीं असें कोण म्हणेल? आतां काळोख पडावयाची वेळ झाली म्हणून आम्हीं त्या बावटा बुरु-जावरून खालीं आलों व त्या बुरुजाशेजारच्या दरवाज्यानें उतरून परत बंदराकडे येऊन बिऱ्हाडीं गेलों. झालें. या किल्ल्याच्या सद्यःस्थितीचें निदर्शन संपलें. आतां आपण त्याच्या पूर्वपीठिकेकडे थोडें लक्ष देऊंया.

हा किल्ला कधीं बांधला याचा उल्लेख सांपडत नाहीं. पण तो विजा-पुरी बादशाही पूर्वीच्या हिंदू राजांच्या कारकीर्दींतील असावा असा तर्क केलेला आहे. कोंकणप्रांत विजापुरकरांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं तो दुरुस्त केला असावा. पण किल्ल्याचे हल्लींचे तीन प्रचंड तट, त्याचे ते मजबूत बुरुज व आंतल्या पुष्कळ इमारती या शिवाजीनें बांधल्या यांत शंका नाहीं. पण शिवाजीच्या मरणानंतर हा किल्ला कुलाब्याच्या आंग्र्यांच्या ताब्यांत आला व १६९८ मध्यें विजयदुर्ग ही त्यानें आपली राजधानी केली. आंग्र्यांचें आरमार म्हणजे सर्व कोंकणप्रांताला दरारा होता. युरोपियन व्यापारी आंग्र्याला भीत असत. १६९८ पासून १७५६ पर्यंत दोन चार वेळा इंग्रजांनीं, डच लोकांनीं व पोर्तुगीझ

लोकांनीं विजयदुर्ग काबीज करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आलें नाहीं. पण १७५६ मध्यें पेशवे व इंग्रज यांनीं जमिनीकडून व समुद्राकडून असा एकदम मारा करण्याचें ठरविलें व यावेळीं मात्र आंग्र्यांस शरण जाणें भाग पडलें. आंग्र्याचें सर्व आरमार जळून गेलें; विजयदुर्ग किल्ला काबीज केला त्यावेळीं किल्ल्यांत बारा लाखांची लूट मिळाली असें म्हणतात. विजयदुर्ग हा किल्ला इंग्रज सरकार आपल्याकडे ठेवूं पहात होतें; पण पूर्वकराराप्रमाणें तो पेशव्यांकडे आला. मग पेशव्यांनीं विजयदुर्ग हें आरामाराचें ठाणें केलें व **आनंदराव धुलप** याला आरामाराचें मुख्य नेमलें. या धुलपाचे वंशज अझून विजयदुर्गांत आहेत हें मागें सांगितलें आहे. आंग्र्याप्रमाणें धुलपांच्या अमदानींतही विजयदुर्ग हें चांचेगिरीकरितां प्रसिद्ध असे. १८१८ मध्यें इतर कोंकणप्रांताबरोबर हा किल्ला कायमचा इंग्रज सरकारच्या ताब्यांत आला.

शिवाजीनें नवीन ठिकाण शोधून काढून नवा किल्ला बांधलेलें ठिकाण मालवण व जुना किल्ला पुष्कळ मजबूत करून ठेवलेलें ठिकाण विजयदुर्ग यांची सांगण्यासारखी कहाणी संपली.

# चक्कर ८ वें

## सुभेदार मल्हाररावांचें जन्मग्राम

कोठें **विंध्य** पर्वतापलीकडील सपाट, सुपीक, सुजल, काळरानी व निश्चित पावसाळी **माळवा** प्रांत तर कोठें **शंभुमहादेवाच्या** डोंगराच्या रांगेपलीकडील उंचसखल, अल्पपीक, दुर्जल, माळरानी व अनिश्चित पावसाळी **फलटणचा प्रांत**. कोठें **सातपुडा** व **विंध्य** या पूर्वपश्चिम जाणाऱ्या समांतर पर्वतराजींच्या मधल्या खोऱ्यांतून वाहणारी, अरबी समुद्राला मिळणारी **नर्मदानदी** व तिच्या कांठचें पुरातन मोठें शहर **महेश्वर**, तर कोठें **कातरज** घाट, **दिवाघाट**, असलेल्या **बोपदेव** डोंगराच्या व **शंभुमहादेवाच्या** डोंगराच्या पूर्वपश्चिम जाणाऱ्या समांतर रांगांच्या खोऱ्यांतून वाहणारी **भीमा** नदीला मिळणारी **नीरा** नदी व तिच्या कांठचें खेडेगांव **मुरूम** ! पण **महेश्वर** व **मुरूम** या दोन विसदृशं व दूर दूर असलेल्या ठिकाणांचा एका ऐतिहासिक गोष्टीनें कायमचा व कधींही न बदलणारा संबंध घडून आला आहे. अर्थात् ती ऐतिहासिक गोष्ट म्हणजे होळकर घराण्याचा प्रख्यात प्रस्थापक सुभेदार **मल्हारराव होळकर** यांचें जन्मग्राम **मुरुम** व त्याची पहिली राजधानी **महेश्वर** होय. मल्हाररावांचें जन्मग्राम व त्याची सद्यःस्थिति यांची प्रत्यक्ष पाहून मिळविलेली माहिती या चक्करांत देण्याचा विचार आहे.

पण सुभेदारांच्या जन्मग्रामाची माहिती देण्यापूर्वी तें गांव ज्या प्रांतांत आहे त्याची व त्या गांवाला जाण्याच्या मार्गाची थोडीशी माहिती देणें अप्रासंगिक होणार नाहीं. मालवप्रांतीय मनुष्यास **मल्हाररावाच्या** जन्मग्रामाचें दर्शन घेण्याकरितां **पुण्यास** आलें पाहिजे. तेथून पुढचा प्रवास एका दिवसाच्या आंतलाच आहे.

पुणें स्टेशनहून मद्रास व सदर्न मराठा रेल्वेची आगगाडी सकाळीं साडेसात आठाच्या सुमारास निघते. ती तीन साडेतीन तासांनीं **लोणंद** स्टेशनला येते. **पुण्यापासून लोणंद** त्रेपन मैल आहे. पुण्यापासून दहा बारा मैलांच्या अंतरावर लेखाचे प्रारंभीं उल्लेखिलेली **बोपदेव** डोंगरांची रांगच रांग लागते. हा भाग डोंगराळ असून फार रुक्ष, निर्वृक्ष व नापीक आहे. डोंगरसुद्धां उघडे–बोडके असून केवळ खडशा मुरमाचे व खडकाचे बनलेले आहेत. या डोंगरांच्या रांगेंतून आगगाडीचा रस्ता विलक्षण वळणावळणानें वर चढत गेला आहे. डोंगर चढून गेल्यावर उंचसखल माळरानाचें खोरें लागतें. यामध्यें मधूनमधून शेतजमीन व तुरळक तुरळक बागा व मळे लागतात. या खोऱ्यांतून **नीरा** नदी वहात गेली आहे. या नदीच्या वरच्या बाजूस दोन तीन नद्यांच्या संगमाचे ठिकाणीं **भाटघरचा** प्रचंड पाणी सांठवणीचा तलाव बांधला आहे. त्यांतील पाणी नदीवाटे **वाल्ह्यापर्यंत** येतें, तेथून **नीरा** नदीच्या दोन्ही तीरांना मोठमोठे नवेच कालवे काढलेले आहेत. या प्रचंड धरणामुळें **नीरा** नदीचें हें खोरें आतां लागवडीस येऊन जागोजाग मळे, बागा व शेतें दिसूं लागलीं आहेत. आणखी कांहीं वर्षांनीं या भागाचा रुक्षपणा नाहींसा होऊन येथें जिकडे तिकडे उंसाचे मळेच मळे दिसूं लागतील. **नीरा** नदीचा उत्तर कालवा ओलांडून मग **नीरेच्या** मोठ्या पुलावरून आगगाडी जाते, नंतर नीरेचा पहिल्यापेक्षांही मोठ्या कालव्यावरील पूल लागतो मग **लोणंद** हें स्टेशन येतें.

नीरानदी ही पुणें जिल्हा व सातारा जिल्ह्यांतील **फलटण** संस्थान यांची सरहद्द आहे. **लोणंद** स्टेशन हें सातारा जिल्ह्यांतील ब्रिटिश मुलखाचे हद्दींत आहे. रेल्वे होण्याचे पूर्वीं हें अगदीं भिकार खेडेगांव होतें, पण रेल्वेमुळें गेल्या तीस वर्षांत हें मोठें व्यापाराचें गांव झालेलें आहे. येथें सर्व बाजूचा माल येतो व येथून आगगाडीनें दूरदूर प्रांताला पाठविला जातो. येथें तांदुळाची मोठी पेठ झालेली आहे. कोंकणांतील कुलाबा जिल्ह्याच्या **महाड** या तालुक्याच्या ठिकाणापासून थेट **पंढरपूर**

**पर्यंत** एक मोठा प्रांतिक गाडीरस्ता जातो. **लोणंद** हें त्या रस्त्यावरील उतारपेठेचें गांव आहे.

**लोणंद** गांवापासून **फलटण** ही राजधानी फक्त १७ मैल आहे. **फलटण** हें संस्थान महाराष्ट्रांतील फार जुन्या संस्थानांपैकीं एक आहे. त्याची स्थापना सात आठशें वर्षांपूर्वींची आहे. या संस्थानचा मूळ संस्थापक **परमार** ( पवार ) राजघराण्यापैकीं असून त्याचें इकडील गांवावरून **नाईक निंबाळकर** असें नांव पडलेलें आहे. या घराण्याची मराठी राज्याचे प्रस्थापक शिवाजी महाराज यांच्या घराण्याशीं दोन तीनदां सोयरीक घडून आलेली आहे. शिवाजी महाराजांची एक राणी या घराण्यांतील कन्या होती. **लोणंद** गांवाला लागून फलटण संस्थानची हद्द सुरू होते व सुभेदार **मल्हाररावांचें** जन्मग्राम या संस्थानचे हद्दीमध्यें आहे. मल्हाररावांचें मूळ घराणें हें फलटण संस्थानची प्रजा होतें व अजूनही आहे हें पुढील हकीकतीवरून समजून येईल.

**लोणंद** स्टेशनपासून **मल्हाररावाचें** जन्मग्राम दहा अकरा मैल दूर असून तें **नीरा** नदीच्या दक्षिण तीराला आहे. लोणंदपासून पूर्वेस **महाड पंढरपूर** रस्त्यानें सात आठ मैल जावयाचें. येथपर्यंत सर्व्हिस मोटार मिळते. पुढें बांधलेला रस्ता नाहीं, यामुळें पायीं चालत जावें लागतें. उन्हाळ्याच्या दिवसांत शेतांतून गांवानजीक मोटार जाऊं शकते. तरी-सुद्धां अर्धा पाऊण मैल पायीं चालावें लागतेंच. हा सर्व भाग माळरानी असल्यामुळें उंचसखल आहे. यामुळें लहान लहान ओढे वाटोवाट लाग-तात. या भागाच्या उत्तरेस **बोपदेव** डोंगरांची रांगच रांग दिसते, तर दक्षिणेस **शंभुमहादेवाच्या** डोंगरांची रांगच रांग दृष्टीस पडते. या दोन्ही डोंगरांच्या रांगा दक्षिणोत्तर लांबचलांब पसरलेल्या **सह्याद्रि** पर्वताच्या पूर्वपश्चिम जाणाऱ्या शाखाच होत. **नीरा** नदी या दोन रांगांनीं परिवेष्टित अशा खडकाळ माळरानी उंचसखल खोऱ्यांतून वहात गेलेली आहे. म्हणून **शंभुमहादेवाच्या** डोंगराकडून जमिनीला उत्तरेकडे **नीरा** नदीपावेतों सारखा उतारच आहे. **नीरा** नदीला काढ-

लेला दक्षिण कालवा हा अर्थात् जितक्या उंचवटयाच्या जागेंतून नेणें शक्य आहे तितका उंचवट्यावरून नेला आहे. त्यामुळें **नीरा** नदी व कालवा यांमध्यें बरीच जमीन सांपडली आहे व या जमिनींत हल्लीं उंसाची लागवड चालू झाली आहे व नजीकं साखरेच्या कारखान्याचें बांधकाम चालू आहे. **महाड–पंढरपूर** सडक टाकून जरासें उत्तरेकडे वळलें कीं लागलाच नीरेचा दक्षिण कालवा लागतो. केवढा प्रचंड हा कालवा आहे ! हा कालवा जवळ जवळ दीड दोनशें मैल लांबपर्यंत गेला आहे. खुद्द कालवा चाळीस फूट रुंद आहे. त्याचे दोन्ही बाजूंस उंच उंच मातीचे बंधारे घातले आहेत व त्या बंधाऱ्यांपैकीं सोयीप्रमाणें केव्हां उत्तर बाजूच्या बंधाऱ्याला तर केव्हां दक्षिण बाजूच्या बंधाऱ्याला लहानशी पण एक मोटार जाईल अशी सडक कालवातपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या उपयोगाकरितां केली आहे. या बंधाऱ्यांनीं सडकेनें मिळून चाळीस फूट जागा अडली आहे व कालव्याच्या बंधाऱ्याच्या व सडकेच्या पलीकडे साठसाठ फूट जागा कालव्याच्या अनुषंगिक आपोआप होणाऱ्या बाभळीच्या झाडांकरितां राखून ठेविली आहे. असा हा दोनशें फूट रुंदीचा व दोनशें मैल लांबीचा कालवा आहे. कालव्यावरून दोन्ही बाजूंच्या गांवांच्या सोयीकरितां दोन दोन तीन तीन मैलांचे अंतरावर तीन तीन कमानींचे सुंदर पूल सर्व कालव्याच्या लांबीभर बांधलेले आहेत. या कालव्याच्या पुलावरून सभोंवारची विलक्षण सृष्टिशोभा दिसते. तो संथपणें व शांतपणें वाहणारा रक्तवर्ण पाण्याचा प्रवाह, दोन्ही बाजूचे गवतानें हिरवेगार दिसणारे मातीचे बांध, बांधावरील ती सुंदर रेताळ सडक, बांधाच्या बाजूनें दाट वाढलेलें बाभळबन व त्या पलीकडील खुलास व मध्यें मध्यें मळे असलेला भूमिभाग हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे मनुष्याचें मन आनंदानें व आश्चर्यानें उचंबळून आल्याखेरीज रहात नाहीं. या कालव्याच्या बांधाच्या सडकेनें थोडा वेळ चालून मग कालवे सोडून उत्तरेच्या दिशेनें नदीकडे पायीं चालत जावें लागतें. ही

पाउलवाट उंसाच्या मळ्यांमधून गेली आहे. यामुळें दोन्ही बाजूंस हिरवे हिरवे दाट ऊंसच ऊंस दृष्टीस पडतात. हा भूमिभाग काळसर जमीनीचा असल्यामुळें व नुकताच पाऊस पुष्कळ पडल्यामुळें व मी गेलों त्या दिवशीं पावसाची बुरबुर चालू असल्यामुळें आम्हांला चिखल तुडवीत गांवापर्यंत जावें लागलें.

या गांवाचें नांव **मुरूम**. या गांवची वस्ती सुमारें तीनशें असावी. येथें दोन यत्तेची एक मराठी शाळा आहे. त्यांत पंचवीस तीस मुलें-मुली शिकतात. शाळेजवळ एक नवें दुरुस्त केलेलें मारुतीचें देऊळ आहे. गांवाला लागून **नीरा** नदी आहे. या देवळाच्या जरा अलीकडे एका घराच्या दगडी भिंतीला लागून लहानशी खुली जागा आहे. त्या सभोंवतीं नुकतेंच एक काटेरी तारेचें कुंपण घातलें आहे व आंत पत्र्याची एक लहानशी खोली व तिच्यापुढें खुला व्हरांडा आहे. दाराच्या वर नवाच एक संगमरवरी शिलालेख भिंतींत बसविला आहे व त्यावर सुभेदार **मल्हारराव होळकर** यांचें व होळकर दरबारचें नांव कोरलें आहे व खोलीमध्यें मल्हाररावांची एक तसबीर आहे व दुसरा एक सचित्र नकाशा सारखा जाड पुठ्यावर छापलेला कागद चिकटविलेला आहे व त्यामध्यें सुभेदार मल्हारराव यांच्या आयुष्यांतील कांहीं यशस्वी मोहिमांची माहिती दिलेली आहे. हेंच सुभेदार मल्हाररावांचें जन्मठिकाण. येथून नदीच्या बाजूस गेलें म्हणजे सटवाईचें एक अगदीं लहान दगडी देऊळ लागतें. त्यावर तें होळकरांचें देऊळ असा मजकूर व बांधणाराचें नांव ओबड धोबड अक्षरांनीं कोरलेलीं आहेत. सन पुष्कळ अर्वाचीन आहे. तेव्हां तो देवळाचा जीर्णोद्धार केल्याच्या वेळचा असावा असें वाटलें. येथून आम्ही अगदीं नदी कांठाला व गांवाच्या जरा खालीं गेलों. तेथून **नीरा** नदीचा प्रवाह सारखा चालू होता. नदीच्या पलीकडे पुणें जिल्ह्यांतील ब्रिटिश हद्दीमध्यें असलेलें **होळ** गांव दिसत होतें. हा गांव बराच मोठा व पुष्कळ उंचवटयाच्या जागेवर बसलेला दिसला. येथें चांगलीं दगडी कवलारू घरें व वाडे आहेत असें

दिसत होतें. आम्ही उभे होतों तेथें एक झाड होतें व त्याच्या सभोंवार उंचवटा असून त्यावर जुने दगड रचून पांच-चार पायऱ्या केल्या होत्या व झाडांखालीं महादेवाची एक पिंडी होती. हें **मल्हारेश्वराचें** देऊळ मल्हार-रावाच्या जन्मापूर्वींपासूनचें होतें. पण तें पुरानें वाहून पडून गेलें होतें. गांवकऱ्यांनीं ते पडलेले दगड रचून देवळाची जोतेवजा उंचवट्याची जागा तयार केली होती व झाडाखालीं व झाडाच्या सांवलींत शंकराची पिंडी व मूर्ति ठेवली होती. जोतेवजा रचलेल्या एका लांब व रुंद वरच्या दगडावर खालील अक्षरें दोन ओळींत खोदलेलीं आहेत.

"शके १७१२ माघ शु॥ १५ मल्हारेश्वर महादेव श्रीमंत सरकार अहिल्याबाई होळकर" यावरून सध्यांचें देऊळ कदाचित् अहिल्या-बाईच्या काळीं दुरुस्त करण्यांत आलें असेल. होळकर सरकारच्या पुणें व सातारा जिल्ह्यांतील मालमत्तेचा व्यवस्थापक **जेजुरीस** राहतो. **मुरुम** गांवीं गणपती न्हावी नांवाचा एक इसम होळकरांच्या वतीनें **मुरुम** गांवांतील जमीनीची व चौगुलेपणाची व्यवस्था सध्यां पहातो. मल्हारराव होळकरांचा बाप **मुरुम** गांवचा चौगुला ( पाटील-कुलकर्ण्यांचें दप्तर वागविणारा माणूस ) असावा. या गांवांत सुमारें नव्वद एकर रयतावा ( सरकारसारा भरणाऱ्या रयतवारी पद्धतीची ) व सुमारें पन्नास पंचावन एकर इनामी अशी एकंदर दीडशें एकर जमीन हल्लीं होळकर सरकारच्या मालकीची आहे. संस्थान फलटणच्या दप्तरीं श्रीमंत तुकोजीराव होळकर असेंच नांव अझून चालू आहे. होळकर सरकारमार्फत **मुरुम** गांवीं अनाथपंगू वगैरे लोकांकरितां एक अन्नछत्र चालू आहे. त्यांत गांवांत बाहेरून येणाऱ्या ( नेहेमीं गांवीं रहाणाऱ्या नव्हे ) अनाथपंगू वगैरेसारख्या माणसांना कोरान्न ( शिधा ) दिला जातो. इतकी माहिती आम्हांला गणपती न्हावी ( होळकर सरकारच्या वतीनें मुरुम येथें चौगुल्याचें काम करणारा ) यांचेकडून व **मुरुम** गांवच्या सरकारी कुळकर्ण्याकडून मिळाली. **मुरुम** गांवापासून एका मैलावर **होळ** म्हणून एक गांव आहे. पण तें मुरुम गांवांपेक्षांही लहान आहे व

तेथें होळकरांची जमीनजुमला किंवा दुसरी कांहीं एक सामक्षा नाहीं. तसेंच नीरानदीपलीकडील व ब्रिटिश मुलखांतील व पुणें जिल्ह्यांतील मोठ्या **होळ** गांवीं सुद्धां होळकरांचा संबंध दाखविणारें कांहीं एक नाहीं असें फलटण येथील सुशिक्षित व माहितगार माणसांच्या तोंडून मला कळलें. तेव्हां मल्हारराव होळकरांचें सध्यांच्या उपलब्ध माहितीवरून व होळकर दरबारच्या नव्याच वसविलेल्या संगमरवरी स्मारकफलका-वरून **मुरुम** हें जन्मग्राम ठरतें. **मल्हारराव** होळकरांचा बाप लहान-पणींच वारल्यामुळें आई लहान **मल्हारीला** घेऊन खानदेशांतील **तळोदे** या गांवीं आपल्या भावाकडे राहण्यास गेली व तेथून **मल्हारी** पुढें सैन्यांत शिरून मोठ्या योग्यतेस चढला व त्यानें माळवा प्रांताची सुभेदारी मिळविली व मध्य हिंदुस्थानांत एक मोठें मराठी संस्थान स्थापन केलें. **मल्हारीच्या** आईनें **मुरुम** हें आपलें मूळगांव असें न सांगतां **मुरुम** गांवानजीक अस-लेलें लहान **होळ** व **मुरुम** गांवाच्या समोरच नदीपलीकडे असलेलें मोठें **होळ** अशा होळ गांवांचें नांव आपलें मूळगांव असें सांगितलें असावें व म्हणून मल्हाररावाच्या घराण्याला होळकर ( होळ गांवचे राहणारे ) असें नामाभिधान पडलें असावें असें अनुमान करण्यावांचून गत्यंतर नाहीं. असें अनुमान करणें अगदीं अनमानधपक्याचें होईल असें म्हणण्यांतही अर्थ नाहीं. कारण परक्या व दूर देशीं गेलेल्या मनु-ष्यानें आपल्या गांवचें नांव सांगतांना स्वतःच्या अगदीं लहान व अज्ञात खेडेगांवचें नांव सांगण्याऐवजीं जवळपासच्या जरा मोठ्या गांवचें नांव सांगावें हें साहजिकच आहे. अशीच गोष्ट होळकरांची झाली असली पाहिजे असें वाटतें.

सुभेदार मल्हारराव होळकरांच्या जन्मग्रामाची प्रत्यक्ष पाहून मिळ-विलेली माहिती इतकीच काय ती ! पण. या लहानशा खेड्यांत गेल्या-वर व त्या सध्यां निवळ बखळ असलेल्या जागेवर उभें राहिल्यावर होळकर घराण्यांतील दोन विख्यात विभूतींची चरित्रकथा व कर्तबगारी

यांचें मूर्तिमंत चित्र माझ्या मनश्चक्षूपुढें उभें राहिलें. माझ्या मनांत आलें, " **मल्हाररावाची** चरित्रकथा किती नवलाची आहे पहा. सन १६९४ मध्यें **मल्हारीचा** या **मुरूमगांवीं** एका सामान्य दर्जाच्या पाटील-कुलकर्ण्यांचें दप्तर वाहणाऱ्या चौगुल्या चाकरी पेशाच्या घराण्यांत जन्म होतो. लहानपणींच पित्याच्या मृत्यूमुळें **मल्हारी** पोरका पोरगा बनतो व आई त्याला आपल्या भावाकडे खानदेशांतील **तळोदे** गांवीं घेऊन जाते. तेथून त्याला सैन्यांत चाकरी मिळते. लवकर त्याचें नांव **बाजीराव** पेशव्याच्या कानापर्यंत जाऊन सन १७२५ मध्यें माळवा प्रांतांतील चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचें काम **मल्हाररावास** मिळतें. तेव्हांपासून सतत चाळीस वर्षें तो आपल्या शौर्यानें, कर्तबगारीनें व मुत्सद्देगिरीनें मराठी साम्राज्याचा एक आधारस्तंभ राहतो व मध्यहिंदुस्थानांत एक कोटी वसूलाच्या मोठ्या संस्थानाचा संस्थापक बनतो. त्याच्या हयातीपासून व त्याच्या वृद्धापकाळीं त्याची सून **अहिल्याबाई** येवढ्या मोठ्या संस्थानची अंतर्गत व्यवस्था उत्तम तऱ्हेनें ठेवते व **मल्हाररावाच्या** पश्चात् तीस वर्षेंपर्यंत होळकर घराण्यांची कीर्ती आसेतुहिमाचल पसरविते. होळकर घराण्यांतील या दोन विख्यात विभूतींची कर्तबगारी किती नवलाची व किती कौतुकास्पद आहे ! मल्हारराव ७२ वर्षें जगतो व आपल्या कर्तबगारीच्या चाळीस वर्षांच्या कारकीर्दींत तो मोठें थोरलें संस्थान स्थापन करतो व त्याला चिरस्थायी करतो. अहिल्याबाई ही ७० वर्षेंपर्यंत जगते व तीही आपल्या चाळीस वर्षांच्या कर्तबगारीच्या कारकीर्दीमध्यें आपल्या प्रजेचें उत्तम प्रकारें पालनपोषण व कल्याण करून सर्व हिंदुस्थानभर देवळें, तळीं, धर्मशाळा-घाट व अन्नछत्रें इत्यादि परोपकाराचीं व सार्वजनिक उपयोगाचीं कामें आपल्या खासगी उत्पन्नांतून करून आपली कीर्ति अजरामर करून ठेवते. १६९४ पासून १७९५ पर्यंत म्हणजे तब्बल शंभर वर्षें होळकर घराण्यांतील वरील दोन विख्यात विभूतींचा जीवनक्रम चालू राहतो. अर्थात् याच शंभर वर्षांत मराठी साम्राज्यवृक्षाचा वटवृक्षाप्रमाणें विलक्षण विस्तार होतो. पान-

पतच्या घनघोर युद्धरूपी वणव्यानें हा वृक्ष जायबंदी होतो. वणवा विझल्यानंतर त्या वृक्षाला कांहीं काळ टवटवी येते खरी; पण मूळ वृक्षाच्या खोडाला विषारी कीड लागून मूळ खोड नष्टप्राय होण्याच्या मार्गास लागतें; पण या विस्तृत वटवृक्षाच्या दूरवर पसरलेल्या शाखा मात्र तेथल्या तेथें मूळ धरून मूळ खोडाच्या जीवनरसावांचून सुद्धां जीव धरतात व मग स्वतंत्र व वेगवेगळे संस्थानवृक्ष म्हणून आजपर्यंत कायमचे टिकून राहातात. काय विलक्षण विधिघटना ही ! "पण या ठिकाणीं मल्हाररावाच्या योग्यतेनुरूप एखादें स्मारक होळकर दरबारनें कां करूं नये असा विचार मनांत आला."

अशा तऱ्हेच्या विचारतरंगाच्या मनःस्थितींत मीं **मुरुम** गांव सोडलें व सायंकाळीं **फलटणास** आलों. झालें. येथें माझें 'मल्हारराव जन्म-ग्राम' आख्यान संपलें.

# चक्कर ९ वें

## नाशिक व त्र्यंबकेश्वर

प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, मानवी हात हा हत्यारांतलें हत्यार आहे. या म्हणीचा अर्थ उघड आहे. मनुष्यानें कारागिरीची किंवा उपयुक्त कामें करण्याकरितां आपल्या बुद्धिमत्तेनें कितीही हत्यारांचा शोध लावला असला तरी त्याचा हात हें मूळचें व स्वयंपूर्ण हत्यार आहे.

जें ॲरिस्टॉटल्नें मानवी हातासंबंधीं म्हटलें आहे तें मानवी पायाबद्दलही म्हणतां येईल. मानवी पाय हें वाहनांतलें वाहन आहे. मनुष्यानें प्रवास करण्याकरितां आपल्या बुद्धिमत्तेनें कितीही वाहनांचा शोध लावला असला, तरी मानवी पाय हें मूळचें व स्वयंपूर्ण वाहन आहे. अर्वाचीन सुधारलेल्या काळांत जलद प्रवासाचीं किती तरी साधनें उपलब्ध झालीं आहेत. वेगाच्या मानानें या साधनांची परंपरा अशी ठरते. सर्वांत जुनें पण सर्वांत सावकाश चालणारें साधन म्हणजे आपली बैलगाडी होय. सामान्य बैलगाड्या तासांत दोन दोन मैल चालल्या म्हणजें फार झालें. मनुष्य पायानें बैलगाडीपेक्षां सुद्धां जास्त जलद चालतो. लांबीच्या पल्ल्याला मनुष्य सामान्यतः ताशीं तीन मैल चालूं शकतो. यापेक्षां जलद साधन म्हणजे टांगा होय. हा ताशीं सहा सात मैल जाऊं शकतो. यापेक्षां जलद म्हणजे पायगाडी होय. ती ताशीं आठ नऊ मैल जाऊं शकते. यापेक्षां जलद फटफटी होय. ती ताशीं पंधरा ते वीस मैल जाऊं शकते. यापेक्षां जलद चालणारी मोटार गाडी होय. ही ताशीं वीस ते तीस मैल चालते. आगगाडी ताशीं तीस ते चाळीस मैल चालते. अलीकडे निघालेल्या पण अजून प्रवासांत

उपयोगांत न आलेल्या विमानाचा वेग तर ताशीं शेंकडो मैलांचा आहे. याप्रमाणें वेगाच्या मानानें साधनांची परंपरा म्हणजे बैलगाडी, पायीं चालणें, टांगा, पायगाडी, मोटार फटफटी, मोटारगाडी, आगगाडी व विमान ही होय. परंतु पृथ्वीवरील प्रदेशाचें ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीनें किंवा सृष्टिसौंदर्य अनुभवण्याच्या दृष्टीनें या साधनांचा उलट क्रम आहे असें म्हटलें तरी चालेल. विमानांतून भयंकर वेगानें प्रवास करतांना खालचा प्रदेश मुळींच दिसत नाहीं व प्रदेशांतील निरानिराळे भाग मुळींच ओळखतां येत नाहींत असें म्हणतात. आगगाडीनें जातांना सुद्धां हाच अनुभव येतो. म्हणजे प्रदेशाचें यथार्थ ज्ञान अशा जलद प्रवाससाधनानें होत नाहीं. जलदीच्या प्रवाससाधनाची ही कमतरता कालिदासानें रथाच्या वेगाचें वर्णन करण्याच्या भरांत न कळत पण मोठ्या मजेदार रीतीनें दाखविली आहे.

> यदालोके सूक्ष्मं व्रजति सहसा तद्विपुलताम्
> यदर्धे विच्छिन्नं भवति कृतसंधानमिव तत् ।
> प्रकृत्या यद्वक्रं तदपि समरेखं नयनयो—
> र्न मे दूरे किंचित्क्षणमपि न पार्श्वे रथजवात् ॥

फार वेगवान् वाहनांतून आपण जात असलों म्हणजे लहान वस्तू मोठी दिसते, तुटलेली सांधलेली भासते, वांकडी सरळ वाटते; याप्रमाणें वेगवान वाहनांतून जातांना उलटेंच्या पालटें दिसतें. म्हणून ज्याला भूप्रदेशाचें यथार्थ ज्ञान पाहिजे असेल किंवा ज्याला सृष्टिदेवीच्या बहुरूपांचें ज्ञान करून घ्यावयाचें असेल त्यानें सावकाश जाणाऱ्या साधनाचा उपयोग करणें अवश्य आहे. एखाद्या एंजिनीयरला एखाद्या भागांतून रस्ता न्यावयाचा असल्यास त्याला पायीं चालून सर्व प्रदेश दृष्टीखालीं घातला पाहिजे तरच त्याला रस्त्याचा नकाशा बरोबर तयार करतां येईल. या दृष्टीनें सर्व प्रवासाच्या साधनांत पायगाडी ही फार सोईची आहे. पायींपेक्षां आपल्याला चालण्यापेक्षां कमी श्रम पडतात व

प्रवास जलद होतो. तरी पण पायगाडीचा वेग आपल्याच ताब्यांत असल्यामुळें हवा तसा कमी करतां येतो, पाहिजे तेथें आपल्याला थांबवतां येतें व सृष्टिशोभा पहात पहात मजेनें प्रवास करतां येतो.

मागें मी पुण्याहून साताऱ्यास सत्तर मैलांचा पायगाडीचा प्रवास केला होता. यंदाचा आमचा बेत त्यापेक्षांही महत्त्वाकांक्षी होता. पुण्याहून नाशकास पायगाडीनें जावें असें माझ्या मनांत पुष्कळ दिवस होतें. मुंबई इलाख्याच्या नकाशांत पाहिलें म्हणजे नाशिक पुण्याच्या थेट उत्तरेस आहे असें कळतें. पण हल्लीं रेल्वेनें प्रवास करावयाचा म्हणजे घाटावरून कोंकणांत बोरघाट उतरून कल्याणास जाऊन तेथून पुन्हां थळघाट चढून घाटावर नाशकास यावें लागतें; किंवा पुण्याहून दौंडास जाऊन दौंडमनमाडकडून नाशकास यावें लागतें. अर्थात् दुसरा रस्ता पहिल्यापेक्षांही जास्त लांबीचा आहे. तेव्हां पुण्याहून नाशकास सरळ रस्ता काढल्यास फार सोईचें असें मला वाटे व दोन्हीं ठिकाणें घाटावर असल्यामुळें रस्ता करणें सोपें असेंही मला वाटे. पण हा माझा भ्रम माझ्या प्रत्यक्ष अनुभवानें पार नाहींसा झाला.

हा पुष्कळ दिवसांचा बेत सिद्धीस जाण्याची संधीही आली. नाशकास प्रांतिकपरिषद् मे महिन्यांत भरण्याचें ठरलें होतें. तेव्हां प्रांतिकपरिषदेस पायगाडीनें जावें असा मीं बेत ठरविला. पुण्याहून नाशिक सुमारें एकशेंवीस मैल आहे असा माझा समज असल्यामुळें साठ साठ मैलांप्रमाणें दोन दिवसांत सहज जातां येईल असा मीं अंदाज केला परिषद् बारा मे रोजीं होती. तेव्हां दहा मे ला सकाळीं निघालें म्हणजे ११ मे च्या संध्याकाळीं नाशिकास जावयाचें असा मीं बेत केला व या प्रवासास किती मंडळी येते हें पाहूं लागलों. पहिल्यानें पांच सहा मंडळी येतील असें वाटलें, पण पुढें त्यांपैकीं बहुतेक गळली. एकदां तर सर्वच बेत रहित होण्याची पाळी आली होती व मीं आपला बेत टाकून दिल्यासारखाच होता. पण अकस्मात् हिंगण्याचे प्रो. दिवेकर

हे भेटले व सहज बोलतां बोलतां नाशकास जाण्याबद्दल गोष्ट निघाली. "पायगाडीनें जाण्याचा आपला बेत होता पण सोबतीच्या अभावीं तो टाकावा लागत आहे" असें ते म्हणाले. मीं म्हटलें, आम्हीं सुद्धां बेत केला होता. पण सोबतीच्या अभावीं आम्ही तो सोडून देणार होतों. याप्रमाणें एकच गोष्ट मनांत असलेलीं माणसें एके ठिकाणीं जमलीं व अर्थात् अर्धवट टाकलेला बेत कायम झाला. माझ्या चक्करमालेंतील माझे सोबती डॉक्टर गुणे हेही या बिकट प्रवासास येण्यास तयार झाले. अर्थात् हें आमचें पायगाडीच्या प्रवासाचें त्रिकूट तयार झालें. मात्र आमच्या कॉलेजच्या कांहीं कामामुळें आम्हांस दहा मे ला सकाळीं निघतां येईना. म्हणून दहाला सायंकाळीं चार वाजतां निघून बारा तारखेस बारा वाजेपावेतों नाशकास जाण्याचें आम्हीं मुक्रर करून प्रवासाच्या तयारीला लागलों. तयारी म्हणजे पायगाड्यांच्या दुरुस्तीची सामुग्री घेऊन पायगाड्या साफसूफ करून घेणें व बरोबर बेतावाताचे कपडे व फराळाचें घेणें ही होय.

झालें. ता. १० मे ला आमची सर्व तयारी झाली. आमचें कॉलेजचें काम तीन वाजतां संपलें. नंतर आम्हीं डॉक्टर गुणे यांच्या बंगल्यावर गेलों. तेथें चहा व फराळाचें खाऊन बरोबर चार वाजतां त्रिवर्गांनीं आपआपल्या पायगाडीवर पाय टाकला व मार्गस्थ झालों. दापोडीचा पूल ओलांडून मुंबई व नाशिक या निरानिराळ्या ठिकाणाकडे फुटणाऱ्या चवाठ्याशीं आलों व मार्गदर्शक खांबावर 'नाशिक १२४ मैल' अशीं अक्षरें पाहिलीं. आम्हीं नेहमीं फिरण्याकरितां शेंकडों वेळां या पाटीकडे पाहिलें असेल. पण त्या वेळीं एकशें चौवीस मैल संख्येचें फारसें कांहीं वाटलें नव्हतें. आतां मात्र आपल्याला पुण्याहून एकसारखा १३० मैलांचा पायगाडीचा प्रवास करावयाचा आहे हें पाहून आमच्या प्रयत्नाचा प्रचंडपणा माझ्या ध्यानांत आला. आम्हीं जुन्नरची पायगाडीची सफर केली असल्यामुळें नारायणगांवपर्यंत हा रस्ता आमच्या ओळखीचा होता व पूर्वपरिचयाचा अनुभव आम्हां

दोघांना होता. पण आमच्या त्रिकूटांपैकीं, प्रो. दिवेकर यांना सर्वच रस्ता नवा होता. आतां सायंकाळ होत चालली असल्यामुळें, वारा विरुद्ध नसल्यांमुळें व आमचा दम ताजातवाना असल्यामुळें आमचा प्रवास जोरानें चालला होता. थोड्याच वेळांत आम्हीं **भोरुरी** गांव टाकून पुढें चाललों. **मोशी** गांव टाकल्यावर लागलीच इंद्रायणीची दरी लागते व सभोंवारच्या भूभागाचा देखावा मनोहर दिसूं लागतो. या दरींत पाणी विपुल असल्यामुळें उन्हाळ्यांतसुद्धां हिरवींगार शेतें दिसतात. कारण विहिरीच्या पाण्यावर इकडे ऊंस करतात. साडेसहाचे सुमारास आम्ही **चाकण** या गांवीं आलों. रस्ता गांवचे थेट मधून जातो. **तळेगांव** स्टेशन-वरून या गांवीं रस्ता येऊन मिळतो. अलीकडे तळेगांवाहून **खेड** व **जुन्नर** या गांवांना मोटारगाडी दररोज जाते. ती **तळेगांव चाकण**-वरून जाते. येथून **खेड** फक्त सात मैल राहतें. आम्हीं रात्रीचा मुक्काम **खेडासच** करण्याचा बेत केला होता व मागें जुन्नरास जातांना आम्ही रा. आपटे वकीलांकडे उतरलों होतों, त्यांचेकडे उतरण्यास जाण्याचा विचार होता. साडेसाताच्या सुमारास आम्हीं **भीमेच्या** पुलावर आलों. भीमेचा पूल ओलांडला कीं डावेहातास खेडचा रस्ता फुटतो. मागें आम्ही येथें आलों होतों तेव्हां भीमेला मिळणाऱ्या खोल ओढ्यांच्या पुलाचें काम चाललें होतें. त्यावेळीं पूल ओलांडल्याबरोबर **खेडकडचा** रस्ता फुटे. म्हणून आम्हीं पूल ओलांडल्याबरोबर पायगाडीवरून खालीं उतरलों व थोडा वेळ चाललों. तरी रस्ता लागेना. यामुळें आम्ही रस्ता टाकून पुढें गेलों कीं काय अशी शंका आली. इतक्यांत एक गृहस्थ **खेडाहून** फिरावयास येत होते त्यांना विचारलें; त्यांनीं सांगितलें कीं जरा पुढें गेला कीं रस्ता लागेल. **खेडची** वाट लागल्यावर आम्ही पुन्हां पायगाडीवर बसलों व अगदीं गांवापर्यंत गेलों. या खेपेला माझ्या पाय-गाडीला विजेचा दिवा होता म्हणून उजेड उत्तम पडे व रात्रींसुद्धां चालण्याची पंचाईत वाटत नसे. गांवांतून आम्ही चालत गेलों व साडे-आठाचे सुमारास आपटे वकीलांचे घरीं पोंचलों. येथें डेक्कन कॉलेजचे

कांहीं विद्यार्थी पायगाडीनें आले होते. त्यांतच आमची भर पडली. पण वकीलांनीं आमचें प्रेमानें स्वागत केलें व भोजनाची तयारी असल्यामुळें हातपाय धुवून आम्हीं लागलेंच भोजन केलें. तीनचार तासांच्या पायगाडीच्या प्रवासानें भूक चांगली लागली होती, तेव्हां आम्ही भोजनाचा चांगला समाचार घेतला हें सांगणें नकोच. तरी पण इतकें खरें कीं अशा श्रमानंतर जेवण फारसें जात नाहीं. भोजनानंतर थोडा वेळ गप्पागोष्टी होऊन आम्ही निद्रावश झालों.

ता. ११ रोजीं पहांटेस आम्हांला निघावयाचें होतें म्हणून लवकर उठून मुखमार्जनविधि आटोपून व चहा फराळाचें खाऊन आम्हीं सहा वाजतां पुढल्या मार्गाला लागलों. खेड टाकल्यावर पांच सहा मैलांनीं पेठेचा घाट लागतो. **जुन्नरला** जातांना या घाटाच्या चढावानें आमचा पुष्कळ वेळ गेला होता, वारा उलट असल्यामुळें फार त्रास झाला होता व **जुन्नरला** पोंचण्यास फार रात्र झाली होती. आतां सकाळची वेळ असल्यामुळें तसा त्रास झाला नाहीं. आम्ही लीलेनें हा घाट पायीं चढत व सभोंवारची सृष्टिशोभा पहात चाललों. भूगोलज्ञानाच्या दृष्टीनें या प्रवासाचा फार मोठा उपयोग होतो. मला आतां सातार्‍यापासून नाशीकपर्यंत बरोबर दोनशें मैलांचा प्रदेश प्रत्यक्ष नजरेखालून घालतां येणार होता. हीं तिन्हीं शहरें एकाच रेषेंत आहेत असें म्हटलें तरी चालेल. सह्याद्रिपर्वताच्या प्रचंड रांगेपासून पूर्वेकडे हीं सरासरी सारख्याच अंतरावर आहेत. अर्थात् सातार्‍याहून किंवा पुण्याहून नाशकास जातांना सह्याद्रीची रांग आपल्या डाव्या हातास डाव्या बाजूच्या क्षितिजावर निळसर काळसर अशी रेघेच्या रूपानें सारखी दृग्गोचर होत असते व उजव्या बाजूच्या क्षितिजाकडे सपाटी दिसते. पण या दक्षिणोत्तर जाणार्‍या सह्याद्रिपर्वताच्या ओळीला काटकोन करून पुष्कळ डोंगरांच्या रांगा पूर्व पश्चिम गेल्या आहेत. त्यामुळेंच या दोनशें मैलांच्या रस्त्यावर लहान मोठे पुष्कळ घाट झालेले आहेत. सातार्‍याहून पुण्यापर्यंतच्या सत्तर मैलांत असे दोन मोठे घाट लागतात; पहिला घाट खंडाळ्याचा (आग-

गाडीचा बोरघाट नव्हे ) व दुसरा पुण्यानजीकच्या कात्रजचा. हे दोन्ही घाट बरेच बिकट व मोठे आहेत. पण या घाटांवर पठार असा मुळींच नाहीं. डोंगर चढतांच उतार सुरू होतो. पुण्याहून नाशकाकडे जातांना पेठचा जो घाट लागतो तो **कात्रजच्या** घाटाइतका आहे. पण त्याचेवर मोठा थोरला पठार लागतो. या पठारावरच **पेठ** गांव वसलेलें आहे व म्हणून हा घाट चढून आल्यावर पहिल्यांदा आमची फसगत झाली. इतका घाट चढून आल्यावर उतार मुळींच नाहीं असें पाहून आम्हांला चढण्याच्या श्रमाचा कांहींच मोबदला मिळाला नाहीं असें वाटून वाईट वाटलें होतें; पण आतां आम्हांला ठाऊक होतें कीं घाट चढल्यावर भयंकर असा उतार गांव टाकल्यावर लागणार आहे व मग पायगाडीवर जातांना एक प्रकारची विश्रांति मिळेल. म्हणून घाट चढल्यावर आम्ही पायगाडीवर बसलों व भराभर मैलावर मैल आक्रमूं लागलों. **पेठ** गांव टाकल्यावर तो पायगाडीवाल्यांना आनंद देणारा पण जबर उतारामुळें थोडासा धोक्याचा उतार लागला; आम्ही वायुवेगानें जाऊं लागलों व हां हां म्हणतां म्हणतां **मंचर** गांवाजवळ आलों. गांव रस्त्याच्या डाव्या हाताला राहतो. तेथून सपाटी आहे व रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं चांगली झाडी असल्यामुळें उन्हाचा फारसा त्रास होत नाहीं. **कळंब** गांवाशीं घोडनदी उतरावी लागते. या नदीला पूल नाहीं. यामुळें येथें बूट वगैरे काढून पाण्यांतून जावें लागतें. पायगाड्या आम्हीं नदीवर असलल्या एका माणसाकडून पलीकडे नेवविल्या व त्याला चिरीमिरीकरितां कांहीं दिलें. येथें आम्हीं थोडीशीं केळींही विकत घेतलीं व एकाददुसरें केळें व एकएक पुरी खाऊन पाणी पिऊन पुढें चाललों. सुमारें एका तासानें **नारायणगांवास** आलों. नारायणगांव अठ्ठेचाळीस व एकूणपन्नास या मैलांच्या दरम्यान आहे. **खेडापासून** चोवीस मैलांचा पल्ला आम्हीं गांठला त्यावेळीं साडेनवाचा सुमार झाला होता. येथून जुन्नराकडे जाणारा रस्ता फुटतो, नव्हे येथूनच नाशिक जुन्नरकडे जाणारे रस्ते फुटतात असें म्हणणें वाजवी आहे. कारण पुण्याहून नारायणगांवपर्यंत रस्ता थेट

उत्तरेकडे जातो व झाडाच्या बुंध्याला दोन फांद्या फुटाव्या त्याप्रमाणें येथून या रस्त्याच्या दोन शाखा होतात; पहिली वायव्य दिशेनें **जुन्नरा-कडे** जाते व दुसरी ईशान्य दिशेनें **संगमनेराकडे** जाते. आतां जाव-याचा रस्ता आम्हांला अगदीं अनोळखीचा होता. जुन्नरचा रस्ता टाकून आम्हीं नाशिकच्या रस्त्याकडे वळलों. नारायणगांवास उंसाची लागवड बरीच दिसते. आतां आम्हांला तहान व भूक लागली होती व उंसाचा रस मिळेल तर किती बहार होईल असें मनांत येत होतें, तोंच समोरून एक मुलगा एक तपेलीची शिंकाळी घेऊन चालला होता. तपेलींत काय आहे असें विचारतां उंसाचा रस असें त्यानें सांगितलें. मग काय विचारतां आम्हांस आनंद झाला. पण तो मुलगा रस देण्यास तयार होईना. आम्हीं त्याला फारच आग्रह केला व पुष्कळ पैसेही देऊं केले, तेव्हां एकदां तो रस देण्यास कबूल झाला. आमच्याजवळचें भांडें काढून आम्हीं प्रत्येकानें एकंएक भांडें रस प्राशन केला. नेहमीं आपण शहरांत भरल्या पोटावर रस पितों त्यावेळीं त्याची गोडी कळत नाहीं. पण आतांच्या श्रमानंतर त्या रसाची आम्हांला विलक्षण गोडी लागली यांत नवल काय ? इतक्यांत एक ऊंसवाली बाईही भेटली; तिच्या जवळून पांचसहा उंसाचीं कांडींही विकत घेतलीं व प्रत्येक पायगाडीला दोन दोन अशीं तीं कांडीं बांधलीं. इतकें होत आहे तों दहा वाजून गेले. आम्हांला अजून आठ नऊ मैलांचा पल्ला गांठावयाचा होता. म्हणून आम्ही चालूं झालों. पुण्या-पासून नारायणगांवापर्यंच्या रस्त्याला बहुतेक ठिकाणीं दोन्ही बाजूंला चांगलीं झाडें आहेत. पण नारायणगांव आम्हीं टाकला नाहीं तोंच सभोंवारचा प्रांत व रस्ता हीं दोन्हीं रुक्ष वाटूं लागलीं. कारण रस्त्याला झाडें मुळींच नाहींत व आजूबाजूससही झाडी दिसेना. शिवाय आतां ऊनही होत चाललें होतें व यामुळें, कालच्या प्रवासामुळें ताजा दम नव्हता म्हणून प्रवास त्रासदायक व कंटाळवाणा वाटूं लागला.

रस्ता अगदीं सरळ चालला होता व साधारणतः चढाचा होता, पुढें किंचित् उतार लागला व मग सपाटीचा सारखा रस्ता लागला. हा भाग

अगदीं ओसाड व जळून उजाड झालेल्या भागासारखा भासतो. पण लवकरच **पिंपळवंडी** गांव लागतें. येथें थोडी झाडी आहे व रस्त्यालाही झाडें आहेत. येथें **पिंपळवंडी** नदी लागते. हिलाही पूल नाहीं. यामुळें बूट काढून पायगाड्या डोक्यावर घेऊन पैलतीरीं जावें लागतें. नदीवर आम्ही आलों व तेथें पाणी भरीत असलेल्या बाईला नदीचें नांव विचारलें. तिनें सांगितलें ' गंगानदी. ' आम्हांला आश्चर्य वाटलें. पुढें **वाटे**-गांवच्या नदीच्याही ठिकाणीं हाच अनुभव आला. यावरून इकडल्या सगळयाच नद्यांना अडाणी लोक 'गंगा' म्हणतात असें वाटलें. या नदीच्या कांठावर आम्हीं थोडा फलाहार केला. येथून साधारण चढीचा रस्ता लागतो. थोड्याच अवकाशांत आम्हांला समोरच एक लहानशा टेंकड्यांची रांग दिसूं लागली व एका खिंडींतून रस्ता गेल्यासारखा दिसूं लागला. म्हणून आम्ही येथें चवकशी करण्याकरितां खालीं उतरलों व डाव्या हातास लहान लहान झोंपड्यावजा घरांशीं असलेल्या माणसांशीं चवकशी करतां असें समजलें कीं, **आळेगांव** डाव्या बाजूस मैल दीड मैल राहतें. पण **आळयाच्या** खिंडीच्या माथ्यावर एक स्वच्छ पाण्याची विहीर आहे व तेथें उतरण्यास दाट झाडीही आहे. तेव्हां तेथें दोनप्रहरची विश्रांति घेण्याचा आम्हीं बेत केला व कांहीं पायीं व कांहीं पायगाडीनें पण शेवटीं एकदां **आळयाच्या** खिंडीच्या माथ्यावर आलों. ही खिंड फारशी मोठी नाहीं. पुण्याच्या गणेश खिंडीपेक्षां जरा जास्त उंच असेल इतकेंच. खिंड चढून वर आल्यावर व थोडासा उतार उतरल्यावर आम्हांला दाट झाडीचीं नांदुरकीचीं झाडें दिसलीं. हेंच आमचें उतरण्याचें ठिकाण असें आम्हीं ओळखलें व पायगाडीवरून खालीं उतरलों व एका झाडाला पायगाड्या लावून ठेवून पायगाडीचा पोषाख उतरून सुटसुटीत धोतर नेसलों. येथें दोनचार उतारू उतरलेले होते व त्यांचें जेवण चालू होतें. आम्हीं झाडाखालीं सतरंज्या पसरून बसण्यास जागा केली व हातपाय धुवून येऊन सावकाश फराळ केला. नांदुरकीच्या झाडांची छाया गर्द असल्यामुळें भर दोनप्रहर होता तरी

उन्हाचा त्रास झाला नाहीं. उलट बारिक वाऱ्याची झुळूक येत होती त्यामुळें हें ठिकाण फार आरामकारक वाटलें. आतांपर्यंत आम्हीं **पुण्याहून** अठ्ठावन मैलांचा व **खेडाहून** तेहेतीस मैलांचा पल्ला गांठला होता. पुणें जिल्ह्यांतील **जुन्नर** तालुक्याची हद्द येथें सरते व येथून नगर जिल्ह्याचा **संगमनेर** तालुका लागतो. **संगमनेरचे** पश्चिमेस नगर जिल्ह्याचा **अकोला** हा तालुका आहे. **संगमनेर** व **अकोला** हे नगर जिल्ह्याचे दोन तालुके पूर्वेकडून व ठाणें जिल्ह्याचे **मुरबाड** व **शहापुर** हे तालुके पश्चिमेकडून पाचरीप्रमाणें नाशिक व पुणें जिल्ह्याच्या दरम्यान आलेले आहेत. आम्ही ज्या मार्गानें नाशिकास जाणार होतों तो मार्ग **अकोला** तालुका पूर्वेस टाकून संगमनेर तालुक्यांतून नाशिकच्या **सिन्नर** तालुक्यांतून नाशकाकडे जातो. जुन्नराकडूनही **अकोलें** तालुक्यांतून एक रस्ता नाशकास जातो. पण तो या रस्त्याइतका चांगला व रहदारीचा नाहीं.

तीन वाजेपर्यंत आम्हीं या **आळयाच्या** खिंडींतल्या नांदुरकीच्या गर्द छायेंत विश्रांति घेतली. **वोटे** गांवची नदी येथून दीड दोन मैलांवर असून तेथेंही नदीला पूल नसल्यामुळें पाण्यांतून जावें लागतें असें समजल्यामुळें पायांत बूट पायमोजे न घालतांच आम्ही आमच्या लोहमय अश्वावर आरूढ झालों व लगेच **वाटे**गांवच्या नदीशीं आलों. जवळ जवळ म्हणतां म्हणतां ही नदी अडीच तीन मैल दूर होती. येथपर्यंत साधारण उताराचा रस्ता असल्यामुळें आम्ही पुष्कळ जलद आलों. नदी उतरल्यावर पुन्हां बूट पायमोजे घालून पायगाडीवर आरूढ होऊन पुढें जाऊं लागलों. **वाटे**गांवाशीं एकसष्ट मैल होता. येथून पुढें **मुळा**नदीची दरी लागते.आम्हीं चौसष्ट मैलाशीं आलों तों त्या मैलावर पुण्याहून चौसष्ट व नाशिकाहून पासष्ट असें लिहिलें होतें,म्हणजे या मोजणीप्रमाणें नाशिक १२९ मैल भरतें. पण पुढें मैल दिले आहेत त्यावरून १३० मैल दिसतें. कोठें तरी रस्त्यांत एक मैलाची तफावत पडली आहे येवढें खरें. पुढल्या मैलाला आम्हीं अर्धा मार्ग आक्रमण केला असें वाटून एक प्रकारचें

समाधान वाटत होतें. पण आम्ही दमूनही बरेच गेलों होतें. आमच्यापैकीं प्रोफेसर द्विवेकरांचा कंटकपणा मात्र विलक्षण होता. त्यांना दम म्हणून काय तें ठाऊक नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. कंटकपणाच्या बाबतींत माझा नंबर आजपर्यंत प्रवासांत वर असे. पण प्रो. द्विवेकरांचा कंटकपणा व श्रमसहिष्णुता पाहून मला खालींच मान घालावी लागली.

सडुसष्ट मैलाच्या सुमारास आम्ही **मुळानदी** उतरलों. या नदीला पूल नाहीं पण नदींत थोडीशी फरशी केली आहे व उन्हाळयांत गाड्या जाण्यासारखा कच्चा पूल केलेला आहे. या नदीचें पात्र फारच खोल आहे व नदीचे पात्रांत खडक फार आहे. या नदीला पावसाळ्यांत फार जोराचें पाणी येत असावें असें वाटलें. नदीचा देखावा थोडासा भयप्रद व आहे. नदी ओलांडल्यानंतर हळूहळू मनुष्य **बालेश्वर** म्हणून जी डोंगरांची रांग पूर्वपश्चिम जाते ती चढावयास लागतो. हा भाग फारच डोंगराळ आहे. आपल्या डाव्या व उजव्या बाजूला डोंगरच डोंगर दिसूं लागतात. प्रथमतः ते टेंकडीवजा भासतात;. पण जसजसें आपण वर चढूं लागावें तसतशी त्यांची उंची ध्यानांत येते. इतका मोठा घाट चढावयाचें आहे हें आम्हांला ठाऊक नव्हतें. **आळया**जवळची खिंड टाकली म्हणजे सपाटी लागेल असा आमचा समज होता पण नगर जिल्ह्याचा **अकोला** तालुका व **संगमनेरचा** हा भाग बराच डोंगराळ आहे; व ही पर्वतांची रांग बरीच उंचही आहे. इतकेंच नव्हे तर ही रांग सह्याद्रीच्या ज्या भागांतून निघते तेथें **कळसूबाई** नांवाचें सह्याद्री पर्वतांतील ५४२७ फूट उंच असलेलें सर्वांत उंच शिखर आहे असें मागाहून कळलें व मुंबई इलाख्याच्या भूगोलावरून त्याची खातरी झाली. अर्थात् आतां आम्हांला संगमनेरास तरी जाणें शक्य आहे किंवा नाहीं याची शंका येऊं लागली. पायगाडीवर तर पाय ठेववेनासा झाला. म्हणून बहुतेक घाट पायींच चढाना लागला. हा घाट **पेठेच्या** घाटापेक्षां मोठा आहे असें आम्हांला वाटलें: तो साताऱ्याहून येतांना लागणाऱ्या खंडाळयाच्या

घाटाइतका मोठा असावा. पण शेवटीं एकदां आम्ही घाटमाथ्यावर आलों. माथ्यावर मोठा पठार आहे व तेथें लहान-लहान गांवें असावींत असें वाटलें. इतका घाट चढून आल्या-मुळें तहान फार लागली. म्हणून एक झोपडीवजा घर दिसलें. तेथें आम्ही पाण्याची चवकशी करण्यास गेलों. तेथून पाणी बरेंच दूर होतें. पण शेतकऱ्यानें आम्हांला पाणी पिण्यास दिलें. पोटभर पाणी प्याल्यावर आम्ही त्याला चिरीमिरी देऊं लागलों पण तो घेईना. तो म्हणाला 'येथें येतांना पुष्कळ लोक पाणी मागतात म्हणून आम्हीं मुद्दाम जास्त पाणी आणून ठेवतों.' त्या शेतकऱ्याच्या आदरातिथ्याबद्दल व त्याच्या स्वाभिमानाबद्दल आम्हांला कौतुक वाटलें व त्याचे आभार मानून आम्ही पुढें सरसावलों. उतार असल्यामुळें आमचा प्रवास जलद होऊं लागला. सहाच्या सुमारास आम्हीं एका रस्त्यावरच असलेल्या विहिरीजवळ आलों. भूक लागल्यामुळें येथें थोडा फराळ करण्याचा बेत केला. येथून संगम-नेर बरोबर १२ मैल राहिलें होतें. येथें **हणमंत नाईक** नांवाच्या प्रसिद्ध बंडखोराची छत्री आहे व त्याच्यालगत दुसऱ्याही कोळ्यांच्या छत्र्या आहेत. यावरून या घाटाला **हणमंत नाईकाचा** घाट म्हणतात. **चंदनापुर** या **गांवावरून** याला **चंदनापुरचा** घाट असेंही म्हणतात. आतां घाट उतरावयाचा असल्यामुळें आम्ही जलद जाऊं असा भरंवसा होता. फराळ वगैरे आटोपतो तोंच पश्चिमेस सूर्य अस्तास गेला व आतां रात्र होईल म्हणून आम्ही झटकर पाय-गाडीवर आरूढ झालों. आतां काय थंड वेळ, पोटांत अन्नपाणी गेल्या-मुळें थोडा आलेला हुरूप व उतार इतक्या गोष्टी एकत्र झाल्यावर मग काय विचारतां ? थोड्याच वेळांत प्रत्यक्ष घाटाचा तो बिकट उतार लागला. सभोंवार काळेकभिन्न भीषण व कड्यासारखे तुटलेले खडकांचे प्रचंड डोंगर होते. त्यांना फोडून जणूं कांहीं आमचा रस्ता चालला होता. रस्त्याला विलक्षण वळणें लागूं लागलीं. कांहीं ठिकाणीं तर दगडी वाटोळ्या जिन्यासारखा गरगर रस्ता फिरता चालला आहे कीं

काय असा भास होई. पायगाडीचा ब्रेक दाबतां दाबतां बोटें बधिर झालीं. तरी सुद्धां पायगाडीचा वेग कमी होईना. अशा वेळीं बेफाम घोड्याप्रमाणें पायगाडी आपल्या ताब्यांत राहत नाहीं. मी जरी पायगाडीवर बसण्यांत सराईत होतों तरी त्या घाटांतून जातांना क्षणोक्षणीं काय होतें काय नाहीं असें मला सारखें वाटत होतें. हा घाट खंडाळ्याच्या बैलगाडीच्या घाटापेक्षांही मोठा आहे यांत शंका नाहीं. जणूं कांहीं चक्राकार अशा रस्त्यांनीं भराभर खालीं येत असल्यामुळें थोड्याच अवधींत आम्ही घाटाच्या तोंडाशीं आलों. येथें डोंगरांची रांग अर्धवर्तुलाकार असून त्या वर्तुळाच्या मधून रस्ता काढलेला आहे, असें आमच्या ध्यानांत आलें. हा अर्धवर्तुळाकार भाग म्हणजे एखाद्या प्रचंड व भयंकर प्राण्याच्या जबड्याच्या आकाराचा आम्हांला वाटला. या सर्व घाटांत कोठें गाडी किंवा वाटसरू लागले नाहींत क्षणोक्षणीं काळोखाचें आवरण पसरत चाललें होतें. अशा वेळीं अशा रस्त्यांतून एकटें एकट्यानें जाणें फार भयप्रद काम आहे यांत शंका नाहीं. आम्ही आतां बहुतेक घाटाच्या तळाशीं येऊन डोंगरांच्या जबड्यांतून बाहेर पडूं लागलों. या खालच्या भागावर आतां झाडेंझुडपेंही दिसूं लागलीं. घाटाच्या प्रारंभींचे ते भीषण काळेकुट्ट खडक दिसेनासे झाले व त्याचे जागीं हिरवेगार डोंगर दिसूं लागले. यामुळें देखावा दृष्टिमनोहर झाला. आतां बहुतेक संगमनेरपर्यंत उतार असावा असें आम्हांस वाटलें व तेंच खरें झालें. घाटाच्या जबड्यांतून बाहेर पडल्यावर पांच सहा मैलांचा टप्पा राहिला होता व आतां मुक्कामाचें ठिकाण जवळ आलें असें वाटून थोडा हुरूप आला व उतार असल्यामुळें इतक्या लांबचा पल्ला चालून आलों असतांना सुद्धां आम्ही मोठ्या वेगानें चालूं लागलों. घाटांत तरी पडला म्हणा किंवा आम्हीं विहिरीजवळ फराळ करतांना कोणीं काढून घेतला म्हणा पण माझ्या विजेच्या दिव्याचा पुढचा भाग नाहीं हें माझ्या ध्यानांत आलें, अर्थात् माझा दिवा निरुपयोगी झाला म्हणून, मला माझ्या दोघां मित्रांच्या पायगाडीच्या दिव्याच्या उजेडानें चालावें

लागलें. जुन्नरच्या वाटेला अशीच माझी फजिती झाली होती. रात्रींच्या साडेसात आठच्या सुमारास आम्ही प्रवरा नदीच्या कांठीं आलों. या नदीला पूल नाहीं पण साधारण उंचीची फरशी केली आहे. ती फरशी आम्हीं पायींच ओलांडली तोंच संगमनेर गांव लागला. आम्हीं आतां पुण्यापासून सत्याऐशीं मैलांचा प्रवास केला होता. आमच्या पायगाडीवाल्याच्या त्रिकूटांपैकीं डॉ. गुणे हे मूळचे नगरचे असल्यामुळें या भागांत त्यांच्या ओळखीचे व नात्याचे लोक पुष्कळ. तेव्हां त्यांच्याच एका नातेवाईकाकडे जाण्याचें आम्हीं ठरविलें व एका माणसानें त्या गृहस्थाचें घर आम्हांला नेमकें दाखविलें. आमचें त्या मंडळींनें प्रेमानें स्वागत केलें व आम्हीं पुण्याहून पायगाडीनें नाशकास जाण्यास निघालों आहों हें ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें. तास दीडतासानें आमचें जेवणखाण झालें. आज आम्हीं बासष्ट मैलांचा प्रवास केला व त्यांतच दोन मोठमोठे घाट चढलों व उतरलों यामुळें पाय अगदीं आंबले व थकवाही विलक्षण आला. येथून नाशिक बरोबर त्रेचाळीस मैल आहे असें कळलें. संगमनेरपासून नाशिक तीस बत्तीस मैल असेल असा आमचा समज होता व म्हणून तेथून एका टप्प्यानें जातां येईल असें आम्हांस वाटलें होतें, पण येथून नाशिक त्रेचाळीस मैल असल्यानें दोन टप्पे आवश्यक झाले व ता. १२ मेच्या परिषदेच्या पहिल्या बैठकीस आम्हांस मुकावें लागलें. तेव्हां १२ तारखेस सकाळीं निघून पंचवीस मैलांवर असलेल्या सिन्नरास दोनप्रहरीं जावें व तेथून तिसऱ्या प्रहरीं निघून संध्याकाळीं नाशकास जावें असें ठरवून आम्हीं बरीच रात्र झाल्यावर झोपीं गेलों.

आदल्या दिवसाच्या अतोनात श्रमामुळें व सकाळीं पंचवीस मैलांचा पल्ला आहे तेव्हां तो चार तासांच्या आंत सहज जातां येईल अशा समजुतीमुळें आम्हीं पहांटेस लवकर उठण्यास थोडा आळस केला व म्हणून खेडाप्रमाणें बरोबर सहा वाजतां न निघतां आम्हीं साडेसाताला संगमनेर सोडलें व गांवाच्या बाहेर मैल अर्धा मैल आलों नाहीं तोंच, प्रो. दिवेकर यांचे पायगाडीच्या धावेस पंक्चर झालें. झालें, अर्धापाऊण

तासाची खोटी झाली. पंकचर नीट करून होत आहे तों साडे आठ होऊन गेले. आतां रस्ता मात्र सपाटीचा होता. पण पांच चार मैल गेल्यावर पुनः एक डोंगरांची रांग लागली. ज्याप्रमाणें पुणें व नगर या जिल्ह्याच्या सीमेवर आळयाची खिंड लागते व ती अट्ठावन्नाव्या मैलाशीं आहे त्याप्रमाणें नगर व नाशिक जिल्ह्यांच्या सीमेवर डोंगरांची रांग लागते व ती सत्याण्णव मैलाशीं आहे.म्हणजे संगमनेर तालुक्यांतून सुमारें चाळीस मैल रस्ता जातो. आम्हीं ही **कऱ्ह्याची** खिंड चढून माथ्यावर आलों. ही खिंड पुण्याजवळच्या कातरजच्या घाटापेक्षां किंचित् कमी असेल असें वाटलें, माथ्यावर एक चांगली विहीर असून डाक बंगलाही आहे. आम्हीं विहीरीच्या कांठाला फराळ वगैरे केला व थोडी विश्रांति घेतली तों साडेदहा अकरा झाले. येथून **सिन्नर** पंधरा मैल होतें तेव्हां दोन तासांत **सिन्नरला** जाऊं असें आम्हांस वाटलें. मैल दीड मैलाचा उतार आम्ही भरकन उतरलों, पण आतां ऊनही झालें. शिवाय भयंकर उलटा वारा सुरू झाला व येथून चढउताराचा पण बहुधा एकंदरीनें चढा-वाचा भाग लागला. **सिन्नर संगमनेरा**पेक्षां जास्त उंचीवर असावें असा आमचा समज झाला. कारण प्रत्येक वेळीं थोडासा चढ लागे व त्या चढाच्या पलीकडे मुळींच क्षितिजावर कांहीं एक दिसूं नये. यामुळें आतां उतार आहे असा भास होई. पण त्या चढावावर यावें तों पुनः थोडका खोलगट भाग गेल्यावर पुनः चढता माळ लागे. याप्रमाणें सारखा भूमिभाग लागत गेल्यामुळें रस्ता सरतां सरेना. या पंचवीस मैलांच्या प्रवासाचा आम्हांला फारच त्रास वाटला व आम्हांला आमच्या खेड-जुन्नरच्या प्रवासाची आठवण झाली. शेवटीं एकदांची गांवाची वेस लागली व आमच्या जीवांत जीव आला. पण येथें आमच्या मित्राच्या नातेवाईकांचें घर सांपडण्यास फारच प्रयास पडले. आम्ही गांव हिंड हिंड हिंडलों पण पत्ता लागेना. शेवटीं पोष्टांत जाऊन तपास केला तेव्हां एकदांचें घर सांपडलें. इतकें होतें आहे तों दोन वाजून गेले. त्यानंतर स्नान भोजन झालें. येथून नाशिक बरोबर अठरा मैल आहे व त्यांतले

तेरा मैल सारखा उतारच आहे. पांच मैलही फारसे त्रासदायक नाहींत असें कळलें. तेव्हां आम्हीं अगदीं संध्याकाळीं निघण्याचा बेत केला व चहा वगैरे घेऊन सहा वाजतां आमच्या या पायगाडीच्या लांबच्या प्रवासाच्या शेवटच्या टप्याच्या मार्गक्रमणास सुरवात केली. गांवाच्या कुसवापर्यंत मंडळी आम्हास पोंचवावयास आली. आम्हीं मंडळीचा निरोप घेऊन पायगाडीवर पाय ठेवला व गांव सोडल्यावर लवकरच टेंकडीवजा लहानसा चढाव लागतो तो चढून वर गेलों तो पुन्हां सपाटीच लागली. आणखी एकदोन मैल गेल्यावर उतार लागूं लागला तो सारखा उताराचाच रस्ता लागला. संगमनेरच्या आधीं तेरा मैल ज्याप्रमाणें उताराचे आहेत तसेच हे तेरा मैल आहेत.यावरून सिन्नर तालुका व गांव डोंगराच्या पठारावर आहे असें संगमनेराकडून येतांना जें भासलें तें बरोबर होतें असें आतां या उतारानें खात्रीपूर्वक समजलें. मागाहून ग्याझीटीयरमध्यें पाहतां सिन्नर नाशिकापेक्षां पांचसहाशें फूट उंचीवर आहे असें समजलें. आम्हीं दारणा नदीपर्यंत सारखे खोखावत खालीं येत होतों. येथें रात्रींचें सुद्धां पुलाचें काम चालू असल्यामुळें किटसनचे दिवे दुरून मजेदार दिसले. कच्च्या पुलावरून आम्ही नदी पार गेलों व पुन्हां चालूं लागलों तों अर्ध्या तासाचे आंत नाशिक रेलवेस्टेशनच्या फाटकाशीं आलों. येथून नाशिक पांचच मैल राहिलें. फाटकाशीं आलों, तेव्हां आतां आमचा प्रवास निर्विघ्नपणें तडीस गेल्यासारखाच झाला. आम्हांला आमच्या श्रमाचें कांहींएक वाटलें नाहीं. राहिलेले पांच मैल आम्हीं मोठ्या लीलेनें आक्रमिले व डॉ. गुण्यांच्या मित्राकडे उतरण्यास गेलों. त्याचें मकाण पंचवटींत होतें. तेथें जातों तों रात्रीचे नऊ वाजून गेले होते. आम्ही पुण्याहून दहा तारखेस चार वाजतां सायंकाळीं निघालों ते नाशकास १२० मैल बारा तारखेस रात्रीं नऊ वाजतां पोंचलों.

येवढा लांबचा प्रवास आम्हीं यशस्वी तऱ्हेनें पार पाडला याबद्दल आम्हांला तर अभिमान व आनंद वाटला. पण नाशकास ज्या ज्या

माणसांना आमच्या प्रवासाची हकीकत कळली त्यांना त्यांना साश्चर्य आनंद वाटला. माझे एक गुरुस्थानीं असलेले स्नेही तर मला थट्टेनें म्हणाले ‘तुमच्यावर आतां रेल्वेकंपन्यांनीं नुकसानीबद्दल फिर्याद केली पाहिजे. तुम्ही पुणें-सातारा, पुणें-नाशिक अशा प्रकारचे लांब प्रवास पायगाडीनें करावयास लागलां व तुमचें अनुकरण दुसरे करूं लागले म्हणजे रेल्वेच्या व्यापाराला धक्का बसेल.’ आतां आमच्या उद्दिष्ट स्थळ-वर्णनाकडे वळणें बरें.

हल्लीं पंढरपूर, तेथली **चन्द्रभागा** ( भीमा नदीच्या तेथल्या वाकणाचें स्वतंत्र नांव ) व पंढरीचा विठोबा हीं यात्रास्थानें वारकरी पंथाच्या सर्व जातींतील प्रसारामुळें जास्त प्रख्यात झालीं असलीं तरी महाराष्ट्रां-तील हीं पवित्रस्थानें बरींच अर्वाचीन म्हणजे तेराव्या शतकानंतरचीं आहेत. वारकरी पंथाच्या कवींनीं व साधुसंतांनीं मराठी भाषेमध्यें विठ्ठलाच्या नामाची व त्याच्या दर्शनाची महती भक्तिभावानें गायिल्या-पासून त्या स्थानांना पावित्र्य आलें व तेथें लाखों लोकांची यात्रा दर-वर्षीं भरूं लागली हें खरें. पण नाशिक व तेथील गोदावरी नदी यांचें पावित्र्य फार पुरातन काळापासून मानण्यांत आलेलें असून नाशिक हें गांव तर उत्तर हिंदुस्थानांतील काशीप्रमाणें सर्व हिंदूंचें फार पवित्र असें यात्रास्थान गणलें गेलेलें आहे. आर्य लोकांनीं सिंधु नदी ओलांडून प्रथम पंजाब प्रांतांत आपली वसाहत स्थापिली व लवकरच त्यांनीं गंगा यमुना या नद्यांच्या कांठचा प्रदेश आक्रमिला व तेथें आपलीं राज्यें स्थापिलीं. पण बऱ्याच काळपर्यंत त्यांना विंध्य पर्वत व तेथलें निबिड अरण्य हीं दुर्लंघ्य वाटत असत. पण शेवटीं अगस्त्यऋषींनीं तो पर्वत ओलांडला व आर्यांचे आश्रम गोदावरी नदी कांठापर्यंत पोहोंचले. गोदावरीच्या दक्षिणे-कडे मात्र निबिड अरण्य असून तिकडे त्यांची वसाहत कित्येक शतकेंपर्यंत झाली नाहीं. परंतु आर्य लोकांच्या वसाहतीची दक्षिण मर्यादा म्हणून गोदावरी नदी व त्या नदी कांठचीं गांवें **पंचवटी जन्मस्थान** व **नाशिक** हीं आर्यांना गंगा नदी व त्यावरील काशीक्षेत्र या

प्रमाणेंच पवित्र वाटत. नव्हे गोदावरीस गंगा समजतात व विशेषतः प्रत्येक बारा वर्षांनीं सूर्य सिंहराशीवर आला म्हणजे प्रत्यक्ष गंगा गोदावरीला येऊन भेटते अशी समजूत दृढ आहे. म्हणून सिंहस्थामध्यें नाशिकांस हजारों यात्रेकरू हिंदुस्थानच्या दूरदूरच्या प्रांतांतून येतात.

नाशिक हें यात्रास्थान पूर्वीच्या तीन युगांत निरनिराळया नांवानें प्रसिद्ध होतें अशी दंतकथा आहे. कृतयुगांत **पद्मनगर**, त्रेतायुगांत **त्रिकंटक**, द्वापार युगांत **जनस्थान** अशा नांवानें हें स्थान ओळखलें जात असे, असें चवदाव्या शतकांतील एका जैन ग्रंथांत सांगितलें आहे. गोदावरी कांठीं **जनस्थान** व **पंचवटी** हीं राहण्यासारखीं स्थानें असून राम लक्ष्मण व सीता यांनीं आपल्या वनवासांतील बराच काळ येथें कंठिला असें वाल्मीकी रामायणांत वर्णन आहे. रामायणांत वर्णिलेली पंचवटी नाशिक नजीकचीच किंवा ती पूर्वेकडे कोठें तरी असावी याबद्दल अर्वाचीन चिकित्सकांमध्यें वाद आहे खरा. पण दंतकथेप्रमाणें व भाविक लोकांच्या पिढ्यानुपिढ्याच्या भक्तिभावाप्रमाणें सध्यांची पंचवटी हें रामनिवासस्थान गणलें गेलें आहे यांत शंका नाहीं व म्हणूनच नाशिक व पंचवटी हीं काशी रामेश्वराप्रमाणें अखिल हिंदुस्थानच्या लोकांना पवित्र वाटतात व म्हणून दूरदूरचे यात्रेकरू नाशिकांस बाराही महिने येतात. हल्लींची पंचवटी रामायणकालीन असो किंवा नसो; पण पुरातन नाशिक हें हिंदुस्थानांतील फार प्रख्यात शहर आहे यांत शंका नाहीं. कारण या नाशिकाचा सर्वांत जुना उल्लेख जबलपूर शहराच्या ( उत्तरपूर्व ) दिशेस १०० मैलांवर असलेल्या **बरहूत** स्तूपावरील क्रिस्तशकापैकीं २०० वर्षांच्या वेळच्या शिलालेखांत आला आहे. नाशिकच्या **गोरक्षिता** नांवाच्या बाईनें देणगी दिल्याचा उल्लेख त्या लेखांत आहे. तसेंच नाशिकनजीकच्या पांडव लेण्यांतील दोन क्रिस्तशतकापूर्वींच्या शिलालेखांत नाशिकच्या एका धर्माधिकाऱ्याच्या व धान्यव्यापारीसंघाच्या देणग्यांचा उल्लेख आहे. यावरून नाशीक हें पवित्र स्थान म्हणून व व्यापाराचें केन्द्र म्हणून दोन हजार वर्षांपूर्वींपासून प्रख्यात होतें असें सिद्ध होतें. नाशिक व पंचवटी हीं दंतकथे-

प्रमाणें रामायण कालापासून व शिला-लेखाप्रमाणें दोन हजार वर्षांपासून प्रख्यात असलीं तरी, पांडवलेण्याखेरीज इतक्या जुन्या काळचीं स्मारकें हल्लीं नाशिकांत किंवा पंचवटींत नाहींत हें खरें आहे. या बाबतींत नाशिक व मथुरा या शहरांच्या सद्यःस्थितीमध्यें फार साम्य आहे.

ज्याप्रमाणें नाशिक—पंचवटी हीं रामाच्या आयुष्यांतील प्रसंगांशीं निगडित झालेलीं आहेत त्याप्रमाणें मथुरावृंदावन हीं स्थानें कृष्णचरित्रांतील प्रसंगाशीं निगडित झालीं आहेत. पण ज्याप्रमाणें मथुरा-वृंदावनांतील जुनीं देवळें व इमारती या मुसलमानांनीं मोडून टाकल्या व मथुरेंतील मुख्य हिंदु देवालयाच्या जोत्यावर मशीद बांधली त्याप्रमाणें नाशीक-पंचवटींतील जुनीं देवळें व इमारती मुसलमान सुभेदारांनीं मोडून टाकल्या व हिंदू देवळांच्या जोत्यावर मशीद बांधली म्हणून मथुरा वृंदावनाप्रमाणें नाशिक-पंचवटींतील सर्व देवळें व इमारती अर्वाचीन काळांतील आहेत. नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींतील व त्यानंतरच्या काळांतील हीं सर्व देवळें व इमारती बांधलेल्या आहेत. इतक्या पूर्वपीठिका-कथनानंतर अर्वाचीन काळच्या नाशीक—पंचवटींतील प्रेक्षणीय स्थळ-वर्णनास लागणें बरें.

नाशिक-पंचवटी हें जोड शहर गोदावरी नदीच्या दोन्ही कांठांवर वसलेलें शहर आहे. येथें गोदावरी नदीला कांहींसें नागमोडीसारखें वांकण आलें आहे व त्याचे मुख्य तीन भाग पडले आहेत. सर्वांत जुना भाग म्हणजे नदीच्या उत्तर तीराला असलेलें पंचवटी गांव; त्याचे दक्षिणेस व नदीच्या दक्षिण बाजूस **कसबा** म्हणून तितकेंच जुनें गांव आहे. येथेंच पूर्वीं मुख्य हिंदु देवालय होतें. येथें नदीच्या अगदीं कांठावर उंचच उंच टेकडीसारखा भाग आहे. त्याला जुनी गढी म्हणतात. या भागांतलि हिंदु देवालयाच्या जोत्यावर मुसलमानांची हल्लीं जुम्मा-मशीद बांधलेली आहे. सध्यां त्या भागांत मुसलमान वस्ती पुष्कळ आहे. मुसलमानी अंमलांत या भागाला **गुलशानाबाद** असें नांव देण्यांत आलें होतें. पण तें आतां नष्टप्राय झालें आहे. सध्यां त्याला कोंकणी-

पुरा किंवा काजीपुरा म्हणतात. नदीच्या दक्षिण कांठाला पण कसब्याच्या पश्चिमेस नवें म्हणजे मराठेशाहींतील नाशिक गांव वसलेलें आहे. पेशवाईमध्यें नाशीक शहराला पुण्याच्या खालोखाल महत्त्व आलें होतें. म्हणजे नाशीक ही पेशव्यांची दुय्यम दर्जाची राजधानीच बनली होती. यामुळें नाशीक ही पुण्याची छोटेखानी आवृत्ति भासते. पुण्याप्रमाणें नाशकास **कसबा** पेठ, नवी पेठ, आदितवार पेठ, बुधवार पेठ, तांबट आळी वगैरे पुण्याच्या सारखीं शहरांतील पेठांचीं नांवें आहेत; मात्र दुसरीं नांवें मुसलमानी पद्धतीचीं आहेत. पुण्यापेक्षां नाशीक जास्त उंच सखल जागेवर वसलेलें आहे. **नाशीक** शब्द हा संस्कृत **नवशिख** शब्दापासून निघाला आहे असें म्हणतात व नांवाप्रमाणें नाशीक नऊ टेंकड्यांवर वसलें आहे असें समजतात. या नऊ टेंकड्यांपैकीं जुनी गढी व नवी गढी म्हणून दोन टेंकड्या अजून दिसून येतात. बाकी टेंकड्यांमधील सखल भाग भरून टाकण्यांत आल्यामुळें, आतां शहरांत कोठेंही टेंकड्यांसारखा भाग दिसत नाहीं. मात्र शहरांतील निरनिराळे भाग बरेच उंच सखल आहेत असें पादचारी प्रवाशास कळून येतें. पुण्याप्रमाणें नाशीकचा अर्वाचीन काळांत चारी बाजूंस विलक्षण विस्तार झाला आहे. **पंचवटी**,—मुंबई आग्रारोड, व मूळ शहराच्या पश्चिम व पूर्वभागाकडे पुष्कळ नवीं नवीं घरें व बंगले झाले आहेत व शहराची वस्ती सारखी वाढत आहे. सन १८८१ सालच्या खानेसुमारीमध्यें येथली वस्ती सुमारें पंचवीस हजार होती, ती गेल्या खानेसुमारींत पन्नास हजार झाली आहे. नवी पाणीपुरवठ्याची योजना करतांना लवकरच पाऊण लाख वस्ती होईल असा अदमास करण्यांत आला आहे. कारण ब्रिटिश अमलामध्यें पुण्याचे खालोखाल नाशकास महत्त्व आलेलें आहे. पुण्याच्या खडकीप्रमाणें **देवळाली** हें लष्करी ठाणें नाशीकनजीक बनविलेलें आहे; नाशीक येथें इलाख्यांतील पोलीस खात्यांतील अंमलदार तयार करण्याची शाळा आहे. येथेंच सरकारी दारूचा मोठा कारखाना आहे. येथें नोटा, कार्डें पाकिटें व स्टांप वगैरे वगैरे छापण्याचा सरकारी '**सुरक्षितता**' छाप-

खाना आहे. येथें मिशनरी लोकांनीं चालविलेला मोठा बाळंतिणीचा दवाखाना आहे; येथें मिशनरी व बाटलेल्या क्रिसचनांची मोठी वस्ती असून **शरणपुर** नांवाचें एक स्वतंत्र खेडें त्यांच्या वस्तीनें व्यापिलेलें आहे. येथें अत्यंत विस्तीर्ण असें गोल्फ मैदान असून सर्व हिंदुस्थानांतील गोल्फ खेळाचे सामने येथें होतात. यामुळें नाशीक हें युरोपियन अधिकाऱ्यांचें मोठें आवडतें निवासस्थान बनलें आहे. हिंदूंच्या दृष्टीनें तें पवित्र स्थान असल्यामुळें व हल्लीं येथें गोखले एज्युकेशन सोसायटीचें कॉलेज निघाल्यामुळें सुखवस्तू हिंदू लोकांना नाशिक हें शीतल निवासस्थानच वाटतें. यामुळें बरेच सुखवस्तू लोक नाशिकास कायमचे येऊन राहिले आहेत, व उन्हाळ्यांत खानदेश वऱ्हाडकडील लोक येऊन राहतात. पंचवटीस तर मुंबईच्या गुजराथी व भाटये या मंडळींची मोठी वसाहतच झाली आहे.


इतक्या नाशीकच्या सामान्य स्वरूपवर्णनानंतर तेथल्या प्रेक्षणीय स्थळांच्या वर्णनास लागूं या. मथुरा–वृंदावनाच्या इतकीं देवळें नाशिक–पंचवटीस नाहींत खरीं; तरी पण तीं शेकड्यांनीं मोजण्याइतकीं आहेत यांत शंका नाहीं. तेव्हां ज्याप्रमाणें मथुरा–वृंदावनामध्यें मुख्य व प्रख्यात देवळांची निवड करून प्रवाशास दृश्यदर्शनाचें काम आटोपावें लागतें त्याप्रमाणेंच नाशीकपंचवटी दृश्यदर्शनांत निवडानिवड केल्यावांचून गत्यंतर नाहीं. अशी निवड केली म्हणजे पांचसात प्रेक्षणीय देवळेंच शिल्लक राहातात व तीं पहाण्याचें काम पायीं दोन तासांचे आंतच उरकतां येतें. आम्हीं तोच मार्ग स्वीकारून नाशीक–पंचवटींतील आमची आधुनिक दृश्यदर्शनाची यात्रा दोन तीन तासांत संपविली.

आम्हीं मुंबई आग्रा रोडवरील आमच्या निवासस्थानांतून निघून शहराच्या तांबे आळींतून तडक गोदावरील पुलाशीं आलों. गोदावरीवरील दहा कमानींचा सुंदर दगडी पूल वांईनजीकच्या कृष्णा नदीच्या पुलाप्रमाणेंच आहे. येथें क्षणभर उभें राहिलें म्हणजे दगडी घाट, पायऱ्या व फरसबंदी पटांगणें यांनीं अलंकृत असा नदीचा किनारा व


कालव्याप्रमाणें बांधून काढलेल्या कुंडामधून वाहणाऱ्या गोदावरी नदीचा प्रवाह व नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर व नदीच्या पात्रांत बांधलेल्या लहान मोठ्या देवळांचीं लहान मोठीं शिखरें व शहरांतील दाट वस्तींतील **घरांचें अरण्य** हीं एक समयावच्छेदेंकरून दृष्टीस पडतात व मनुष्याच्या मनांत आनंद व आश्चर्य असे मिश्र मनोविकार उद्भूत होतात. येथून दिसणारा देखावा किती वेळ तरी पहात रहावें, असें वाटतें. पण पुलाचे डावे बाजूस असलेलें **सुंदर नारायणाचें** देवालय मनुष्याचें मन वेधतें. हें देवालय नदीच्या प्रवाहापासून शंभर फुटांच्या वरच उंच आहे व प्रवाहापासून देवळाच्या ज्योत्यापर्यंत उत्तम दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. देवालय पूर्वाभिमुख असून पूर्व दिशा इतकी बरोबर साधली आहे कीं वीस एकवीस मार्च या दिवशीं देवळाला तीन दरवाजे असतांना सूर्योदयानंतर सूर्याचीं सकाळचीं किरणें नेमकीं देवाचे पायावर पडतात! उत्तर पूर्व व दक्षिण या तीन्ही बाजूंस दगडी नक्षीकामानें अलंकृत अशीं प्रवेशद्वारें असून प्रवेशद्वाराशीं प्रमाणबद्ध अशा **वाटपाही** मंडप्या आहेत. त्यांतून आंत गेलें कीं **अष्टपैलू** मुख्य मंडप लागतो. याचें बांधकाम आश्चर्यकारक आहे. या अष्टपैलू चौकाचेवर कंगोऱ्या कंगोऱ्याचा वर्तुळाकार बैठा घुमट बांधलेला आहे. त्याचे पुढें मखरयुक्त अशा चवथऱ्यावर विष्णूची काळी मूर्ति व दोन्ही बाजूंस लक्ष्मीच्या छोट्या मूर्ति आहेत. या गाभाऱ्यावर उंच उंच नक्षीबांधकामाचें शिखर आहे. नाशकांतील नांवाप्रमाणें हें एक सुंदर देवालय आहे, यांत शंका नाहीं.

हें देवालय गंगाधर यशवंत चंद्रचूड या गृहस्थांनीं नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीमध्यें सन १७५६ च्या सुमारास बांधलें. याला १० लाख रुपये खर्च लागला. या देवळाच्या चालू खर्चाकरितां सरकारकडून सुमारें ९०० रुपयांची नेमणूक आहे.


या देवळाचे पायऱ्यांनीं आम्ही नदीचे पात्रापर्यंत गेलों. तेथून सारखे घाट व पायऱ्या लागतात. नदीच्या प्रवाहावर असलेल्या फरसबंदी




नं. १७] नाशिक : पुलावरून दिसणारा देखावा [ पान १६६



नं. १८] पंचवटी [ पान १६



नं. २० ] नाशिक नारोशंकराचें देवालय [ पान १६७



नं. १९ ] नाशिक सुंदर नारायणाचें देऊळ [ पान १६७

कोरड्या पटांगणामधून आम्ही पंचवटीस आलों व तेथें प्रथम कपाले-श्वराचें उंचच उंच देऊळ पाहिलें. हें देऊळ सुंदर नारायण देवळाच्या अगदीं समोरच आहे. हें देऊळ अगदीं साध्या बांधणीचें आहे. तेव्हां येथें आम्हीं केवळ देवदर्शन घेतलें व मग लगेच बोळकंड्यासारख्या अरुंद रस्त्यानें काळ्या रामाच्या देवळाशीं आलों व प्रवेशद्वारांतून आंत प्रवेश केला तों सुंदर आकारानें व कमानदार ओऱ्यांनीं शोभायमान झालेलें मोठें थोरलें खुलें आवार पाहून आम्ही आश्चर्यानें थक्क झालों. हें आवार २४५ फूट लांब व १०५ फूट रुंद आहे ! या देवळाचें काम साधें पण फार सुबक आहे यांत शंका नाहीं. देवळाचे समोर पण तुटक असा सुंदर दगडी खांबाचा सभामंडप आहे. त्याला दहा दहा चौकोनी घडीव दगडी खांबांच्या चार रांगा आहेत. खांब बारा फूट उंच असून त्यांचे आधारावर सपाट छतासारखें दगडी फरशीचें छप्पर केलेलें आहे. सभामंडप खरोखरींच सुंदर सुबक व खूप मजबूत आहे. लांबीच्या मानानें मंडपाचा मधला भाग किंचित अरुंद वाटतो. यामुळें मंडपाच्या प्रमाण-बद्धतेला किंचित् कमतरता आली आहे. मुख्य देवालय मात्र सुंदर नारा-यणाच्या देवळापेक्षां सुद्धां अधिक सुंदर आहे. अर्थात् देवळांमध्यें काळ्या दगडाच्या राम लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति आहेत.

हें देवालय दाक्षिण हिंदुस्थानांतील प्रचंड प्राकारयुक्त देवालयांची छोटेखानी आवृत्ति आहे असें वाटतें. हें देवालय सरदार रंगराव ओढेकर यांनीं सन १७८२ च्या सुमारास बांधलें. या देवळाच्या बांधकामावर २००० माणसें बारा वर्षें खपत होतीं असें म्हणतात. या देवळाला सुमारें पंचवीस लक्ष रुपये खर्च आला, असें सांगतात. या देवळाला सरकारी दरसाल बारा हजारांची नक्त नेमणूक आहे.

काळ्या रामाचें देऊळ नदीकांठाच्या जरा आंत आहे. तेथून आम्ही नदीकांठावरच बांधलेल्या रामेश्वर किंवा नारोशंकरच्या देवळाला आलों. हें देऊळ नाशीकच्या सर्व देवळांमध्यें जास्त श्रीमंत व जास्त नक्षीकामाचें देऊळ आहे. हें देऊळ काळ्या रामाच्या देवळा-

पेक्षां जवळ जवळ अर्ध्या हिश्शानें लहान आहे. दोन्हीचें सामान्य स्वरूप व प्रकार अगदीं सारखेच आहेत. पण या देवळावर जिकडे-तिकडे अतोनात नक्षीकाम केलेलें आहे व शेंकडोंशें दगडी मूर्ती व चित्रें खोदलेलीं आहेत ! सभामंडपापुढें नंदीची मूर्ति आहे व खोल गाभाऱ्यांत शिवाचें लिंग आहे. नाशीकच्या इतर देवळाप्रमाणें या देवळाला प्रवेशमंडपीवर, मधल्या मंडपावर बसक्या घाटाचे घुमट आहेत तर गाभाऱ्यावर उंचच उंच शिखर आहे. आवाराच्या प्रशस्त प्राकाराचे चारी कोनावर वर्तुळाकार व कमानदार सुंदर बुरूज आहेत. या प्राकारावरून फिरत गेलें म्हणजे नदीचा व नाशीक–पंचवटीचा चित्ताकर्षक देखावा दिसतो व प्रवाशाचें मन प्रसन्न होतें असा माझा अनुभव आहे. पश्चिम प्राकाराच्या मधोमध व नदीच्या प्रवाहाचे समोर छोटासा पांचवा बुरूज आहे. येथेंच नाशीकची प्रख्यात **नारो शंकरी** घंटा बसविलेली आहे. या घंटेवर १७२१ असा सनाचा आंकडा आहे. ही घंटा वसईहून आणलेली असावी असें म्हणतात. नाशीकच्या देवळांमध्यें हें देऊळ मुकुटमण्याप्रमाणें शोभतें यांत शंका नाहीं.

हें देऊळ मालेगांवचे राजे बहादूर नारोशंकर यांनीं सन १७४७ च्या सुमारास बांधलें. त्याला सुमारें वीस लक्ष रुपये खर्च आला. सुंदर नारायणाच्या देवळाप्रमाणें याला नदीच्या प्रवाहांतील फरशीच्या पटांगणापर्यंत दगडी पायऱ्या केलेल्या आहेत. या पायऱ्यांनीं आम्हीं नदीच्या फरशीच्या विस्तीर्ण पटांगणांवर आलों. या देवळानजीक नाशीकचें प्रख्यात **रामकुंड** आहे. **सीताकुंड धनुष्यकुंड** व **रामकुंड** हीं एकमेकांना लागूनच आहेत. नाशीकच्या नदीचा येथला देखावा दोन्ही बाजू बांधून काढलेल्या कालव्याप्रमाणें दिसतो. उन्हाळ्यांत नदीचा प्रवाह अगदीं संपुष्टांत येतो. पण बाराही महिने रामकुंडामधून थोडें फार पांणी वाहण्याची व्यवस्था केल्यामुळें नेहमीं येथें स्नान करण्याइतकें पाणी असतें. धार्मिकदृष्ट्या या रामकुंडांत स्नान करणें हें पुण्यदायक आहे अशी समजूत असल्यानें प्रत्येक धार्मिक यात्रेकरू या कुंडावर

स्नान केल्याखेरीज रहात नाहीं. माझ्यासारखे सुधारलेले यात्रेकरू मात्र विऱ्हाडींच स्नान करतात.

सुंदर दगडी फरशीवजा पुलावरून आम्हीं नाशिकच्या बाजूला परत आलों व मग गोऱ्या रामाचें देऊळ पाहिलें. वर वर्णन केलेलीं नाशिक-पंचवटीचीं देवळें पाहिल्यावर गोऱ्या रामाचें देऊळ मनांत भरत नाहीं. पण या देवळाचा सभामंडप फार विस्तीर्ण आहे; दोन हजार माणसें मावण्याइतका तो मोठा आहे. मुख्य देवळांत रामलक्ष्मण सीता भरत व शत्रुघ्न अशा पांच मूर्ती आहेत. आवारामध्यें छोट्या छोट्या देवळांत किती तरी देवदेवतांच्या मूर्ती आहेत. तेव्हां गोऱ्या रामाचें देऊळ म्हणजे हिंदु देवांच्या मुख्यांचें **संग्रहालयच** आहे असा भास झाल्यावांचून रहात नाहीं.

माझें नाशिक–पंचवटीचें दृश्यदर्शन इतकेंच. अर्थात् त्याचें वर्णनही येथेंच संपविणें प्राप्त आहे.

नाशकाच्या आसपास कितीतरी इतिहासप्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळें आहेत. कारण नाशिक प्रांत हा उत्तरेकडून दक्षिणेकडे येणाऱ्या हम-रस्त्यावर असल्यामुळें व दक्षिणेकडे नीलगिरीपर्यंत गेलेली सह्याद्री पर्व-ताची रांग नाशिक जिल्ह्याच्या वायव्य दिशेस सुरू होत असल्यामुळें या जिल्ह्यांत कितीतरी उंच उंच पर्वत शिखरें व विलक्षण आकाराचे डोंगर आहेत व जुन्या राजवटीमध्यें त्या ठिकाणीं किल्ले व धार्मिक स्मारकें बांधलीं गेलीं आहेत. अशा टेंकड्या व शिखरें नाशीकच्या सर्व बाजूंस आहेत. अगदीं उत्तरेच्या टोंकास सालेर मुल्हेर व जालना नांवाचे ऐतिहासिक किल्ले आहेत. नाशिक जिल्ह्याच्या मधोमध **सात माळची दोर** नांवाची पर्वतराजी पूर्वपश्चिम गेली आहे. तिच्यामध्यें कितीतरी किल्ले आहेत; त्यांत सप्तशृंगी नांवाचें उंच शिखर असून तें एक यात्रास्थान आहे. नाशिक जिल्ह्याच्या दक्षिण टोंकास सह्याद्रि पर्व-तांतील चौपन्नशें फूट उंच असलेलें शिखर कळसुबाईचा डोंगर म्हणून

प्रख्यात आहे. तेथें देवीचें देऊळ आहे. नाशीकच्या पश्चिमेस तर सह्याद्रींची सारखी ओळ असून त्याला लागूनच प्रख्यात त्र्यंबकेश्वराची पर्वतराजी आहे. हीं सर्व प्रेक्षणीय स्थळें पहावयाचीं म्हणजे नाशकास महिना दोन महिने राहिलें पाहिजे. पण अशा तऱ्हेनें राहून व प्रत्यक्ष अवलोकन करून व ऐतिहासिक माहिती मिळवून नाशीकच्या व त्याच्या आसपासच्या प्रेक्षणीय स्थळांचा वर्णनपर एक स्वतंत्र व मनोरंजक ग्रंथ **नाशीकचा मार्गदर्शक** म्हणून करतां येण्यासारखा आहे असें मला नाशकास असतांना राहून राहून वाटत होतें. पण नाशीकचें दो दिवसाचें चक्कर मारून येणाऱ्या माझ्यासारख्या प्रवाशाचे ते विचार 'मनांतले मांडे' व्हावे हें स्वाभाविक आहे. तेव्हां नाशिकच्या आसपासच्या प्रेक्षणीय स्थळांच्या सविस्तर व सर्वगामी वर्णनाच्या भानगडींत न पडतां दोन दिवसांत ओझरतें पाहिलेल्या स्थळवर्णनास लागणें बरें.

नाशिक नजीकचें पहिलें प्रेक्षणीय—नव्हे—दुर्दर्शनीय स्थळ म्हणजे आनंदवल्ली गांवांतील गोदा नदीतीरावरील मोडकें तोडकें ठिकाण हें होय. हें नाशीकच्या पश्चिमेस अवघें तीन मैल आहे. येथें एक खोल ओढा गोदावरी नदीला येऊन मिळाला आहे. तो ओलांडल्यावर किल्ल्यासारखे मोठे उंच बुरूज व मध्यें मोठ्या दरवाज्याचें द्वार लागतें. आतां हा सर्वभाग अगदीं पडीक झाला आहे. आंत गेल्यावर एक बराच मोठा उंचवटा लागतो व त्या उंचवट्यावर एका छोट्या इमारतीच्या पडक्या भिंती दृष्टीस पडतात. सभोंवारच्या आवाराला असलेल्या तटवजा भिंतीचे थोडे अवशेष दिसतात. सध्यां असें हें अगदीं पडकें झडकें ठिकाण आहे. येथें पेशवाईतील गृहकलहमूर्ती आनंदीबाई रहात असें व येथेंच तिचें निधन झालें. ही जागा हल्लीं कोणी एका पार्शी गृहस्थानें खरेदी केली असून येथली दगडमाती काढून नेली जात आहे असें दिसलें. पण ही नदीकांठचीं उंचच उंच जागा निसर्गरमणीय आहे यांत शंका नाहीं. या उंच ठिकाणावरून गोदावरी नदीचा नागमोडी प्रवाह व त्या नदीकांठच्या हिरव्यागार बागा मोठ्या नयनमनोहर

दिसतात खऱ्या. येथें नदीला छोटेसें धरण बांधलेलें आहे. ओढ्याच्या कांठीं व नदीच्या पात्राला लागून एक छोटेसें महादेवाचें दगडी देऊळ आहे. या ठिकाणीं क्षणभर उभें राहिलें असतांना पेशवाईतील अन्तः-कलहाचें दुःखपर्यवसायी चित्र माझ्या मनःचक्षूपुढें उभें राहिलें व किंचित् विषण्ण मनानें मी हें स्थान पाहून बिऱ्हाडीं परत आलों.

नाशीकच्या आसपासचें दुसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे नाशीकचीं प्रख्यात व पुरातन पांडवलेणीं होत. नाशकास आलेला प्रत्येक प्रवाशी हीं लेणीं पाहिल्याखेरीज रहात नाहीं. नाशीकचें तें एक चित्ताकर्षक स्थान आहे यांत संशय नाहीं. या लेण्यांचें ऐतिहासिक महत्त्व फार आहे. कारण या लेण्यांमध्यें लहान मोठे चोवीस शिलालेख असून ते क्रिस्त-शकांपूर्वीं दोनशेंपासून क्रिस्तशक पांचशेंपर्यंतच्या काळांतील आहेत. या विस्तृत शिलालेखांमध्यें कमींतकमी आठ राजांचा उल्लेख आलेला आहे. हे नाशीकचे शिलालेख बरोबर लावण्याचा मान डॉ. भांडारकरांचा आहे. या नाशीकच्या शिलालेखांचा व नानाघाटांतील व जुन्नर येथील लेण्यांतील शिलालेखांचा डॉ. भांडारकरांना महाराष्ट्राचा पुरातन इति-हास लिहितांना फार उपयोग झालेला आहे. इतकें या लेण्यांचें ऐति-हासिक महत्त्व आहे.

नाशीकच्या दक्षिणेस इगतपुरीला जाणाऱ्या रस्त्यावर पांच मैलांवर **त्रिरश्मी** नांवाच्या त्रिशकूसारख्या सुळक्याच्या अलग अलग तीन टेंकड्या आहेत. त्या टेकड्यांपैकीं रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या पहिल्या टेंकडीच्या अर्ध्या उंचीवर हीं लेणीं खोदलेलीं आहेत. टेंकडीवर जाण्या-करितां रस्त्यापासून मुरूम घालून साधारण सोपीशी वाट टेकडीच्या पायथ्यापर्यंत केलेली आहे. टेकडीचा चढाव सुरू झाला म्हणजे ओबडधोबड पायऱ्यावजा पाऊलवाट आहे. चढाव बेताचा आहे. पण साधारण निम्मी टेकडी चढल्यावर जरा बिकट चढावाची वाट लागते. या डोंगराच्या पूर्व बाजूच्या काळ्या खडकामध्यें हीं लेणीं कोरलेलीं आहेत. यामुळें लेणीं पूर्वाभिमुख आहेत. लेण्यांसमोर उभें राहिलें

म्हणजे नाशीक जिल्ह्याचा कितीतरी विस्तीर्ण भाग एकदम दृग्गोचर होतो. नाशीकच्या दक्षिणेस व पूर्वेस सपाटीचा प्रदेश आहे; उत्तर दिशेकडे व पश्चिम दिशेकडे मात्र मुलुख डोंगराळ असून मध्यें मध्यें उंच उंच पण अलग अलग असे डोंगर व डोंगरकिल्ले फार आहेत. यामुळें क्षितिजापर्यंत मोठा आश्चर्यकारक देखावा दिसतो.

येथें एकंदर २४ लेणीं आहेत. लेण्यांचे आंकडे उत्तर दिशेकडून दक्षिण दिशेकडे घातलेले असल्यामुळें व पाऊलवाट उत्तर दिशेकडेच लेण्याशीं मिळत असल्यामुळें लेणीं अंकानुक्रमानें पहातां येतात. अर्थात् हीं लेणीं क्रिस्तशकापूर्वी दीडशें-दोनशें वर्षांच्या सुमारास खोदलेलीं आहेत व तीं बुद्ध भिक्षूंना राहण्याकरितां तयार केलेलीं आहेत. त्यामुळें लेणीं लहानमोठ्या खोल्यांप्रमाणें आहेत. त्यांत निजण्याकरितां खाटेप्रमाणें दगडी खाटेसारखे ओटे खडकांत खोदून काढलेले आहेत. कांहीं लेणीं साधीं व कमी नक्षीकामाचीं आहेत तर कांहींवर जास्त नक्षीकाम असून सिंह, हत्ती, बैल इत्यादि प्राण्यांचीं सुबक चित्रें कोरलेलीं आहेत. बांधकलेच्या व मूर्तिकलेच्या दृष्टीनें दहा, आठरा, एकोणीस व तेवीस या नंबरांचीं लेणीं विशेष वाखाणण्यासारखीं आहेत. आठरावें लेणें हें चैत्य लेणें आहे. येथें मोठा स्तूप आहे. हें लेणें कार्ल्याच्या चैत्य लेण्याची छोटी व सुबक आवृत्तिच आहे असें लेणें पहातांक्षणीं वाटतें. त्याची बांधणी, आकार व नक्षीकाम कार्ल्याच्या लेण्याप्रमाणें आहे. मात्र हें लेणें कार्ल्याच्यापेक्षां जास्त साधें व कमी नक्षीकामाचें आहे. तेवीसाव्या लेण्यांमध्यें बुद्धाच्या मूर्तीच मूर्ती कोरल्या आहेत. जुन्या राहत्या लेण्यांचें महायानपंथी बौद्धांनीं हें एक मोठें देवालय बनविलें आहे असें दिसतें. हीं सर्व लेणीं एकाच काळांत खोदलेलीं नाहींत; तर हें खोदण्याचें काम शतकानुशतकें चाललेलें असावें असें निरनिराळ्या काळच्या शिलालेखांवरून कळून येतें. हीं लेणीं पाहून येण्यास दोन अडीच तास लागतात व टांग्याला जातां येताचें दीड रुपया भाडें पडतें.

नाशीकच्या अगदीं नजीक नाहीं खरें पण मोटारच्या सोयीमुळें सहज पहातां येण्यासारखें अर्वाचीन काळचें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे दारणा नदीवरील धरण हें होय. नाशीक-इगतपुरी रस्त्यानें तेरा मैल गेल्यावर पूर्वेस धरणाला जाणारा आठ मैलांचा स्वतंत्र रस्ता आहे. माझे ग्रामस्थ रावसाहेब शंकरराव जोशी हे नाशकास असिस्टंट एंजीनीयर असल्यामुळें मला त्यांचे मोटारींतून दारणा धरण सहज पाहतां आलें. हें धरण जवळ जवळ खडकवासला धरणाइतकें मोठें आहे व येथला देखावा साधारणतः खडकवासल्यासारखाच दिसतो. मात्र या धरणांतून खडकवासल्याप्रमाणें प्रत्यक्ष कालवा काढलेला नाहीं. भाटघर धरणाप्रमाणें दारणा धरण हें पाणी सांठविण्याचें धरण आहे. याच्या मोऱ्यांतून जरूरीप्रमाणें नदींतच पाणी सोडलें जातें व पुढें छोटेसें धरण बांधलें असून तेथून नदीच्या दोन्हीं कांठांनीं कालवे काढलेले आहेत. या धरणावरचा तपासणी बंगला साधाच पण फार विस्तृत असून त्याचे पुढें फारच सुबक बाग केली आहे. अर्थात् दारणा धरण हें एक मोठें रमणीय स्थान बनलें आहे व सुटीच्या दिवशीं दोन प्रहरीं येऊन चार दोन तास सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेण्यास हें मोठें नामी स्थान झालें आहे असें मला वाटलें.

नाशीकच्या नजीकचें धार्मिक दृष्ट्या यात्रास्थान म्हणून किंवा निसर्गदृष्ट्या रमणीय स्थान म्हणून अग्रेसरत्व पावलेलें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे त्र्यंबकेश्वर हें होय.

माझे एक जवळचे नातेवाईक भाऊसाहेब भाटे हे त्र्यंबक म्युनसिपालिटीचे सेक्रेटरी असल्यामुळें व ते हल्लीं त्र्यंबकचे कायमचे रहिवासी झाल्यामुळें मला त्रिंबकास जाण्यास विशेष आनंद वाटला. नाशकाहून त्र्यंबकेश्वरास जाण्यास सकाळीं आठ नऊ वाजतां मोटारी निघतात. भाडें आठ आणे पडतें. त्र्यंबक हें गांव नाशकाच्या ( दक्षिण पश्चिमेस ) असून तेथें जाण्यास स्वतंत्र आठरा मैलांची सडक आहे. नाशीकाहून त्र्यंबकचा डोंगर व किल्ला मुळींच दिसत नाहीं. कारण अंजनेरी डोंगरांची रांग

त्र्यंबक डोंगरांच्या पुढें लांबवर पसरलेली आहे. या रांगेमध्यें विलक्षण आकाराचीं निरनिराळीं व एकमेकांपासून तुटक असलेलीं पुष्कळच शिखरें आहेत. तीं काळीं काळीं भोर निर्वृक्ष रुक्ष विचित्र शिखरें मोठीं भीषण दिसतात. त्र्यंबकची सडक ही फार उंचसखल भागांतून जाते. पहिले सात आठ मैल साधारण सपाटी असून या भागांत द्राक्षाची बरीच लागवड आहे असें दिसतें. हिरव्याहिरव्या गार व गर्दपानाच्या त्या द्राक्षाच्या वेली व मध्येंमध्यें द्राक्षवेलींना चढण्याकरितां लावलेल्या झाडांच्या रांगाचरांगा हा द्राक्षाच्या मळ्याचा देखावा मोठा नयनमनोहर आहे खरा. हे मळे टाकल्यावर जास्त डोंगराळ भाग लागतो. पण येथली जमीन दुपिकी असल्यामुळें हा सर्व भूमिभाग हिरवा हिरवागार दिसतो. पावसाळ्यांत भात काढून घेतल्यावर दुसरें पीक गव्हाचें करण्याची या भागांत रीत दिसली. या भागांत पाऊस पुष्कळ पडत असल्यामुळें पावसाळ्यांत कोंकणांतील भात व हिंवाळ्यांत देशावरील गहूं अशीं दुहेरी पिकें या जमीनींत होतात असें दिसून आलें. त्र्यंबक गांव सुमारें चार पांच मैल राहिले म्हणजे हिरव्या हिरव्या गर्द छायेंत वसलेलें तें त्र्यंबक गांव व त्याचे पलीकडे धनुष्याकार तो काळ्याभोर खडकाचा तटासारखा त्र्यंबकचा दुर्गम व दुर्भेद्य उंचच उंच डोंगर व त्याच्या बाजूवरील तें दाट रान असा मोठा आनंदाश्चर्यकारक देखावा एकदम दृग्गोचर होतो. हा थक्क करणारा देखावा पहात पहात असतां मी थोड्याच वेळांत गांवांतील मोटारच्या अड्ड्याशीं आलों व मग तेथून माझे नातेवाईकाचे घरीं गेलों.

निसर्गप्रिय माणसाचें मन मोहून टाकणारें त्र्यंबकमधलें स्थान म्हणजे गंगाद्वार हें होय. चहापाणी झाल्याबरोबर आम्हीं प्रथम गंगाद्वारास जाण्यास निघालों. पूर्वींच्या काळीं या बिकट व १५०० फुटांच्या उंचीवर असलेल्या ठिकाणीं जाणें फार कठीण काम होतें असें सांगतात; पण एका श्रीमंत गुजराती यात्रेकरूनें गंगाद्वारपर्यंत लाख दोन लाख रुपये खर्च करून दगडी पायऱ्या बांधल्यापासून गंगाद्वाराला जाणें जरी श्रमाचें व घाम आणणारें काम असलें तरी तें पुष्कळ कमी बिकट व भयप्रद

आहे. स्थूल व अशक्त माणसाकरितां येथें डोल्या मिळतात. गंगाद्वाराच्या पायऱ्या थेट पुण्याच्या चतुःशृंगीच्या पायऱ्यांप्रमाणें आहेत. मात्र गंगाद्वारे चतुःशृंगीपेक्षां कितीतरी अधिक उंच व उभ्या चढाचें आहे. या दगडी पायऱ्या साडेसातशें आहेत. हें ठिकाण चढतांना मला म्हैसूरच्या चामुंडी टेंकडीची राहून राहून आठवण येत होती. पण चामुंडी टेंकडीपेक्षांही त्र्यंबकचा डोंगर अधिक भीषण आहे. सुमारें निम्मे पायऱ्या चढेपर्यंत डोंगरावर भुरटें पण दाट रान आहे. पुढें मात्र भिंतीसारखा खडा उभा डोंगराचा कडाचकडा लागतो. हा सुमारें हजार फूट उंच असावा. यावर तुरळक वाळलेल्या गवताखेरीज कांहीं एक नाहीं. काळीभोर रुक्ष सुतासारखी सरळ रेषेंत असलेली ती खडकाची भिंत पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें यांत शंका नाहीं. किती दुर्गम व दुर्भेद्य हें ठिकाण वाटतें. पण हल्लीं दगडी पायऱ्या झाल्यामुळें चढण्याला अवघड वाटत नाहीं. मात्र चढतांना दम लागतो व विसांवा न घेत वर जाऊं लागलें तर मनुष्य धापा टाकूं लागतो. पण शेवटीं एकदांचे आम्ही गंगाद्वाराशीं आलों. येथें पायऱ्या संपतात व थोडीशी सपाट फरशी लागते. येथें डोंगराला एक उंचच उंच चिर पडली आहे असें भासतें. येथें छोट्याशा दगडी जोत्यावर छोटेंसें मखरवजा देऊळ आहे. येथें गोदावरी देवीची मूर्ति आहे व येथल्या कुंडामध्यें त्या भयंकर चिरीमधून थेंब थेंब पाणी गळत असतें. हें गोदावरीचें उगमस्थान असें समजतात. त्र्यंबक गांवामधलें हें सर्वांत पवित्र स्थान. ही नदी येथून गुप्त होऊन मग गांवांतील कुशावर्त तीर्थामध्यें प्रगट होते अशी समजूत आहे. गोदावरीचें हें गंगाद्वार म्हणजे उगमस्थान होय, ही गोष्ट अर्वाचीन चिकित्सकबुद्धीला पटण्यासारखी नाहीं. मात्र या डोंगराच्या पाणलोटाचे पाण्यानें गोदावरी नदीस सुरवात होऊन त्र्यंबक गांवांतून जाणारा लहान ओढा पुढें गोदावरी नदी बनतो हें खरें.

गंगाद्वाराच्या फरशीवर उभें राहिलें म्हणजे दूरवरचा देखावा चित्ताकर्षक दिसतो यांत शंका नाहीं. त्र्यंबकाचा हा डोंगर थेट अर्धवर्तुळा-


कार आहे. पश्चिम दिशेकडे तो एकदम तुटलेला आहे व मग पूर्वेकडे अर्धवर्तुळ करून वळलेला आहे. या डोंगराचें पूर्व टोंक म्हणजेच त्र्यंबकचा दुर्भेद्य किल्ला होय. हल्लीं त्या किल्ल्यावर प्रेक्षणीय असें कांहीं एक नाहीं असें कळल्यावरून मी तिकडे जाण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. या किल्ल्याला कृत्रिम तटाची किंवा बुरुजाची जरूरी नाहीं व नव्हती. हा निसर्गदेवीनें तयार केलेला एक स्वाभाविक किल्लाच होय असें वाटल्यावांचून रहात नाहीं. सन १८१८ मध्यें हा किल्ला सर करण्यास विजयी इंग्रज सैन्यास बरेच प्रयास पडले यावरून या किल्ल्याची दुर्भेद्यता दिसून येते.

या गंगाद्वाराशीं बराच वेळ थांबून मग आम्ही परत आलों. पायऱ्या उतरतांना फारसे श्रम पडत नाहींत व मनुष्य पट्‌दिशीं डोंगराचे पायथ्याशीं येतो. त्याप्रमाणें आम्ही बाराचे सुमारास घरीं पोहोंचलों.


दोन प्रहरीं त्र्यंबकेश्वरचें मुख्य देवालय त्र्यंबकेश्वर हें पाहिलें. या देवालयाचें दगडीकाम वाखाणण्यासारखें आहे. नाशीकचीं प्रख्यात देवळें व हें देऊळ या मधला तरतमभाव शोधून काढणें कठीण आहे. हें देवालय नानासाहेब पेशवे यांचे कारकीर्दीमध्यें बांधलेलें आहे. खोदकला बांधकला मूर्तिकला या सर्व दृष्टीनें हें देवालय महाराष्ट्रांतील एक उत्तम देवालय होय यांत शंका नाहीं. या देवळाला इनाम जमिनीखेरीज दरसाल १२००० रुपयांची नक्त नेमणूक आहे व त्याची वंशपरंपरा व्यवस्था जोगळेकर घराण्याकडे आहे.

या देवळाच्या इतकें सुंदर बांधणीचें ठिकाण म्हणजे कुशावर्त तीर्थ होय. हें दगडी पायऱ्यांनीं अलंकृत केलेलें एक मोठें जिवंत पाण्याचें चौकोनी कुंड आहे. तिन्ही बाजूंस दगडी सभामंडप व ओऱ्या बांधल्या आहेत. हें बांधकाम मोठें सुबक असून, या तीर्थाचा मनावर मोठा अनुकूल परिणाम होतो यांत शंका नाहीं. दर सोमवारीं त्र्यंबकेश्वराची पालखी निघते व ती देवळांतून कुशावर्तास जाऊन मग परत येते. या


स्थल प्रत
नं.




नं.२१] त्रिबंक : गंगेची मूर्ति [पान १७६




नं. २२] त्रिंबकेश्वराचा मुकुट [१७६




नं. २३ ] त्रिंबक : श्री त्र्यंबकेश्वराचें देवालय [पान १७६



नं. २४ ] त्र्यंबकेश्वराच्या देवळांतील नक्षीकाम



नं. २५ ] त्रिंबक : कुशावर्त [ पान १७७



नाशिक काळ्या रामाच्या देवालयाचे महाद्वार

नं. २६ ] [ पान १७७

दिवशीं नाशकाहून पुष्कळ यात्रेकरू येतात. मी सोमवारींच त्र्यंबकास गेल्यामुळें मला सहज ही मिरवणूक पाहण्यास मिळाली व मिरवणूक संपल्यावर देवाचा रत्नजडित मुकुट पहावयास सांपडला. हा मुकुट बऱ्याच जुन्या काळचा असावा. याचें जडावाचें काम वाखाणण्यासारखें आहे. त्र्यंबक गांवाचे आसपास कितीतरी तलाव आहेत. ते सर्व दगडांनीं बांधून काढलेले आहेत. या अर्धवर्तुळाकार डोंगरांत जें पावसाचें पाणी पडतें तें सर्व सांठवून ठेवण्याची पूर्वीच्या राजवटींत तजवीज केलेली दिसते. अशा एका मोठ्या तलावावर पंप लावून गांवाला नळाच्या पाण्याचा पुरवठा करण्यांत आला आहे. यामुळें हल्लीं गांवांत रोगराई पुष्कळ कमी असते. त्र्यंबक हें गांव जुन्या महाबळेश्वराप्रमाणें उंचावर नाहीं. तरी पण या गांवाच्या दक्षिण पश्चिम व पूर्व दिशेस त्र्यंबक डोंगरांची उंचचउंच भिंत असल्यामुळें हें गांव उत्तराभिमुख घराप्रमाणें गार राहतें. येथें उन्हाळ्यामध्यें सुद्धां फार उन्हाळा भासत नाहीं. छोट्याशा शीतल निवासस्थानासारखें हें गांव राहण्यास फार सोयीचें आहे असें मला वाटलें.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं 'नीलपर्वत' नांवाची पश्चिमेस असलेली टेंकडी पहावयास गेलों. ही पुण्याच्या पर्वतीसारखी एक टेकडी असून टेंकडीवर नीलांबिका देवीचें व दत्तात्रयाचें अशीं दोन देवळें आहेत. या टेंकडीवर जाण्यास गंगाद्वाराप्रमाणें दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत. ही छोटीशी टेकडी हा या गांवचा एक छोटा अलंकार आहे. याचे पायथ्याचे बाजूस निवृत्तिनाथाची समाधी आहे.

निवृत्तिनाथाच्या पुण्यतिथीचे दिवशीं येथें मोठी यात्रा जमते. ही यात्रा अलीकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर जमूं लागली आहे असें कळलें.

जुनें गोदावरीचें उगमस्थान म्हणून व निवृत्तिनाथाचें समाधिस्थान म्हणून त्र्यंबकास दुहेरी धार्मिक पावित्र्य आलें आहे. यामुळें येथें येणाऱ्या

यात्रेकरूंचें प्रमाण वाढतें आहे. यात्रेकरूंवर येथें चार आणे कर आहे. या कराच्या उत्पन्नापासून गांवच्या म्युनिसिपालिटीला शहराचें आरोग्य राखतां येऊन कायम स्वरूपाच्या सुधारणाही करतां येतात असें दिसतें. झालें. माझें त्र्यंबकचें दृश्यदर्शन संपलें. पुनः पहाण्याची इच्छा उत्पन्न करण्याइतकें निसर्गरमणीय हें स्थान आहे यांत शंका नाहीं.

या माझ्या नाशीक-त्र्यंबकेश्वराच्या १३० मैलांच्या पायगाडीच्या चक्करानें माझ्याच चक्करमालेचा कळस झाला. आतां फक्त उपसंहार राहिला.

# चक्कर १० वें

## उपसंहार

**आमच्या पायगाडीच्या चक्करांची** कल्पना व योजना माझे सहाध्यापक व सन्मित्र कै. डॉ. पां. दा. गुणे यांची होय. डॉक्टर गुणे यांच्या-माझ्या वयामध्यें पुष्कळ अंतर, तेव्हां त्यांची माझी मूळपासूनची मैत्री असणें शक्य नव्हतें. त्यांचें मराठी शिक्षण, राहुरीस व इंग्रजी शाळेचें शिक्षण अहमदनगरीं झालें. प्रवेशपरीक्षेंत त्यांनीं संस्कृतची पहिली शिष्यवृत्ति मिळविली. कॉलेजांतील त्यांचें सर्व शिक्षण मुंबईत विल्सन कॉलेजमध्यें झालें व विश्वविद्यालयांतील संस्कृत विषयाकरितां ठेविलेल्या शिष्यवृत्त्या व बक्षिसें त्यांनीं मिळविलीं व संस्कृत विषय घेऊन ते एम. ए. ची परीक्षा दुसऱ्या क्लासांत उत्तीर्ण झाले व तेव्हांपासून त्यांनीं संस्कृतभाषेचे पारंगत विद्यार्थी व अभ्यासू म्हणून नांव केलें. खासगी शिक्षणसंस्थांमध्यें शिरून आपलें आयुष्य शिक्षणदानांत घालविण्याचें ध्येय ठरवून ते पुण्याच्या डे. ए. सोसायटीचे आजीव सभासद होऊन फर्ग्युसन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून सन १९०९।१० मध्यें पुण्यास आले. तेव्हांपासून डॉ. गुणे यांचा माझा थोडा परिचय झाला खरा. पण ते लवकरच जर्मनीला संस्कृताचा व विशेषतः भाषाशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां गेले व डॉक्टर ऑफ फिलॉसफीची पदवी मिळवून सन १९१३ मध्यें परत आले. तेव्हांपासून त्यांचा दृढतर परिचय होत चालला. त्यांना माझ्याप्रमाणेंच प्रवासाचा व दृश्यदर्शनाचा अतोनात नाद आहे असें दिसलें. त्यांनीं युरोपांत असतांना लिहिलेलीं व मनोरंजनाच्या मित्रांनीं प्रसिद्ध केलेलीं प्रवासवर्णनपर पत्रें या म्हणण्याची साक्ष पटवितात. तसेंच पायगाडीसारखें स्वस्त, सुलभ,

जलद व स्वावलंबी प्रवासाचें साधन हें माझ्याप्रमाणें त्यांचेंही फार आवडतें आहे असें समजलें. आम्हां दोघांमध्यें वयसमानत्व नव्हतें खरें. पण **समानशीलव्यसनेषु सख्यम्** या न्यायानें आम्हां दोघांचा फार निकट स्नेह जमला.

रोज तास दोन तास एकमेकांच्या सहवासांत व संभाषणांत घालविण्यास सांपडून शिवाय दररोज नियमित व्यायामही व्हावा या दृष्टीनें व दीडदोन दिवसांच्या सुटीमध्यें रहात्या ठिकाणच्या **आसपासच्या व नातिदूरच्या** प्रेक्षणीय स्थळांच्या दृश्यदर्शनाचा निरपेक्ष आनंद अनुभवावयास सांपडावा म्हणून ही आमच्या पायगाडीच्या चक्राची कल्पना निघाली व आम्ही पायगाडीचीं चक्रें मारूं लागलों. त्यामध्यें आम्हांला नानाविध अनुभव आले व अडीअडचणींचे प्रसंग आले. या आमच्या अनुभवांना व प्रसंगांना **वाचा** फोडण्याचें काम माझे मित्र, मासिक मनोरंजनाचे संपादक कै. का. र. मित्र यांनीं केलें. आम्ही आपल्या पायगाडीच्या चक्राचीं वर्णनें त्यांच्या मासिकांत प्रसिद्ध करावीं अशी त्यांनीं विनंति केली. तदनुरूप मी माझ्या सवडीप्रमाणें आमच्या कांहीं कांहीं चक्रांचीं वर्णनें प्रथमतः मासिक मनोरंजनाकरितां व मग दुसऱ्याही मासिकाकरितां लिहूं लागलों.

पुढें मी विलिंग्डन कॉलेजच्या स्थापनेकरितां दक्षिण महाराष्ट्रांत कायमचा राहण्यास आलों. त्यामुळें आमच्या पायगाडीच्या चक्रांना खळ पडला. एका नव्या शिक्षणसंस्थेचें भिक्षापात्र माझ्या हातीं पडलें. त्यामुळं माझें दृश्यदर्शन थांबलें. या एका तपाच्या काळांत मीं पुष्कळ प्रवास केला खरा; पण कोठें तो आमचा पूर्वींचा निरपेक्ष आनंददायी व सृष्टिसुंदरीचीं विविधरूपें दाखविणारा प्रवास व कोठें तो सकाम चिंतादायी व देणगी देणारांचे सढळ किंवा कंजूष हात दाखविणारा प्रवास ! पहिला प्रवास वाङ्मयस्फूर्ति देणारा तर दुसरा प्रवास वाङ्मय पराङ्मुख करणारा ! म्हणून या काळामध्यें आमच्या पायगाडीच्या चक्रांचीं वर्णनें बंद पडलीं; तरी पण मला दुसरे मित्र मिळाले व सबंध बारा

वर्षांत मला वाङ्मयस्फूर्तिदायक असे तीनच प्रवास वाटले. त्यांचीं वर्णनें या पुस्तकांत घातलीं आहेत.

आमच्या पायगाडीच्या चक्करांचा कळस म्हणजे डॉ. गुणे यांचे समवेत केलेला पुणें ते नाशीक या १३० मैलांच्या पायगाडीचा प्रवास होय. तो डॉ. गुण्यांच्या हयातींत सन १९१७ मध्यें झालेला आमचा प्रवास होय. तरी पण तो इमारतीच्या कळसाप्रमाणेंच असल्यामुळें या प्रवासवृत्तपर पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत तो वृत्तांत छापिला आहे.

माझ्या प्रवासवृत्तमालेच्या या पुष्पाचा उपसंहार लिहितांना मला एकप्रकारची विलक्षण उद्विग्नता वाटत आहे. कारण आमच्या **पायगाडीच्या चक्कराच्या**. वांटेकऱ्यांपैकीं पहिले मित्र अकालीं मृत्युमुखीं पडले. दुसऱ्या मित्राची मैत्री मंदावली तर तिसरे मित्र देशांतरीं गेले. शेवटीं **आमच्या पायगाडीच्या चक्करांची** अधिष्ठात्री देवता व माझी वीस वर्षांची प्रिय सखी '**पायगाडी**' हिला माझ्या छातींतील क्षणिक पण दुःसाध्य दुखण्यामुळें डॉक्टरच्या सल्ल्यावरून सोडचिठी द्यावी लागली व माझीं पायगाडीचीं चक्करें कायमचींच बंद झालीं.

पण वाङ्मयरूपानें चिरस्थायी झालेल्या आमच्या पायगाडीच्या चक्करांच्या सिंहावलोकनानें माझ्या मनाला कितीतरी करमणूक होते. या पुस्तकाच्या वाचनानें वाचकांच्या मनाचीहि तशीच चार घटका करमणूक झाली तर माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मला वाटेल.

# सूचि.


अग्रा ५१
अग्निमतारा ८७, ९४, १०१
अग्निमशहा १०१
अमृतराव ३७
अमेरिका ४, १०
अल्लाउद्दिन ६७
अवलाई १६, १७
अहिल्याबाई १४३
ॲरिस्टॉटल १४५
आंबिल ७७
आल्सेस ७५
आवा ५३
आस्त्रिया ७४, ७५
आळंदी २८
इंग्लंड ७५
इटाली ७५
इंद्रायणी १५, १६, १९, २८
उरमोडी ८६, ८७
एलवाडी २१
एलफिन्स्टन ५३, ७३
एलट्री ७३
औरंगाबाद ५१
औरंगजेब ६८, ७१, ८७
अंबरखाना ४५
कनकाई १६०
कळसूबाई १५५
कागदी ४०
कातरज २६, ३३, ७७
कापुरवहाळ ५६, ५९, ६२
काव्यविहारी १०७
का. र. मित्र १८०
कालिदास १४६
कुकडी ३७, ४६
कुलापकर ४५
केदारेश्वर ६६
कोंडाणा ६९, ७१
गणेशडोंगर ३६
गंगाबाई पेशवे ७२
घेरिया १३०
चन्नापूर १२०
चारुदत्त ५४
चंडीराम ५०
चंद्रचूड १६६
चांदबिबी १००
चौल ५२
जनस्थान १६२
जयसिंग ७०
जाधव ६७
जांबा ८
जाळवा ५
जिजाबाई ५२
जुम्मामशीद ४२
डिकन्स ९१
तहपान ५१
तानाजी ७१
ताराबाई ७१, ७२
तुकाराम १२, १३, १५, १६, २२, २३
तुळजा ३६
तोरणा ६६
त्रिंबकटक १६२

त्रिंबकजी डेंगळे ७३
त्र्यंबकेश्वर १४५, १७६
दमाजी थोरात ७२
दिलावरखान १००
दिलेरखान ६८, ६९
देवगड ११२
देवल १०३
देवगिरी ५१
देशपांडे बाजी ६९
देहू १३, १५, १६, २१, २६, २८
दौलताबाद ५१
धनाजी ७२
धुलप १२९, १३५
नवशिख १६४
नाईक निंबाळकर १३८
नाना फडणवीस ७२, १२८
नारो शंकर १६७, १६८
नीलकंठ नाईक ६८
नौरस्तारा ८७, ९४
न्यू इंग्लिश स्कूल २६
पद्मगड १२६
पद्मनगर १६२
पद्मावती ६१, ६३
परळी ८६, ८७, ९०, ९३, ९४
परशुरामभाऊ ५३
पर्लनल्प ६
पीरजादे ४२
पीर दरवाजा ४४
पुंड्या ६
पुरंदर ५५, ५७, ५८, ६०, ६१, ६२, ६३
६९, ७१, ७३
पंचवटी १६१
पांडवगण १२६
प्रागजी प्रभु १००
फर्गसन कॉलेज ३१
फलटण १३६, १३८
फ्रायर ५३
बनीयन ११४
बनेश्वर ७९, १२७
बहामनी ६७, ९३
बहादुर निजाम ५२
बाजीराव ४२, ५३
बापदेवखिंड ५७, ५८, ६०
बावटा बुरुज १३४
बालेश्वर १५५
बाळाजी विश्वनाथ ६७, ७२
बोधलेबुवा ६३
बोल्होबा १६
बोर्सीनिया ७४
बौद्धधर्म ३५
बंकिमचंद्र ९१
भांडार १७, १९
भुलेश्वर ६०
भुजंग ८४
भैरवखिंड ६१
भोज १००
भोरुरी १४९
मृच्छकटिक १०८
मल्हारेश्वर १४१
मल्हारराव होळकर १३६, १३८, १४०
महमदशाहा ९३

महाराष्ट्रवेद १३
माथेरान ५८
माधवराव ५३
मानमोडा ३६, ४४
मालोजी ५२, ६७
मिरझाराजा ६८, ६९
मुरुम १३६, १४०, १४१
मोरे १६
मंगलाई ९९
मांजरी १, ३, २६
यवतेश्वर ८६
राघोबादादा ३७, ६७
राजकोट १२६
राजगड ६६
रामदास ९४
रामचंद्रपंत अमात्य १००
रामायण ६३
रामेश्वर भट १८
रावबाजी ५४, ७३
लेण्याद्रि ३६, ३८, ३९
लोहगांव १९
लोरेन ७५
वृद्धेश्वर ३०
वज्रगड ५८, ६३, ६५, ६९
वाघोटन १३०, १३४
वाल्मिकि ६३
वाल्हे ६३
विजापूर ५२, ५३, ६७, ९३
विजयदुर्ग ११२
विजयगड १२७
विलिंग्डन कॉलेज १८०
शरणपूर १६५
शहाजी ५२, ६७, ६८
शाक्तपंथ २३
शातकरणी ३७
शाहीस्तेखान ६८
शाहू ५३, ६५, ७१, ७२
शिवनेरी २७, ३६, ४३, ४५, ४६, ५०, ५१, ५२, ५४
शिवाबाई ४४, ४५, ५२
शिवाजी १८, ४२, ४७, ४८, ५२, ५३, ६१, ६७, ६८, ७०, ९३, ९४, ९६
शिलाहार १००
शंकराजी ७१, ७२
शंभू महादेव १३८
सखाराम बापू ७२
सर्जेकोट १२६
सवाई माधवराव ६७, ७२, ७३
सराजो ७५
सह्याद्रि ८७
साक्रेटिस २२, २३
सिंहगड ५३, ५८, ६०, ६६
सिंधुदुर्ग ११२
सीतागुंफा ३७
सुकूल ८४
सुंदर नारायण १६६
सुराजोव्ह ७४
सुलासदत्त ३८
सोफिस्ट २३
सौदागर घुमट ४९
संभाजी ९४
संगमेश्वर १०६
संगमनाथ १०७
हणमंत नाईक १५६
हिरण्यक ३८

REFBK-0005414